Received 2d June 1903.
Registn. No. 804 of 1903/4.

# श्रीएकनाथ.

## ( भक्तिरसपर व ऐतिहासिक नाटक. )

श्री एकनाथसदनीं माधवजी सर्व काम हें करितो ॥
स्वकरें चंदन घासी, गंगेचें पाणि कावडीं भरितो ॥ १ ॥

मोरोपंत.

MARATHI TRANSLATION SOCIETY POONA. 1894

**वासुदेव रंगनाथ शिरवळकर.**

असिस्टंट मास्तर पूना नेटिव इन्स्टिटयूशन, 'पानपतचा मुकाबला,' 'श्री तुकाराम' या नाटकांचा कर्ता व 'मौनयौवना,' 'श्रीविक्रमादित्य' भाग १।२, 'राणा भीमदेव' या पुस्तकांच्या कर्त्यांपैकीं एक.

यांनीं रचिलें.

तें

पुणें येथें

"आर्यभूषण" छापखान्यांत रा० हरी नारायण गोखले
यांनीं छापून रा० वासुदेव रंगनाथ शिरवळकर
यांनीं प्रसिद्ध केलें.

सन १९०३.

किंमत १ रुपया; ट. ह. ०१.

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या आक्टाप्रमाणें नोंदून पुस्तक छापविण्याचा, रंगभूमीवर प्रयोग करण्याचा, संगीत व भाषांतर करण्याचा वगैरे सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपल्याकडे ठेविले आहेत.

हा ग्रंथ

**श्रीमंत सरदार**

# सर गंगाधर गणेश ऊर्फ बाळासाहेब पटवर्धन,

के. सी. आय्. ई.

# मिरज संस्थानचे अधिपति

**यांचे**

असामान्य गुणग्राहकत्व, विद्यावृद्धीविषयीं उत्कंठा, औदार्य, प्रजेच्या कल्याणाविषयीं व शिक्षणाविषयीं अश्रांत परिश्रम व देशभाषेच्या उन्नतीकरितां पराकाष्ठेची कळकळ इत्यादि

## अनेक सद्गुण

मनांत आणून त्यांच्या सेवेशीं परमादरपूर्वक त्यांच्याच परवानगीनें

## अर्पण केला आहे

श्रीमंतांचा नम्रसेवक

**ग्रंथकर्ता.**

# प्रस्तावना.

If you have all the world and all heaven to love you,
And that love with its power would you fully convince,
Then love all the world; and men royal and true,
Will make cry as you pass-God bless him, the Prince!

RALPH WALDRO TRINE.

ब्राह्मणाचा पोर खेळिया एका भला। तेणें जन खेळकर केला रे॥
जनार्दन बसवंत करुनियां। तेणें वैष्णवांचा मेळ मिळविला रे॥
एकचि घाई खेळतां खेळतो। आपणची बसवंत झाला रे॥

टिपरीचे अभंग—तुकाराम.

एकनाथ पूर्ण ज्ञानी॥ अवतार जाहला प्रतिष्ठानीं॥
द्वादश वर्षें ज्याच्या सदनीं॥ वाहिलें पाणी श्रीकृष्णें॥ १॥

संतलीलामृत—महिपती.

गोपां किति गोपींना नेदी उदकासि आणिकां वडिलां॥
तो एकनाथसदनीं गंध उगाळूनि आणि कावडिला॥ १॥

नाथचरित्र—मोरोपंत.

ज्यानें बाल्यावस्थेंत एकनिष्ठपणें सेवा करून सद्गुरु श्रीजनार्दनस्वामी यांची कृपा संपादन करून ब्रम्हज्ञानाची प्राप्ति करून घेतली; ज्याला भगवान् श्रीदत्तात्रेय यांनीं प्रसन्न होऊन प्रत्यक्ष दर्शन देऊन ज्याच्या मस्तकीं आपला वरदहस्त ठेविला; ज्याच्या घरीं प्रत्यक्ष श्रीकृष्णपरमात्म्यानें कावडीनें पाणी वाहण्याचीं, उच्छिष्टें काढण्याचीं, दीपकपंक्ति प्रज्वलित करण्याचीं वगैरे नीचतर कामें केलीं; ज्या पुण्यपुरुषानें आपलें सर्व वित्त व बल यांचा व्यय अंध, पंगु, निराश्रित, व अनाथ लोकांस भोजनें घालण्यांत व त्यांचें दुःख निवारण करण्यांतच केला; ज्याला महाराष्ट्रभाषावधूची अनास्था व अवहेलना सहन न होऊन ज्यानें आपल्या महाराष्ट्र कवित्वानें व वक्तृत्वानें विद्वान मुकुटमणि म्हणविणाऱ्या व गीर्वाण भाषावधूवरच मोर्चेलें उडविणाऱ्या काशीक्षेत्रवासी क्रोधावश झालेल्या संन्याशांना व शास्त्रीपंडितांना खालीं पहावयास लाविलें; ज्याचें अप्रतिम वक्तृत्व, रसाळ वाणी, गंभीर उपदेश, स्वयंभु काव्य, व आत्मानात्मविचार श्रवण केल्याबरोबर वर्णश्रेष्ठ ब्रम्हवृंद चित्रासारखे तटस्थ होत; ज्याची स्वाभाविक

शांतवृत्ति, सहनशीलता, व मनोनिग्रह पाहून अंतरशुद्धि झाली नसतां ब्राम्हण धर्माची घमेंड मिरविणाऱ्या कितीएक कुत्सित बुद्धीच्या लोकांना ज्याला शरण जावें लागलें व ज्यानें आपली योग्यता केवळ प्राच्यदेशीय सॅक्रेटिसापेक्षां अधिक करून घेतली; प्रत्यक्ष स्वस्त्रीला भरजनसमुदाया-मध्यें एका द्रव्यलोभी शठानें धरिली असतां ज्याचा सहनशीलतेचा मनोरा बालाग्रही ढळला नाहीं, यामुळें ज्याला अजातशत्रु युधिष्ठिराची साम्यता आली; जो साधुवृंदांचें शिरोभूषण, मोटमोठ्या तत्ववेत्यांनीं व पंडितांनीं जीं जीं लक्षणें साधूंचे ठायीं असावींत असें प्रतिपादन केलें आहे, तीं सर्व ज्याचे ठिकाणीं जागृत होतीं, इतकेंच नाहीं परंतु जो सन्मणिमालेंत चम-कलेला, जो संसारांत असून अलिप्त, ज्याची कृति अखंडदंडायमान, जो ई-श्वराचे ठिकाणीं तादात्म्य पावलेला, त्रिपुटी मावळलेला, तद्रूप झालेला, केवळ विष्णूचा अवतार;ज्यानें वेदाध्ययन व तपव्रतें न करणाऱ्या स्त्रीशूद्रांना आपल्या भागवत धर्मानें ईश्वरप्राप्तीचा सुलभमार्ग दाखविला; आशा कल्पना ज्या भवनदीच्या दरडी आहेत, ज्या नदीचा मायारूपी जळाचा ओघ सोसाट्यानें वाहत आहे, जीमध्यें मोहरूपी मासे क्रीडत आहेत, भ्रांतीच्या सुसरी गिळीत आहेत, अहंकाराच्या लाटा उसळत आहेत, कामक्रोधाचे भोंवरे बुडवून तळला पोंचवीत आहेत, अशा अति दुस्तर भवनदींतून सद्गुरुरूपी सांगडीनें जो दंड थोपटून सहज पैलतीरास निघून गेला; ज्यानें श्रीभावार्थ रामायण, रुक्मिणीस्वयंवरासारखे चरित्रविषयक ग्रंथ केले, व स्वात्मसुख, चतुःश्लोकी भागवत, हस्तामलक, आनंदलहरी, व श्रीमद्भागवताचे एकाद-शस्कंधावर सुरस टीका करून आपला कीर्तिरूपी ध्वज भक्तिरूपी मंदिरावर अक्षय फडकावयास लाविला; अशा श्रीएकनाथ महाराजांचें चरित्र नाटक-रूपानें मार्मिक जनापुढें मांडण्यास त्यांच्यासारखाच थोर मनाचा आणि कुशाग्र बुद्धीचा साधु पुरुष पाहिजे होता, परंतुः—

कां जे लळेयाचे लळे सरती ॥ मनोरथांचे मनोरथ पुरती ॥
जरी माहेरें श्रीमंतें होती ॥ तुह्मां ऐसीं ॥ १ ॥
ना तरी बाळक बोबडां बोलीं ॥ वांकुडा विचुका पाउलीं ॥
तें चोज करूनि माउली ॥ रिझे जेवीं ॥ २ ॥
तेसें तुमचें अवधान धाय ॥ आणि तुह्मी ह्मणा हें होय ॥
ऐसें वक्तृत्व कवणा आहे ॥ जेणें रिझा तुह्मी ॥ ३ ॥
तरि विश्वप्रगटितिया गभस्ती ॥ काय हातिवेन न कीजे आरती ॥
कां चुळोदकें अपांपति ॥ अर्घ्य न दीजे ॥ ४ ॥
प्रभू तुह्मी महेशाचिया मूर्ती ॥ आणि मी दुबळों अर्चितसें भक्ती ॥
ह्मणोनी बोल जरी गंगावती ॥ तऱ्ही स्वीकाराल कीं ॥ ५ ॥

बाळक बापाचिये ताटीं रिगे ॥ आणि बापातेंच जेवऊं लागे ॥
कीं तो संतोषलेनि वेगें ॥ मुखचि वोढवी ॥ ६ ॥
तैसा मी जरी तुह्मांप्रती ॥ चावटी करितसें बाळमती ॥
तरी तुह्मी संतोषिजे ऐसी जाती ॥ प्रेमाची असे ॥ ७ ॥
अहो तान्हयाचें लागतां झटे ॥ तेणें अधिकचि पान्हा फुटे ॥
रोषें प्रेम दुणवटे ॥ पढियंतयाचेनि ॥ ८ ॥
ह्मणउनि मज लेंकरु वाचेनि बोले ॥ तुमचें कृपाळूपण निदैलें ॥
तें चेइलें ऐसें जी जाणवलें ॥ यालागीं बोलिलों मी ॥ ९ ॥

श्रीज्ञानेश्वर.

या न्यायानें अशा गहन विषयाचें आकलन करण्याचा शक्त्यनुसार प्रयत्न केलेला आहे.

"एकनाथाला आकाशवाणी झाल्यानंतर त्यांनीं बारा वर्षें अध्ययन करून बावीस हजार ग्रंथ लिहिला, अशी कथा आहे. त्यांच्या ग्रंथांत भागवतधर्म तर दिसलाच; पण चरित्रांतही दिसला. भागवतधर्म चरित्रांत दाखविणें हें विशेष भाग्य एकनाथाचेंच होतें. हा भागवतधर्म सांगण्यास सोपा, पण आचरण्यास कठीण असा आहे. ज्ञानेश्वरांत गृहस्थाश्रम कमी, त्याचप्रमाणें रामदासांतही गृहस्थाश्रम कमी. ब्रह्मचाराच्या मार्गांत मोह कमी. परंतु एकनाथांनीं गृहस्थाश्रमीं राहून संसार वगैरे करून, भागवतधर्माचा प्रभाव विशेष रीतीनें दाखविला, हें विशेष आहे. आपलें मुख्य कर्तव्य भगवंताची ओळख व्हावी, हें आहे. ती कशी होईल ह्याविषयीं तुकारामांनीं व ज्ञानदेवांनीं सांगितलें आहे. पण, एकनाथचरित्रांत त्याची परिस्फुटता विशेष दिसून येते. ह्या पुरुषाची आठवण व्हावी ह्मणून त्याची पुण्यतिथी केली पाहिजे. ह्यांच्यासारखे भाग्यवान् पुरुष इतर देशांत झाले असतील, नाहीं असें नाहीं; पण आपणाला त्यांच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. तर जे एका रक्तामांसाचे, त्यांच्याविषयीं आम्हांला विचार करावयाचा. त्यांच्या शरीराचें मांस जर आमच्यांत आहे, तर त्यांच्या विचारांचें मांस आमच्यांत कां असूं नये ?"

न्यायमूर्ति रानडे.

"एकनाथस्वामींचीं वचनें घेऊन भागवतधर्माचें त्यांनीं जें उपपादन केलें त्यांतील सारांश असा आहे कीं, ज्ञानमार्ग आणि योगमार्ग हेच दोन खरे मानिले, तर पुष्कळ साध्या मनुष्यांस उन्नतीची आशा नाहीं असें होऊं लागेल. कारण कीं, ते मार्ग अत्यंत दुष्कर, एखाददुसऱ्यासच साध्य. केवळ कर्ममार्गाचें अवलंबन केलें असतां जडता प्राप्त होते, अंतरात्मा विकसित होत नाहीं; परंतु भागवतमार्ग सर्वांस–साध्याभोळ्यांससुद्धां–साध्य आणि त्याच्यायोगें प्रेमळता, दया, क्षमा इत्यादि गुण अंतरात्म्याच्या ठायीं

विकसित होतात. शिवाय हा मार्ग सर्व जातींच्या पुरुषांस आणि स्त्रियांस मोकळा आहे त्याप्रमाणें वरील तीन नाहींत. ह्मणून भागवतधर्म ह्मणजे देवाच्या ठायीं शुद्ध भावानें अनुराग आणि तत्पूर्वक त्याचें भजन आणि पूजन हाच श्रेष्ठ मार्ग. "

डा. भांडारकर.

वरील दोन उतारे केवळ आमच्या नाटकांतील नायक पात्र जो एकनाथ त्याची महती अर्वाचीन कालच्या विद्याचारसंपन्न मानलेल्या व एकप्रकारें समाजाचें धुरीणत्व धारण केलेल्या लोकांत किती मानली जात आहे, हें दर्शविण्याकरितां दिले आहेत. आह्मीं पूर्वी रचिलेल्या श्रीतुकाराम नाटकाविषयीं डा. भांडारकर लिहितात कीं,--

"In the play entitled "*S'ri-Tukârâm*," the author Mr. V. R. Shirvalkar has skilfully arranged the principal incidents in the life of the Saint, mentioned by Mahîpati, in a manner to bring about the dramatic unity of action. The play is interesting and impressive, and the style generally happy and worthy of a practised writer. The work, as a whole, is certainly a very meritorious production. "

परंतु, ज्याच्या चरित्रांत आजपावेतों या पृथ्वीच्या पाठीवर जितके महान, बुद्धिवान, पंडित, वक्ते, तत्वज्ञानी ह्मणून होऊन गेले त्यांच्या तर्कशक्तीस पुरून अनंत उरलेला जो विश्वव्यापक परमेश्वर, त्याच्याचविषयीं अति विस्तृत विचार भरलेले आहेत, अशा विचारांचे मजसारख्या अल्पमतीकडून नाटकरूपानें यथार्थ विवरण होणें परमाशक्य आहे. असो. प्रस्तुत नाटकांतील मुर्तजा निजामशहा बादशहा या पात्रासंबंधानें विशेष खुलासा करावयाचा आहे तो असाः—

ब्राह्मणी राज्य स्थापन करण्याची आख्यायिका सर्वत्र प्रसिद्धच आहे. सदर राज्याचे जे पांच विभाग झाले त्यापैकीं अहमदनगरच्या निजामशाही गादीची स्थापना करणारा सुलतान अहमदशहा निजामशहा बहिरी हा होय. हा बादशहा छत्रपति शिवाजीमहाराजांप्रमाणें मोठा शूर व कारस्थानी असावा, असें इतिहासाच्या अवलोकनानें निदर्शनास येतें. ह्यानेंच अहमदनगर शहर वसविलें, व इ. स. १५०८ मध्यें दौलताबादचा किल्ला मोठ्या पराक्रमानें सात वर्षें वेढा घालून ब्राह्मणी राज्याचा सुभेदार जो मलिक वुज्यू याजपासून घेतला. यानें अनेक वेळां गुजराथ देशाचा प्रबळ बादशहा जो बहादुरशहा त्यास पराजित केलें, व एके प्रसंगीं तर त्याच्याच पीलखान्यांतील उन्मत्त हत्ती मध्यानरात्रीं त्याच्या झनानखान्यांत सोडून सर्वांची दाणादाण उडवून त्यास पराजित केलें. हा जातीचा देशस्थ ब्राह्मण असून मोंगलाईंतील पाथरी या गांवचा राहणारा होता. पुढें त्यास

प्रसंगानुसार जरी महमदीय धर्माची दीक्षा घ्यावी लागली, तरी त्याचें वर्तन पायाशुद्ध होतें, हें आपल्यास पुढील लेखावरून दिसून येतें:—

"Though the virtues of this prince exceeded all that can be comprized in the bounds of description, yet, in compliance with the custom of historians, the author (Ferishta) attempts to relate a few. Among his great qualities, were continence and modesty. When he rode through the streets of the city he never looked aside to the right or left, lest his eyes might fall upon another's wife. When he was a young man and marched to reduce the fortress of Kaweel, there was taken among the captives a young lady of exquisite beauty, who was presented as an acceptable gift to the Sultan by his first minister. Ahmedshaw was charmed with her person, but being told by her that she had a husband, who, with all her family, was among the prisoners, he bridled his desire, and restored her uncontaminated to her friends, with presents to a great amount." Ferishta's History of the Deccan.

हा बादशहा इ. स. १५०८ त मेल्यानंतर त्याचा पुत्र सुलतान बुऱ्हाण निजामशहा बहिरी गादीवर बसला. ह्यानें इ. स. १५५६ पावेतों राज्य केलें. हा आपल्या बापाप्रमाणेंच शूर होता. ह्याचे कारकीर्दींत गुजराथ देशाचा बादशहा सुलतान बहादुरशहा हा फार प्रबळ होऊन त्यानें निजामशाहीचें राजधानीचें शहर जें अहमदनगर तें जिंकिलें. परंतु तें बादशहानें परत मिळविलें. शेख जाफर नांवाचा त्याचा दिवाण होता, त्याच्या मूर्खपणामुळें आपल्यावर असा प्रसंग आला, व प्रजाजन व फौजेंतील लढाऊ लोकही त्याच्या स्वभावास फार त्रासून गेले आहेत, असें पाहून बुऱ्हाण निजामशहानें त्यास पदभ्रष्ट करून कुमारसेन नांवाच्या ब्राम्हणास पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. हा ब्राम्हण फार चतुर, प्रामाणिक व पराकाष्ठेचा धूर्त होता. ह्या बादशहापासून दिवाणाचें पद ब्राम्हण लोकांस मिळत गेलें असें दिसतें; व म्हणूनच जनार्दनपंत देशपांडे एकनाथाचे गुरु मुर्तजा निजामशहाबादशहाचे दिवाण झाले असावेत असें वाटतें. प्रसिद्ध मुत्सद्दी दादू नरसू काळे हाही बुऱ्हाणशहा बादशहाचे अमदानींतच प्रसिद्धीस आला.

ह्या बादशहानंतर सुलतान हुसेन निजामशहा हा गादीवर बसला. ह्यानें इ. स. १५६५ पावेतों राज्य केलें. त्यानंतर त्याचा मुलगा मुर्तजा निजामशहा बहिरी ज्याचा संबंध प्रस्तुत नाटकांत आला आहे तो गादीवर बसला. एकनाथाचा जन्म १५४९ त झाला असल्यानें तो ह्याच बादशहाचे कारकीर्दींत उदयास आला. मुर्तजा निजामशहानें इलिचपूरचें

राज्य इमादशाही १५७४ त बुडविलें. त्यावेळीं तेथें बुऱ्हाण अमदशहा नांवाचा नामधारी बादशहा असून सर्व राज्य तोफलखान नांवाच्या त्याच्या वजिरानें बळकाविलें होतें. ह्यावरून तोफलखान हा अत्यंत दुष्ट मनुष्य असावा असें दिसतें. इमादशाहीचें राज्य बुडविण्यास तोच कारणीभूत झाला. तोफलखानानें उन्मत्तपणानें दौलताबादेवर चाल केली यावरून प्रथम अगळीक त्याच्याकडूनच घडून आली. तोफलखानाचे व मुर्तजा निजामशहाचे दोन हात झाल्यावर तोफलखान पराजित होऊन सैरावैरा पळूं लागला. प्रथम त्यास खानदेशाचे सुलतानानें आश्रय दिला परंतु मुर्तजा निजामशहाचे धमकावणीस भिऊन जाऊन त्यानें त्यास सोडिलें. मग तोफलखान वऱ्हाडांत परत येऊन परनाळा किल्ल्यांत राहिला. तेथून त्यानें अकबर बादशहाकडे दाद मागितली. अकबरानें आपला वकील मुर्तजा निजामशहाकडे पाठविला परंतु त्यानें त्याची परवा केली नाहीं. परनाळा किल्ला हस्तगत करून तोफलखानास कैद केला व इलिचपूरचें राज्य निजामशाहीस जोडिलें. जनार्दनपंत देशपांडे हे खानदेशांतील चाळीसगांवचे मूळचे राहणारे असून याचे दिवाण होते व एकनाथानें तोफलखान यास तो दौलताबादचा किल्ला सही करीत असतां कैद केला असावा. ही गोष्ट १५७४ चे अगोदर थोडे दिवस घडून आली असावी. एकनाथ बारा वर्षें दौलताबादचे किल्ल्यावर जनार्दनस्वामीची सेवा करीत होता, व ज्यावेळीं तो किल्ल्यावर गेला त्या वेळीं त्याचें वय आठ वर्षांचें होतें असें महिपतीनें भक्तलीलामृत ग्रंथांत लिहिलें आहे. ह्यावरून तोफलखानानें जो दौलताबादेवर हल्ला केला तो १५७० चे सुमारास असावा असें दिसतें. हा बादशहा इ. स. १५८६ त आपल्या मुलाकडून मारिला गेला. हा आपल्या आज्यापणज्या प्रमाणें फार शूर व धर्मशील होता.

प्रसिद्ध इतिहासकार फेरिस्ता यानें दिलेली हकीकतही ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. तोफलखानाविषयीं तो लिहितो:—

"In the year 1572, Mortiza, Nizam Shaw began his expedition to Berar; and succeeded by the gallantry of Chungeeze Khan, who, drove Tuffal Khan from Elichpore, forced him to seek shelter in the woods, and brought over the inhabitants of the districts by his clemency. Tuffal Khan fled from place to place and wood to wood, for six months; at the end of which he fled to Khandesh the Sultan of which, at the threats of Nizam Shaw refused him protection. He returned into Berar, took refuge in the fort of Parnalleh, and applied for assistance to the emperor Akber; who sent an Ambassador to Nizam Shah, commanding him to desist from his invasion

of Berar; but no attention was paid to the message. Pernalleh was taken, as also other fortresses with Tuffal Khan and Direa Ummed-al-Moolk, who were kept prisoners."

इमादशाहीविषयीं तो असें लिहितो :—

"Immad Shahi—It was so called from the founder Ummad al Moolk, a Chief of the Bhamenee Sultans. This monarchy lasted through four generations. The last Prince, Boorahan Ummed Shaw, was only nominal sovereign, the power being usurped by his minister Tuffal Khan. He was reduced by Mortiza Nizam Shaw, who added Berar to his own dominions in the year 1574."

Ferishta's History of the Deccan.

एकनाथानें केलेल्या पराक्रमाविषयीं महिपती लिहितो :—

लीलावतारी एकनाथ ॥ लाघव दाखवितसे शत्रूतें ॥
थोडेंच सैन्य याचें होतें ॥ परि दिसतें बहु तयालागीं ॥ १ ॥
बाण सुटती सणसणा ॥ शस्त्रें वाजतीं खणखणा ॥
वीररस माजला जाणा ॥ युद्धकंदना मिसळले ॥ २ ॥
झुंज जहालें घटका चार ॥ धुळीनें कोंदून गेलें अंबर ॥
तरी नाटोपेचि वैष्णववीर ॥ परसैन्य समग्र पळालें ॥ ३ ॥
शत्रूसि आणोनि नगरांत ॥ यजमानासि भेटवीत ॥
वस्त्रें भूषणें देवोनि त्यातें ॥ ह्मणे स्वस्थानातें जा आतां ॥ ४ ॥

श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीजनार्दनस्वामी, चक्रपाणि, श्रीखंड्या, मलंग, गावचा, कानडावाणी, व्यंकटाचार्य पुराणिक, पैठणचा धर्माधिकारी. काशीचा मठाधिपती, सरस्वतीबाई, गिरजाबाई, राण्या महार, उमीचंद इत्यादि पात्रांची योजना महिपतीच्या वाक्याला धरूनच केलेली असून या नाटकास मुख्यत्वें आधार महिपतीच्या भक्तलीलामृतांत लिहिलेल्या एकनाथाच्या चरित्राचाच घेतला आहे. हें नाटक होतां होईल तितकें इतिहासाला धरून लिहिलें आहे, परंतु क्वचित् स्थळीं नाटकाला गोडी आणण्याकरितां ग्रंथकर्त्यास पदरची भर घालावी लागली आहे, व स्थळविशेषीं इतिहासांतील गोष्टी मागें पुढें कराव्या लागल्या आहेत.

श्रीतुकाराम व श्रीएकनाथ या दोन्हीं नाटकांत ज्या ज्या स्थळीं भक्तिरसरूपी कोमल वेलीची कलिका विकसित होऊन सहृदय प्रेक्षकाचे अंतःकरणास तन्मय करून नेत्रावाटे प्रेमाश्रु ढाळावयास लावते, तीं तीं स्थळें हृदयंगम होण्याचें सर्व श्रेय आमचे परमपूज्य जन्मदाते वडील ती. रा. रंगो

वामन शिरवळकर यांनीं आह्मांस बाळपणीं केलेल्या सदुपदेशाचें होय. ईशकृपेनें आमचे वडीलमातोश्री हयात असून वडिलांची पन्नास वर्षांच्या वर श्रीपंढरपूरची वारी आहे, व त्यांचें वय ऐंशी वर्षांवर असून रोज कमींत कमी सहा तासांचें तरी श्रीज्ञानेश्वर-एकनाथ-नामदेव-तुकाराम यांच्या ग्रंथांचें परिशीलन आहे. पंढरपूर येथील प्रसिद्ध साधु वै. गंगुकाका शिरवळकर हे आमच्या वडिलांचे सख्खे चुलते असून ह्यांनीं स्थापन केलेल्या भजनाच्या सप्ताहांतील वीणा पाऊणशें वर्षें होत आलीं अद्याप भूमीवर टेविला नाहीं भक्तिरसपर नाटकांची उभारणी होण्यास सर्वतोपरी तेच कारणीभूत असून आमचे हातून पुढें होणाऱ्या श्रीनामदेव नाटकास तरी आम्हांस त्यांच्या आशीर्वादाचाच आधार आहे. पुत्रधर्माला अनुसरून आह्मी त्यांचें वंदन करून आपलें मातृपितृप्रेम व्यक्त करितों.

आम्हीं पूर्वीं रचिलेलें श्रीतुकाराम नाटक येथील डेक्कन व्हर्न्याक्यूलर ट्रान्सलेशन सोसायटीस पसंत पडून त्यांनीं आम्हांस बक्षीस दिलें, याबद्दल आम्ही सोसायटीचे फार आभारी आहोंत. श्रीएकनाथ नाटक ह्यापूर्वींच चार महिने छापून विक्रीस तयार झालें असतें, परंतु येथें उद्भवलेल्या प्लेगामुळें छापखान्यांत खिळे जुळण्याकरितां मिळणाऱ्या लोकांची तूट पडली व यामुळें जरी बराच विलंब लागला, तरी छापखान्याचे मालकांनीं आमचें नाटक विशेष काळजी घेऊन मनाप्रमाणें छापून दिलें, याबद्दल आह्मी त्यांचे आभारी आहोंत.

ग्रंथ शेवटास जाणें हें ईश्वरकृपेचें फळ आहे. ग्रंथकर्तृत्वाचा मीपणा मिरविणें व्यर्थ होय. शेवटीं सुज्ञ वाचकांपुढें एवढेंच म्हणणें आहे कीं:-

**परि हें मियां केलें ॥ कीं हें माझेनि सिद्धी गेलें ॥**
**ऐसें नाहीं टेविलें ॥ वासनेमाजी ॥ १ ॥** श्रीज्ञानेश्वर.

मुक्काम पुणें पेठ कसबा
घरनंबर २१० ता. १०
माहे मे, सन १९०३ इ.

वासुदेव रंगनाथ शिरवळकर,
ग्रंथकर्ता.

देशभाषेचा अभिमान बाळगणाऱ्या खालीं दिलेल्या सद्गृहस्थांनीं आपला अमोलिक वेळ खर्च करून अनेक तऱ्हेनें प्रस्तुत ग्रंथ तयार करण्याचे कामीं मदत केली, व ज्यांनीं वेळोवेळीं आपली योक्त मसलत देऊन महाराष्ट्र भाषेची अल्पसेवा आमचे हातून करून घेतली, त्यांचा मी फार ऋणी आहें. त्यांचीं नांवें मोठ्या आनंदानें सुज्ञ वाचकांपुढें मांडतों.

डाक्तर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, एम. ए., पी.एच डी, सी. आय.ई, पुणें.
रा. ब. काशिनाथ बाळकृष्ण मराठे, पे. फ. सब जज्ज, पुणें.
,, ,, नारायण गणेश देशपांडे, पे. डे. कलेक्टर, शिरवळ.
,, ,, माधवराव केशव कुमठेकर, सेक्रेटरी म्युनिसिपालिटी, पुणें.
रा. सा. काशिनाथ नारायण साने, हेड मास्तर पुणें हायस्कूल, पुणें.
डाक्तर कृष्णाजी गणेश देशपांडे, सातारा.
रा. सा. गणेश रघुनाथ अभ्यंकर, हायकोर्ट प्लीडर, सांगली.
,, ,, केशवराव रामचंद्र कानिटकर, एम. ए., सांगली.
डाक्तर विठ्ठल रामचंद्र कुळकर्णी, सांगली.
सुभेदार रामचरणसिंग, मुंबई, लाइट इन्फंट्री नंबर ५.
रा. रा हरि कृष्ण दामले, म्यानेजर, न्यू किताबखाना, पुणें.
,, ,, गोपाळराव रंगनाथ शिरवळकर, नाजर, कोर्ट भुसावळ.
,, ,, बळवंतराव लक्ष्मण खेडकर, हेड मास्तर, मिडल स्कूल, जालना.
प्रो. सदाशिव कृष्ण पिंपळखरे, पुणें. रा. रा. विनायक त्रिंबक मोडक, पुणें.
रा. रा. कृष्णाजी वासुदेव खरे, मुंबई. रा. रा. शंकर आत्माराम पाटकर, पुणें.
रा. रा. रामचंद्र बाळकृष्ण कोनकर, पुणें. रा. रा. शंकर बापूजी मुजुमदार, पुणें.
रा. रा. जनार्दन गणेश वाळिंबे, अंमळनेर. रा. रा. वासुदेव विष्णु आठवले.

## ज्या ग्रंथांच्या आधारानें हा ग्रंथ रचिला त्यांचीं नांवें.

१ महिपतीकृत भक्तलीलामृत व भक्तविजय.
२ एकनाथकृत भावार्थरामायण, भागवत व रुक्मिणीस्वयंवर.
३ गोंधळेकरांनीं प्रसिद्ध केलेली एकनाथाच्या अभंगांची गाथा, भाग १।२.
४ धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धे यांनीं रचिलेलें श्रीएकनाथाचें चरित्र.
५ राजाराम रामकृष्ण भागवत ,, ,, ,, ,,
६ न्या. मू. रानडे यांचीं धर्मपर व्याख्यानें.
७ केरळकोकिळचे लेखकानें प्रसिद्ध केलेली सार्थ व सटीक ज्ञानेश्वरी.
८ Ferishta's History of the Deccan.
९ Colonel Meadows Taylor's History of India.
१० Gazetteer's Report of the Bombay Presidency.

वरील पुस्तककर्त्यांचा ग्रंथकार फार आभारी आहे.

# पात्रांची यादी.

**श्रीज्ञानेश्वरमहाराज**—श्रीअलंकापूर येथील एक प्रसिद्ध साधु.
**श्रीजनार्दनस्वामी**—दौलताबादच्या बादशहाचे दिवाण व सेनापती.
**चक्रपाणि**— एकनाथाचा आजा.
**श्रीएकनाथमहाराज**— पैठण येथील प्रसिद्ध साधु.
**श्रीखंड्या**— एकनाथाच्या घरीं पाणी वाहणारा ब्राह्मण.
**गावबा**—एक भ्रमिष्ट मुलगा एकनाथाचा स्नेही.
**व्यंकटाचार्य**— पैठण येथील पुराणीक.
**कानडावाणी** — एक व्यापारी.

| | |
|---|---|
| **पैठणें येथील धर्माधिकारी**<br>**त्रिविक्रमशास्त्री**<br>**धरणीधरशास्त्री**<br>**विश्वेश्वरभटजी**<br>**सोमनाथशास्त्री**<br>**काशी येथील मठाधिपति**<br>**ब्रह्मानंद**<br>**विवेकानंद**<br>**उमीचंदवाणी** | एकनाथाचा छळ करणारे. |

राण्या, गेन्या, सोपान्या, नाम्या, तुक्या, पिऱ्या—महार लोक.
**सुलतान मुर्तजा निजामशहा बहिरी**—दौलताबादचा बादशहा.
**जंगीजखान**— बादशहाचा वजीर.
**तोफलखान**— इलिचपूरचा जुलमी बादशहा.
**सरस्वतीबाई**-- चक्रपाणीची बायको एकनाथाची आजी.
**गिरजाबाई**-- एकनाथाची बायको.
**लैला**— सुलतान मुर्तजा निजामशहाची बायको.
**जानकाई महारीण**— राण्या महाराची बायको.
**मोहना**— उमीचंदाची बायको.

एक म्हातारा व म्हातारी, मलंग, शिद्दी, बादशहाचे सरदार, कलावंतिणी, कांहीं कोळी लोकं, भालदार चोपदार, चाकर, माणसें वगैरे.

# श्रीएकनाथ.

## अंक पाहिला.

### प्रवेश १ ला.

**स्थळ**–गोदावरीच्या तीरावरील श्रीशंकराचें जीर्ण देवालय.

( एकनाथ शंकराची पूजा करून कर जोडून स्तुति करतो. )

**एकनाथ**–ॐ शिवाय नमः, हे हेरंबतात, हे पुराणपुरुषा, हे अनादिसिद्धा, हे मायाचक्रचालका, हे पंचवदना, हे त्रिपुरांतका, हे दक्षमखविध्वंसका, तुला मी अनन्यभावें शरण आहें. ( एकीकडे ) परमेश्वराचें प्रत्यक्ष दर्शन कोणत्या रीतीनें होईल, ही चिंता माझ्या मनाला रात्रंदिवस लागून राहिली आहे. आईबाप लहानपणीं वारले. आजोबा नेहमीं म्हणतात, ‘ एक्या, भानुदासाच्या वंशांतील तूं एकच तंतु उरला आहेस, तस्मात् त्यांच्या वंशाला शोभेल, अशी कृति तुझ्या हातून घडून आली पाहिजे. ’ भानुदासाचा अधिकार केवढा ! आनागोंदीच्या राजानें नेलेली श्रीपांडुरंगाची मूर्ति ज्यानें पंढरपुरास परत आणिली, ज्यानें बाळपणांत सूर्यनारायणाची सेवा करून वंश सुशोभित केला, तो भानुदास कोणीकडे ! अशा वंशांत मी उत्पन्न होऊन केवळ भूमीला भारभूत झालों आहें. काम, क्रोध, लोभ, मोह, दंभ, अहंकार ह्यांचा अनिवार मारा माझ्यानें सहन होत नाहीं. आशामनीषा, माया यांनीं माझ्या जिवाला भूल पाडली आहे. ( श्री शंकरास उद्देशून ) कायावाचामनेंकरून मी तुला अनन्यभावें शरण आहें. माझी सर्व लाज तुला आहे. पुराणांतील कथा श्रवण करून माझी चित्तवृत्ति बावरून जाते. परमेश्वरानें निरनिराळे अवतार धारण करून आपल्या भक्तांचे हेतु कसे परिपूर्ण केले ! हा संसार केवळ निःसार

आहे, हें जाणून संसारांत असून कितीएक महासाधु पारमार्थिक कसे बनले! ध्रुवाला अढळपद कसें प्राप्त झालें! उपमन्यूला क्षीरसागर कसा मिळाला! ह्या महत्वाच्या गोष्टी माझ्या मनांत घोळूं लागल्या ह्मणजे माझ्या अंगांत आवेश उत्पन्न होतो. माझे बाहु स्फुरण पावतात. कांहीं तरी महत्कार्य माझ्या हातून झालें पाहिजे, अशी माझी मनोवृत्ति होऊन जाते. ( श्रीशंकरास साष्टांग नमस्कार घालतो, इतक्यांत आकाशवाणी होते. " देवगड किल्ल्यावर जनार्दनपंत देशपांडे, महा सत्पुरुष, यवन बादशहाचे पदरीं आहेत, त्यांना शरण जा. त्यांना गुरु कर, ह्मणजे इष्टहेतु सिद्धीस जातील. " ) हा प्रचंड ध्वनि खरोखर श्रीशंकराचे पिंडींतून उत्पन्न झाला. काय चमत्कार आहे! पुराणांत आकाशवाणी झालेली आपण ऐकतों, परंतु आज मला प्रत्यक्ष अनुभव आला. ( बेलांचे झाडांवर ठिकठिकाणीं बेलाच्या कांट्यानें आकाशवाणींतील अक्षरें पुनः पुनः लिहितो व पुनः पुनः त्यांचा उच्चार करितो. ) आतां घरीं परत जावयाचें नाहीं. आजोबाची वृद्धावस्था, माझ्या वियोगानें त्यांना आणखी आजीला होणारें दुःख, त्यांची मजवर असलेली पराकाष्ठेची ममता, वगैरे गोष्टी मनांत आल्या ह्मणजे माझा कंठ भरून येतो, नेत्रांवाटे अश्रु वाहूं लागतात; पण तें कांहीं नाहीं. देहाचें सार्थक झालें पाहिजे. अंतकाळीं कोण सोडविणार आहे? मातापिता, सोयरेधायरे, हे कोणी निर्वाणीचे नाहींत, एक सद्गुरु आहे. बायको म्हणते, मी सर्वस्वी तुमची, पण केशवपनाचा प्रसंग आला ह्मणजे केशांसाठीं तीहि रडूं लागते. या वेळीं मन कठोर केलें पाहिजे. आतां दोनप्रहर रात्र उलटून गेली आहे. उजाडण्याचे सुमारास सात आठ कोस सहज निघून जाऊं. याच पावलीं देवगिरीचा रस्ता धरला पाहिजे. ( जाऊं लागतो, इतक्यांत व्यंकटाचार्य पुराणीक व गावबा वेडा प्रवेश करतात. )

**गावबा**–( एकनाथास भय दाखवितो. एकनाथ दचकतो. हें पाहून आपण पोट धरधरून हंसतो. ) नाथा, आज मला अशी एक नवीन जम्मत सांपडली आहे! ती मी अगदीं अगदीं कोणाला कोणाला सांगणार नाहीं. फारच मोठ्या गोष्टीचा शोध लागला आहे. अगदीं व्यासवाल्मीकालासुद्धां त्याचा पत्ता लागला नव्हता.

**एकनाथ**–तर मग, गावबा, तूं तर व्यासवाल्मीकापेक्षां सुद्धा बुद्धिवान् झालास म्हणावयाचा ?

**गावबा**–यांत काय संशय. हा पठ्ठ्या तसाच हुशार आहे.

**पुराणीक**–पण जें आहे त्तें गावबाला नवीन शोध कशाचा लागला आहे, हें आम्हांला एकवार कळूं तर द्या.

**गावबा**–( तोंड वांकडें करून ) जें आहे त्तें, जें आहे त्तें जे ते कालाचे ठायीं–तेथें होती लक्ष्मीबाई—( हंसतो. )

**पुराणीक**–( गावबास चापट्या मारतो, तरी तो हंसतोच. ) चिप्प, चिप्प. जास्त बोललास तर खबरदार.

**एकनाथ**–अहो, तो बोलून चालून वेडा. त्याचें बोलणें आपण इतकें मनावर कशाला घेतां ?

**पुरा०**–तुम्हींच त्याला जें आहे त्तें अगदीं डोक्यावर चढविला आहे. जेव्हां तेव्हां माझें सोंग आणीत असतो. हें मला बिलकुल खपावयाचें नाहीं.

**गावबा**–धोंड्याच्या महिन्यांत जें आहे त्तें बायकांनीं अनरशांचीं त्याचप्रमाणें जें आहे त्तें घिवरांचीं, मोतीचूर, जिलबी, दूळ, बेसन, चुंदी, ह्यांच्या मोठमोठाल्या लाडूंचीं वायनें जें आहे त्तें पुराणीकबुवास द्यावींत. ( पुराणीक गावबास मारतो. एकनाथ त्याला सोडवितो. )

**एकनाथ**–तें जाऊं दे गावबा. पण तूं आमचा लहानपणचा दोस्त ना ? तेव्हां नवीन शोध, जेथें व्यासादिकांची मति कुंठित झाली, असा तुला लागला आहे; तो आम्हांला सांग. आम्हीं कोणाला सांगणार नाहीं.

**गावबा**–पुराणीक बुवा, तुम्ही आमची गुप्त गोष्ट ऐकूं नका. तिच्यावर तुम्हीं कोट्यावधि रुपये मिळवाल. पन्नास हजार रुपये या घटकेस मोजीत असाल, तर तुम्हाला ती गम्मत सांगतों.

**पुराणीक**–फुटकी कवडीसुद्धां देणार नाहीं. मी आपला लांब जाऊन उभा राहतों. मग तर झालेंना ?

**गावबा**–( एकनाथाच्या कानांत मोठ्यानें ओरडून ) अतिशय महत्वाचा, संसारांत अत्यंत उपयोगी असा शोध लागला आहे.

**एकनाथ**–कळू तर दे एकदां; रडूं दे काय आहे तें.

**गावबा**–( इकडे तिकडे पहात, कोणी ऐकत नाहीं, अशी खातरी झाल्यावर ) हें पहा, आपल्या घरांत तांबडे मुंगळे झाले किनई, म्हणजे उकरड्यास दहींभाताचा नैवेद्य दाखवावा म्हणजे नाहींसे होतात.

**एकनाथ**–हा मूर्खा ! हाच का मोठा शोध ? व्यासाला आणखी वाल्मीकाला ज्याचा पत्ता नाहीं तो ?

**गावबा**–तुम्ही अनुभव घेऊन पहा. मग बोला. लाखों कोट्यावधि तांबडे मुंगळे जर आपल्या घरांत झाले, तर तुम्ही काय कराल ? घर सोडून द्याल काय ? हजारों रुपये खर्च करून बांधलेलें घर तुमच्यानें सोडवेल काय ? एवढ्याकरितां हा उपाय मीं व माझ्या चतुरमातोश्रीनें शोधून काढला आहे. तुम्ही असें पहा कीं, तेहेतीस कोटी देवता श्रीविष्णूचे पोटांत आहेत, मग म्हसोबाला शेण कां थापावें लागतें ? तशीच ही युक्ति आहे, समजलास ? ( जोरानें पळत जातो. )

**पुराणीक**–नाथा, तूं त्या वेड्याच्या नादीं काय लागतोस ?

**एकनाथ**–बरें तें असो. आपलें नेहमीं सांगणें आहे कीं, योग्य गुरुमुखाशिवाय ब्रम्हज्ञान प्राप्त होणार नाहीं. माझा विचार आतां देवगडचे किल्ल्यावर जाऊन श्रीजनार्दनमहाराजांस शरण जाण्याचा आहे. आजोबाला आजीला विचारून जावें, तर प्राण गेला तरी ते जाण्याला परवानगी देणार नाहींत. तुमचा विचार या कामांत कसा काय पडतो ?

**पुराणीक**–माझा विचार पुसशील तर असेंच परभारें चालतें व्हावें. आजाआजीची परवानगी घेण्याच्या भरीस पडलास कीं फसलासच म्हणून समज. उलट तूं इकडे तिकडे पळून जाशील म्हणून तुला जास्त अटकेंत मात्र ठेवतील. मीहि आतां त्याच बाजूला एका गांवीं जात आहें. पाहिजे असल्यास आपण सोबतीनें जाऊं.

**एकनाथ**–मग तर फारच चांगलें झालें. जय जनार्दन स्वामीकी जय. ( उभयतां हातांत हात घालून जातात. )

---

# प्रवेश २ रा.

**स्थळ**–पैठण येथील चक्रपाणि याचें घर.

( चक्रपाणि व त्याची बायको सरस्वती एकनाथ सांपडत नाहीं म्हणून सचिंत बसलेलीं आहेत. )

**सरस्वती**–अहो ऐकलेंका, रोजच्याप्रमाणें मी एक्याला जागें करायला गेलें. दहा बारा हाका मारल्या, पण ओ कांहीं देईना, म्हणून खोलींचें दार उघडून आंत जाऊन पाहतें, तों एकनाथ मुळींच तेथें नाहीं. बाहेरच्या दरवाज्याची कडी मोकळी होती. मला वाटतें तो मध्यानरात्रींच निघून गेला. आतां देवा आम्हीं काय करावें ?

**चक्रपाणि**–साऱ्या आळींत तपास करून आलों. ज्यांच्या ज्यांच्या घरीं त्याची जाण्याची वहिवाट आहे, तेथें तेथें जाऊन माझा नाथ कोणीं पाहिला का, ह्मणून विचारून आलों, परंतु त्याला कोणी पाहिल्याचें देखील सांगत नाहींत.

**सरस्वती**–माझ्या नाथाच्या गुणाला मोल नाहीं. त्याची विलक्षण बुद्धि, त्याची शांतवृत्ति, सगळ्या पैठणच्या आबालवृद्धाला, कोणाला म्हणजे नाथ नको, असें कांहीं नाहीं. किती तरी आमच्या आज्ञेंत ! घोटभर पाणी पिऊन रहा ह्मटलें तरी रहावयाचा. त्याचे लहानपणचे खेळ ह्मटले म्हणजे लहानलहान गोटे मांडून त्यांची पूजा करायची, सांद्यावर पळी घेऊन तिचा विणा करायचा, काठीला फडकें बांधून तिची पताक करून पंढरीच्या वारीस जाण्याकरितां निघायचा, नेहमीं रामकृष्ण हरिगोविंद ही नामावळी मुखानें चाललेली ! माझा एवढा मुलगा सूर्यनारायण गेला, पण या नातवाकडे पाहून आह्मी दिवस काढीत होतों तें कांहीं देवाला सहन झालें नाहीं. आतां या मुलाचा शोध कोठें तरी करावा !

**चक्रपाणि**–श्री पांडुरंग जेव्हां भानुदासास प्रसन्न झाले, त्यावेळीं त्यांनीं हाच वर मागितला होता कीं, तुह्मी माझ्या वंशांत अवतार घ्यावा. त्यावरून मला असें वाटत असे कीं, माझा एकनाथ पांडुरंगाचा अवतारच आहे. सगळी पैठणकर मंडळी त्याचा शोध करीत आहेत. गंगेच्या कांठीं त्याचा शोध केला. सारें वाळवंट

पालथें घातलें. नदींत, गांवांतल्या विहिरींतून पानबुडे घातले. दूर-दूरच्या जुनाट पडक्या देवळांतून त्याला बसायचा नाद आहे, तेथें तेथें जाऊन शोध केला. फार तर काय पण गांवोगांव जासूद-सुद्धां नाथाच्या शोधाला पाठविले आहेत.

**सरस्वती**–पण तुह्मी त्या व्यंकटाचार्य पुराणिकाकडे गेला होतां का ? त्याच्याबरोबर नेहमीं तो एकांत करीत बसत असे. का दोघे-जण मिळून देशावर निघून गेले ?

**चक्रपाणि**–एवढें मात्र खरें. तो पुराणीक आजच कसा गांवाला गेला ? याचें मला राहून राहून आश्चर्य वाटतें. मला वाटतें, पोराला त्यानेंच फसविलें. कोठें तरी पोराला घेऊन गेला. पण असें म्हणावें तर पुराणीक मोठा सज्जन माणूस आहे, त्याच्या हातून असें दुष्ट कृत्य होणार नाहीं, अशी माझ्या मनाला खातरी वाटते. काल संध्याकाळीं मला पुराणीक भेटला होता. गांवाला जाण्याचे संबंधानें त्यानें अवाक्षरसुद्धां काढिलें नाहीं. पुत्रशोकामुळें अगोदर हें हृदय कसें करपून गेलें आहे. त्याच्यावर या नाथाच्या वियोगानें होणारें दुःख माझ्यानें आतां सहन करवत नाहीं. परमेश्वरा, सोडीव मला या दुःखांतून ! अगे, पुरुष बायकांप्रमाणें हंबरडा फोडून आक्रोश करून दाखवीत नाहींत, परंतु अंतर्यामीं त्यांच्या पोटांत जी कालवाकालव चाललेली असते, तिचें वर्णन करतां येत नाहीं. वृद्धापकाळचा माझा आधारस्तंभ कडाडून पडला ! माझा नाथ नाहींसा झाला ! ! हाय हाय ! ! मी आतां काय करूं ?

**सरस्वती**–म्हटलें, तुह्मी जर असे हातपाय गाळले, तर मीं अबलेनें काय करावें ? माझा नाथ जिवंत आहे; त्याला कांहीं मृत्यूनें आपल्या जबड्यांत ओढून नेला नाहीं. तो पुराणीक आणखी हा कोठें तरी काल रात्रीं उठून गेले. नाहीं तर रामेश्वराला गेले असतील. पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि कां होईना, खुशाल असला ह्मणजे झालें. केव्हां ना केव्हां तरी आपल्याला तो भेटल्याविना राहणार नाहीं. त्याला तरी आपला वियोग सहन होणार कसा ?

**चक्रपाणि**–मला तर त्याच्या भेटीची कांहीं आशा दिसत नाहीं. कारण तो फारच विचारी मुलगा आहे. कोणतेंहि काम तो

विचार करून करतो. आतां तरी तो पूर्ण विचार करून निघून गेला आहे. तूं खातरी ठेव कीं, त्याचा जर निरुपाय झाला तरच तो माघारा येणार आहे. राम राम ! काय माझी दशा ! वृद्धापकाळानें माझें सर्व अंग शुष्क पर्णाप्रमाणें थर थर कांपतें आहे ! चालतां चालतां मी अनेक वेळां ठेंचाळतों ! अगदीं जेव्हां दुसऱ्याच्या तोंडा-जवळ तोंड न्यावें, तेव्हां हा अमका मनुष्य आहे, असें ओळखतां येतें ! कानांनीं हातचें सोडलें ! अशा वृद्धापकाळीं नाथा मला तूं टाकून गेलास ! हें तूं फार अनुचित कर्म केलेंस ! (मूर्च्छित पडतो.)

**सरस्वती**–हा एक दुसराच अनर्थ ओढवूं पहात आहे. असे वरचेवर निचेष्ट पडल्यानें पटकन् प्राण निघून जावयाचा. आपण पुरुषासारखे पुरुष, आपण जर असें धैर्य सोडलें, तर आह्मीं बायकांनीं काय बरें करावें ? मुलाचा पक्का शोध करा. जो कोणी त्याचा तपास लावून देईल, त्याला आपण आपल्या घरची अर्धी मिळकत देऊं. मुलगा जिवंत आहे अशी आशा करण्याला आपल्याला जोंपर्यंत जागा आहे, तोंपर्यंत तुम्ही असे हातपाय गाळूं नका. या तुमच्या स्थितीकडे पाहिलें म्हणजे माझी कंबर खचते.

**चक्रपाणि**–( शुद्धीवर येऊन ) माझ्या डोळ्यांस अंधाऱ्या येऊं लागल्या. तोंड कोरडें पडलें. माझ्यानें आतां जास्त बोलवत नाहीं. तुला इतकेंच सांगतों कीं, भानुदासाचे वंशाचा कुलदीपक आज मावळला ! पांडुरंगाची मर्जी ! आतां ह्मणजे एकनाथ परत येतो, असें थोडेंच आहे ! कर्मांत असेल तें चुकत नाहीं. मी देवाला दोष देत नाहीं. दैवाला दोष देतों. आपण या जन्मीं नाहीं, परंतु पूर्वजन्मीं घोर पातकें केलीं आहेत, त्यांचीं कडू फळें आपल्याला भोगिलीं पाहिजेत. एक्याच्या पोटीं एखादें पुत्रसंतानसुद्धां नाहीं कीं, मीं त्याच्याकडे पाहून समाधान करून घ्यावें. मला जीव नकोसा झाला आहे. परमेश्वरा, आतां किती माझा अंत पाहतोस ? विठ्ठल विठ्ठल ? ( मूर्च्छित पडतो. )

**सरस्वती**–यांच्यापेक्षां मला अगोदर मरण येईल तर किती उत्तम होईल ! अहेवपणीं मला मरण आलें तर सोनें होईल. पण तें मेलें कोठें गुंतलें आहे कोण जाणें ! एवढाले दुःखाचे डोंगर अंगावर

कोसळतात, परंतु मी आपली काळाची काकडी जिवंतच! क्षणोक्षणीं मला माझ्या एकुलत्या एक मुलाची आठवण होऊन पोटांत भडभडून येत असे, पण मी नाथाकडे पाहून समाधान मानून घेत असें. आतां कोणाकडे पाहूं? एक दिवस आह्मां उभयतांची सेवा केल्याशिवाय त्यानें घालविला नाहीं. किती तरी तुझे गुण आठवूं? ( निचेष्ट पडते. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ–गंगानदीचा डोहो.

( दोन चार कोळी सांगडी घेऊन गाणें म्हणत प्रवेश करतात. )

### गाणें.

आतां मारि फटफट, उभा धिट हलगट, मारिन चपट, हरि वाट सोड ह्मणते रे मला, कोण प्रहरची विनंति करतें, करुणा येईना तुला ॥ १ ॥

यश्वदेचा हरि, आह्मीं सासुरवाशी नारी, जातों यमुनेच्या तिरीं, जातों आंघोळ करण्यासाठीं, सोड नको धरूं रे मनगटी ॥ २ ॥

नको करूं किरकिर, झाला उशिर, घरीं सांगेल दिर, माझ्या चाहड्या रे आवघ्या गोष्टी, सासु कजाग लागेल पाठीं ॥ ३ ॥

करुणा दावुन, मग रजा घेऊन, कळंबातळीं येऊन, मग हर्ष मावेना पोटीं, आह्मीं ठकीवला जगजेठी ॥ ४ ॥

॥ चाल ॥ अगे मायावसनें फेडा, अगे फेडा,
बांधा भक्तीचा जुंबडा, जुंबडा,
टाकिती उड्या धडधडा, धडधडा ॥ ५ ॥

इतकें ऐकून, हरि आला लपून, वस्त्रें घेतलीं छपून, देव कळंबावरी चढला, अवघड होती फांदी त्याच्यावर जाऊनशनी बैसला ॥ ६ ॥

एक बाहेर निघून, एक उभी राहून, एक खालीं बसून, पाहू पाहू दमल्या, हिंवें भरलीं तट्ट फुगल्या ॥ ७ ॥

॥ चाल ॥ तेव्हां देखिले गोपीनाथ, गोपीनाथ,
अवघ्याच झाल्या लज्जित, लज्जित,
टाकिल्या उड्या पाण्यांत, पाण्यांत ॥ ८ ॥

ऐशी याची मात, नारि, जोडिति हात, हरि घाल माण-सांत, नको करूरे गलबला, हात जोडून शरण आल्या विनवीति कृष्णाला ॥ ९ ॥

एक बाहेर निघून, एक उभी राहून, एक खालीं बसून-करा सूर्याशीं नमस्कार, खुप मजा पाहिन क्षणभर ॥ १० ॥

॥ चाल ॥ एक तिथेंच फिरे गरगर, गरगर,
एक पिंगा घालून दाविती, दाविती
एक पक्का ललकारिती ललकारिती,
गद्गदा हंसे श्रीपती, श्रीपती ॥ ११ ॥

कळंबावरून जिचीं तिला वस्त्रें देऊं लागला, उतरुन कळंबातळीं कृष्णानें रजा दिली अवघ्याला ॥ ॥ १२ ॥

( एक कोळी घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करतो. )

**पहिला कोळी**—कायरे रामजी, इतका घाबरलास काय म्हून !

**दुसरा कोळी**—म्हनजे, आर ल्येका मी आपल्या परत्यक्ष डोळ्यांनीं पाह्यलं, आन राव मी धावत धावत यतुया तो इतक्यामंदी दिली गंगच्या ढवांत उडी ठोकूनश्यान एका बामनाच्या पोरीन. अन तुम्ही आपल गान्याच्याच नादांत.

**तिसरा कोळी**—बामनाची व्हती व्हयर ?

**चौथा कोळी**—पन् गाढवाच्या लेकानू, आतां बामनाची प्वार व्हती का महाराची व्हती, तिचा जीव चाललया, नाहीं तर मेलीबि असल. झटकन् उडी टाकूनशान् तिला बाहेर काढायची आदुगर, का तिची जात आन् गोत पुसत बसायच ?

**पहिला कोळी**—तसं नाह्यर, बामनाची असली आन् शिरीमंताची असली, तर पोटाची चंगल व्हईल म्हून म्हनतो.

**दुसरा कोळी**—आन् नाहीं पोटाला दिल म्हुनशान् का नदीमंदी मानूस मरून द्येतुस व्हय ? मंग गांवामंदी कुनी राहूबि द्येनार नाहीं.

**तिसरा कोळी**–आन् पोटामंदी काट भरीनास गाढवाच्या ल्येका ! हाकड घराला आग लागलीया, आन तकड बायकोसनी म्हनतुया कीं, ढवऱ्याला बकरी किती मारायची म्हुनशान्. चला, आटपा, टाका उड्या. ( चौघेजण डोहांत उड्या घालतात. )

**चौथा कोळी**–कायर रामजी, काय मागमूसबी नाहीं लागत. माझी दमछाट होईपोत मी तळाशीं चाचपून पाह्यल, पन काही हा ताला लागत नाहीं.

**दुसरा कोळी**–तू जागा बराबर नाहीं हेरलीस. हंग मी उभं राह्यलुया तकड नजर देऊनशान् बुडी मारली पाह्यजीया म्हंजे खात्रीन घावल.

**तिसरा कोळी**–अर पान्याच काम ह्मटलं म्हंजे अस हाय कीं, जकड मनुक्ष बुडत तकडून पान्याच्या लोटासरस व्हावत व्हावत लांब जात. तऱ्हा आपून चहूंकड तळाशीं चाचपून पाह्यल पाह्यजे. घ्या येवाच नांव आन् करा एकदा मनाचा धडा खोल पान्यामंदी जायचा. जे आई गंगे, एखांद्या कपारींत नाहीं तर खबदाडांत मातर आमासनी आडकून देऊं नको. नाहीं तर प्वार गवसायची तर बाजूला राह्यली, आन् आह्मीबि तिच्या संग एखांद्या भगदाडांत आडकूनशान् बसायच ह्मंजी झाल. (गंगेचें नांव घेऊन चौघे पुनः बुड्या मारतात.)

**चौथा कोळी**–आर घावलीर घावली यार. या धरूं लागा या. ( दोघे धांऊन धरूं लागतात. )

**दुसरा कोळी**–आर आगदीं बच्चा हायर ! बारा तेरा वरसाची असल. माझी माय तूं, तुला काय सासुरवास झालाया ? तुझ्या जिवाला कसलं दुःख झालया ? येवाला माहीत. तूं नदीमंदी उडी घातलीस इतकं तुझ्या जिवावर काय संकट आलं व्हतं ? रामाला माहीत.

**तिसरा कोळी**–आर ही तर त्या पल्याडल्या आळींतल्या त्या मोठ्या हावेलीमधल्या देसपांड मनसबदाराची प्वार. ही तर लै लै शीरीमंताची है. येवा ही जर जगली तर आमच कोट कल्यान व्हईल बगा. हिचा बाप लै नामी मनुक्ष है. आन् त्येला ही एवढीच पोरगी हाय. आन् ही त्या चक्रपानीच्या एकनाथाला द्यायची ठरली व्हती. मंग अस कस झाल कोन जान.

**पहिला कोळी**–अर ल्येका ही गारठून गेलीया, अन् थंडीनं काकडूनशान् गेलीया, पान्यानं प्वाट फुगलया, नाकातोंडांतून पानी गळतया, तिला आदुगर कुंभाराच्या चकावर नेऊनशान् घातली पाह्यजीया, आन् मंग तिच्या बापाला बलावलं पाह्यजीया; कसंर रामजी ?

**दुसरा कोळी**–तुह्मी तिघ हिला घेऊनशान् कुंभाराच्या घरीं जा. आन् चाकावर घालूनशान् गरगर गरगर फिरवा ह्मंजे भडाभडा भडाभडा पानी वकूनशान् जाईल. आन् प्वाट मोकळ होऊनशान् जाईल. आन् मी जाऊनशान् तिच्या आईबापासनी खबर देतुया.

**तिसरा कोळी**–जा पन् बक्षीसाच संमद् पैस यकटाच उपटूं नको. पैस आपून चौघजन सारख वाटूनशान् घेऊं.

**पहिला कोळी**–काय ह्मन बक्षिसाच पैस ! बाजाराच्या आदुगर उचल्यांनीं कंबरा बांधल्याती. आदुगर पोरगी जिवंत व्हईल तवा मंग बक्षीस, का मेलेली पोर पान्याच्या बाहेर काढलीया म्हुनशान् बक्षीस ? लै गाढवाच ल्येक श्येन झाल्याती. चल राम्या, जारे तूं तिच्या बापाकड आन् आह्मी जातों कुंभाराच्या हाकड हिला घेऊनशान्. ( मुलीस खांद्यावर टाकून जातात. )

---

## प्रवेश ४ था.

### स्थल—देवगिरीचा किल्ला.

( जनार्दनपंत समाधी लावून बसले आहेत. )

**एकनाथ**–( प्रवेश करून ) सुंदर सरोवरांत ज्याप्रमाणें कमलिनी विकास पावतात, अथवा गर्भश्रीमानाच्या घरीं जशी लक्ष्मी वास करते, त्याप्रमाणें क्षमा ज्यांच्या अंगीं बाणलेली आहे; मेरूपर्वताला आपल्या शिखरांचा जसा भार होत नाहीं. अथवा ज्याप्रमाणें अनेक नदींनदांचे समुदाय मोठाले महापूर घेऊन आले तरी महासागर त्यांना आपल्या उदरांत सांठवितो, त्याप्रमाणें या संसारांत नानाप्रकारचीं दुःखें प्राप्त झालीं असतां ज्यांचें हृदय कधीं दुखंड होत नाहीं, इतकेंच नाहीं; परंतु आपण दुःखाचे डोंगर गिळीत आहों, हें

ज्यांच्या लक्षांतहि येत नाहीं, वाऱ्याची धांव जशी सरळ असते, अथवा मातोश्रीपुढें जातांना बालकाच्या मनाला ज्याप्रमाणें कोणत्याही प्रकारची शंका वाटत नाहीं, त्याप्रमाणें यांना आपपरभावना कांहीं माहित नाहीं. बादशहा मुर्तजा निजामशहा जो हल्लीं अहमदनगरच्या निजामशाहीचा मालक आहे, त्याचा अम्मल किती करडा! एका हातांत समशेर व एका हातांत कुराण. अशा महमदीय मंडळींत हे स्वामीमहाराज आपला धर्म तलवारीच्या तिखट धारेप्रमाणें अप्रतिहत चालवीत आहेत! हें पाहून कोणाचें मन आश्चर्यचकित होणार नाहीं! ह्या पुण्यपुरुषाची त्रिकाल स्नानसंध्या, श्री गुरुदत्तात्रेय यांची महापूजा, समाधी, यांत तिळमात्र तरी अंतर येत आहे काय? मी तर यांची अशी कीर्ति ऐकतों कीं, आत्मस्वरूपांत त्यांनीं इतकें प्राविण्य संपादन केलें आहे कीं, त्यांना प्रत्यक्ष दत्तदर्शनाचाही लाभ वारंवार होत असतो. सुवर्णाला ज्याप्रमाणें पुटें देणें व्यर्थ, त्याप्रमाणें माझी स्तुति व्यर्थ होय. उत्तम मार्ग म्हटला ह्मणजे त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून दंड जसा भूमीवर निचेष्ट पडतो, त्याप्रमाणें आपण स्वस्थ पडावें. ( साष्टांग प्रणिपात करतो. )

**जनार्दनस्वामी**–( एकीकडे ) हा तेजःपुंज केवळ मदनाचा पुतळा, कमलपत्राप्रमाणें विशाळ नेत्र, भव्य कपाळ, ब्रम्हचर्य व्रत अंगीं बाणलेला, असा हा कोण बरें असावा? मला वाटतें, ब्रम्हचारी वेषानें मला दर्शन देण्याकरितां अनसूयासुत अत्रिनंदन भगवान् श्री दत्तात्रेय तर आले नसतील ना? कारण आज मी मघापासून मानसपूजा करण्याकरितां श्रीची मूर्ति ध्यानांत आणण्याचा प्रयत्न करीत असतां, वरचेवर ही ब्रम्हचारी मूर्तिच माझ्या ध्यानांत येत असे. हा काय बरें चमत्कार असावा! आज मला प्रातःकालपासून शुभचिन्हें होत आहेत. माझा उजवा डोळा लवत आहे. माझा उजवा बाहु स्फुरण पावत आहे. या सर्वांचें कारण तरी मला वाटतें हेंच असावें. ( उघड ) तूं कोण आहेस? येथें कां आलास?

**एकनाथ**–( हस्त जोडून अत्यंत नम्रपणानें ) महाराज, या देहाला एकनाथ म्हणतात. मी पैठणचा राहणारा. वडिलांचें नांव सूर्यनारायण. आजाचें नांव चक्रपाणी व पणजाचें नांव भानुदास. भानुदा-

साऱ्या वंशांत मी एक अत्यंत मूढ, ज्याची वतनदारी केवळ मूर्खपणा, असा पैदा झालों आहें. आजपावेतों वेदाध्ययन केलें. वडील मातोश्रीच्या ठिकाणीं असलेलीं आजाआजी यांची मनोभावें सेवा केली. श्रीशंकराचें पूजनार्चन करीत आलों. चित्तांत हेतु हाच कीं, ज्ञानप्राप्ति व्हावी. प्रत्यक्ष श्रीचें दर्शन व्हावें. कांहीं तरी प्रसाद व्हावा. श्रीशंकराची याप्रमाणें रात्रंदिवस प्रार्थना करीत असतां गेल्या सोमवारीं उत्तररात्रीं देवालयांत शंकराचे पिंडीवर मस्तक ठेविलें असतां पिंडींतून गंभीर स्वरानें आकाशवाणीप्रमाणें ध्वनि झाला.

**जनार्दनस्वामी**–अहाहा ! तूं मोठा भाग्यशाली आहेस ! तुझी आईबापांचे ठिकाणीं असलेली पूज्यबुद्धि व आजाआजीची एकनिष्ठपणें केलेली सेवा पाहून श्रीशंकर प्रसन्न झाले. शंकराची दृढभक्ति केलीस त्याचा प्रत्यक्ष साक्षात्कार झाला यांत कांहीं संशय नाहीं. याला ढळढळीत उदाहरण श्रीपुंडलीकानें घालून ठेवलेंच आहे. त्याच्याकरितां पांडुरंगमूर्ति चंद्रभागेच्या तटाकीं अजून तिष्ठत उभी आहे. तस्मात् ज्यांना वडीलमातोश्रीची सेवा घडत नाहीं ते परम अभागीच म्हणावयाचे. असो, एकनाथ, श्रीशंकराच्या पिंडींतून ध्वनि काय निघाला बरें ?

**एकनाथ**–माझें भाषण आपल्यास असत्य वाटेल, कारण मी अल्पमति यःकश्चित् मनुष्य आहें; तथापि मी आपल्यास अनन्यभावें शरण आहें. आपण सर्वसाक्षी परमेश्वर आहांत, असें मी समजतों. मी आपल्या चरणांची धूळ आहें. माझी इच्छा कायावाचामनेंकरून आपली सेवा करावी, अशी आहे. हाच हेतु मनांत धरून मी आलों आहें. पूर्ण करणें आपल्याकडेस आहे. मी अत्यंत मूढ आहें. मला ज्ञान व्हावें. श्रीचें दर्शन व्हावें. श्रीचा प्रसाद व्हावा. श्रीशंकराच्या पिंडींतून हाच ध्वनि निघाला कीं, " यवन बादशहाच्या पदरीं देवगड किल्ल्यावर जनार्दनपंत देशपांडे महा सत्पुरुष आहेत त्यांना शरण जा. त्यांना गुरु कर, म्हणजे इष्ट हेतु सिद्धीस जातील. "

**जनार्दनस्वामी**–मी एक अत्यंत पतित आहें, माझा एवढा गौरव कसा झाला याचें मला आश्चर्य वाटतें. मी आपल्याला एक पर-

मेश्वराचा दासानुदास म्हणवितों, याबद्दल मला तर कांहीं अभिमान नाहीं, परंतु माझ्याबद्दल परमेश्वराला मात्र असला पाहिजे. कसा ह्मणशील तर मोठमोठ्या राजांजवळ निशाणें असतात. लढाईचे वेळीं सर्व फौजेनें काय करावयाचें, तर निशाणाजवळ बळ बांधून उभें रहावयाचें. कशाकरतां तर तीं शत्रूच्या हातीं जाऊं नयेत. बरें, आतां निशाण ह्मणजे काय ? तर एक प्रकारचें चिरगूट–फडकें–मग तें जरीचें असो, नाहीं तर खारव्याचें असो; त्याची कांहीं विशेष किंमत नाहीं. परंतु तें राजाचे नांवानें मुद्रांकित असतें. त्या राजाच्या नांवाला किंमत असते. तसा देव भक्ताची महती वाढविण्याकरितां त्याच्या हातून कांहीं तरी अमानुष कृति करवीत असतो. अस्तु; मी तुला विन्मुख परत लावीत नाहीं. कांहीं दिवस तूं या किल्ल्यावर माझ्याजवळ रहा. मला वाटतें, श्री दत्तात्रेय तुझ्यावर कृपा करतील. तुझ्या अंगीं पूर्ण योग्यता आल्यावर उपदेश आपोआप होईल.

**एकनाथ**–महाराजांची आज्ञा प्रमाण. ( एकीकडे ) आज सर्व सुकृतांचें फळ मिळालें. मी मोठा भाग्यवान् कीं, स्वामींची सेवा मजकडून होणार. आतां असा दिवस कधीं उगवेल कीं, स्वामी माझ्यावर प्रसन्न होऊन मला अनुग्रह देतील ! मला श्रीदत्तांचें दर्शन करवितील ?

**जनार्दनस्वामी**–तू फार थकलेला दिसतोस. चल माझ्याबरोबर, स्नानसंध्या आटोपून भोजन कर, ह्मणजे तुला बरें वाटेल. ( उभयतां जातात. )

# अंक दुसरा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**–बादशहाचा रंगमहाल.

( लैला पलंगावर तक्याशीं टेंकून बसली आहे. दासजिन उभा आहे. नाच चालू आहे. )

**सर्व कलावंतिणी**–(गुल गुल बुन बिनकारके–या चालीवर.)

लखो बुल बुल ॥ जे तुमे मुबारक ॥
तुमे मुबारक ॥ लखो बुल बुल ॥ ध्रु० ॥
झूटा तेरा जप ॥ पैका करता गप ॥
सद्गुरूके आगे चप ॥ काल करेगा गप ॥ १ ॥
लागो सोमेलिया नाम ॥ हेजी सदा भरे काम ॥
भला आशा बेफाम ॥ तुझे कहा मिलेगा राम ॥ २ ॥
मूकूं आंगकूं लगाया राख ॥ आत्मा होवेगी ना पाक ॥
भला आशामें डुब लगे ॥ एका जनार्दन का बंदा ॥ ३ ॥

**चाल**–( संगे मै गेंदा बनजाऊं–या चालीवर. )

अल्ला तुही तुहीरे ॥ नबी तुही तुहीरे ॥ ध्रु० ॥
बगलम्यानें तबलबाजे घरमे नहीं कोई ॥
खालीं हंडी चुवा बजावे नाचन लागे डोई ॥ १ ॥
ढवळागिरी पर्वत म्यानें शंभू करता तप ॥
भिल्लिणीकी गांठ पडी जब तप हुवा गप ॥ २ ॥
नारद बडा जगदभारी औरत मागें दान ॥
साठ संवत्सरके लडके कीये होगये दानादान ॥ ३ ॥
गोकुळ म्याले राज करतहै नाम रखा गिरिधारी ॥
सोळासहस्र लौंड्या भोगे होये ब्रह्मचारी ॥ ४ ॥
मेरे साहेब उंच माडी कपडा धुवा न जाय ॥
हातका साबण गिरगया तो फिरफिर गोते खाय ॥ ५ ॥

**कपडा फाटे चमडा तूटे हो गये सब सायास ॥**
**एका जनार्दनका बंदा दीलका दरवेश ॥ ६ ॥**

( बादशहा प्रवेश करतो; सर्व कलावंतिणी जातात. )

**लैला**–( एकीकडे ) मेरे शहाजादेके शादीमे मेरे दिलोजान् मेरे प्यारे, मेरे दिलकी खायूष् पूरी करनेवाले, हुजूरे पूर्नूनसे, मेरे मनकी मुरादें कुच् पूरी न किई गई. वास्ते इस्के मय् आव् इन्के उप्र खपा मर्जी करके जरा गरम् होके बैठती हूं. क्या इंतेजाम् होता हय् सो देखती हूं.

**बादशहा**–क्या, हमारे आनेसे नाच् और् गाना मोकुफ् हो गया ? बडी ताजुबूकी बात हैय्. क्या हम् उस्मे कदर्दान् नहीं ? या गानेका इल्म् हमे मालूम् नही ? ( लैला आपल्याशीं कांहीं बोलत नाहीं असें पाहून ) क्या हमारे उपर खपा मर्जी ? लेकिन् हम्से कुसूर् क्या ? इसकातोवी बयान् करो. ( हात धरावयास जातो तों ती झिडकारून टाकिते. ) क्या नादानिकी बात् हय्, तो हातमेका हात् निकूल् जाता हय्. मय् समजाके आप् दोनो सात्, तो हरगिज् न होना तेढी बात.

**लैला**–आपूके बातोंपर येतूबार, तो नाहाक् दूसरेके छातीपर कट्यार्, मुजे आप बोलेथे के तू बुलबुलेसे प्यार्, तो फिर् क्यंव् हूवा शादीमे जिकूर्, क्या मेरा शहाजादा था गव्हार ?

**बादशहा**–साहेब जादेकू कोन् कहे गा गव्हार, उसे मय् कहुंगा पागल् नादार् लेकिन् मयूने कीया दूलनके उपर नजर्, फिर क्या काम जरोजिवर ? तुजे चाहीये या खायूष् हो अगर, तो दूर्या की नही लगेगा करनेकू सफर्, खजानेमेसे लेनेकू मत्कर कुसूर्.

**लैला**–वो खजाना हय् मेरा, फिर शादीका क्यंव् तोरा ? क्या आपके उप्र था जोरा, तो शहाजादेकू बिलफेल् कीया इशारा, और घरमे लाया मुशारा ? सबूर करूना था जरा, लाखो लवंडीया मिल्तीथी एक्सूरा, लेकिन् जिस्मे मेरी बदनामीकी तऱ्हा, उस्मे आपकू खुषी हजारा.

**बादशहा**–चले जाता चाहे उदर, वास्ते कहनेकू आया था तेरे फायदेकी खबर, लेकिन् तू हय् बेजार आप्ने बेतौरसे, अदमी

क्या चीज, जैसी मखडी मर जाती वैसा लहजेमे दुनयेके पडदे परसे चले जाता ह्य्. ( तोफांचे आवाज होतात. )

**लैला**—या अल्ला, ये क्या बला, इत्ने रात्मे ये क्या गिल्ला ह्य् ! इसमेसे आब् वल्ला कैसे सलामत् निकूल् जावे ? ( बादशहाच्या गळ्यांत जाऊन पडते. )

**बादशहा**—अय् मेरे प्यारी ये क्या गुल् ह्य् ? ये ऐसे रातके वक्त् आपने जानपे क्या आफ्त् आया ह्य् ? दुश्मन् आनेका मुजे बिल्कूल् इतल्ला नहि. अब् कोनसी तरकीब निकालूं ? अब् आपूकू ये आफूत्से कोन् बचावेगा ? अये जहांआँफ्री, ये बंदेने कोन्सा कुसूर् कीया तो इसके उपर तूने इस वक्त् दुश्मन्कू भेज दीया !

( एकनाथ नानकशाचे वेषानें प्रवेश करतो. )

**एकनाथ**–अल्ला रखेगा वैसाभी रहेना ॥
मौला रखेगा वैसाभी रहेना ॥ ध्रु० ॥
कोइ दिन् सिरपर छतर उडावे ॥
कोइ दिन् सिरपर घडा चढावे ॥
कोइ दिन् तुरंग उपर चढावे ॥
कोइ दिन् पावस खासा चलावे ॥ १ ॥
कोइ दिन् शक्कर दूध मलीदा ॥
कोइ दिन् अल्ला मागत गदा ॥
कोइ दिन् सेवक हात् जोड खडे ॥
कोइ दिन् नजीक न आवे घोडे ॥ २ ॥
कोइ दिन् राजा बडा आधिकारी ॥
एक दिन् होय कंगाल भिकारी ॥
एका जनार्दनी करत् कर तारी ॥
गाफल क्यंव करता मग्रुरी ॥ ३ ॥

तक्सीर माफ्. आप् इत्ने गमगीन् क्यंव ? ये देवगिरीका कीला, जिसे आप् दवलताबाद् कहते ह्य्, ये कुच् अद्नासा चीज नही के उसके उपर दुश्मन् आप्नी तोफ् चलाके एक रात्मे ले सके ! ह-जारो हजार तोफ् की फेर हुवी, तो कीलेका एक् फत्तर बी उडा न

जाबू. ऐसा ये कीला मुस्तकीम् ह्यू. मयूने अबि गनिमोंके छावनीमे जाके तालाशू कीया, गनीमूका इरादा ये ह्यू के, सुभों कीला सही करना. फिल्हाल् उनूने किलेकू घेरा दीया ह्यू. लेकिनू, ये कुच् मुमूकिन् नही के गनीम् कीला सही करे. आपूने फौरन् आप्के फौजूबक्ष् जनाब् जनार्दनपंत देशपांडे इनूकू तलूब् करना. और तमाम् जमीयतूकू फौरन् तय्यार होनेके बारेमे संदेशा भेज्कर बिल्फेल् जंगकी तयारी जारी करना. दुशमन् को कैद करके लायंगे. जनाबकी फतेमंदी खामखा होनेवाली, इसमे कुच शक् नही. मेरे उस्तादे शरीफ् स्वामी जनार्दनके मेहेरबानीसे मय् चोर रास्तेसे इस मेहल्मे आया. आब् निकूल् जाताहूं. ( गाणें म्हणत जातो. )

**बादशहा**–तू मुजे बडा साधू नजर् आता ह्यू. तेरे सवाल बहुती काबील् और दिल्मे रखनेके लायूकू ह्यू. ( लैलेचा हात धरून ) अय्. मेरे प्यारी जान् तू बेफिकीर रहिना. खुदा होतालाकी मेहेरबानीसे कुच् न तेढा हो जायगा. चलो उसकी याद् करेंगे. (जातात.)

---

# प्रवेश २ रा.

**स्थळ**–देवगड किल्ल्यावरील जनार्दनस्वामीची
समाधि लावण्याची जागा.

---

(कपाट उघडें असून स्वामीची समाधि लावण्याची तयारी चाललेली आहे.)

**जनार्दनस्वामी**–( आत्मगत ) ज्याप्रमाणें ध्रुव बालक बापावर रुसून भगवंताप्रीत्यर्थ रानोरान भटकत फिरत होतें, तसा हा एकनाथ ईश्वरप्राप्तीकरतां माझ्याकडे आला आहे. खरोखर हा ईश्वरी अवतारच आहे. माझें मोठें भाग्य ह्मणून याचें आगमन माझ्या आश्रमांत झालें आहे. नीच काम कसें करावें, याची शंका याच्या मनांत तिळमात्र येत नाहीं. चार घटका रात्र बाकी राहिली कीं, एकनाथ अंथरुणावर बिलकुल पडून रहात नाहीं. मोठ्या उल्हासवृत्तीनें हातांत केरसुणी घेऊन सर्व देवघर झाडून साफ करितो. घरांत दासदासी असून त्या निद्रिस्त आहेत तोंच माझ्या

स्नानाकरितां उष्णोदक तापवून तयार करून ठेवतो. पादप्रक्षालन स्वहस्तें करून आपल्या उत्तरीय वस्त्रानें माझे पाय पुसून साफ करतो. तुळशी, बेल, नानाप्रकारचीं पुष्पें, धूपदीप, नैवेद्य, वगैरे सर्व पूजेचें साहित्य स्वतः मांडून धोतरें चुणून ठेवितो. माझें स्नान झाल्याबरोबर पादुका पुढें आणून ठेवितो. मला कांहीं सेवकजनांला कमी आहे काय ? परंतु तो आपल्या स्वतःला एकुलता एकच समजतो आहे. मी इकडे ध्यानस्थ बसलों कीं, आपण तत्कांत तांबूल तयार करून ठेवतो. पिकदाणी धुण्याचें अमंगळ काम स्वतः हातानें मोठ्या प्रीतीनें करतो. भोजनास बसलों ह्मणजे माशा वारीत उभा राहतो. माझें भोजन झाल्यावर उच्छिष्ट पात्रावर प्रीतीनें बसतो. अंगांत सुस्ती येईल ह्मणून अल्प आहार करतो. भोजन झाल्याबरोबर स्वहस्तानें मला तांबूल देऊन मी वामकुक्षि केली कीं, माझे चरण संवाहन करतो. त्याला असें वाटतें कीं, याप्रमाणें जन्मभर माझी सेवा आपल्या हातानें घडावी. तींत कोणी वांटेकरी नसावा. असो, आतां नित्य-नियमाप्रमाणें समाधि लावण्याची वेळ झाली आहे. ( एकनाथ प्रवेश करतो. त्यास उद्देशून ) एकनाथ, मी आतां समाधि लावतों. तूं पहाऱ्यावर सावध असावें.

**एकनाथ**–स्वामीची आज्ञा प्रमाण. ( मोठ्या नम्रपणानें )

स्वजन जनार्दन, विजन जनार्दन ।
जन तो जनार्दन, होऊनी ठेलें ॥ १ ॥
जनक जनार्दन, जननी जनार्दन ।
जीव तो जनार्दन, जीवनकळा ॥ २ ॥
भाव जनार्दन, स्वभाव जनार्दन ।
देव जनार्दन, जेथें तेथें ॥ ३ ॥
एका जनार्दनी, आकळे जनार्दन ।
एका जनार्दन, निश्चळ तेथें ॥ ४ ॥
जप जनार्दन, तप जनार्दन ।
ब्रह्म जनार्दन, जेणें सहित ॥ ५ ॥
कर्म जनार्दन, धर्म जनार्दन ।

भोग जनार्दन, अहर्निशीं ॥ ६ ॥
योग जनार्दन, याग जनार्दन ।
स्वरूप जनार्दन, जनीं वनीं ॥ ७ ॥
ध्याय जनार्दन, ध्यान जनार्दन ।
एका जनार्दन, ज्ञान सहित ॥ ८ ॥

साखर दिसते, परंतु तिची गोडी कांहीं दिसत नाहीं. कापराच्या अंगीं परिमळ आहे, परंतु तो उघडपणें निराळा दिसत नाहीं. सर्व जग जनार्दनानें व्याप्त आहे, परंतु तें जाणण्याला आपली वृत्ति अभिमानरहित झाली पाहिजे. सुवर्णाला ज्याप्रमाणें पाठ किंवा पोट किंवा तोंड नसतें, त्याप्रमाणें आपली वृत्ति झाली पाहिजे. आपला मीपणा आपल्यामध्येंच हरपून गेला पाहिजे. लोहपरिसाचें घर्षण झालें अथवा सागरांत गंगा जाऊन मिळाली ह्मणजे ती जशी पूर्व स्थितीला येत नाहीं, त्याप्रमाणें स्वामीच्या संगतीनें मला अभक्ताला भक्ति उपजत चालली आहे. उघडच आहे कीं, दासी जर राजाच्या ठिकाणीं रत झाली, तर तिला दासी असें कोण ह्मणणार आहे ? ( जासूद प्रवेश करतो. )

**जासूद**–आदाब अर्ज, जनाब् मुर्तजा निजामशहा-पादशहा इनूका स्वामी जनार्दनकूं ये हुकूम् हय् के, दुष्मन्ने सब फौजबंद होके कीले दौलताबाद्के पन्हेकू घेरा दीया हय्. वास्ते इस्के अबिके अबि जमीयत् लेके उन्के उपर हमूला करना. और फोरन् जाके सब् फौजूकू कत्ल् फरमाना. गनीमूकी फौज दस् हजार हय्, और तोफ्खाना जबर् हय्. चालीस तोंफकू एकसा बत्ती देके उनूने बडी धूम मचाया हय्.

**एकनाथ**–आपूने पास् फौज् तयार कितनी हय् ? और तोफ तयार कितनी हय् ?

**जासूद**–आपने पास फौज ये कीलेमे तय्यार पांच हजार हय्. और तोफ् बडे पल्लेकी जैसेके दुर्गादेवी तोफ्, बालाहंसार तोफ्, और मेंढा तोफ् वगैरे चार हय्, सिवाय तोफ छोटेखानी दस् हय्. इत्ने फौजसे दुष्मनूके उपर चढाई करनेका जनाब् फौजबंद जनार्दनपंत

देसपांडेकू हुकूम् किर्या हयू. और हुकूम् की तामिली अबीके अबी होना चाहीये.

**एकनाथ**–बादशहाके हुकूम्की तामिली बिल्फेल् बजा लायंगे. आप् चले जाईये. और बादशहाको मारुजा स्वामीके तरफ्से ऐसा करनाके आब बेफिकूर रहिना. दुष्मन्कू गिरफ्तार करके आप्के कद्म् चोसीके लिके मौजूद् करताहू.

**जासूद**–आदाब अर्ज, मय् इजाजत् लेताहूं (सलाम करून जातो)

**एकनाथ**–( आत्मगत ) या समयीं माझी स्थिति अत्यंत भयंकर आहे. स्वामीमहाराजांची समाधी लागली आहे. ती दोनप्रहरानंतर उतरणार. तोंपावेतों दम खाल्ला तर, किल्ल्याला शत्रूंनीं शह दिलाच आहे. तो ते सही केल्याशिवाय रहाणार नाहींत. बरें, स्वामीच्या समाधीचा भंग केल्यास स्वामी माझ्यावर कोपायमान होतील. आतां यावर तोड काय काढावी ! प्रत्येक गोष्टीवर तोड ह्मणून असतेच, या न्यायानें ( विचार केल्यासारखें करून ) यावर तोड इतकीच कीं, स्वामीचा पोषाक आपण चढवावा. ढाल तलवार हातांत घेऊन दुशमनांवर तुटून पडून त्यांना नेस्त नाबूद् करावें. आजपावेतों स्वामीबरोबर युद्धकलेचें जें अध्ययन केलें आहे, त्याची आज परीक्षाच आहे. तिरंदाजी करणें, भरधांव घोडा फेंकणें, भाला सफाईनें मारणें, तलवारीनें जानवें उतरणें, अचुक जाऊन शत्रूवर तुटून पडणें, छापा घालून शत्रूचा कमरगा फोडणें वगैरे गोष्टी स्वामीच्या कृपेनें मला अवगत झाल्या आहेत. स्वामीचें शिरस्त्राण मस्तकावर धारण करतों, ह्मणजे अपयश कधींहि येणार नाहीं. त्यांची ती विजयशालिनी भवानी तलवार हातांत घेतों आणि सूर्याच्या अश्वाला मागें टाकणारा असा जो वलाहक नांवाचा घोडा आहे त्याजवर स्वार होतों. त्यांचा पोषाक केला ह्मणजे सर्व फौज मला जनार्दनपंत देशपांडे सेनापती असेंच समजतील. ज्या यादववंशाचा हा किल्ला आहे, ते रामदेवराव जाधव, ज्यांच्यावर श्रीज्ञानेश्वरमहाराजांची पूर्ण कृपा, त्यांच्या चरणांचें स्मरण करतों. आज्ञेशिवाय कोठें गेला, याची स्वामीमहाराज चौकशी करतील, त्यांच्या मनास त्रास पडेल, करितां येथें एक पत्रिका लिहून ठेवावी. त्यांत बादशहाचा सक्तीचा हुकूम,

व निरुपायास्तव आपण केलेलें धाडस, यांचें संक्षिप्त रीतीनें वर्णन करावें. जय स्वामी जनार्दन महाराजकी जय. यश देणार स्वामीचे चरण समर्थ आहेत. ( स्वामीस नमस्कार करीत असतां पडदा पडतो. )

## प्रवेश ३ रा.

**स्थल**–देवगड किल्ल्याच्या बाहेरील पटांगण.

( तोफलखान आपल्या एका सरदारासहवर्तमान प्रवेश करतो. )

**तोफलखान**–मुजे ताजुबकी बात ये मालूम होती ह्य के, कीलेके अंदरसे तोफ चलरही ह्य. और कीलेके बाहेर ये घोडेसवार कैसे आये ! हम् लोगोने तो कीलेका दरवाजा रोंख लिया ह्य. सिवाय इसके उन् लोगोने अंदरसे जंजीर लगाया ह्य. तों फिर लोग् बाहेर कैसे आये ? मय् समजतां हूं के, कीलेपरसे बाहेर आनेके वास्ते दुसरा चोर रास्ता होगा. उस् रास्तेसे ये दगा होता ह्य. अलबत्ता चार हजार लोग् बाहेर आये ह्य. आप् दोनो तरफसे हमारे उपर हमला होता ह्य. अंदरसे तोफ्का और बाहेर रिसालेका. अब् कौनसी तरकीब निकालता ?

**सरदार**–बहोत तन्का ताकद्दार और खुबसूरत नजर आता ह्य. ( लांब पाहिलेंसें करून. ) इस्का घोडा कित्ना तेज ह्य ? समसेर कैसी चलाता गोया एक बिजली. पैले तो आब् लोगोने उस्को और उस्के लोगोको बहोति बहोत पिछे हटाया. और् सेकडोकू कतल फरमाया, लेकिन् ये जनार्दनपंत देसपांडेने सबकू इनाम् बक्षीस वगैरा देनेका एकरार करके सब्कू वापस लाया. अब् बहोत् जोरसे हमला आपने उपर होता ह्य. ( दुसरा सरदार लंगडत प्रवेश करतो. )

**दुसरा सरदार**–तकसीर माफ्. आप्के फरजंद शहाजादे बिलनखान तोफके गोलेसे अस्मान् उडगये. ( रडत रडत ) और मेरे पावकू बडी जबर जखम–

**तोफलखान**–लाहोल्वलाकूवत् ! इल्लाबिल्ला ! या अल्ला कैसा बूरा वक्त लाया ! मेरा फरजंद बिलन्खान मुजे जंगमे छोडके कैसा

निकूल गया. ( कान धरून ) तौबा तकसीर तौबा. मेरी खामखा खातर थीके मयू कीले दौलताबाद सही करूं. लेकिन् अबि कुच् अच्छा जमाना नजर नहि आता. ( तिसरा सरदार प्रवेश करितो. )

**तिसरा सरदार**—तक्‌सीर माफ्. जनार्दनपंत करके बडा जवा-मर्द फौजबक्ष ह्यू. शेंकडोकू कत्‌ल् करता ह्यू. मयूने ये आखोंसे देखाके, आपूने सेंकडो लोग उसके उपर तलवार चमकाते. भाला फेकते. लेकीन् उसका एक बालबी तेढा नही होता. आब् फतेमंदी की बात् तो दूर ह्यू. लेकिन् आपूके लोक जानूसे कैसे बज जावेगे?

**तोफलखान**—ये जनार्दनपंत देसपांडा मेरे सामने क्यंव नहि आता? फिर उसकू मयू अल्लाका डेरा बताता. ये दौलताबादके कीलेमे मेरा बडा फरजंद हक्क हूवा ह्यू. जान् गई तो भेतर, लेकिन् शिवाय कीला सही करनेके मयू पलटा कबी न खाऊ. यकीने कामील् समजना. (चौथा सरदार मोडलेला हात गळ्यांत बांधून प्रवेश करतो.)

**चौथा सरदार**—तक्‌सीर माफ्. आपूने फौजबक्ष जनाब सपूतरखान मिया जनार्दनपंतने घोडेपरसे खीचा. फिर ओ गिर पडे.और उन्‌के तन्‌के उपर देसपांडेने आपूना घोडा डालके उसको कतल कीया. (रडत रडत ) जनाबेआली मेरा हात उस गडबडमे जरासा तूट गया.

**तोफलखान**—ये जनार्दन कोई शैतान ह्यू या जिंद् ह्यू? या कौन् ह्यू तोबी कौन्? ऐसे ऐसे लढवय्ये मानिंद् रुस्तुमके काटता ह्यू, उनकी गरदन चाक करता ह्यू, चलो मयू जातसे उसका मुकाबिला लेताहूं. (पांचवा सरदार एका डोळ्यावर हात टेऊन प्रवेश करतो.)

**पांचवा सरदार**—तक्‌सीर माफ्. आपके तोफखानेके गोलंदाज दरजे अव्वलके जनाबखानखा साहेब बहादर जनार्दनने तोफके कानेपर हात रखके तलवारसे उडादीया. और मयू नसदीकथा, तो मेरे आखोमे भाला मारा. ( रडत रडत ) आब् मयू क्या करूं! मेरा गरीबका आंख फूट गया.

**तोफलखान**—अब्‌सोस्, अब्‌सोस्! एकके पिछे दुसरे रोते आते. (मोठ्यानें ओरडून) तुम्‌ने उसकू क्यं नहि काटा? फरजंदकू काटा, बक्षीकू काटा, गोलंदाजकू काटा, तुमकू क्यंव नहि काटा? जा

काला मू कर जा ह्यांसे. और फिर कोई रोते आयगा तो मय् उसकू काट खाऊ. ( एक म्हातारी रडत रडत प्रवेश करते. तोफलखान तिला धरतो व चावतो. म्हातारी त्याला चावते. )

**म्हातारी**–हात् तेरा खाना खराब होय्. मय् बुढ्ढी तू जवान्, मुजे काटखाता तू ? अद्मी हय् या शेर हय् ? मय् रोती इस्का वझे तू कुच् जानता हय्! ये कीलेका चोर रस्ता कोन्सा हय् ये मय् जानती हूं. अगर तुजे चाहीये तो मय् लेजाउंगी अंदर. फिर देख कैसा चमकता तेरा सिकंदर, नाचेगा तू खुषीसे जैसा बंदर, लेकिन् मुजे तूं क्या देगा तवंगर, ये तरकीब् मय् निकाली, चूंके मूर्तजा निजामशहा किलेदार, हमे सताता और करता बेजार, वास्ते इस्के सजा होना, बहोत् बेहेतर, मगर मेरी येक हय् तकरार, तूने आकेला आना चाहीये मेरे बराबर, आंखे तेरे बांधुंगी कपडेसे जबर, चाहीयेतो कबूल कर, नहि तो चली जाती चाहे उदर.

**तोफलखान**–अय बुढ्ढी इमान्दार, जरा सबूर, तू मुजे कीलेका चोर रस्ता बताई अगर, तो मय् तुजे दौलतमंद बनाऊंगा गबर, तुजे आदा करू जागीर, या तेरे फरजंदकू बनाऊं सरदार, तेरे बातोंपर रखता हूं येत्बार, कपडेसे आंखे मेरे बांधताहूं बेफिकर, आर सात् तेरे चलताहूं लेके तलवार, अये मेरे प्यारे सरदार, तुम् यंहि ठेरना बेकदर, रास्ता देखके आताहूं इदर, फिर तुमे लेजाऊ मानिंद शेर, और फतेमंदी करेगा परवरदिगर. ( म्हातारी तोफलखानाचे डोळे बांधते व त्याला हातीं धरून घेऊन जाते. लष्करी पोषाक चढविलेला एकनाथ आपल्या फौजेसुद्धां प्रवेश करतो. त्यास पाहून तोफलखानाचे वायाळ झालेले सरदार छपून बसतात. )

**एकनाथ**–( फार जोरानें ) ठेर जाना, सबूर सबूर, भागोगे तो नाहक् मर जायंगे. ह्यांसे एक उंगल पलटा खायेंगे तो तुमे कसम् खुदाकी. ह्यांसे तुम् कधि पीछे हाट जायंगे, तो मेरी समशेर तुमारी जान चाक करनेके वास्ते बिलकुल तमा न करेगी. मेरा तुमकू ये सक्त हुकूम् हय् के, बिगर तोफलखानकू कैद करके तुम् काला मू लेके वापस् जायंगे, तो मय् तुमकू तोफके मू चढाऊंगा. अय मेरे बिरादर जो तुमकू रोज् खाना खिलाता हय्, जो तुमारा परवरदिगर

पालन करनेवाला ह्यू, उसे तुम नमकहरामी करते? उसे तुम बेमान् होते? ऐसे नाकाबिल् नाताकद्वाले नामर्द जंगमे कतूल् कमा हो गये तो बेहतर.

**एक रिसालदार**–हमारे जीकू डर मालूम होता. हमू तो चार हजार दुशमून् दस् हजार फत्ते मंदी कैसी होगी?

**एकनाथ**–मेरे दोस्तों, हिम्मत मर्दा तो मदत खुदा. मेरी जान् तुमारे वास्ते मौजूद ह्यू. तुमारे एक् बालकू धक्का नहि लगेगा. तोफलखानका लडका, बक्षी, और गोलंदाज मोहतमीम् मारे गये ह्यू. तोफलखान बहोत् गमगीन् ह्यू. उस्का तालाश करके उसूकू जिंदा पकडके जनाब मुर्तजा निजामशहाके तरफ ले जायंगे. तोफलखान्की जमीयत् आपनेसे दुग्नी या दसदफे जादा हो, तो मुजाका नहि. (सगळे परत जातात, तों त्यांस तोफलखानाचे छपून बसलेले लोक सांपडतात.)

**एकनाथ**–तुम् किनके लोग् ह्यू?

**पहिला सरदार**–हम-गम—तुन हमू एक ह्यू.

**एकनाथ**—क्या बात् करता? हमारे रिसालदार ह्यू? तुम् सच् बात् करो, नहि तो जबान् कट जायंगी. जान् कट् जायंगी. क्या परवल् ह्यू? (दुसरा सरदार दुसरे लोकांस पुढें ढकलतो. एकमेकांस बोलण्याचा आग्रह करतात. ओढाताण करतात.) परवल मालूम् नहि. हत्यार नीचे रखो. मुर्तजा निजामशहा बादशहाके तुम् कैदी ह्यू. तीन दफे गिनूता हूं. इसमे तुम्ने हत्यार नीचे न रखा तो तुमारा हात तुमारे हत्यारके सात् कट जायगा. देखो गिनताहूं. एक, दोन, तीन. (सगळे हत्यार ठेवितात व गुडघे टेंकतात. हात जोडता[illegible]

**तिसरा सरदार**—ये हत्यार तुमारा ह्यू. मगर हमारी [illegible] बचाव. हमकू छोड देव. कैदखानेमे मत् डालो. ये हमारा अ[illegible]

**एकनाथ**—तुमारा सुभेदार तोफलखान किदर ह्यू? [illegible] अबीके अबी. नहि तो कैदखानेमे डालके तुमारे आंखे फोड[illegible] चमडा निकालेंगे. बूरे हाल करके फिर गरदून उडा देंगे. ज[illegible]लो, सुभेदार तोफलखान किदर ह्यू?

**चौथा सरदार**—एक बुढी अम्मा ( मोठ्यानें रडतो ).

**एकनाथ**—क्या तेरेकू माकी याद हूवी ? तू जंगके वास्ते आया हय् या रोनेके वास्ते ? तेरी गर्दन् मय् आब् उडादेता. ( ठार मारण्याचें अवसान दाखवितो. )

**चौथा सरदार**—मेरी बात् सुनो. मय् ऐसा बोलता हय् के, एक बुढी अम्मा ह्यांपर आइथी. उसे कीलेमे जानेका चोररस्ता जिसूमेसे तुमारी जमीयेत् चली आती हय् वो मालूम हय्. उस् बुढीको तुमारे मुर्तजा निजामशहा बादशहाने बहोत नाराज कीया हय्. वास्ते इसके हमारे बादशहाको वो रास्ता बतानेके वास्ते ले गयी हय्; मगर् वो देखो हमारे बादशहा तोफलखानको लेके इदर आती हय्.

**एकनाथ**—सब् लोग् खामोष् रव्हना. कोई जबानसे बात करेगा तो मय् जबान छाट् लेऊंगा. सब् लोगोने एक सरीके एक बाजूकू खडे रव्हना, मूसे एक लव्हज् बी नहि निकाल्ना. मय् तोफलखानके सात् बात् करताहूं. ( तोफलखान व म्हातारी प्रवेश करतात. तलवारीचें टोंक त्याच्या गळ्याशीं लावतो. म्हातारी तोफलखानाचे डोळे सोडते. ) जनाबेमंद, अगर जान बचानेकी खायश् हो, तो हत्यार खाली रखो. बहोत् अपसोस की बात् हय् के, आप् जनाबमुर्तजा निजामशहा बादशहाके ताबेदार हो. आपूके तमाम् उमराव कैद कीये गये हय्. उनूका हत्यार छीन लीया हय्. आपूके तरफ्का ह्यां एक बी अदमी नहि. इसका गौर होना चाहीये. आपूकू पादशाके तरफ ले जाताहूं, और आपके हातपर हात देके ये कसम् करतां हूं के आपके जानपर आफत् न आवेगीं ऐसी तरकीब निकालके आपकू बहोत् आदबसे आपने जायपर वापस् पोहोचावेंगे. आप मेरे बडे भाई हो, मेरे हातूसे हात मिलाव, और मेरे साथ चलो कीलेमे. आपकू बादशाहासे बडि जियाफत् दिलाता हूं. बिलकुल् रंज् नही करना. आज हमारा दिन् हय्, कल तुमारा था. ये सब् शिकंदरके तारे चमकते हय्.

**तोफलखान**-मेरे लोगोका मुजे ऐसा घुस्सा आया हय् के, मय् उनकों मानिंद बकरींयोकें काट खाऊ. तुमने अपने हत्यार कैसे दुश्मनूके ताबेमें दिया ? और तुम् कैदी कैसे बने ? जंग करते हुवे

मरजात तो षहिद्र होते थे. तुम् लोगोनें मेरा दगा किया. बात् मेरे वापस जानेके एकसा सबकु कतल् करूं. ( एकनाथास उद्देशून ) तेरे सुपर्द मय् आपनि समशेर करतां हुं. मेरे लोगोनें दगा किया, यिसलिये मेरा फरजंद्र और बक्षी और गोलंदाज् गनिमोसे कतल कमा हो गये. और मयू तुम्मेसे गिरफ्तार् होगया. तौबा, तौबा, इन् लोगोनें कीलेके ऊपर चढाइ करनेकी मेरंकू कैसी सल्ला दिया. और आप जातसे तो नामर्द ठैर गये. ( एकनाथाचा हात धरून पडद्यांत जातो. सर्व फौज त्यांच्यामागून जाते. म्हातारी दुसऱ्या दिशेनें निघून जाते. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थल**—देवगडच्या किल्ल्यावरील बादशहाचा दरबार.

( दरबारांत मुर्तजा निजामशहा बादशहा, वजीर चंगीझखान व कांहीं सरदार बसले आहेत. )

**बादशहा**—हसन गंगू ऊर्फ अल्लाउद्दीन् बिरामनी जो गद्दीका अव्वल मालक, वो पहीले गंगू बमूनोके पास् गुलाम था. लेकिन् आपनें नेकीके और इमान्दारीके मदतसे इतना बढगया और जिसने इतना बडा मुलुक् काबीज् किया के तुंगा नदीसे तहत् रामेश्वरतक उसका नाम चलताथा. महमदशा, फिरोजशाहा अहमदशाहावल्ली, अल्लाउद्दीनशाहा, हुमायूनशहा, ऐसे ऐसे बडे बडे काबील बादशहा होगये. और जिस् रियासतमें वजीर महमद गवान् सरीके अकलमंद और दानिशमंद शक्स पैदा हुये. बाद महमद गवान्के इन्तकालके बीरामनी रियासतके पांच तुकडे होगये. जैसे के, आदिल्शाई, कुत्बशाई, इमातशाई, हम् निजामशाई, और बेरीदशाई. कीले दवलताबादका मुलुख् हमारे सुपुर्द हय्. ( जासूद प्रवेश करतो. )

**जासूद**—तक्सीर माफ्. सरकारकूं ऐन दिलपसंतीका संदेसा कहनेके वासूते मुजे जनाब फौजबक्ष, जनार्दनपंत देशपांडे साहेबने भेजा हय्. सरकारकी दीन बदीन खुदाहुताला कलमूजारी करे. मनूकी

मुरादे पुरी करे. फिलहाल जो जंग हुवा और सरकारका दुश्मन तोफलखान जिसनें आपने कीले दौलताबादके पन्हेकु घेरा दियाथा, उसके फरजंदकू और बक्षीकू शिकस्त किया. और तोफलखानकू गिरफ्तार करके सरकारके कदम् बोसिके लिये पाबंद करके लाया ह्यू. दरबारके अंदर आनेकी राहा देखता ह्यू.

**बादशहा**—माशा अल्ला, सुभान अल्ला, असतू गफरुल्ला ! या एलाही ये सब तेरी कुदरत् ह्यू. आज जो तुनें मुजपर करम किया, इसका एहसानमंद मयू कितना होगया ह्यू ! तू पाक ह्यू, मयू गुन्हेगार. ह्यू. अये मेरे वजीर और तमाम सरदार लोग, जनार्दनपंतने ये जो बहोत् दिलपसंतीका काम किया ह्यू इसका मोबदला उसकू इनाम या जागीर देना जूरूर ह्यू चूके आपके पास फौज सिर्फ् पांचहजारथी, और दुश्मन्की तो दसहजार थी. लेकीन् बडी ताजूबकी बात ह्यू के सबकू कतल कमा करके तोफलखानको गिरफ्तार किया और हमारे सामने वास्ते कतल करनेके लाया ह्यू. ( जासुदास उद्देशून ) जाव्, उसकू और जनार्दनपंडतकू अंदर दरबारमे ले आव. ( जनार्दनपंत, एकनाथ व कैद झालेला बादशहा प्रवेश करितात. जनार्दनपंतास बादशहा सामोरा येतो व हातांत हात घालून आपल्या शेजारीं बसावितो. )

**भालदार**-निगारुबरु जनाब मुर्तजा निजामशहा अर्कानै दवलत् किले दौलताबाद और अहमदनगर तक्तूपर रोशन ह्यू, आदबसे, तमीजसे हुशार् रहिना.

**बादशहा**-जनार्दनपंत देशपांडे, ये जो तुमने फते मंदीका काम किया, इसके बदला पहले मुलाकातूकू आपकू ये मुर्तजा निजामशहा पादशहा " गाजी " ये किताब् देता ह्यू, और आपने गलेका मोती और हिरेका कंठा बहोत् किमतवान जवाहिरात् आपकू इनाम देता ह्यू. लेनेका इनकार न कीजिये. शिवाय इसके आपकू दसहजारकी जागीर आदा करता हूं. इस बारेमे फौरन् सनद करके आपकू देताहूं. आपके पिछे आप चाहिये उसकू देना. सरकारकी बिलकुल् हरकत होनेवाली नहीं. ( चाकरलोक पोषाख आणून ठेवतात)

लढाईका जिकूर कैसा हुवा उसका बयान् सुन्‌नेके वासूते मयू बहुत परिशान् ह्यू.

**जनार्दनपंत**—तकसीर माफ् फिद्वीका मारूजा कदम् बोसी करके ये ह्यू के, आजका लढाईका जिकूर मयू बिलकूल जानता नही. जब कीलेकू दुश्मनोने घेरा दिया, उस वक्त मयू बिलकूल होशमे नयी था. मयू भगवतके ध्यानमे इतना मषुगुल था के, लढाई कैसी हुई और फतेमंदी किनकी हुइ, ये हाल मुजे बिलकूल मालुम् नही. तोफकी फयूर मयने सुनी नही. आजका हुजूरे पुरनूरके नाम का डंका ये बहादूरने बजाया. ( एकनाथास उद्देशून ) इसका इस्मे शरीफ् एकनाथ ह्यू. और ये मेरा बहोत प्यारा चेला ह्यू. सबके दिलकी खायष इसने पूरी किया. अल्लाने इसकू फता दिया. ये आपके कदमकी भलाई ह्यू. सरकारकू तसलीम बजाव. कुरनीसाद करो. और लढाईका बयान् करो. ( एकनाथ कुरनिसाद करतो. बादशहा त्यास आपल्याजवळ बसवितो. )

**बादशहा**—बेटा एकनाथ, तूं क्या हमारे दिवान बहादूर गाजी फौजबक्षका चेला ह्यू ? तूं तो बिलकुल् छोकरा ह्यू. आपतक तेरेकू लढाईका इतना इलूम् कहांसे पैदा हुवा, के तूने तोफलखानको कैद करके लाया ह्यू. लढाइका जिकर कैसा ह्यू मुजे बयान् कर.

**एकनाथ**—तकसीर माफ्. सरकारकी फौज तोथी पाचहजार, फिर हमने कीलेमे रख दिया हजार, और चोर रास्तेसे लेगाया बाहेर चार हजार. दुश्मन् बहोत् हुवा बेजार, जब उसने दोहो तर्फोंसे देखा भडिमार, पहले तो आपने लोगोका टूटगया कुफ्र, फिर हम बोले बिरादरो जरा ठयरो सबूर. एक बुद्धीनें तोफलखानकू लेगाया दूर, उसे बहेकाके बतातीथी रस्ता चोर, वापूस लोट गई किसे मालुम नही उसका फंद फितूर. हम लोगोनें तोफलखानको किया गिरफ्तार, और लाया ह्यू कदम् बोसीके लिये, ह्या दरबार. उम्मेद ह्यू सबकू माफ् हो जायगा कूसूर, पावेगा वो आपनी गद्दी की जायदार और. हक्क होगये जंगमे इसके फरजंद और गोलंदाज मानिंद वजीर, सजा ये पाया ह्यू खुदासे बेतक्रार.

**बादशहा**—बेजा बात् बेजा बात्, तुम करते हो हमारे सात्.

खुदानें इससे सजा करनेके वासते भेजा दिया हमारे हात, इसकी हम् जान लेईंगे करेंगे मात, यकिनें कामील हुवा दिनरात्. अय् मेरे लढनेवाले रिसालदार, लेजाव कैदखानेमे ये मगरूर, पावंद् करो ये हरामखोर, और सुभो उडादो इसकी गर्दन बेफिकर.

**तोफलखान**—मेरा फरजंद् और मेरा गोलंदाज मानिंद् वजीर लढाइमे हक्क हो गये. ये खुदा हुतालानें मुजे बहोत सजा किया. सिवाय इसके सरकारकी हो मर्जी, तो मय् न करूंगा अर्जी, के मुजे प्यारी है जान मेरी. किसमत् मेरा खराब, तो दुश्मन के हातमे मिलगया, जैरा पिया हुवा शराब, छातीपर हात रखके बक्षी बोले मूसे बात, लव्हजू हवेमे उड गया जैसा परिंदा जात गोते खात. जिस मूसे मुजे जान बचानेका किया कलाम्, उस मूको आप् सो सो दफे सलाम.

**वजीर चंगीझखान**—सरकार, ये तोफलखान जो आपनेकू फिलहाल् बादशहा कहता हय्, ये बहोत दगाबाज अदमी हय्. इनूनें मूसे इलिचपूरके गद्दीका मालक बुन्हान महमदशा इमादशाही बिलकुल बच्चा उसको कैदमे डालके ये हरामजादा बादशहा बनगया हय्. इसकु सजा होना जुरूर हय्.

**बादशहा**—क्यों दिवान साहेब, इसके उपर आपकी राय क्या है सो हमे पेश् किजीये. क्या आपनें चेलेने ऐसा येक़रार कीयाथा के गनिमोकू कुसूर माफ् हो जायगा.

**जनार्दनपंत**—सरकारे आली फौद्रवीनें पहिले मारुजा किया हय् के जंगका किस्सा मुजे बिलकुल मालूम् नहीं. आपको जो कुछ इनाम् बक्षीस जागीर आदा करनेके हो वो एकनाथ जैसा मय् वैसा वोही खैरख्वाह नौकर समजके उसकू मिलनेका फर्मान होना. मोतीयोका और हीरेका जवाहिरात पेननेकू मय् नही आब काबिल, इसलिये सरकारनें होना रहिम् दिल् और इस्कु सब् आदा करना बिलफेल्.

**बादशहा**—( मोत्यांचा कंठा व पोषाख, एकनाथास देण्याकरितां पुढें करितो. तो घेण्यास अनमान करितो.) तुजे दिल चाहेसो मांगले.

**एकनाथ**—तकसीर माफ्. मयूने ख्वाप्मे न देखा ऐसा जवाहिरात्, मय् लेनेकू इनकार करता हुं साफ्, दुश्मनकू गुन्हा हो जाना

माफ्, तो मय् पाया हूं जवाहिरात्, और जागीर हजारो लाख. अगर आप् कौलके सच्चे हो तो एक मानो गरिबकी बात्, उस्ताद हमारे थक गये काम करते हुवे दिन रात. तातील मिलना उनकू हर जुमेरात्, चूंके दत्तात्रय हमारे भगवान् का दिन कहला जाता है सबके जात्.

**बादशहा**–खुशी हू मय् तेरे सवाल सुन्ता हुवां. माफ् किया गुन्हा इस्कू जैसा तेरा मनसुबा हुवा. जुमे रातकू तातील दिलाता हू येहेसान मंद हुवा, और तुमने दत्तात्रय भगवान्का नाम लेना संसार मे गिरफ्तार् न हुवा. अब मैय्फिल्मे बुलाव परियोंकू ऐसा इन्तेजाम् हुवा, सब मिलके खुशी हो जायंगे, तुम बहोत परिशान हुवा. तूही नानक होके मुजे महेलमें मिला हुवा, मयने तुजे आप पूरा पैछाना हुवा. महेलमें तू कैसा आया मुजे ताजुब हुवा, तूही मेरी जान बचायी, मय एहेसान मंद हुवा.

**एकनाथ**–सुना मयने तोफकी फैर जब अंदाज हुवा, बादशाकी जान घबराके बहोत परिशान हुवा. नानकका मयने लिबाज पेना बहुत खुशी हुवा, उस्तादके पांवसे मय आपका महेल दाखल हुवा. आमके झाडपर चढके, महेलमे मय तनबीसे अंदर दाखल हुवा, मारुजा आपकु किया के गनीमका हमला हुवा. ( नाच सुरू होतो. )

**गोरस बेचन चले गोरी मथुरा । तुम केंव ठाडे नंदकिबिछोरा ॥ ध्रु० ॥ मत खेचो मेरी फारी चुनेरी । सास बुरी मैंकु देवेंगी गारी ॥ गोरस० ॥ १ ॥ चैतनकी मेरी आंगिया फारी । काय कहूं मै नंगी उघरी ॥ गोरस० ॥ २ ॥ हांकारहुकार मेरा गरवा फोरा, । ठाके गोरस सबही गीरा ॥ गोरस० ॥ ३ ॥ एका जनार्दनीं सबही भेटे, । लागा चुटका फेर न छुटे ॥ गोरस० ॥ ४ ॥**

**छोडा तन-धन-गेहका काम । ज्यासे हरिसे बदलाम ॥ ध्रु० ॥ हम तो रामभजनमो बैठे । याबिन साधन सबही झूटे ॥ छोडा० ॥ १ ॥ कछु नही जाने मुद्रा माला । पिया नामामृतका प्याला ॥ छोडा० ॥ २ ॥ खाना पिना बिसर पडा । नजरम्याने अल्ला खडा ॥ छोडा० ॥ ३ ॥ एका जनार्दनका बंदा । तिनो लोकमे देखे खुदा ॥ छोडा० ॥ ४ ॥**

# अंक तिसरा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**–देवगडचा किल्ला.

[ एकनाथ हिशेब तपाशीत बसला आहे. ]

**एकनाथ**-( आत्मगत ) ज्याप्रमाणें अल्पोदकींचा मासा महासागरांत यावा किंवा जन्मांधाला दृष्टि प्राप्त व्हावी किंवा भिकाऱ्याला इंद्रपद प्राप्त व्हावें, तसें मला स्वामी जनार्दनाचे पाय प्राप्त झाले आहेत. या जगांत दैवी संपत्तीनें भाग्यवान् व्हावें, अशी ज्याची इच्छा असेल त्याची जन्मभूमि गुरुसेवा होय. ही सेवा शोकग्रस्तांना ब्रह्म करून सोडते. सकल जलाचा सांठा घेऊन गंगा ज्याप्रमाणें समुद्रास मिळते किंवा श्रुति ज्याप्रमाणें ब्रह्मपदांत प्रविष्ट होतात, किंवा सकल गुणालंकारासहवर्तमान पंचप्राण ज्याप्रमाणें पतिव्रता भ्रतारास अर्पण करते, त्याप्रमाणें अंतरबाह्य सर्वस्व मी श्रीगुरूला अर्पण करतों. विरहिणी स्त्रीचा पति ज्या देशांत असतो, तो देश जसा रात्रंदिवस तिच्या ध्यानीं मनीं दिसतो, त्याप्रमाणें गुरूचा आश्रम माझ्या ध्यानीं मनीं दिसो. गुरूचेठायीं असणाऱ्या प्रेमानें मी वेडा होऊन जावो. गुरूच्या वियोगाचें एक निमिष मला युगाहून थोर वाटो. गुरूच्या गांवाहून कोणी आलें किंवा गुरूंनीं कोणी धाडिलें, तर मरणोन्मुखाला जीव आल्याप्रमाणें किंवा सुकून चाललेल्या मोडावर अमृतधारा पडावी त्याप्रमाणें, नाहीं तर रंकाला ठेवा दृष्टीस पडावा त्याप्रमाणें मला आनंद होवो. असो, गुरुस्तुति कितीही केली, तरी तृप्ति होणार नाहीं. आपल्यास श्रीगुरूंनीं सर्व हिशेब तयार ठेवण्यास सांगितलें आहे. हिशेब सर्व तयार आहे. एक पावआण्याची चूक लागली आहे. ती सांपडावी ह्मणून आज तीन दिवस अहोरात्र जागरणें करून झटपटतों आहें, पण ती कांहीं सांपडत नाहीं. आतां काय करावें ? दहा वेळ हिशेब तपासला, पण ती

कोठें नजरेस पडत नाहीं. जमेकडची बेरीज आणि खर्चाकडची बेरीज यांचा एक मेळ बसत नाहीं. पाव आण्याची चूक ज्याअर्थी मिळत नाहीं त्या अर्थी श्रीगुरूची सेवा आपल्या हातून पूर्णपणें घडत नाहीं हेंच खरें; नाहीं तर असें झालें नसतें. माझ्या प्रामाणिकपणास आणि स्वामीसेवेस कालिमा लागली. यांत कांहीं संशय नाहीं. कोट्यवधि रुपायांच्या घडामोडी माझ्या हातून झाल्या, परंतु आतां अभ्युदय होण्याची वेळा, आणि हिशोबांत पाव आण्याची चूक, हें कांहीं बरोबर नाहीं. जय श्रीगुरुमहाराज एवढी पाव आण्याची चूक सांपडून द्याहो ! एकदां बेरीज तपासतों.

( जनार्दनस्वामी प्रवेश करितात. )

**जनार्दन०**—अरे हा अजून जागाच आहे ! हा इतका हिशेबांत चूर कसा झाला आहे ! मघांपासून मी याच्याकडे नजर देऊन पहात आहें; हा अगदीं गुंग होऊन गेला आहे. आतां पहाट होण्याची वेळा आली. बसून बसून कंबरेला कळ लागली असेल ! डोळे किती लाल झाले आहेत ! हा इतका निमग्न झाला आहे कीं, मी याच्या इतक्याजवळ जाऊन उभा राहिलों आहें, तरी याच्या लक्षांत येत नाहीं. (एकनाथ मोठ्यानें टाळ्या वाजवितो. मांडीवर थाप मारतो, ) मला पाहिल्याबरोबर जो नम्रपणें हात जोडून उभा रहावयाचा, तो आज आनंदाच्या भरांत टाळ्या पिटतो आहे. इतका आनंद तरी याला कशाचा झाला आहे ? ( उघड ) एकनाथ, कशाचारे इतका आनंद तुला झाला आहे ? का ब्रह्मानंदीं निमग्न झालास ?

**एकनाथ**—( नम्रपणें ) आपल्या आज्ञेप्रमाणें हिशेब तयार ठेवींत असतां एक पाव आण्याची चूक कांहीं केल्या सांपडेना. चित्तांत फार खेद उत्पन्न झाला. वाटलें कीं, स्वामीचा मजवर रोष होईल. तीन दिवस अहोरात्र जागरणें करून हिशेब तपासला, परंतु चूक सांपडली नाहीं. आतां इतक्यांतच चूक सांपडली ! फार आनंद झाला. दुसरें कांहीं नाहीं.

**जनार्दनस्वामी**—पाव आण्याची चूक काढण्याकरितां जसें तूं एकाग्रचित्त केलेंस तसें एकाग्र चित्त भगवंताकडे लावलेंस तर

देव तुझ्यापुढें येऊन उभा राहील. एकनाथ, तुझी एकनिष्ठ सेवा पाहून मी फार संतुष्ट झालों. भागवतधर्माचा उपदेश ग्रहण करण्यास तुझ्या अंगीं पूर्ण पात्रता आली आहे.

॥ श्लोक ॥

कायेनवाचामनसेंद्रियैर्वाबुद्ध्यात्मनावाऽनुसृतस्वभावात्॥
करोति यद्यत्सकलंपरस्मै नारायणायेति समर्पयेत्तत् ॥ १ ॥

सकाम बुद्धीनें केलेलीं अथवा निष्काम बुद्धीनें केलेलीं सर्व कर्में ईश्वरास अर्पण कर. उदकावर तरंग उत्पन्न होतात, परंतु ते उदकापासून भिन्न नसतात; अथवा बुद्धिबळाच्या खेळांत असणारे राजा, प्रधान, हत्ती, घोडे आणि पायदळ जशीं सर्व लांकडेंच त्याप्रमाणें आपलें सर्व संकल्पविकल्प भगवद्रूप ठेवावे. तात्पर्य, हा भागवतधर्म ह्मणजे भक्तिमार्ग, कर्ममार्ग आणि ज्ञानमार्ग यांच्यापेक्षां फक्त भगवंताच्या ठिकाणीं एकनिष्ठ भाव धरणाराला अत्यंत सोपा आहे. हा फार श्रेष्ठ आहे. याच्या श्रवणानें अथवा पठणानें अथवा ध्यानानें मनुष्य भवसागर सहज तरून जाईल. भागवत धर्माचें आचरण केल्यानें फक्त भक्तच तरतो असें नाहीं. तर जो देवद्रोही असेल, अथवा विश्वद्रोही असेल, तोही पण तरतो. भागवत धर्म हृदयांत धरला असतां कर्माकर्मांचें खंडन होतें. निंदा, द्वेष, क्रोध, अधर्म, अविद्या यांचें निर्मूलन होतें. असा भागवतांत श्रीनारद मुनींनीं भगवान् कृष्ण परमात्मा याचा पिता जो वसुदेव याला उपदेश केलेला आहे. यम, नियम, प्राणायाम, प्रत्याहार वगैरे अथवा वेदशास्त्रव्युत्पत्ति हे सर्व गहन मार्ग अज्ञजनाला काय होत ? ह्मणून जडमूढ केवळ पशु, उदाहरणार्थ, गजेंद्र किंवा रामावतारी वानरगण अथवा विवरांत बसणारी जांबुवती अस्वलीण हीं भागवत धर्मानेंच तरलीं. जाति, कूळ, गोत, उंच, नीच वगैरे कांहीं भेदाभेद येथें नाहीं. निष्काम भक्ति करण्याचा जसा अधिकार अत्युच्च ब्राम्हणास आहे, तसाच महारास आहे. चोखामेळ्यास जसा विठोबाचा साक्षात्कार होता, त्याचा गंध देखील त्यावेळच्या कर्मठ ब्राम्हणांस लागलेला नव्हता. सारांश देवाच्या घरीं भक्तीचें प्राधान्य आहे, जातीचें नाहीं हें लक्षांत ठेव. जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, सर्वत्र परमेश्वर भरलेला आहे. सर्वांना समदृष्टीनें

अवलोकन करावें, कोणाविषयीं विषम भाव मनांत ठेवूं नये, ह्मणजे तूं स्वतः ब्रम्ह होशील. आज फाल्गुन शुद्ध षष्ठी आहे. आज तुला भागवत धर्माचें महत्व अति संक्षिप्त रीतीनें सांगतों. ("रामकृष्ण हरि" हा मंत्र सांगतो. मस्तकावर हात ठेवतो.) आतां तुझ्या चित्तास कसें वाटतें?

**एकनाथ**—प्रथम तर मला असें वाटतें कीं, या हृदयरूप कमळांत श्रीगुरूच्या मूर्तीची स्थापना करून तिला निरंतर ध्यानामृताचा अभिषेक करावा. बोधरूप सूर्याचा उदय झाला त्यामुळें बुद्धिरूप परडींत सात्विक भावाचीं कमळपुष्पें भरून श्रीगुरूला लाखोली वाहावी. प्रातःकाळीं, मध्यान्हकाळीं आणि सायंकाळीं जीवदशारूप धूप जाळावा. ज्ञानदीपानें ओवाळावें. ऐक्यभावाची पाकसिद्धि करून नैवेद्य अर्पण करावा. ही माझी शरीररूपी माती श्रीगुरूचे चरण जेथें उभे राहतील, त्या भूमींत मिसळून द्यावी. माझे स्वामी आनंदानें ज्या पाण्याला स्पर्श करतील, त्या पाण्यांत ह्या शरीरांतील पाणी एकरूप करावें. इतकें करून मी स्वामीचा उतराई होणार नाहींच असें मला वाटतें. आज स्वामींनीं कृपाळू होऊन ब्रह्मविद्येच्या परम गुप्त भांडाराच्या किल्ल्या माझ्या हातीं दिल्या. आतां ही पिशाच्च लिपी आजपासून लिहिणार नाहीं. ही लेखणी श्रीगुरुचरणीं अर्पण करतों. ( लेखणी स्वामीचरणीं अर्पण करून हात जोडून ह्मणतो. )

## अभंग.

**त्रैलोक्याचा स्वामी जनार्दन ॥ केला व्यापार त्यापासून ॥१॥ मोठा लागला व्यापार ॥ राम नाम निरंतर ॥ २ ॥ सोहं कर्जखत दिलें ॥ तें म्यां मस्तकीं वंदिलें ॥ ३ ॥ महा प्रेमाचीं वस्त्रें दिधलीं ॥ निज मुक्तपणें प्राप्त जालीं ॥४॥ अनुभवाची तहसील समस्त ॥ स्वामीस करुणा पाठविल रिस्त ॥ ५ ॥ धर्म खर्डाजमा ॥ खर्चीं घातलें पूर्वकर्मा ॥ ६ ॥ संतासंगें वसूलबाकी ॥ भक्ताहूनी अति नेटकी ॥ ७ ॥ कैवल्यपुरीं बांधले तोरण । चैतन्य चावडी बैसलों जाण ॥ ८ ॥ ऐसा व्यापार सिद्ध झाला ॥ एका जनार्दनीं केला ॥ ९ ॥**

( स्वामीस साष्टांग नमस्कार घालतो. स्वामी त्यास आलिंगन देतात.)

**जनार्दन०**–पाव आण्याच्या चुकीकरितां तीन दिवस अहो रात्र जागरणें केलींस. अशी जर श्रीकृष्ण परमात्म्याकडे वृत्ति लावलीस, तर भगवंताशीं तादात्म्य होऊन ब्रह्मानंदीं निमग्न होशील. तुझ्या गुरुभक्तीचें तप आज पूर्ण झालें. आतां तुला उद्‌ईक दत्तदर्शन करवितों.

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—दौलताबाद किल्ल्यानजीकच्या पर्वतावरील सरोवराचा किनारा. कीर्र झाडी.

---

( नानाप्रकारचे पक्षी शब्द करीत आहेत. विजांचा कडकडाट चालला आहे. जनार्दनस्वामी व एकनाथ नानाप्रकारचें पूजेचें सामान घेऊन प्रवेश करितात. )

**जनार्दनस्वामी**–एकनाथ, हें स्थळ किती रम्य आहे पाहिलेंस का? हें सुंदर सरोवर, येथें असलेला हा औदुंबराचा वृक्ष, ही स्फटिकाची श्रीदत्तात्रेयाची मूर्ति, ही दोन्ही बाजूनें लतावेष्टित आम्रवृक्षांची राजी, खरोखर हें स्थल तपश्चर्येला किती तरी पण उत्तम आहे ? हें स्थल फक्त मलाच माहीत आहे. या स्थळीं अजून इतर मान[illegible]वी प्राण्यांचा प्रवेश झाला नाहीं.

**एकनाथ**—महाराज, आतां आपल्याला श्रीदत्तात्रेया[illegible]चें दर्शन केव्हां होईल ?

**जनार्दन०**—तूं अगदीं उतावळा दिसतोस. आतां येथें [illegible] प्रथमतः मी एक सहस्र पार्थिवपूजेकरितां लिंगें तयार करतों. तीं त[illegible]यार होऊन त्यांचें यथासांग पूजन झालें म्हणजे भगवान् प्रकट होत[illegible]ील. परंतु कोणत्या वेषानें प्रकट होतील, याचा मात्र भरवसा न[illegible]ाहीं. एखादे वेळीं प्रचंड व्याघ्राचेंच रूप धारण करून येतात. ए[illegible]खादे वेळीं मोठा भुजंग होऊन येतात. एखादे वेळीं सुंदर अश्वरत्न [illegible]होऊन येतात. एखादे वेळीं वल्कलें परिधान केलेला दिव्य स्वरू[illegible] धारण केलेला वैरागी, एखादे वेळीं दिगंबरमूर्ति, एखादे वेळीं [illegible]ष्टवर्षांचा

बटु ब्रम्हचारी, काय वाटेल त्या स्वरूपानें दर्शन देतात. आतां आज कोणता वेष धारण करून येतात हें सांगवत नाहीं; परंतु इतकें मात्र लक्षांत ठेव कीं, कसलाही रौद्ररूपी वेष धारण केला, तरी तुला भिण्याचें कारण नाहीं. तूं आतां या आंब्याच्या झाडाखालीं स्वस्थ बस, आणि मीं तुला पाचारण केलें म्हणजे तूं आह्मांजवळ ये.

**एकनाथ**—जशी महाराजांची आज्ञा असेल तसें करतों. ( एकीकडे ) आज माझा भाग्योदय खास होणार ! आपल्या सर्व आयुष्यक्रमांत ज्या दिवशीं परमेश्वर आपल्यापुढें प्रत्यक्ष दर्शन देण्यास येऊन उभा राहतो, तो दिवस खरोखरच सोन्याचा. त्या दिवसाची थोरवी केवढी ! वास्तविक ह्मटलें, तर जनार्दनस्वामी आणि दत्तात्रेय भिन्नस्वरूप का आहेत ? एक सगुण आहेत, एक निर्गुण आहेत. सूर्य आणि त्याची प्रभा, पारिजातकाचें पुष्प आणि त्याचा सुवास, वाद्य आणि त्याचा नाद, अमृत आणि त्याचा स्वाद, हीं भिन्न करतां येतील काय ? आज माझ्या गुरुमहाराजांनीं माझ्याकरितां कल्पतरूची उद्यानभूमिका निर्माण केली. चिंतामणीचे पर्वत निर्माण केले. सप्त समुद्र अमृतानें भरले. स्वामीचे उपकार मीं पामरानें काय फेडावे ? सर्व पृथ्वीचे पृथ्वी बावनकशी सुवर्णाची मला पारितोषिक म्हणून दिली !

**जनार्दनस्वामी**—एकनाथ या प्रसंगीं देहाची समाधि कशी लावावी, हें तुला सांगतों. याच्याकडेस लक्ष दे.

## अभंग.

**उदय समाधी लागती निवळ ॥ अवघा ब्रह्मगोळ निखळ तो ॥ १ ॥ चक्रामध्यें चक्र येती व्योमाकार ॥ आदि मध्य हेर ज्योती त्याची ॥ २ ॥ द्वितीय समाधि लागे कैशापरी ॥ गुरुपुत्रा हेरी नयनरुपें ॥ ३ ॥ प्रथम समाधी निबिड सर्पकार ॥ त्यामध्यें आकार चक्राचा पैं ॥ ४ ॥ झळकती मनीं दिव्यरत्न खाणी ॥ अविनाश देखणी चिन्मयाची ॥ ५ ॥ उदयाची ज्योती द्वितीयेमनीं ॥ ही दोन्ही देखणी झाली बापा ॥ ६ ॥ उदयाचे तिन्ही द्वितीयेचे तिन्ही ॥ अविनाश देखोनि [illegible]ळीं ॥ ७ ॥ संध्याकाळीं संदेह भाव-**

ना टाकुनी यावी ॥ तेणेंचि घ्यावीं समाधिसुखें ॥ ८ ॥ एक चक्र येती आभासा येव्हढी ॥ त्यामधें चौकडी मोतीयाची ॥ ९ ॥ मनीं रत्नज्योती संध्याकाळीं वाती ॥ तेलाविण दीप्ति पाजळती ॥ १० ॥ ह्मणे जनार्दन एकनाथा घेई ॥ शोधी याची देहीं समाधिसुख ॥ ११ ॥

अभंग.

देहाची समाधि घ्यावी तीन वेळां ॥ आपुली जीवनकळा साधावी पैं ॥ १ ॥ कर्णीं घालोनी बोटें अंगोठ्या नयन तगटे ॥ विकाश सुभटे शुभ्रवर्ण ॥ २ ॥ तयाचें हें नाम बिंब जीवदशा ॥ तेणें रूपदशा मारुनी येती ॥ ३ ॥ तितुक्यामध्यें भाव न सोडी समाधि ॥ त्याचे पुढें शोधी गुरुपुत्रा ॥ ४ ॥ स्वामीनें पुशिलें कैसें काय जालें ॥ आत्मरूप पाहिलें केशापरी ॥ ५ ॥ शिष्य ह्मणे स्वामी धारितां कान डोळे ॥ एकाएकी उमाळे आदित्याचें ॥ ६ ॥ विकसिलें निर्मळ जैसा चंद्र दिसे ॥ येणें न्यायें प्रकाशे आत्माराम ॥ ७ ॥ ह्मणे जनार्दन नव्हे एकनाथा ॥ समाधि पाहतां आळस केला॥८॥

अभंग.

मन एकाग्र प्रतीति निश्चळ मध्यरात्रीं ॥ गुरुखुण एकांतीं रिघत जाय ॥ १ ॥ हंस अंगीचा डोळा विकासुनी कमळ ॥ तयाचीये स्थळा हेरीत जाये ॥ २ ॥ चिन्मय अविनाश प्रगटती ज्योती ॥ तोचि प्राणनाथी या देहाचा ॥ ३ ॥ त्यापुढें अभ्यास दिसे निवळपणें ॥ तैसें रुप जाणें विराटाचें ॥ ४ ॥ ब्रह्मांडीं जें असे तेंची पिंडीं दिसे ॥ बोलायाचा भास नाहीं पुढें ॥ ५ ॥ त्यापुढें समाधि दुजी सांगे कोण ॥ त्या होय पतन निश्चयो वेदीं ॥ ६ ॥ ह्मणे जनार्दन एकनाथा पाही ॥ हेंचि भरुनी घेई ओहं सोहं ॥ ७ ॥

( जनार्दन स्वामी समाधि लावितात. )

एकनाथः—

अभंग.

चारमुद्रा आणि समाधी त्या चारी ॥ दिसती चक्राकारी

स्वरूप हें ॥ १ ॥ चहु समाधींचें पाहीं हें देखणें ॥ विकळतां तेणें सहजीं व्हावी ॥ २ ॥ जिकडे पाहतां तिकडे स्वरूपचि दिसे ॥ तयामाजी ठसे आणिक बिंब ॥ ३ ॥ मसूरप्रमाण शून्य महा तें कारण ॥ गुरुमुखें खुण जाणिली पैं ॥ ४ ॥ साचार स्वरूपाची मेळवणी केली ॥ परात्पर ठेली हेची ज्योती ॥ ५ ॥ त्याच वस्तुसाठीं भांडती पुराणें ॥ वेदशास्त्रें तेथें मौनावलीं ॥ ६ ॥ गुह्य हें पंचक देखोनी समाधी ॥ बोलोनीया वेदीं निश्चयो केला ॥ ७ ॥ एका जनार्दनीं स्वरूप उरलें पाहीं ॥ द्वैत गेलें पायीं सद्गुरूच्या ॥ ८ ॥

(औदुंबरांतून कडकड ध्वनि होऊन श्री दत्तात्रेय मलंगाच्या वेषानें सर्वांग चर्मानें वेष्टित आहे, एका हातांत नग्न तलवार, एका हातांत तिरकमटा, मस्तकावर मोराच्या पिसाऱ्याचा टोप, नेत्र आरक्त, व ज्याचें शरीर कृष्णवर्ण आहे, असे प्रकट होतात. बरोबर एक भयंकर कुत्रीही प्रवेश करते.)

अरे बापरे ! माझ्या पोटांत तर धडकी भरली ! किती भयंकर ही स्वारी ! पण स्वामींनीं मला मघांच सांगून ठेविलें आहे कीं, तुला भिण्याचें अगदीं कारण नाहीं.

**मलंग**—(जनार्दनस्वामीस प्रीतीनें जवळ घेऊन) जनार्दन, संत और देव इन्मे तफावत् नही. संतकू मिलनेके वास्ते मुजे बहोत खुषी होती हय्. जब मय् उनकू मिलता तब मेरा कलीजा उनके मोहब्बतसे बहोत थंडा होता हय् उनकू मय् आपने तखतूके ऊपर बिठाथा. और उनूकी पूजा करता. नारद, वसिष्ठ, वाल्मिक, बिभीषन, हनुमान, धर्मार्जुन, उद्धव, अक्रूर, गोपी, गोप, निवृति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, चोखा महार, कबीर, कमाल, ये सब् हमारे देव हय्. जो मेरी याद् करता, और जो खता और गुन्हेमे गिरफ्तार नही वो मेरा अल्ला. खैर अब ये कटोरीमे ये कुत्तीका दूध निकाल्. फिर आब् दोनो मिलके उसमे रोटी खायेंगे.

**जनार्दन०**—जी हुकूम्. बंदा सो दफे तोबा करता, और आपने कुसुरकी माफी मंगता. अबी ये अम्माका दूध निकालताहूं.

(दत्तात्रेय इकडे तिकडे हिंडतात. जनार्दनस्वामी कुत्रीचें दूध काढतात.)

**मलंग**—(एकनाथाकडेस पाहून) हमारे जो देव हय् उस्मेसे

क देव भागवत महज़ूबका बडीजाव करनेकेवास्ते अदमीयोंके ननसे ह्यां आया हय्. जनार्दनका चेला बनके वास्ते मेरे मुलाकातूके ह्यां आकर बैठा हय्. अच्छा, बडी खुषीकी बात् हय्.

( जनार्दनस्वामी कुत्रीचें दूध आणतात. त्यांत शिळ्या भाकरीचे तुकडे कुसकरतात. उभयतां मोठ्या प्रीतीनें खातात. )

**एकनाथ**–मोठ्या आनंदानें एकमेकांच्या आत्मज्ञानाच्या गोष्टी चालल्या आहेत. खात आहेत. मिटक्या मारीत आहेत. दुधाचे भुरके मारीत आहेत. त्यांतलें उष्टें प्रसाद म्हणून मला थोडेसें मिळेल तर मी आपल्याला फार भाग्यवान समजेन. गुरूचें उष्टें, हींच गंगा, हेंच अमृत. यांत मुख्य गोष्ट ध्यानांत धरण्यासारखी ही आहे कीं, दत्तात्रियांनीं यवनवेष धारण केला आहे. भाषा यवनाचीच वापरीत आहेत. यावरून परमेश्वराच्या घरीं सर्व जाति आणि सर्व भाषा सारख्याच मानिल्या जातात. तेथें भेदाभेद मुळींच नाहीं.

( जनार्दनस्वामी एकनाथास श्रीदत्तात्रियाच्या पायांवर मस्तक ठेवण्यास सूचना करितात. तसें करण्यास तो भितो, हें पाहून आपण स्वतः त्याला धरून त्याचें मस्तक दत्ताचे चरणावर ठेवितात. जनार्दनस्वामी त्यास कटोरा धुवून आणावयास सांगतात. त्यांतील हात धुतलेलें पाणी प्रसाद म्हणून एकनाथ पितो. )

**मलंग**– ( एकनाथास जवळ घेऊन मस्तकावर हात ठेवितो. मुख कुरवाळितो. ) तेरा भला हो जायगा. जिस कामके वास्ते, तूं ये दुनियेमे पैदा हुवा हय् वो काम् तेरे हातसे खामूखा होजायगा. रामायन्के उपर और भागवतके उपर बडी बडी किताबे तयार करेगा. सिवाय् इसूके किसनजीके शादीका बयान् करेगा. और हाजारो हजार कवीतू जिसे अभंग कहलाते हय् वो बनावेगा. तेरे मकान्मे सब देव मानिंद गुलामके काम करेंगे. और तू बडा साई बनजायगा. जनार्दन, आब् इसकू पैठनकू फौरन् जाने दे. चूं के इसके जद्दआमजूद चक्रपानी, और उसकी बुढ्ढी औरत् इसकी रहा रात दिन् देखते हय्. ये अगर् न गया तो जल्दी खतम् होजागये. शिवाय् उनूके रुखसतसे ये ह्यां आया हय्. और वो इसके तालाषके लिये घुमते हय. खैर जबतक् चांद और आफताब् हय् तबूतक् इसका नाम् दूनीयेमे कायम् रहेगा. आब मैय् चले जाता हूं.

एकनाथ-

पद.

दत्तगुरु दत्तगुरु दत्तात्रय गुरु हो ! ॥ ध्रुवपद ॥
आदिनाथ दिनानाथ ब्रह्मरूप ॥ दत्तगुरु ॥ १ ॥
शंखचक्रगदाधरा ब्रह्मरूप ॥ दत्तगुरु ॥ २ ॥
उमापते ! रमापते ! ब्रह्मरूप ॥ दत्तगुरु ॥ ३ ॥
पूर्णब्रह्म सनातन ब्रह्मरूप ॥ दत्तगुरु ॥ ४ ॥
अनसूया वरदपुत्र ब्रह्मरूप ॥ दत्तगुरु ॥ ५ ॥
भक्तकाम कल्पद्रुम ब्रह्मरूप ॥ दत्तगुरु ॥ ६ ॥
सच्चित् अति सुखसागर ब्रह्मरूप ॥ दत्तगुरु ॥ ७ ॥
निरंजन निराधार ब्रह्मरूप ॥ दत्तगुरु ॥ ८ ॥
निर्विकल्प चित्प्रकाश ब्रह्मरूप ॥ दत्तगुरु ॥ ९ ॥
सर्वांठायीं सदोदित ब्रह्मरूप ॥ दत्तगुरु ॥ १० ॥
एका जनार्दनीं दत्त ब्रह्मरूप ॥ दत्तगुरु ॥ ११ ॥

( मलंग औदुंबराच्या वृक्षांत नाहींसा होतो. )

**जनार्दन०**-एकनाथ, आकाशवाणीप्रमाणें तुला ब्रम्हज्ञान व त्याचप्रमाणें श्रीदत्तदर्शन ह्या दोन्ही गोष्टी प्राप्त झाल्या. आतां तूं तीर्थयात्रा करून भगवंतानें सांगितल्याप्रमाणें पैठणास जा. आपल्या वृद्ध आजाआजीची सेवा कर.

**एकनाथ**-हा काळपर्यंत मी आनंदाच्या शिखरावर जाऊन बसलों होतों. परंतु आतां स्वामीचा वियोग होणार, ही कल्पना मनांत आल्याबरोबर माझा कंठ भरून आला. आजपावेतों ज्यांनीं मला अत्यंत ममतेनें वागवून माझ्या जन्माचें सार्थक केलें, ते मला माझ्या प्रत्यक्ष पित्यापेक्षां अधिक प्रिय आहेत. माझ्यानें हा वियोग सहन होत नाहीं. ( जनार्दनस्वामीचे पोटांत डोकें घालतो. )

**जनार्दन०**-एकनाथ, अरे तूं रडतोस? मी प्रत्यक्ष तुझ्या हृदयांत आहें. तूं तर माझा जीवप्राण, आणखी मी तुझा आत्मा. तूं आणि मी यांत द्वैताद्वैत भेदाभेद काय उरला आहे तो सांग बरें ?

**एकनाथ**-कसेंही करा, परंतु मला हे चरण सोडून लावूं नका. मला तीर्थयात्रा नको. मला आजाआजी नको. आपल्या सेवेशिवाय

कांहीं नको. मी येथेंच आपलें उच्छिष्ट भक्षण करून मोठ्या आनंदानें राहीन. आपण माझा असा त्याग करूं नये. आईनें बालकाचा त्याग केला तर त्या बालकानें कोणीकडे जावें?

**जनार्दन०**–एकनाथा, तूं आतां भगवान् दत्तात्रेय यांची आज्ञा काय बरें ऐकली आहेस? ती आपण उभयतांनीं मान्य केलीच पाहिजे. त्यांत आपलें सर्व प्रकारें कल्याण होणार आहे. तूं आतां जा. मी तुला निरोप देतों. शेवटीं तुला इतकेंच सांगतों कीं:––

## अभंग.

आलिया अतीथा द्यावें अन्नदान ॥ याहुनी साधन आणीक नाहीं ॥ १ ॥ ज्ञातीसी कारण नाहीं पैं तत्वतां ॥ असो पैं भलता अन्न द्यावें ॥ २ ॥ अन्न परब्रह्म वेदांतीं विचार ॥ साधीं हाची निर्धार प्रेमतत्वें ॥ ३ ॥ ह्मणे जनार्दन यापरतें आणिक ॥ नाहीं दुजें देख एकनाथा ॥ ४ ॥

## अभंग.

सर्वांभूतीं भाव नको ठेऊं दुजा ॥ तेणें गरुढध्वजा समाधान ॥ १ ॥ संतासीं नमन आलिया अन्नदान ॥ यापरतें कारण आणिक नाहीं ॥२॥ सर्व भावें वारी पंढरीची करी ॥ आणिक व्यापारीं गुंतूं नको ॥ ३ ॥ ह्मणे जनार्दन घेई हाचि बोध ॥ सांडोनी सर्वदा द्वेष भेद ॥ ४ ॥

एकनाथ—

## अभंग.

जय जय वो जनार्दने ॥ विश्वव्यापक संपूर्णवो ॥ सगुण अगुण विगुण ॥ पूर्ण पूर्णानंदघनवो ॥ १ ॥ ब्रह्मा विष्णु रुद्र निर्माण तुजपासूनीवो ॥ गुणत्रय उभयवनीं तूंची पंचक अंतःकरणीं वो ॥ व्यापुनी पंचकप्राण दशइंद्रिय करणींवो ॥ पंचक विषयस्थानें पंचविषयांचे स्वामिनीवो ॥ २ ॥ स्थूळ लिंग कारण चौथें महाकारणवो ॥ जागृती स्वप्न सुषुप्ति तुर्या उन्मनी हे स्थानवो ॥ नेत्र कंठ हृदय मूर्ध्नीं या प्रमाणवो ॥ विश्व तैजस प्राज्ञ प्रत्यगात्मा तूं संपूर्णवो ॥ ३ ॥

स्थूळ प्रविविक्त सुख चौथें आनंदाभासवो ॥ पिंड ब्रह्मांड आणीक तूं ओंकाराचें सुखवो ॥ त्वंपद तत्पद आणिक असिपद तें तूं एकवो ॥ ४ ॥ आजी पंचका कारण षड् चक्राचें भेदनवो ॥ मंत्र तंत्र स्थानीं अनावराचें आवरणवो ॥ नसोनी एकपणीं एकाएकीं जनार्दनवो ॥ ५ ॥

( दोघे दोन्ही बाजूंनीं पडद्यांत जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**–पैठण येथील पिंपळेश्वराचें देवालय.

---

( गिरजाबाई व एक म्हातारी प्रवेश करिते. )

**म्हातारी**–देवा देरे पुत्र आणखी देवानें दिलें कुत्रें. दहा बारा मुलें मला झालीं. त्यांत हा एकटा कायतो मागें राहिला. बाकीचीं सगळीं मेल्या देवानें नेलीं. बरें, हा तरी एवढा चांगला शहाणासुरता निघेल ह्मटलें, कांहीं नांवलौकिक मिळवील, म्हातारपणीं संभाळील, हातपाय जाणील, पण तें कांहीं नाहीं. तुकडा खातो आणखी भटकत फिरतो. सर्व मुलांचीं रामा, कृष्णा, गोविंदा, गोपाळा, गंगा, यमुना, सरस्वती, भागीरथी अशीं जरी नांवें ठेविलीं होतीं, तरी कोणाला पोटांतलें, कोणाला देवी, कोणाला गोवर, कोणाला अफू जास्त, कोणी सटावलें, कोणी माडीवरून पडलें, कांहीं तरी होऊन एकामागून एक वर्षाचें, दोन वर्षांचें, तीन वर्षांचें, चार वर्षांचें असें होऊन मेलें. शेवटीं हा दाणा मुलगा जन्माला आला. याचें मग बारसें केलें नाहीं, आणखी नांवही पण ठेविलें नाहीं. कोणीं नांव काय ह्मणून विचारलें, तर सांगतें कीं, गावबा. मुलगा बापाच्या मुळावर. दिवस राहिले मात्र. तो बापाला गिळलाच होता मेल्यानें. पण मग शांत केली, तेव्हां ते दुखण्यांतून उठले. कधीं शाळेंत गेला नाहीं. ठोंब्याला एक अक्षर सुद्धां लिहितां वाचतां येत नाहीं. आतां आह्मी मेल्यावर याला खायला कोण घालील, याची मला रात्रंदिवस काळजी पडली आहे.

**गिरजा**–तुह्मी आपल्या नशीबाला इतक्या रडतां, आणखी मीं काय करावें? आईबापाला पांडुरंगाचा दृष्टांत झाला कीं, चक्रपाणीच्या घरीं मला द्यावी ह्मणून. आतां मला चौदावें सरून पंधरावें लागण्याचे दिवस आले. लोकांच्या मुली माझी चेष्टा करतात. मला पाहिलें ह्मणजे रस्त्यांतील बायका नाक मुरडतात. केवढी घोडनवरी झाली ह्मणतात. आतां मीं आपल्या नशीबाला कसें करावें?

**म्हातारी**–ह्मणजे, मला हें आश्चर्य वाटतें कीं, तुझा बाप इतका श्रीमंत असून तुला अजून स्थळ मिळूं नये, ह्मणजे मोठें आश्चर्य आहे!

**गिरजा**–मी आठ वर्षांची झाल्यापासून माझ्या वडिलास दृष्टांत होत आहेत कीं, मला चक्रपाणीच्या घरीं अमक्या अमक्याला द्यावी. बरें, इकडे चक्रपाणि आणखी सरस्वती काकू यांनीं लग्नाची तयारी आहे ह्मणून सांगितलें. छत्तीस गुण उतरले. पण ज्यांचें लग्न व्हायचें ते कुठें लग्न करण्याला कबूल आहेत? मला साफ लग्नच कर्तव्य नाहीं, ह्मणून हजार वेळां निक्षून सांगणें झालें. बरें, माझ्या बापानें कोठें दुसरीकडे स्थळ जुळविण्याचा प्रयत्न केला कीं, लागलींच वरपक्षाकडचें कोणी तरी मरून प्रतिकूल झालें, म्हणून एकच गवगवा होतो. शिवाय माझ्या बापाला स्वप्नें पडतच असतात कीं, तूं कांहीं काळजी करूं नको. तुझी मुलगी भानुदासाच्या वंशांतच पडणार आहे. तूं स्वस्थ अस.

**म्हातारी**–आतां काय बाई करावें? आतां किनई पैठणकर धर्माधिकारी तुझ्या बापाला वाळींत टाकतील बरें का? तूं आपल्या बापाला दुसरीकडे द्यायला सांग. नाहींतर तुझा बाप चांगला श्रीमंत आहे, मग माझ्या गावबाला करीना घरजावई?

**गिरजा**–तें काय ह्मणून? जर माझें लग्न झालें नाहीं, तर मी आपली जन्मभर वेगळी राहून देवाची सेवा करीन. आईबाप वेगळे राहतील. मग तर त्यांना कोणी वाळींत टाकणार नाहींना? माझा तर हा निश्चय कधींपासूनच झाला आहे. मी आठ वर्षांची असतांना मला देऊं केलेली आहे. आणखी चक्रपाणि यांनीं माझ्या बापास तुमची मुलगी आम्ही आपल्या घरीं करून घेऊं म्हणून वचन दिलेलें

आहे. सगळ्या पैठणकर ब्राम्हणांना हें कां माहीत नाहीं काय? त्यांना माहीत आहे, म्हणूनच ते आजपर्यंत स्वस्थ बसले आहेत. नाहीं तर त्यांनीं माझ्या बापास कधींच वाळीत टाकलें असतें.

**म्हातारी**–पण कायगे गिरजा, तूं त्या दिवशीं जीव काय म्हणून दिलास? मग नदींत बुडाल्यावर तुला कसें वाटलें गे? त्या दिवशीं तूं फारच मोठें धाडस केलेंसहो. शाबास तुझी! तुला काय वाटलें कीं, एकनाथ आपला आटपला म्हणून हो?

**गिरजा**–प्रथम माझ्या सावत्र आईनें मला अशी खोटी बातमी सांगितली कीं,–मी निजलें होतें–मला जागे करून म्हणाली–बैस आतां जन्मभर हाका मारीत. आम्ही जें जें स्थळ तुला जुळवितों, तेथें तेथें कांहींना कांहीं तरी प्रतिकूल होतेंच होतें. या ठिकाणीं तर आतां कळसच झाला. प्रत्यक्ष नवरामुलगाच नदींत पडून बुडून मेला असें म्हणतात. कोणी म्हणतात, त्यानें आत्महत्या केली. आतां तर तुला कोणीच पतकरणार नाहीं. त्याच्यापेक्षां तूंच मेली असतीस तर उत्तम झालें असतें. माझ्यासारखी असती, तर नदींत जाऊन जीव दिला असता. अशा तिच्या मर्मभेदक भाषणानें मी फारच संतापलें, व मला तरी आतां ज्यांच्या नांवावर मी विकली जात आहें, त्यांच्यामागें जगून काय करायचें आहे, असें मनांत येऊन मीं बाई जीव दिला. त्याच वेळीं मी मेलें असतें, तर किती उत्तम झालें असतें! पण माझ्या नशीबीं आणखी अनेक दुःखें भोगावयाचीं आहेत. तीं पूर्णपणें भोगल्याशिवाय मला मरण येणार कोठून! ज्या कोळ्यांनीं मला बाहेर काढून अनेक उपाय करून जिवंत केलें, त्या कोळ्यांना माझ्या बापानें दोनशें रुपये बक्षीस म्हणून दिले!

**म्हातारी**—पण कायगे, तूं जो जीव दिलास तो एकनाथासाठीं दिलास का आईच्या जाचासाठीं दिलास?

**गिरजा**—आई कांहीं मला खात नव्हती, कांहीं गिळीत नव्हती. ज्यांच्याकरतां मला जगावयाचें ते नाहींत, असें पाहिल्याबरोबर जीव दिला.

**म्हातारी**–-पण ज्याच्याकरितां जीव दिलास त्याला तूं जीव दिल्याचें समजलें तरी का?

**गिरजा**—सर्व कळलें आहे. पण मला नाहीं वाटत कीं, कांहीं तरी उपयोग होईल.

**म्हातारी**—त्याला कसेंग समजलें. त्याला तूं कां पत्र पाठविलेंस होय ?

**गिरजा**—कांहीं ह्मणा, पण त्यांना कळलें आहे एवढें खास.
(बायकाचा वेष घेतलेला गावबा प्रवेश करतो.)

**गावबा**—(रडत रडत) अहो बाई, माझें पोर कोणीं चोरून नेलें कोण जाणें !

**म्हातारी**—केवढेंसें तुझें मूल आहे गे बाई ! तूं कुणब्याची आहेस कीं ब्राह्मणाची ?

**गावबा**—मी व्हय. कुणब्याची है आन् माझा गावबा कसला गुनाचा व्हता ! (रडतो.)

**म्हातारी**—अग पण रांड. असें पोर टाकून तूं गेली होतीस कोठें शेण खायला ? तुझें तुला पोर संभाळवेना, बायको कशाला झालीस ?

**गावबा**—मंग मला पुरुस व्हताइना. मंग मी म्हटल मी आपली बायकोच व्हते. आतां मला असा मंतर येतो हय कीं मला वाटल तव्हा मी पुरुष होते, आन वाटल तव्हा बायको होते. आन् बायको झाले कीं, कोनी तरी माझ पोरग चोरून नेत. पन कायहो बया तुम्हाला एक पोर हय ना ?

**म्हातारी**—असून आणखी नसून सारखाच. आज पंधरा दिवस झाले, त्याचा पण मेल्याचा पत्ता नाहीं. त्याचें नांव गावबा आहे.

**गावबा**—तुह्मी बायको झाला म्हुनशान तुमचा मुलगा कोनीतरी चोरून नेला. तुह्मी जर पुरुस असता तर तुमचा गावबा कोनीबी नेला नसता. आतां बोलूनशान् काय उपयोग ! आपला दोघीचाबी गावबा चोरून नेला. तुम्ही आम्ही सारख्याच दुःखी आहों. आतां मी जर तुमचा गावबा अनुनशान दिला, तर तुम्ही मला काय द्याल ?

**म्हातारी**—काय मागशील तें देऊं.

**गावबा**—या बाईचा नवरा, या बाईला मिळवून द्याल ?

**गिरजा**—हें ग बाई तुला कसें कळलें ?

**गावबा**–दुसऱ्याच्या मनामंदी काय चालल ह्यू ते मला तवाच कळत. मी ह्मनते तस ह्यू की नायू सांगा.

**गिरजा**–सांग माझ्या मनांत काय चाललें आहे?

**गावबा**–तुमच्या मनामंदी जप चालला ह्यू जप. हे पघा, एकनाथ नांवाचा जप चालला ह्यू. आनखी तुमच्या मनामंदी अस हय कीं, या जन्मीं नाय तर ह्मोरल्या जन्मीं, त्या जन्मीं नाहीं तर त्येच्या म्होरल्या, असी सात जन्म कव्हा ना कव्हा तरी त्येची बाईल होईन. समद्या यात्रा पालथ्या घालीन. हात पाय करवतान कापुनशान घेईन. एका पायावर उभ राहूनशान तप करीन. पन त्याची अस्तुरी होईन. आन असा एक कागुद लिहुनशान तुम्ही या बाईच्या मुलासंग दिला हय. त्या कागदाच्या जाबाची तुम्ही वाट पहात आहां. खर कीं नाइ बोला? आता तुम्हाला त्या कागदाचा जाब सांगितला आन या बाईचा ऐटदार आन खबसुरत आन इद्वान् मुलगा या बाईला आनुनशान दिला, तर मला काय द्याल? ( पुराणीक प्रवेश करितो. ) अहाहा! हे माझ्र परानपती आल. परानताथ, आज किर्तिदी झाल् तुमच्या भेटीला बर? ( त्याच्या गळ्यास मिटी मारतो. )

**पुराणीक**–( पलीकडे लोटून ) शांतं पापं. विष्णवे नमः. कोण ही हडळ बेशरम आहे! एकदम माझ्या येऊन गळ्याला मिठी मारते.

**गावबा**–आन् मी आपली आवा, आपली परत्यक्ष बायको. तुम्ही जर अस कराया लागला तर तुमच्यावानी येड या जगामंदी कोनी असल का? हजारा लोकामंदी तुमच माझ्याशी लगीन लागल आन मी चंद्रसूर्याला साक्षी ठेवूनशान भवल यंघल. आन तुह्मी माझ्र लाड पुरवीन म्हनुनशान शपथ खाल्लीया.

**पुराणीक**–अग सटवाई, तूं कोण आणखी मी कोण, तुझा माझा काय संबंध? मीं तुला जन्मांत कधीं पाहिलें नाहीं. तुझें नांव काय?

**गावबा**–माझ्र नांव तंगी. मी कानडी हय. आन तुमच नांव यंकोबा. आन आपल उपाध्याच नांव शुक्राचार्य. कां आतां पटली का खुन? आतां कस काय परानताथ! ( गळ्याला मिटी मारतो. पुराणीक त्याला फर फर ओढून तोंडावरचा बुरखा बाजूला करतो. )

**म्हातारी**–हा तर माझा गावजी! हा मेल्या बायल्या! आतांशा का बायकांचीं सोंगं घेऊन हिंडत असतोस वाटतें ? थू तुझी जिनगानी ! !

**गावबा**–( सर्वत्रांस नमस्कार करून. ) मी तुमचा परम अपराधी आहें. कांहीं जरूरीच्या कामाकरितां मला हा वेष धारण करणें भाग पडलें. ह्या वेषानें मीं मोठी कामगिरी बजावली आहे. मीं केवढा पराक्रम या वेषानें गाजविला आहे तो पुढें मागें जगांत महशूर झाल्याशिवाय राहणार नाहीं.

**म्हातारी**–अरे जा मूर्खा, मी आज पंधरा दिवस झाले तुझा शोध करीत आहें. मेल्याचा पत्ता नाहीं. मेल्यानें लुगडें चोळी माझींच चोरून नेलीं आहे वाटतें. काय मेलें कारटें जन्मलान् तें आलें आहे ! सगळीं मेलीं आणखी हें राहिलें !

**गावबा**–त्यांचा सर्वांचा उद्धार करीन. मग तर झालेंना ? ( पुराणीकास उद्देशून ) जें आहेत तें पुराणीकबुवा, तुह्मी इतके दिवस कोठें गेला होता ? तुमच्याकरितां विधवा बायकांनीं जेते कालाचे ठायीं, मोतीचूर, जिलबी, बुंदी यांचीं वायनें सिद्ध करून ठेविलीं आहेत. ( तोंडास पाणी सुटलें आहे असें दाखवितो. )

**गिरजा**–( एकीकडे ) मीं याला एक पत्र दिलें होतें. त्याचें यानें काय केलें कोण जाणें ? हा तर बोलून चालून वेडा. मीं व्यर्थ याच्याजवळ पत्र दिलें. मला म्हणाला कीं, अगदीं तिकडे हातांत पत्र देईन. ( उघड ) माझ्या पत्राचें काय केलेंस ?

**गावबा**—हें घे तुझें पत्र. जसेचें तसें परत आणिलें आहे. मीं त्याची एकांतीं गांठ घेतली. तुझ्या रूपाची आणखी गुणांची त्याच्याजवळ पुष्कळ वाखाणणी केली. पण कांहीं नाहीं. शेवटीं पत्र दिलें, पण त्यानें तें वाचलें सुद्धां नाहीं. त्यानें सांगितलें मला तुझी गरज नाहीं. मी साफ लग्न करणार नाहीं. तुला वाटेल तसें कर. वाटल्यास दुसरा नवरा कर.

**पुराणीक**–( गावबास मारतो. ) दुसरा नवरा कर ! गावबा, अशीं अक्षरें तोंडांतून काढतोस काय ?

**म्हातारी**–( मोठ्यानें ओरडून ) अहो तो वेडा आहे, वेडा आहे.

सान्या जगाला माहीत आहे. तुह्मी त्याला मारूं नका. ( चक्रपाणि प्रवेश करितो. )

**चक्रपाणि**–( पुराणीकास ओळखून ) आपण फार शहाणे आहांत. बरें झालें, चोरा सांपडलास. माझा एकनाथ, कोठें पळवून नेलास? का त्याला मारलास का केलेंस तरी काय? दुष्टा, आतां तुला या सोट्याखालीं झोडून काढतों समजलास? ( त्याला मारावयास धांवतो)

**पुराणीक**–पण अगोदर मी काय ह्मणतों, तें ऐकून तर घ्या, मग मला मारा. उगाच ब्राह्मणाला जें आहेत तें मारूं नये असें शास्त्र आहे.

**चक्रपाणि**–आग लागो तुझ्या शास्त्राला! पोरगें माझें नाहींसें केलेंस. काय त्याचा पत्ता काय?

**पुराणीक**–( कागदपत्र दाखवितो ) हे माझे कागद पहा. ही मला लढाईत मिळालेलीं इनामपत्रें पहा. मी दिल्लीकडे लढाईवर गेलों होतों तेथें मला इतके दिवस लागले.

**गावबा**–( एकीकडे ) बहुतेक लाडूवर लढाई मारली असेल. झुरळाला सुद्धां भितो, आणखी लढाईच्या थापा मारतो आहे.

**पुराणीक**—आतां तुमच्या एकनाथाविषयीं म्हणाल तर मला इतकें माहीत आहे कीं, तो दौलताबादच्या किल्ल्यावर स्वामी जनार्दन यांची सेवा करून ब्रम्हज्ञानाची प्राप्ति करून घेण्याकरितां गेला होता. परंतु अजून तो परत कसा आला नाहीं, याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. पाहिजे असल्यास मी त्याचा शोध करून येतों. आपण अत्यंत दुःखानें व्याकूळ झालां आहां, व आपल्याच्यानें आतां पौत्रवियोग जें आहेत त्तें सहन होत नाहीं. मी एकनाथाला घेऊनच येतों, मग तर झालेंना?

**चक्रपाणि**—माझा एकनाथ जिवंत आहे, इतकें तूं सांगितल्यानें मला तूं आज त्याची प्रत्यक्ष भेट केल्याप्रमाणेंच झालें. मेघानें ज्याप्रमाणें चातकासाठीं प्रसन्न होऊन अमृताचा पाऊस पाडावा, अथवा मारवाड देशांत उन्हानें तप्त होऊन तृषित झालेल्यास सुवर्णाची झारी थंडगार पाण्यानें ज्याप्रमाणें प्राशन करण्यास द्यावी, त्याप्रमाणें तूं आज मज तृषितावर अमृताचा पाऊस पाडलास. मी

जन्मभर तुझे उपकार विसरणार नाहीं. तुला मी कमजास्त बोलल्याबद्दल तूं मला क्षमा कर. आणखी माझा एकनाथ मला आणून भेटीव.

**पुराणीक**–तुह्मी जरी कमजास्ती बोललां आणखी मला मारिलें, तरी तुह्मी मला वडिलाप्रमाणें आहांत. सहन करण्याचा माझा धर्म आहे. बरें जातों मी आतां.

**चक्रपाणि**–( गिरजाबाई नमस्कार करिते. ) पुराणिकबोवा जरा थांबा. ह्या मुलीचा बाप आज कैक दिवस एकनाथाची वाट पहात बसला आहे. मीं त्याला अनेक वेळा सांगितलें कीं; कोठें तरी दुसरी-कडे स्थलाची योजना करून कार्यभाग उरकून घे. परंतु तो ह्मणतो कीं, मला पांडुरंगाचा असा दृष्टांत झाला आहे कीं, तुमच्याच घरीं मुलगी द्यावी. ह्या मुलीनें आज कितीएक दिवस उपोषणें चाल-विलीं आहेत. सोळा सोमवार करीत असते. रोज पिंपळेश्वराला प्रद-क्षिणा चालल्या आहेत. जिवापाड कष्ट करीत आहे. हिच्या बापा-कडून शंकराला एकादशनी, लघुरुद्र, महारुद्र यांचीं आवर्तनें चाललेलीं आहेत. इतकें करून अखेर फलप्राप्ति होईल किंवा नाहीं, याची मला वानवाच दिसते. कारण नाथाच्या मनांत स्वताचें लग्न मुळींच कर्तव्य नाहीं. आमच्या देखत त्याचें लग्न होऊन आह्मी तो सुखसोहाळा पाहूं एवढें आमचें भाग्य दिसत नाहीं. तात्पर्य हेंच कीं, तुह्मी स्वामी जनार्दनांना या मुलीची स्थिति कळवा. आणखी आ-मची विनंति कळवा कीं, आपण कृपा करून जेणेंकरून एकनाथ गृहस्थाश्रम स्वीकारील असा त्याला बोध करा. नाहीं तर भानुदा-साच्या वंशाचें नक्कल झालें ह्मणावयाचें. हे माझे कळकळीचे शब्द त्यांना कळवा. मुली, तुला काय आशीर्वाद देऊं? भगवान् श्रीशंकर तुझें खास कल्याण करील. ( पुराणीक जातो. )

**गावबा**–( चक्रपाणीस नमस्कार करितो.) ह्मटलें माझ्या लग्नाचें कुठें जुळल्यास पहा. अनेक नवऱ्या आजपावेतों चालून आल्या. पण मी घोड्यावर असल्यानें व मी आपला घोडा नेहमीं भरधांव फेंकीत असल्यानें बायकोच्या हातीं सांपडलों नाहीं. (त्याची आई त्याला मारीत मारीत पडद्याकडे नेते ) नको–मला बायको नको–पोंचली–पोंचलीः– ( चक्रपाणि त्याला सोडविण्याचा प्रयत्न करतो. त्रिवर्ग जातात. )

**गिरजा**–( आत्मगत ) माझ्या आशेचा अंकुर पुनः जागृत होत चालला आहे. जनार्दनस्वामीकडे आपण स्वतः जावें, त्यांची सेवा करावी, आणखी मीं काय अपराध केला आहे, तो माझा इतका अव्हेर होत आहे, याचें कारण त्यांना विचारावें. चार समजुतीच्या गोष्टी सांगून मन वळवून घरीं आणावें. असें कैक वेळां माझ्या मनांत आलें. पण लोक मला ह्मणतील मुलगी मोठी ढालगज आहे, फार फाजील आहे. या जनापवादाला भिऊन मी आपली गप बसलें. पण आतां देवी रुक्मिणीनें ज्याप्रमाणें आपला एकविध भाव ब्राह्मणाच्या रूपानें भगवान् श्रीकृष्णाकडे पाठविला होता, त्याप्रमाणेंच हे पुराणीक कार्यभाग शेवटास नेण्याकरितां स्वामीमहाराजांकडे गेले आहेत. माझी पक्की खातरी आहे, कीं स्वामींचा शब्द व्यर्थ जाणार नाहीं. ( दचकल्यासारखें करून ) अगबाई, बाबा मला हाका मारीत आहेत वाटतें. आलें हो आलें बाबा. ( जाते ).

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—पैठण येथील पिंपळेश्वराचें देवालय.

---

( गोसाव्याच्या वेषानें एकनाथ प्रवेश करतो. गिरजाबाई पूजा करिते. )

**एकनाथ**–( आत्मगत ) याच ठिकाणीं प्रथम आकाशवाणी होऊन मी जनार्दनस्वामीकडे गेलों. आकाशवाणीप्रमाणें कार्यभाग होऊन आतां मी परत आलों आहें. ज्या बिल्ववृक्षांच्या खोडांवर मी आकाशवाणीचीं अक्षरें लिहिलीं होतीं तीं अक्षरें आतां मुळींच दिसत नाहींत. तीं बेलांचीं झाडें आतां पहिल्यापेक्षां किती तरी मोठीं झालीं आहेत! त्यांच्यांत मला केवढा फरक दिसत आहे! माझ्या वृत्तींतही त्याप्रमाणेंच फरक पडला आहे. असो, आपण महाक्षेत्र वाराणशीस जाऊन मनिकर्णिकेचें स्नान करून भगवान् विश्वेश्वराचें दर्शन घेतलें. मग प्रयागतीर्थी येऊन त्रिवेणीसंगमीं स्नान झालें. विंदुमाधवाचें दर्शन झालें. गयेला जाऊन विष्णुपदाचें दर्शन झालें. मला तर वाटतें कीं, कायावाचामनेंकरून जे श्रीविष्णूला

शरण आहेत, त्यांना गयावर्जन बसल्या ठिकाणींच होतें. ज्यांची निष्ठा हरिचरणीं आहे, त्यांना सर्व सत्कर्मे घडलीं. इतकेंच नाहीं, परंतु त्यांचे पाय लागल्याबरोबर तीर्थेंच पुनीत होतात. यमुना, गोदावरी, भागीरथी, कृष्णा, वेण्या, सरस्वती, नर्मदा, तापी, भीमरथी, या नेहमीं संतांच्या आगमनाचीच इच्छा करितात. गया, प्रयाग, काशी झाल्यानंतर अयोध्येस गेलों. कोदंडधारी रघुकुलटिळक भगवान् रामचंद्र यांचें दर्शन घेऊन हिमाचलावर बदरीकाश्रमास गेलों. तेथें शिक्यांत बसून जावें लागतें. बदरीनारायणाचें दर्शन झाल्यानंतर द्वारकेस आलों. जनीं जनार्दन भरलेला आहे, असा दृढसंकल्प मनांत धरून उत्तरेकडील सर्व तीर्थें करून आलों. ( उघड ) हें मंजूळ स्वरानें शंकराचें गाणें कोण बरें गात आहे. आपण गाभाऱ्यांत जाऊन पहावें. ही सुंदर स्त्री कोण बरें असावी !

गिरजाबाई:—

पद.

मग गेला नंदिवरी बसून ग ॥
पहातसे चहूंकडे हंसून ग ॥
निजभक्त छंद कसकसून ॥
करिती आरोळा करिती आरोळा ॥
आह्मीं आज देखिला डोळां ॥
सांब शिव भोळा ॥ सदाशिव भोळा ॥
आह्मीं आज देखिला डोळां ॥ १ ॥
एके हातीं लहानसा करी ग ॥
जसा सौम्य चाबुका परी ग ॥
जटाभार वेष्टिला शिरीं ॥
करुनिया गोळा, करुनिया गोळा ॥
आह्मीं आज देखिला डोळां ॥ २ ॥ सांब शिव ॥
अंगीं भस्म चर्चिलें असे ग ॥
त्यानें शुभ्रकाय तो दिसे ग ॥
अर्ध्या अंगीं पार्वती असे ॥

गूण वेल्हाळा, गूण वेल्हाळा ॥
आह्मीं आज देखिला डोळां ॥ ३ ॥ सांब शिव ॥
भाळिं अर्ध चंद्र निर्मळ ग ॥
जटेमधून स्रवतसे जळ ग ॥
वर करी छाया शीतळ,
नाग तो काळा, नाग तो काळा॥
आह्मीं आज देखिला डोळां ॥ ४ ॥ सांब शिव ॥
ह्मणे विठ्ठ तया देवाचे ग ॥
निर्वाण भक्त देशाचे ग ॥
उचलून पायधुळ त्यांची,
लाविन कपाळां, लाविन कपाळां ॥
आह्मीं आज देखिला डोळां ॥ ५ ॥ सांब शिव ॥

अगबाई ! हा बैरागी मोठा तेजःपुंज दिसतो ! कोणी तरी मोठा साधु असावा ! आपण जाऊन नमस्कार करावा. संतांच्या दर्शनानें आपल्या जन्माचें सार्थक होतें असें बाबा मला सांगत असतात. संताचा महिमा देवसुद्धां वर्णन करितात. ( नमस्कार करते. )

**एकनाथ**-पुत्रवती भव.

**गिरजा**-( हंसते ) बिचाऱ्याला काय माहीत कीं, मी कुमारिका आहें. त्यानें आपला चालीप्रमाणें आशीर्वाद दिला.

**एकनाथ**-तुम्हांला हंसायला काय झालें ? मीं कां वाईट आशीर्वाद दिला ?

**गिरजा**-तसें नाहीं बुवासाहेब, मी अजून कुमारिका आहें. म्हणून तुमच्या आशीर्वादाचें हंसूं आलें.

**एकनाथ**-अजून कुमारिका ! ! तुझ्या वडिलांनीं तूं इतकी उपवर झालेली असून अजून तुझें लग्न केलें नाहीं ! मोठें आश्चर्य आहे !

**गिरजा**-माझ्या दैवाची कहाणी फार विचित्र आहे ! ( रडते. )

**एकनाथ**-अरेरे ! माझ्या भाषणानें तुह्माला दुःख झालें काय ? मला क्षमा करा. तुमच्या दुःखाचा प्रतिकार माझ्या हातून होण्यासारखा असल्यास मी तावडतोब करीन. भूतमात्रांवर दया करणें हाच आमचा धर्म आहे. तुह्मी फार दुर्दैवी कसे झालां ?

**गिरजा**—आपण माझ्या दुःखाचा प्रतिकार कसे करणार ? मला तर असें वाटतें कीं, प्रत्यक्ष ब्रह्मदेव जरी आला, तरी त्यालासुद्धां माझ्या दुःखाचा प्रतिकार करतां येणार नाहीं; मग तुह्मी तर मनुष्यच आहांत.

**एकनाथ**—( एकीकडे ) अरेरे ! गरीब बिचारी इतक्या तरुण वयांत इच्यावर कोणता एवढा दुःखाचा डोंगर कोसळला आहे बरें ? ( उघड ) मला तुमच्या दुःखाचा वाटेकरी कराल काय ? मला तुमच्या दुःखाची कहाणी ऐकण्याची मोठी इच्छा उत्पन्न झाली आहे.

**गिरजा**—आपण ज्या अर्थीं इतका आग्रह करीत आहां, त्याअर्थीं सांगतें. महासाधु भानुदास. ज्यानें श्री पांडुरंग प्रसन्न केला होता, त्याचें नांव आपल्यास ऐकून माहीत आहे काय ?

**एकनाथ**—( एकीकडे ) हें प्रकरण तर अंगावरच येत चाललें. ( उघड ) त्यांचें नांव माहीत नाहीं असा या आर्यभूमींत कोण आहे ? बरें पुढें काय ?

**गिरजा**—माझ्या बापास पांडुरंगाचा असा दृष्टांत झालेला आहे कीं, त्यांच्या वंशांत मला द्यावी. ही गोष्ट चक्रपाणि महाराज भानुदासाचे पुत्र यांना संमत असून त्यांचे प्रत्यक्ष पौत्र, ज्यांचें नांव घेण्यास मला लज्जा उत्पन्न होते, त्यांना पसंत नाहीं. त्यांच्या मनांत ब्रह्मचर्यव्रतानें रहावयाचें आहे. गृहस्थाश्रम स्वीकारावयाचा नाहीं. शिवाय, ते एकवचनी आहेत. एक अंशीं अग्नि आपली दाहकता सोडील, समुद्र आपली मर्यादा सोडील, किंवा पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगवेल; पण ते आपला निश्चय फिरविणार नाहींत. ते मनाचे इतके कठोर केवळ पाषाणहृदयाचे आहेत कीं, त्यांनीं प्रत्यक्ष आपल्या वृद्ध आजाआजीचा त्याग केला आहे. देवगडावर स्वामी जनार्दनमहाराजांची एकनिष्ठपणें सेवा करीत आहेत. हें त्यांचें करणें ह्मणजे मला असें वाटतें कीं, घरीं वृद्ध आईबापांचा त्याग करून एखादा अविचारी उनाड मुलगा ज्याप्रमाणें काशीयात्रेस जातो, आणखी त्याला जितकें पुण्य जोडतें, त्याप्रमाणें असून तितकेंच पुण्य यांना जोडणार आहे.

**एकनाथ**—( एकीकडे ) आपण तूर्त इला ओळख देऊं नये.

( उघड ) उघडच आहे, ज्यानें आपल्या वृद्ध आणखी परमपूज्य आजाआजीचा त्याग केला, व जो ब्रह्मज्ञानाची प्राप्ति करून घेण्याकरितां निघून गेला, तो पुढें होणाऱ्या बायकोची गरज कितीक बाळगणार? दुष्टच तो! अशा मनुष्याचा नाद सोडून द्यावा. तुमच्या वडिलांनीं दुसऱ्या स्थळाची योजना करावी, हें माझ्या मतें फार चांगलें आहे. मग तुह्मी तसें कां करीत नाहीं?

**गिरजा**–माझी खातरी आहे कीं, पांडुरंगाचा दृष्टांत असत्य होणारच नाहीं. माझ्या वडिलाचा आणि माझा स्वतःचा असा संकल्प आहे कीं, दुसरें स्थळ पहावयाचेंच नाहीं. त्यांतून माझी तर अशी प्रतिज्ञाच आहे कीं, त्यांच्याशिवाय इतर पुरुष मला केवळ बापा–भावा–प्रमाणेंच—

**एकनाथ**–अरेरे! अशीं अभद्र अक्षरें मुखांतून काढूं नको. ज्याला तूं कठोर अंतःकरणाचा ह्मणतेस, तो कदाचित् वेडा असेल, अथवा गृहस्थाश्रम करून मुलाबाळांचें सुख, अशा सुंदर स्त्रीची संगती, त्याला विषतुल्य वाटत असेल. त्याच्यासाठीं तूं आपल्या देहाला कां श्रम देतेस?

**गिरजा**–नुसते श्रम देत नाहीं, परंतु त्यांच्याकरितां मी आपला प्राण सुद्धां खर्चीं घालण्याला एका पायावर तयार आहें. ते ज्यावेळीं पैठणांतून नाहींसे झाले, त्याच वेळीं मीं गंगेंत उडी टाकून प्राणत्याग करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत मला यश आलें नाहीं. त्यांच्या प्राप्तीकरितां मी कडक व्रतांचें आचरण करितें, बहुतकरून मीं नेहमीं उपोषित असतें. रात्रंदिवस त्यांचें ध्यान आणखी त्यांच्या नांवाचा जप मी करीत असतें. त्यांची आजाआजी मला सूनबाई म्हणून हाक मारितात, मला जवळ घेतात, आणखी टपटप अश्रु गाळूं लागतात.

**एकनाथ**–( एकीकडे ) या वेळीं मी येथें आलों आहें, हें जर त्यांना कळलें तर त्याचा परिणाम फारच भयंकर होईल. मला तर गुरुमहाराजांची आज्ञा अशी आहे कीं, भरतभूमीवरील सर्व तीर्थें करून नंतर त्या वृद्धांच्या सेवेला जावें. आतां येथून लवकर नि-

घून गेलें पाहिजे ह्मणजे दक्षिण दिशेकडील सर्व तीर्थें होतील. नाहीं तर गुरूची आज्ञा भंग केल्याचा दोष माझ्या माथीं लागणार आहे.

**गिरजा**–का बुवासाहेब, कसला विचार चालला आहे? तुह्मी माझ्या दुःखाचा प्रतिकार कोणत्या रीतीनें करणार सांगा की?

**एकनाथ**–मी ह्मणतों तुमची आणि त्याची प्रत्यक्ष गांठ पडली, तर तुह्मी त्याला काय ह्मणणार? ज्याचा तो मोकळा आहे. कोणी कोणाचा बांधलेला थोडाच आहे? ( जाऊं लागतो.)

**गिरजा**–( एकीकडे ) या बोलण्याचा अथ काय बरें? मला वाटतें माझें भाषण समक्षच चाललें आहे. आतां माझ्या मनाची खातरी होत चालली. तेच ते. या वेळीं माझे वडील अगर चक्रपाणि मामंजी येथें असते, तर फार उत्तम झालें असतें. कारण स्वारी जाण्याच्या तयारींत आहे. शंकरा, या वेळीं मला दोन शब्द बोलण्याचें ज्ञान आणि धैर्य दे. इतका वेळ मीं भाषण केलें, पण त्यावेळीं माझ्या मनाला भीति मुळींच वाटली नव्हती. आतां लज्जा आणखी भीति यांचा पगडा माझ्यावर बसला. पण या प्रसंगीं धैर्यच धरिलें पाहिजे. ( उघड ) हें पहा, मी त्यांना असें विचारणार कीं, आजपावेतों जे जे मोठमोठे साधु झाले; उदाहणार्थ नामदेव, दामाजीपंत, चोखामेळा यांनीं का बायका केल्या नव्हत्या कीं काय? मोठमोठ्या साधूंनां तरी जन्म साध्वी स्त्रियांनींच दिले आहेत. ज्ञानेश्वरमहाराज, शुकाचार्य, भानुदास अथवा कबीराचा कमाल यांचे जन्म स्त्रियांपासूनच झालेले आहेत. यावर ते काय ह्मणतील?( एकनाथ जाऊं लागतो.) कां आपण कांहीं बोलत नाहीं? मघांचा आपला आशीर्वाद बहुतेक निष्फळच आहे.

**एकनाथ**–मी तुला खरेंच सांगतों, तूं ज्याच्याकरितां इतके कष्ट करीत आहेस, तोच मी. तूं इतकी चतुर, शहाणी आणखी बहुश्रुत आहेस कीं, मला बोलण्यांत कुंठित करतेस. तुझें ह्मणणें सर्वप्रकारें उक्त आहे. आतां माझा मनोदय असा आहे कीं, गृहस्थाश्रम मला कर्तव्यच नाहीं. याकरितां तूं माझा नाद सोडून दे. आपल्या वडीलांस समजावून सांग, आणखी या माझ्या सत्कृत्यास मदत कर.

**गिरजा**–( एकीकडे ) माझा तर्क अगदीं खरा झाला. (उघड)

नेहमीं आपल्या आज्ञेंत वागेन. काडीमात्र अवज्ञा करणार नाहीं. वस्त्रालंकारांची मला अपेक्षा नाहीं. रात्रंदिवस चरणाची सेवा करीन. पाहिजे असल्यास मी अशीच आपल्याबरोबर तीर्थयात्रेस येतें. मला आपल्या संगतीनें जें सुख होणार आहे, तें त्रिभुवनीचें राज्य दिलें तरी होणार नाहीं. एखाद्या क्षुधितापुढें ज्याप्रमाणें अलंकारांनीं भरलेलें ताट ठेवावें, अथवा अरसिकाला साधूचें महत्त्व सांगत बसावें, त्याप्रमाणें आपला उपदेश व्यर्थ आहे. आपल्याशिवाय मला गति नाहीं.

**एकनाथ**–( एकीकडे ) विद्वान् किंवा अविद्वान् कसाही असला तरी त्याचें सत्वभंग करून त्याला कुमार्गास नेण्यास स्त्रिया समर्थ आहेत. याकरितां कोणत्याही स्त्रीपाशीं एकांतीं बसूं नये. कारण इंद्रियें बळकट आहेत. तीं विद्वानासुद्धां ओढतात असें मनुस्मृतींत सांगितलें आहे. ( उघड ) तूं फार सुज्ञ आहेस ह्मणून मी तुला विनंति करतों कीं, माझा नाद तूं सोडून दे. मनांतली गुप्त गोष्ट तुला सांगतों. माझे परमपुज्य गुरु भगवान् श्री जनार्दनस्वामी यांची मला अशी आज्ञा आहे कीं, तूं प्रथम सर्व तीर्थें करावीं. ज्योतिर्लिंगांचीं दर्शनें घ्यावीं. पुण्यक्षेत्रें पहावीं. नंतर आपल्या आजाआजीची सेवा करावी. आतां या गोष्टींपैकीं कांहीं एक न करतां मीं जर तुझें पाणिग्रहण केलें, तर गुरूची आज्ञा उल्लंघन केल्याचें महापापाचें खापर माझ्या डोक्यावर फुटणार. सगळ्या जगांत माझ्यासारखा दुराचारी, नीच, अधम कोणी नाहीं. विषयसुखाला लंपट होऊन आजपर्यंत केलेल्या वेदाध्ययनाला, प्राप्त करून घेतलेल्या ब्रह्मज्ञानाला काळोखी लावली. भूमीला भारभूत केवळ पशु उत्पन्न झालों असा माझा लौकिक होईल. ह्मणून विनंति आहे कीं, तूं फार धूर्त आहेस, सर्व गोष्टींचा विचार कर, आणखी माझा नाद सोडून दे. मी आतां जातों.

**गिरजा**–हां जाऊं नका. दैवगतीनें समुद्रांतलीं कमळें नाहींशीं झालीं, तरी कोंबड्याप्रमाणें हंसपक्षी उकीरडा उकरूं लागतील काय? तसें मी इकडचा त्याग करून आपल्या बापाला स्थळांविषयीं कांहीं एक सांगणार नाहीं. आपण म्हणतां त्या गोष्टी मला कबूल आहेत. आपला जो लौकिक तोच माझा लौकिक. आतांच आपण करग्रहण

करा, असें मी म्हणत नाहीं. आपण तीर्थयात्रा करून वर्षानें दोन वर्षांनीं परत याल, त्यावेळीं मी तुझें पाणिग्रहण करीन, असें मला वचन द्या. म्हणजे माझें कांहीं म्हणणें नाहीं. शिवाय मामंजी आणि सासूबाई यांचें दर्शन घेतल्याशिवाय आपण जाऊं म्हणतां ? आपल्या पश्चात् त्यांचा अंत झाल्यास ते प्राण निघून जाईपर्यंत आपल्या नांवानें टाहो फोडतील ! त्यांची उत्तरक्रिया कोण करणार ? या सर्व गोष्टींचा पोक्त विचार व्हावा.

**एकनाथ**–( एकीकडे ) व्यर्थ व्यर्थ मी पैठणास आलों ! माझी स्थिति एखाद्या जाळ्यांत सांपडलेल्या वाघाप्रमाणें होऊन बायकामुलांनीं त्याला जसे खडे मारावेत तशी झाली आहे. ( उघड ) आतां यावेळीं मीं कसें वागावें असें तुला वाटतें ?

**गिरजा**–मला असें वाटतें कीं, आपण आजाआजीस भेटून त्यांची आज्ञा घेऊन नंतर जावें. त्यांच्या समक्ष लग्न करीन अशी शपथ घ्यावी.

**एकनाथ**–पर्वताच्या शिखरावरून उडी घालून शरीराचे तुकडे तुकडे करीन. भयंकर सर्पाच्या जबड्यांत हात घालीन. पेटलेल्या भडाग्नींत उडी घालीन. पण गुरूची आज्ञा मोडणार नाहीं. तुझा विचार मला कबूल नाहीं. मी जाणार, एक पळभर येथें राहिलों कीं माझा सर्वस्वी घात होणार आहे. ( जोरानें जाऊं लागतो. )

**गिरजा**–बरें, मला नुसतें वचन तरी द्या. म्हणजे चातकपक्षाप्रमाणें मार्गप्रतिक्षा–

**एकनाथ**–तें कांहीं होणार नाहीं.

**गिरजा**–प्राणत्याग करीन.

**एकनाथ**–त्याचा दोष माझ्याकडे नाहीं.

**गिरजा**–श्रीशंकराची शपथ घेऊन सांगतें कीं, आतांच्या आतां मी देहत्याग करीन. ही पहा चाललें–इहलोक सोडून जाऊं–जाऊं–जाऊं ? ( एकनाथाच्या अंगावर मूर्च्छित पडते. )

**एकनाथ**–( एकीकडे ) खरोखरच इनें श्वास कोंडून धरून प्राण देण्याचा प्रयत्न केलेला आहे ! कदाचित् जयदेव कवीच्या बायकोप्रमाणें ही महापतिव्रता असेल. तिनें जसा आपला पति मेला असें

ऐकतांच प्राणत्याग केला, तसेंच ही करील. आतां काय करावें? ( लांब पाहिलेसें करून ) हें दुसरें भयंकर संकट उद्भवलें ! आजा आणखी आजी इकडेच येत आहेत. आतां काय बरें करावें ? आतां इला अशीच येथें ठेवून आपण जरा लांब जावें. आणखी यांचा डोळा चुकवून झपाट्यासरसें निघून जावें. जय जनार्दनमहाराज, सोडवा मला आतां या संकटांतून ( झपाट्यानें जाऊं लागतो. चक्रपाणि व सरस्वतीबाई प्रवेश करितात. )

**चक्रपाणि**–अहो बुवासाहेब, अहो बुवासाहेब, जरा माघारे फिरा हो. एक शब्द माझ्याशीं बोला, नंतर जा.

**एकनाथ**–( एकीकडे ) टक्कल पडलेल्या एका मनुष्याचें डोकें उन्हानें तापलें याकरितां सावलींत बसावें म्हणून तो एका झाडाखालीं गेला, दुर्दैवानें तें झाड नारळाचें होतें. तेथें बसणार, तों इतक्यांत झाडावरून एक फळ पडून ताड्दिशीं त्याच्या डोक्यावर आपटलें. दुर्दैवी मनुष्य कोठें गेला तरी तेथें विपत्ति ठेवलीच आहे! काय ही बाबांची स्थिति झालेली आहे ! आजीकडे तर पहावत नाहीं. माझा कंठ भरून आला. माझ्यानें पाऊल पुढें टाकवत नाहीं. इकडे गुरूची आज्ञा भंग केल्याचा महादोष ! इकडे मातृपितृहत्या ! माझ्यासारखा दुष्ट अभागी या जगांत नाहीं ! बरेंवाईट कोणतेंही काम करण्यापूर्वी शहाण्या मनुष्यानें त्याचा परिणाम ध्यानांत आणावा. नाहीं तर पश्चात्ताप मरेपर्यंत मनाला टोंचीत असतो. मनांतल्या मनांत माझ्या वृद्ध आजाआजीला नमस्कार करतों. ( उघड ) काय ह्मणतां महाराज ?

**चक्रपाणि**–हे पहा, सुख मिळण्याची आशा नष्ट झाली. बरोबरचे जिवलग मित्र स्वर्गास गेले. काठी धरूनसुद्धां उभे रहाण्याची पंचाइत पडूं लागली. तथापि हा निर्लज्ज देह अजून मरणाला भीतच आहे. याला एकनाथाची आशा आहे. आमचा नातू एकनाथ आह्मांला अशा वृद्धापकाळीं सोडून गेला. त्यानें मोठें निष्ठुर मन केलें. रात्रंदिवस आह्मांला चैन नाहीं. अन्न गोड लागत नाहीं. माशाप्रमाणें आह्मी तडफडत आहों. रात्र वर्षाएवढी वाटते. आमची अंधळ्याची काठी नाहींशी झाली. आह्मा अंधळ्यांना तप्त भूमीवर उभें

केल्याप्रमाणें भासत आहे. खरेंच सांगा, तुह्माला पांडुरंगाची शपथ आहे. माझा एकनाथ कोठें पाहिला काहो ?

**सरस्वती**–अहो, तुह्मी कांहीं ह्मणा, हाच तो. मीं पक्का ओळखिला. ते पहा त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. त्याच्यानें बोलवत नाहीं.

**चक्रपाणि**–बाळा एकनाथा !

**सरस्वती**–एकनाथा ! (एकनाथ जाऊं लागतो. दोघे जाऊन त्याच्या गळ्यास मिठी मारतात. )

**एकनाथ**–बाबा, मी तुमचा लाडका एकनाथच आहें.

**सरस्वती**–एकनाथ ! तूं कसारे आह्मांला सोडून निघून गेलास ! अरे आह्मी तुझ्याकरितां घरोघर शोध करीत हिंडलों. कोणी यात्रेकरू भेटला कीं, आह्मीं त्याला तुझी माहिती विचारावी. त्यानें नाहीं ह्मटलें तर हिरमुष्टी होऊन परत जावें. अशा तऱ्हेनें आह्मीं दिवस काढले. आतां मात्र कुडींत प्राण फक्त जिवंत राहिले आहेत. अंगांत तिळमात्र शक्ति उरली नाहीं.

**एकनाथ**–आजी, बाबा, मीं तुम्हांला फार दुःख दिलें. मी मोठ्या कठोर मनाचा आहें, असें तुम्हांला वाटत असेल; परंतु तुम्हांला दिलेल्या विपत्तीबद्दल मीं फार उत्तम भरपाई केली आहे, स्वामी जनार्दनमहाराजांची अहोरात्र सेवा करून त्यांना मीं प्रसन्न करून घेतलें. ब्रह्मज्ञानाचा उपदेश त्यांनीं मला केला; आणखी शेवट असा गोड झाला कीं, त्यांच्या कृपेंकरून मला प्रत्यक्ष श्रीदत्तात्रेयाचें दर्शन झालें.

**चक्रपाणि**–अहाहा ! धन्य धन्य माझा एकनाथ ! तूं जन्माचें सार्थक करून घेतलेंस. आम्हीं मायापशांत गुंतून व्यर्थ दिवस घालविले. भानुदासाच्या वंशाचें पुनर्जीवन केलेंस. मला अत्यंत समाधान झालें. आजपावेतों झालेलें दुःख मी विसरून गेलों. आतां मात्र आम्हांला सोडून तूं कोठें जाऊं नको.

**एकनाथ**–स्वामीची मला अशी आज्ञाच आहे कीं, सर्व तीर्थयात्रा झाल्यानंतर पैठणास येऊन आपली सेवा करावी. उत्तरेकडील माझीं सर्व तीर्थें झालीं आहेत. आतां मी दक्षिणयात्रा करून सहा

महिन्यांत आपल्या चरणांची सेवा करण्यास हजर होतों. मला जाण्याची अनुज्ञा असावी. नाहीं तर गुरूची आज्ञा भंग केल्याचा दोष मला लागणार आहे.

**सरस्वती**–मी तुला एक क्षणभरसुद्धां सोडणार नाहीं. सहा महिने मला असंख्य युगाप्रमाणें वाटणार आहेत. आमचा उभयतांचा आतां घटकेचा भरवसा नाहीं. सहा महिने तूं आह्मांला सोडून जाऊं नको.

**एकनाथ**–मला तुह्मी दुष्ट, निर्दय, नीच कांहीं ह्मटलें तरी हरकत नाहीं. मांगहृदयाचा म्हणा, वाटेल तें म्हणा, परंतु मी गुरूच्या आज्ञेस पाठ करणार नाहीं. मला गेलेंच पाहिजे.

**चक्रपाणि**–हायरे दैवा ! एकनाथ, तूं आह्मांला सोडून चाललास! अरे, आह्मीं कोणाकडे पाहून दिवस काढावे ? आह्मांला उभे राहण्याची शक्ति राहिली नाहीं. अशा स्थितींत आह्माला टाकून तुझें पाऊल तरी कसें उचलतें ? तूं तिकडे गेलास कीं, आमचे उभयतांचें देहावसानच झालें ह्मणून समज. आमचें औद्धारिक कार्य करण्यास प्रत्यक्ष आमचा पौत्र जवळ असून आह्मांला नाहींसा झाला आहे. पांडुरंगा, सोडवा मला ! ( एकनाथ जाऊं लागतो. त्यास उभयतां प्रतिबंध करितात. त्यांना सोडवून एकनाथ जाऊं लागतो. पुराणीक व गावबा प्रवेश करितात. चक्रपाणि व सरस्वतीबाई मूर्छित पडतात. )

**एकनाथ**–हा अभाग्या एकनाथा ! प्रत्यक्ष आईबापाप्रमाणें ज्यांनीं माझा प्रतिपाळ केला, ज्यांनीं मला लहानाचें मोठें केलें, माझ्याकरितां ज्यांनीं हा कालपावेतों असह्य यातना भोगिल्या, त्यांच्या मृत्यूस मी सर्वप्रकारें कारणीभूत झालों ! पण विचार केला असतां मी कोण यांचा आणि हे कोण माझे ? मी जाणार, गुर्वाज्ञा मोडणार नाहीं.

**पुराणीक**–हाच तो. बरा सांपडला. प्रत्यक्ष आजाआजी आसन्नमरण होऊन धरणीवर पडलीं आहेत ! बिचारी गिरजाबाई याच्याकरितां प्राण ब्रह्मांडीं नेऊन धरणीवर निचेष्ट पडली आहे. पण याच्या मनावर त्याचा कांहींच परिणाम नाहीं. केवढी याची सत्व-

धीरता ! ( एकनाथ जाऊं लागतो. ) हां थांब, काय एकनाथ, तुझें काय ह्मणणें आहे ?

**एकनाथ**–( पुराणीकास नमस्कार करून ) पुराणीकबुवा, मीं यांना पुष्कळ समजावून सांगितलें. सहा महिन्यांत दक्षिणमानस यात्रा करून चरणांची सेवा करण्यास हजर होतों. पण यांची समजूत पडली नाहीं. मला तर गुरूंची आज्ञा मोडतां येत नाहीं. तुह्मीं तरी यांची समजूत पाडा. पण समजूत पाडण्याचा काल आतां निघून गेला. यांच्या शरीरांतील प्राणज्योति मावळली. हीं उभयतां ममतेच्या पाशानें माझ्याकरितां बळीं पडलीं ! त्याचप्रमाणें ही भोळी मुलगी हट्टीपणानें सर्वस्वी आपल्या जीविताला आंचवली !

**पुराणीक**–ही जनार्दनपत्रिका. हें श्रीदत्ताचें चरणतीर्थ. स्वामींनीं अशी आज्ञा केली आहे कीं, हें तीर्थ तूं आपल्या हातानें त्रिवर्गाच्या मुखांत घाल, म्हणजे त्रिवर्ग पुनः सावध होतील. ( एकनाथ तसें करतो. त्रिवर्ग उठून बसतात. )

**गावबा**—पण ही बाई कोण आहे ? हिला येथेंच झोंप आली होती कीं काय ? ( निरखून पाहून ) हें आपलें पुढें होणारें कुटुंब ! यांची समाधि तर नव्हतीना लागली ? तुला अत्यंत आनंद होईल अशी गोष्ट सांगतों. अहो आजोबा, अहो आजीबाई, एकनाथाबद्दल तुह्मी तिळमात्र दुःख करूं नका. तुह्मांला सर्वांला हे पुराणीकबोवा आज जें आहेत तें अत्यानंद देणार आहेत. तुह्मी यांना जें आहेत तें लाडूंचीं वायनें—

**एकनाथ**–( पत्रिका मस्तकावर धारण करतो. ) हें अक्षर स्वामींचेंच आहे. काय ह्मणतात महाराज ? "अनेक आशीर्वाद. तुझीं आजाआजी तुझ्या वियोगानें आसन्नमरण झालीं आहेत. वृद्धापकालीं त्यांची तूं सेवा करावी हा तुझा धर्म आहे. हीच तुझी तीर्थयात्रा. त्यांची सेवा केली ह्मणजे प्रत्यक्ष पांडुरंगाचीच सेवा केल्याप्रमाणें आहे. करितां हें पत्र तुझ्या हातांत पडतांच पुढें न जातां तेथेंच रहा व त्यांना संतोष दे. दुसरें असें कीं, भानुदासाच्या वंशांत तूंच कायतो एक आधारतंतु उरला आहेस. तूं परम विरक्त आहेस हें मी जाणून आहें. परंतु आजाआजीस संतोष व्हावा, भानुदासाच्या

वंशवृक्षास सुंदर फळें यावीत म्हणून तूं गृहस्थाश्रम स्वीकारावा. सर्व आश्रमांत गृहस्थाश्रम उत्तम आहे. याची थोरवी अशी आहे कीं, यांत प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साधतां येतात. षड्रिपु जिंकण्याचे प्रसंग जसे संसारांत येतात तसे अरण्यांत जाऊन येत नाहींत. स्वेच्छेनें वरण्याकरितां जी वधु तुला आलेली आहे, तिचेंच पाणिग्रहण कर. ती महा पतिव्रता आहे. कळावें हे आशीर्वाद." स्वामीची आज्ञा अशी आहे कीं, हें पत्र तुझ्या हातांत जेथें पडेल तेथेंच रहा. आतां मी या जागींच मुक्काम करीन. हें माझें कायमचेंच घर. मी आतां येथेंच राहणार.

**पुराणीक**—इतका विपरीत अर्थ करण्याचें कारण नाहीं. येथें राहून ऊन, थंडी, पाऊस, वारा यांचा ताप होणार आहे. आपण घरीं चलावें.

**एकनाथ**—नुसत्या जमिनीवर निजणें आणि पलंगावर परांच्या गादीवर निजणें मला सारखींच वाटतात. घोंगडी पांघरणें आणि शालजोडी पांघरणें मला सारखींच वाटतात. नुसती भाजी खाणें आणि शाल्योदन खाणें सारखींच. सुख आणि दुःख मला सारखींच भासतात. सर्वत्र सद्गुरु जनार्दन भासत आहे. घरीं येणार नाहीं असें नाहीं, परंतु मुख्य ठिकाण हेंच. येथेंच गृहस्थाश्रम करावयाचा.

**गावबा**—मी येथें तुमचे सेवेला राहतों म्हणजे झालें. कोणी तरी आपल्याला येथें एक छानदारसें घर बांधून देईल तर बरें होईल?

**चक्रपाणि**—कां मुली, झालें कां तुझ्या मनाप्रमाणें? मिळाला का एकनाथ तुला भ्रतार?

**गिरजा**—( हंसेत ) माझा जीव गेलेला पुनः परत कसा आला. मला वाटलें जशी कांहीं मला झोंपच लागली होती. आतां माझ्या बापाला किती तरी आनंद होईल!

**सरस्वती**—मुलगी पायगुणाची झालीहो. तिच्या भाग्यानें माझा एकनाथ मला पुनः भेटला. इतकेंच नाहीं परंतु माझ्याजवळ निरंतर राहिला. ( गिरजाबाई सर्वांच्या पायां पडते. पडदा पडतो. )

# अंक चवथा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**—डोंगरांतील गुहा.

( पांच चोर दागिन्यांचा डबा घेऊन प्रवेश करितात. )

**राण्या**–अपुन इचेभन कांहीं निसत च्वार नाहीं. सूर शिपाई मर्द आहो.

**गेन्या**–शिपाई मर्द ! दरोडेखोर–खून करणारे–समद्या गावाला मरिआईची सात तुम्ही ह्यूती. अन् म्हन आह्मी शिपाई मर्द. अन् आह्मी नबाव सुभदार.

**तुक्या**–नई मर्दानु अपुन रनसूर ह्यूति. पन काम लइ वंगळ करतुया.

**नाम्या**–कायर वंगळ काम करतुया ? तुक्या ! लइ लइ वंगळ म्हनतुस ?

**सोपान्या**–सुभदाराचा हुकुम तुम्ही तोडता. लोकांना लइ ताप देता. लोकांची घर फोडता, अन् चोऱ्या करता.

**राण्या**–अन् मी म्हनतो, तोफलखान सुभेदारान काय केल ? त्यान नाइका लोकाला ताप दिला ? दौलताबादला येतांना रस्त्यान गाव जाळलीं ? आन लोकांचीं घर फोडूनशान समदी दौलत लुटुनशान नेली ? आन हजारो लोकांनाची ठार मारल ! आन मुसलमान बी केल ? मंग आता आह्मी सुभेदारापुन चांगल नव्ह का ?

**गेन्या**–पन काही जरी झाल, तरी तुला च्वार म्हनतील. आन त्येला सुभदार ह्मनतील.

**राण्या**–आन सुभदार तरी काय करतो ? आपला मुलुख लइ वाढावा ह्मनुनशान हजारो फौज गोळा करूनशान दुसऱ्या मुलखावर सवारी करतो. आन मंग त्याच्या हजारो लोकांची कत्तल करतो. मग कांही गरीब पहातुया का ? आर मी म्हनतो, आह्मी चोर, ए-

खाद्या गावालाच लुटुं, पन सुभदार तर इलिचपुराहून निघतो तो दौलताबाद् गाठतुया. आन वाटेत घर जाळतुया. आन शेत तुडवतुया. आन लोकाच परान घेतुया. आह्मी तर एखाद् घर जाळल असल, पन सुभदार गावचे गाव बेचिराख करतुया. मंग आता सुभदार आमच्यापुन लयी मोठा च्वार म्हटला ह्मणजे झाल !

**तुक्या**–अरे लेका रान्या, तू तर मोठा पंडितच झालास ! पन मी म्हनतो सुभेदाराच देन तुझ्या बाला तरी देता येईल का ? सुभदार इनाम करून देतोया, आन लोकाला जागिर करून देतोया. आन शहर बनवतुया. यापार वाढवतोया. आन पोरासनी लिव्हन शिकवतुया. लिव्हन ! तुम्ही काय चोरी कराया शिकवता व्हय ?

**राण्या**–मंग हमी बी गरिबाला पैस देतो. गरिबाला लुटित नाहीं. तुमच्यासारख लोक मी जवळ बाळगल. आन तुह्माला शिस्तवारिन चोरी कराया शिकवल. माझ म्हनन इकतच कीं, आम्ही अन सुभदार दोघ मरूनशान जवा देवाप जाऊं, तव्हा देव म्हनल की एक मोठा चोर हय, आन एक लहान चोर हय. पन दादा दोन्हीबी चोरच हयती. कस ?

**नाम्या**–ते जाऊ द्या. पन गड्यानु आजच्यासारखा लाट आपल्यासनी कधीबी गवसला नसल, अन ह्मोरबी काधि नाय गवसायचा. या एकनाथाच्या लग्नामंदी लई लाट गवसला.

**सोपान्या**–मनसबदार देशपांड्या लई शिरीमान आन त्येच्या घरी, कोन सावकार लोक आल्याती, संमद् इच्याभन शिरिमान. लइ दागिन घावलेती. पन गडे तेवढी नवरी मुलगी एकनाथाची बायको गवसली असती, ह्मंजे कोटकल्यान झाल असत. हजारो रुपयाच दागिन तिच्या अंगावर हयती. पन राव वरात गेली आन माघ आपुन हळुच घरामंदी शिरून भित फोडून आत घुसलो, आन पेटीमधला डागिन्याचा डबा कुलुप काढुनशान काढून घेतला. नवरी मुलगी उचलुनशान आनतो, तर दागिनच दागिन, आन पैसच पैस झाल असत !

**राण्या**–तर मग तुम्ही अस करा. गेन्या, तुक्या, नाम्या आन

सोपान्या, तुम्ही चौघवी नदीच्या कडला त्या एकनाथ्याच्या घरीं जा. आतां पहार रात उरली असल. हळुच त्याच्या घरामंदी शिरा. आन तो म्हातारा आन म्हातारी, आन समद्याना आता गार झ्वाप लागली असल. लगनामंदी संमद दमुनशान गेलती. घरामंदी शिरून नवरीमुलीला उचलुन आना हत. मग घेऊ समद लुबाडुनशान आन देऊ राव हाकुन. जाउ दौलताबादाला शहरामंदी आन तथ घालू त्या सोनाराच्या पदरांत समद. नाइतर जाऊ बादशाच्या फौजमंदी शिपाईगडी बनुनशान.

**गेन्या**—बर हय नाइक साब. आह्मी जातो तकड हुकमापरमान. पन हे संबाळा संमद. नाइतर कोतवाल लइ वंगाळ हय. गावामंदी गस्त फिरतीया. आन आह्मी जाऊ तकड. आन हत समद होईल वाटुळ. म्हुनशान ह्मनतो.

**राण्या**—अर हा नावाचा राण्या हय. समजलास ? कोतवालाच्या बाला दात यायचा नाहीं. जा, तुह्मी सवस्त. ( चौघे जातात. राण्या आत्मगत ह्मणतो. ) औंदा. काळकाई मला चांगली पावलीया ! काय बर डाग हयती ! ( मोजतो ) मोत्याची पेंडकी हयती. आन आमच्या अस्तुरीन घातली म्हुनशान काय झाल ? तीबी बामनिनीगत दिसल. आन मुरका मारिल तव्हा पोटामंदी कशा गुदगुल्या होत्याल ! आन ही नथ ! अग बया बया ! हजार रुपयाची असल ! ही देईन नाकांत लटकाउन. आन मंग तर काय तोंडाकड पाहूनशान समद लोक लाळ घोटाया लागतील लाळ घोटाया ! आन म्हनतील, रान्या, लेका कुठर गेलतास रोजगाराला ? ते जाऊ द्या. आतां हा डबा या झाडाखालीं पुरुनशान ठेवावा, आन आपुन सवस्त झ्वाप घेवी. आन ते आल म्हनजे मंग समद वाटूनशान घेऊ. ( डबा पुरून ठेवतो. कोतवालाचे शिपाई प्रवेश करितात. राण्या लपून बसतो. )

**पहिला शिपाई**—हा राण्या नाईक आज येथें आलेला आहे, यांत शंका नाहीं. त्याच्याशिवाय हें काम झालेलें नाहीं.

**राण्या**—( एकीकडे ) हा तुमचा बाप हत उभा हय. माझ्याप हत्यार अस्त तर समद्याचा समाचार घेतला असता.

**दुसरा शि०**—या वेळेस राण्या जर सांपडला, तर मोठी बहार होईल ! सरकाराकडून आपल्याला मोठें बक्षीस मिळेल.

**तिसरा शि०**—राण्या सांपडणें ह्मणजे तोंडच्याच गप्पा असतील ? आपल्यापैकीं एकादोघांला ठार करील, तेव्हां राण्या हातीं लागेल.

**राण्या**—( एकीकडे ) हा मातर अगदीं खर बोलला. पन काय करूं मजप हत्यार नाहीं. बर झाल, मी समद् पुरूनशान टाकल. ते यांच्या बालाबी गवसनार नाहीं. आन त्या चौघालाबी गवसनार नाहीं. आतां काय बरं सोंग कराव ? यानी तर आपल्यासनी पघितलं. आता येंच्यासंग दोन हात कराव. का येड्याच आन मुक्याच आन बहिऱ्याच सोंग घ्याव ? नाइतर अदुगर धिंगामस्ती करून एकाची तलवार हिसकुन घ्यावी. आन मंग येडा बहिरा आन मुका बनावं. ( भय दाखवितो. एका शिपायाच्या कमरेला मिठी मारतो. तलवार हिसकावून घेतो. )

**पहिला शिपाई**—पकडा हरामखोराला. हाच तो राण्या. मीं पक्का ओळखला. ( पुष्कळ झटापटी होतात, त्यांत राण्या हटला जाऊन शिपायांच्या स्वाधीन होतो. )

**दुसरा शिपाई**—बोल चोरा, आज देशपांड्या मनसबदाराच्या घरीं चोरी कोणीं केली ? ( तो बोलत नाहीं, असें पाहून त्याला मारतात. )

**तिसरा शिपाई**—अरे हा मुका आहे. याला बोलतां येत नाहीं. मला वाटतें हा राण्या नव्हे.

**चवथा शिपाई**—अरे ह्यानें मुक्याचें ढोंग केलें आहे, दुसरें काय ? याची चांगली कणीक मऊ केली, म्हणजे आपोआप बोलायला लागेल. ( राण्याला खूप मारतात. राण्या खुणा करून सांगतो कीं, मी मुका आहें, मला मारूं नका. मला चोरीची बातमी सुद्धां नाहीं. वेडे वेडे चार करतो. शिपायांच्या हातून निसटून जाण्याचा प्रयत्न करतो. )

**पहिला शि०**—आतां असें करूं नका. याचे हात पाय बांधून याला येथेंच ठेवून आपण आणखी याचे कांहीं साथीदार हिकडे तिकडे असतील, त्यांचा शोध करूं. ( राण्याचे हात पाय बांधून त्याला लाथा मारून निघून जातात. )

**राण्या**—( स्वतः सोडून घेतांना आत्मगत ) अग वया वया वया! मेलों. अगदी अगदी ठार झालों. सारी हाडन हाड मोडली. अगदी उ-ठुन बसन्याची बी ताकद राहिली नाहीं. आता काय करूं. मघाशी म्हटलं काळकाई भवानी औंदा चांगली पावली, पन आता तिच्या काळाची खबर देनार नाही. लयी मार खाल्ला. साऱ्या जलमामंदी असा मार कवाबी खाल्ला नाहीं. समद्या अंगांतून रगत भळाभळा वहातया. पोटामंदी कालपुन भाकर नव्हती. आन आता मार खा-ऊनशान पोटामंदी आग पडलिया. आता कइ उभ राहवत नाहीं. आता खुरडत खुरडत नाथाच घर गाठतो. म्हनजे त्या गेन्याची आन नाम्याची गाठ पडल. आता त्याना हित आनुनशान ये शिपुरड्याचा समाचार घेतो. ( रांगत रांगत निघून जातो. )

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—एकनाथाचें घर.

---

*( एकनाथ व त्याची बायको गिरजाबाई प्रवेश करितात. )*

**गिरजा**—का मनांत लग्न करावयाचें नव्हतेंना ! मग कसें लग्न लागलें ? झालें कीं नाहीं सावधान ?

**एकनाथ**—ज्यांना ज्यांना म्हणून अंतरपट लागले आहेत, त्यांनीं त्यांनीं सावधानाच्या वेळीं सावध असलें पाहिजे. निमिष-निमिषमात्र हरिचरणचिंतनाविषयीं सावधान असलें पाहिजे. ज्यांनीं आपल्या अंगीं जाणतेपणा धरला आहे, त्यांना सावधानपणा राहिला नाहीं. जेव्हां ॐपुण्याला गांठ पडली, तेव्हांच आमची द्वैत-भावाची गांठ सुटली. मायेचें वधुवस्त्र फेडून तूं अष्टपुत्री धारण केली-स. आणखी मग लोभी उपाध्ये मलीन वस्त्रासाठीं एकमेकांशीं भांडूं लागले. तुझ्या मनाची स्थिति त्यावेळीं कशी झाली ?

**गिरजा**—चरणाची गांठ पडल्याबरोबर संदेहाच्या गाठी सु-टून गेल्या. वृत्तीस समाधान झालें. शब्द खुंटला. मौन तुटलें. जि-

कडे तिकडे चैतन्यघन भरलें आहे असा भास झाला. देह विसरून गेलें. दिवस आणि रात्र यांचेंसुद्धां स्मरण नाहींसें झालें. आजपावेतों आशा, मनीषा, तृष्णा, कल्पना, ममता, भ्रांती, वासना, कुबुद्धि, निंदा, अहंता, चिंता, निद्रा ह्या माझ्या मैत्रिणी होत्या. त्यांच्या जागा आतां रिकाम्या झाल्या आहेत.

**एकनाथ**—फार उत्तम झालें. त्यांच्या जागीं आतां सुबुद्धि, शांति, दया, क्षमा आणि नम्रता यांची योजना कर. स्वामी जनार्दन यांचा उपदेश होण्याच्या अगोदर माझे परमस्नेही मनाजीराव सुभेदार, बुधाजीपंत फडणीस, चित्ताजीपंत चिटणीस, अहंकाराजीपंत सबनीस, विकल्पाजी महाजन, मोहाजी शेटे, कामाजी कोतवाल, क्रोधाजी नायकवडी, द्वेषाजी जमेदार, लोभाजी पोतनीस, विकारपंत जकातदार, मदाजी देशपांडे, आणखी दंभाजी देशमुख हे होते. त्यांच्या जागीं स्वामीमहाराजांचा उपदेश झाल्याबरोबर शुद्धसत्वभाव, वैराग्य, विवेक, बोध, परमार्थ, आनंद, समाधान, निर्वैर, स्वानुभव, धैर्य, सत्य, भजन, पूजन, भक्ति यांची योजना केली गेली आहे.

**गिरजा**—मग लढाई मारून बादशहाच्या दुष्मानाला कैद करून बादशहाकडे कसें आणलें ? याची हकीकत एकदां इकडच्या तोंडांतून ऐकण्याची फार इच्छा आहे.

**एकनाथ**—मग फार चांगलें. लढाईची हकीकत अशी झाली कीं, ज्यांनीं ज्यांनीं आमच्यावर षड्विकारांचे बाण सोडले, त्यांचे बाण निर्विकार बाणांच्या योगानें निवारण केलें. अहंता, तृष्णा, इत्यादि षडूर्मि यांच्या तलवारी ज्यांनीं ज्यांनीं मारल्या, त्या सर्व बोधरूप कुऱ्हाडीनें तोडून टाकल्या. ज्यांनीं क्रोधाचा भाला मारला त्याला शांतीच्या ढालेवर धरून बोथट करून टाकला. वासनेची गुप्त कट्यार ज्यांनीं चालविली, तिचें टोंक निर्वासनेच्या चिलखताच्या योगानें मोडून टाकिलें. श्रीगुरूच्या नामाचें शिरस्त्राण धारण केल्यानें मस्तकावर कोणीं घाव केला नाहीं. याप्रमाणें लढाई करून क्रोधरूपी दुश्मनाला विवेकाच्या दोऱ्यांनीं बांधून बादशहापुढें हजर केला. ( चार चोर प्रवेश करितात. ) हे कोण बरें आहेत ? यांना काय पाहिजे आहे ?

**गेन्या**—( हळूच ) हे लचांडच आहे इचेमन. या बामनाला इवाप बी काय नाय. हतामंदी माळ घेऊनशान बसलाया. आन बयाची जागीच आहे.

**तुक्या**—आन आता आपुन परत गेलो, तर राण्या आपल्याला भागुबाई म्हनल.

**नाम्या**—आता चौघानी चार बाजूला व्हाव. आन दोघानी त्या बामनाला धरूनशान लांब उभा करावा. आन दोघानी या बयाला उचलूनशान राण्याच्या तथ न्यावी. आन मंग समद अंगावरच बुचाडून घ्याव.

**सोपान्या**—रान्याप नेऊन काय करायच ? हत समद वरबडून घेतल तर तुम्हास कोन मारतया व्हय ? ( चौघे चार बाजूला होतात. )

**एकनाथ**—अरे तुम्हांला काय पाहिजे ? तुम्ही कोण आहांत ?

**गेन्या**—आम्हासनी ही बया पाहिजे, म्हनजे झाल. आमी मुकाट्यान जातो.

**एकनाथ**—हिला घेऊन तुम्हांला काय करावयाचें आहे ?

**तुक्या**—नदीवर घेऊन जातो आन अंगावरच समद दागिन काढून घेतो.

**नाम्या**—नाइ तर बामना तूं मुकाट्यानें बस. म्हनजे आम्ही हत काढुनशान घेतो.

**सोपान्या**—हत नाइ, नदीवर राण्याप. ल्येका हत कोतवालच शिपाई गस्त घालताना आल, तर आपल्या मुस्क्या बांधत्याल.

**गेन्या**—पकडा त्या बामनाला.

**एकनाथ**—अरे मला कशाला धरतां ? तुह्मी आल्याचा मी मुळींच बोभाटा करीत नाहीं ( बायकोला अंगावरील सर्व जिनसा काढून देण्याला सांगतो. ) घरांत तुह्मांस नेण्यासारखें असल्यास घेऊन जा. हें घर तुमचेंच आहे असें समजा. मग काय ह्मणतां ?

**तुक्या**—अस साधू लइ पाहिलेत. आह्मा सगळ्यास ग्वाड ग्वाड बोलूनशान मंग कोतवालाच्या ताब्यांत द्यायच व्हय ?

**गिरजा**—आतां बाई मी काय करूं ? हे चोर मला धरून

नेतील. माझी विटंबना करतील. पांडुरंगा सोडीव आह्मांला या संकटांतून.

**एकनाथ**--तुला भिण्याचें कारण नाहीं. खुशाल त्यांच्याबरोबर ते नेतील तिकडे जा. ते तुझे भाऊच आहेत, असें समज, आणखी अंगावरील अलंकार काढून देऊन परत ये. अलंकार देशील त्या वेळेस मनांत कृष्णार्पण असें ह्मण.

**गिरजा**—जशी आज्ञा होईल तसें करितें.

**नाम्या**—हे गौडबंगाल काय कामाच ? लइ भट लबाड. आह्मी नदीवर हिला घेऊनशान गेलों ह्मणजे माग कोतवालाला वर्दी देऊन आमासनी पकडून त्येच्या हवाली कराव. हा राव इचा मनखुबा दिसतुया. बस, ते काइ कामाच नाइ. आमी दोघ ह्याला हत धरूनशान ठेवतो. चाल र गेन्या. आन तुह्मी ह्या आवाच्या तोंडांत बोळा कोंबूनशान घेऊन जा नदीवर. (नाम्या व गेन्या एकनाथास पकडतात. तुक्या व सोपान्या गिरजाबाईस पकडावयास जातात. त्यांना एकदम दिसेनासें होतें.)

**तुक्या**—अर इचेभन मला अंधळ कोनी केल ? मला एकाएकी दिसनास कस झाल ?

**सोपान्या**—आन मीबी अंधळा झालो. आता काय कराव ? अर तू हयसर कुठ ? अर ये तुक्या. (एकमेकांस धरावयास जातात. धडाधड पडतात.)

**गेन्या**—ही का चेष्टा चालवली व्हय ? नायकाला जर सांगितल तर ढुंगनावर एक एक लाथ मारत्याल. ठाव नाय अजून. चोरी कराया आलात का हजामती कराया आलात. चेष्टा हयती व्हय ?

**नाम्या**—गेन्या, दे र या बामनाला सोडून. आपुन या अवाला घेऊनशान नदीवर जाऊं. ह्या चोराना एक पैसाबी देनार नाइ. बसूदे वाजवीत. (एकनाथास सोडून गिरजाबाईस धरावयास जातात. त्यांनाही दिसेनासें होतें. चौघे अंधळे झाल्यावर इकडे तिकडे चार दिशांनीं चाचपूं लागतात. रडावयास लागतात.)

**गेन्या**—बामनबुवा आह्मी चुकलो. तुमच्या अस्तुरीला हात लावाया गेल्याबरोबर आमच डोळ गेल. तुम्ही साधु हयती. हे समद

खर, पन आता आह्मी अंधळ झाल्यावर आमच्या बायकाची पोट कोन भरील ?

**तुक्या**—आता आमच्या बदला कोन चोऱ्या करील ?

**नाम्या**—आन मला आता बायको तरी कोन देनार ? माझ लगिन व्हायच व्हत. आतां अंधळ्या नवऱ्याला कोन आपली मुलगी देनार ?

**सोपान्या**—ह्य माझ्या शेजारी एक अंधळी मुलगी. तिच्या बाला मी सांगन आन तुला बायको करूनशान देईन. पन आतां राण्याला ही खबर कोन देनार ? (राण्या येऊन जमीनीवर अंग टाकतो.)

**राण्या**—तुह्मी गेल्यावर मला त्या कोतवालाच्या शिपायानी धरल. आन राव अस मारल ह्य कीं आता मी जगत नाहीं. पन मी कबूल झालों नाहीं. आता मी मरतो. आता काय मी जगत नाहीं. माझ्या घरी माझे बायकोला जाऊन सांगा राण्या मेला. कुनासंगबी तूं मोहतुर लाव. हा तुमचा डबा. मी आतां जातो. (चारी अंधळे त्याला चाचपून पाहतात.)

**एकनाथ**—अरेरे! याला फारच मारलें आहे बरें का. सर्वांग रक्तानें भरलें आहे. आतां तर हा अगदीं मरतो आहे. आतां आपण काय करावें बरें ?

**गिरजा**—मला वाटतें याच्या पोटांत थोडा अन्नाचा रस गेला तर याला बरें वाटेल.

**एकनाथ**—तूं अगदीं खरें बोललीस. मग आणतेस का कांहीं तरी याला खायाला ? याला कांहीं खाववणार नाहीं. पिण्यासारखें कांहीं तरी आण.

**गिरजा**—कणेरी करून आणतें म्हणजे झालें. (जाते.)

**गेन्या**—महाराज, किरपा करून आमच डोळ चांगल करा. आह्मी आपल्या पायाच चाकुर ह्यती. आता ह्मोर आह्मी चोरीचा धंदा करनार नाहीं.

**एकनाथ**—पण इतक्यांत तुमचे डोळे चांगले होतेनारे ? इतक्यांत त्यांना झालें तरी काय, याचें मला मोठें आश्चर्य वाटतें.

**नाम्या**—तुमच्या बायकोसनी हात लावाया गेलो मातर, आन

आह्मी आंधळ झालो. आन खरोखरच आह्मी तिला नदीवर घेऊन गेलो असतो, तर आमच मुडद्‍च वळल असत. नाइतर जळूनशान आमची राख झाली असती.

**एकनाथ**–पाहूं तुमच्या डोळ्यांना काय झालें आहे तें? गुरुमहाराज, हे गरीब बिचारे एकाएकीं अंधळे झाले. हे आपल्या पायाचे दास आहेत. कृपा करून यांना दिसूं द्या. यांचे जर डोळे गेले, तर यांनीं आपला चरितार्थ कसा चालवावा? गुरुमहाराज यांच्यावर आपण कृपा करावी. ( चौघांच्या डोळ्यांवर हात फिरवितो. ) आतां कसें काय?

**गेन्या**–महाराज पहिल्यापरमान नामी दिसाया लागल. आन ह्यानाबी समंद्याना दिसाया लागल. तुमच उपकार आमच्या डोईवर लइ झाल. ते आह्मी कस फेडाव.

**एकनाथ**–आमचे उपकार तुह्माला फेडावयाचे असल्यास तुह्मीं इतकेंच करावें कीं, आजपासून चोरी करूं नये, लबाड बोलूं नये, पांडुरंग तुमचा चरितार्थ चालवील, अशी खातरी ठेवा. पोटासाठीं मजुरी करून इमानानें आपल्यास जें परमेश्वर देईल त्याच्यावर उदरनिर्वाह करावा. तुह्मी चांगले हुशार लोक आहांत, सशक्त आहांत, शेनाभातांत कामें करावीं, आणि जें पोटाला धान्य मिळेल त्याची भाकरी आनंदानें खावी. (कणेरी घेऊन गिरजाबाई प्रवेश करिते. एकनाथ राण्याच्या तोंडांत चमच्यानें कणेरी घालतो. राण्या हुशार होतो.) राण्या तुला चोरी कराविशी वाटते काय?

**राण्या**–वासराला जशी गई, नाइ तर तान्ह्यामुलाला त्याची आई, तस तुमी लइ दयाळु हात. तुमच्या घरच अन्न मी आज खाह्ल, लइ गोड लागतय. त्याचा गून माझ्या मनावर असा झाला कीं, मला चोरी कराविशी आता वाटत नाहीं. हा घ्या डागिन्याचा डबा. हे समद डाग मनसबदार देशपांड्याच्या घरच हयती. ज्येच त्येला हे परत करा. मी जातीचा म्हार, आन तुमी बामन, अस असूनशान तुमी माझ्यावर इकती दया केली कीं मला कोतवालाच्या शिपायाच्या सोधिन न करतां तुमी उलट माझ्या अंगावर हात फिरविल्याबराबर माझ्या अंगातून

जे रगत वाहत होत, तेबी बंद पडल. पहिल्यागत मी अगदीं हुशार झालों. आतां मी या पायाचा रातंदिस चाकुर हय. नेहमीं देवाच नांव घेत जाईन.

**एकनाथ**—असें केलेंस तर मी तुला आपल्या पाठच्या भावा-प्रमाणें समजत जाईन. तूं महार आणि मी ब्राम्हण हा भेदाभेद माझ्या मनांत नाहीं. परमेश्वराच्या घरीं आपण उभयतां एकच आहों. समुद्राला जोंपावेतों नद्या, ओढे किंवा ओहोळ मिळाले नाहींत तोंपावेतों लोक त्यांना निरनिराळीं नांवें देतात. परंतु एकदां समुद्रांत मिळाल्यानंतर त्यांचा एकच महासागर होतो. तसें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार जाति कोठपावेतों ? जोंपावेतों त्या ईश्वराच्या भक्तिरूपी नावेंत बसल्या नाहींत तोंपावेतों. याचीं उदाहरणें, चोखा मेळा महार, सजन कसई, रोहिदास चांभार, गोरा कुंभार, कबीर कमाल, वगैरे शेंकडों देतां येतील. ( कोतवालचा शिपाई प्रवेश करितो. )

**शिपाई**—महाराज, मी या राण्या महाराला पकडून नेण्याकरितां आलों आहें. तसेंच याचे हे साथीदार यांनाही चावडीवर घेऊन जाणार आहें. या राण्या महारानें आजपावेतों शेंकडों वेळा चोऱ्या करून लोकांचीं घरें लुटलीं आहेत. याला कोतवालाकडून चांगली शिक्षा मिळाली पाहिजे.

**एकनाथ**—यानें केलेल्या अपराधाबद्दल मला आज पूर्ण पश्चात्ताप वाटत आहे असें तो ह्मणतो. कोतवालसाहेबाला माझी विनंति अशी जाऊन सांग कीं, शिक्षेचा मुख्य उद्धेश हाच कीं, पुनः गुन्हा होऊं नये. हें जर आहे तर राण्या महार पुनः गुन्हा करणार नाहीं. याला मी जामीन आहें. इतक्यावर त्यांची मर्जी. या सर्व चोरांना शिक्षा करावी अशी असल्यास त्यांना विचारून येऊन यांना घेऊन जा.

**शिपाई**—महाराज, आपली कृपा त्यांच्यावर झाली. आतां ते जन्मांत चोरी करणार नाहींत. मी कोतवालसाहेबास आपला हेतु समजाऊन सांगतों. ( जातो. )

**गिरजा**—ह्मटलें हे आपल्या घरीं पाहुणे आले आहेत. तेव्हां या सर्वांनीं आपल्या घरीं जेऊन जावें असें मला वाटतें.

**राण्या**—बाई, तूं आमची वडील बहीन हैस. आमची पांच भावांची ववाळणी तुला काय द्यावी ? आतां आह्मी पांचजन तुला आनखी तुझ्या नवऱ्याला दंडवत घालतों. ( दंडवत घालतात. एकनाथ व त्याची बायको उलट पायां पडतात. चोर जातात. श्रीखंड्या कावड घेऊन प्रवेश करतो. नमस्कार करतो. )

**श्रीखंड्या**—आपण नेहमीं श्रीविठ्ठलाची सेवा करितां, ब्राह्मणाची सेवा करितां, सर्व भूतमात्रीं समता धरितां, आपपर भेदाभेद पहात नाहीं, हें पाहून माझ्या चित्तांत आपली सेवा या हस्तें कांहीं तरी घडावी ह्मणून मी लांबून आलों आहें. जन्मापासून मी आपल्यासारख्या संतांचें दास्यत्वच करीत आलों आहें. संतांचें दास्य मी एकनिष्ठपणानें आणखी फार उल्हासानें करितों. मला कांहीं नको, कांहीं नको. तुमच्या घरचें अन्न तुमचा प्रसाद ह्मणून पोटभर खावयाला मिळालें ह्मणजे बस्स. एखादें जाडेभरडें वस्त्रप्रावरण—केवळ निर्वाह होण्यापुरतें मिळालें, ह्मणजे मला तें बहुत मोलाची शालजोडी किंवा पीतांबरच मिळाला असें समजेन.

**एकनाथ**—तुमचें राहण्याचें ठिकाण कोणतें ? तुमच्या कुटुंबांत कोणकोण माणसें आहेत ? तुह्मी कोणत्या शाखेचे ब्राम्हण ? तुमचें नांव काय ?

**श्रीखंड्या**—महाराज मला कोणी नाहीं. आई नाहीं. बाप नाहीं. पाठीं नाहीं. पोटीं नाहीं. माझा मी या जगांत एकटा. बायकोचेंसुद्धां हडदें नाहीं. जसा परमेश्वर एकटा तसाच मी एकटा. या देहाला रुष्ण श्रीखंड्या ह्मणतात. मी सर्व देश हिंडत असतों. मला जेथें प्रशस्त वाटेल त्या ठिकाणीं राहतों. मी ऋग्वेदी ब्राम्हण आहें. तुमची सेवा करावी या हेतूनें आलों आहें.

**एकनाथ**—( हंसून ) सेवा करण्याचें कांहीं कारण नाहीं. आपण खुशाल आमच्या घरीं भोजन करून रहावें.

**श्रीखंड्या**—स्वकष्टार्जित अन्न मिळवावें ह्मणजे तें खाण्यास प्रशस्त असतें. तशांतून मी चांगला धट्टाकट्टा आहें. कांहीं तरी परोपकार करीत असावा. जातों. गंगेचें पाणी कावडीनें भरतों. ( जातो. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—गंगानदीचें वाळवंट.

( धर्माधिकारी व इतर ब्राह्मणमंडळी एकनाथाच्या कुटाळ्या करीत बसली आहेत. एक महाराचें पोर उन्हानें वाळूंत तडफडत आहे. )

**धर्माधिकारी**—आमच्या पैठणांत भागवत धर्माचें हें एक दुकानच घातलें आहे ह्मणावयाचें. वक्तृत्वांत ह्मणजे मोठा बाणेकरी आहे असें मला कांहीं वाटत नाहीं. परंतु कीर्तनाच्या योगानें मात्र लोकांचीं मनें आपलींशीं करून घेण्याविषयीं अगदीं हातखंडा काम आहे. गीर्वाण भाषेचा कैवार घेण्याचें टाकून प्राकृत भाषेवर चवऱ्या ढाळतो. शेंकडों संस्कृत पुराणें आहेत, पण सगळ्यांना फाटा देऊन यानें भागवत निवडून काढिलें. भागवत ऐकून आतां लोक आपलीं कामनीक व्रतेंसुद्धां कोणी आचरीतनासे झाले. कसें, विश्वेश्वर भटजी ?

**पिऱ्या**–( वाळूंत गडबडा लोळतो. ) अग बया बया, मेलों मेलों मेलों !!!

**विश्वेश्वरभटजी**–अहो काय सांगावें, आमचे यजमानाचे जिवावर आमचा प्रपंच चांगला थाटानें चालत होता. पण आतां आमचे सगळे यजमान त्या भागवताचे नादीं लागून कांहीं व्रतवैकल्यें करीतनासे झाले. काय करावें हो सोमनाथशास्त्री !

**पिऱ्या**– ( वाळूंत गडबडा लोळतो. ) अग बया बया, मेलों मेलों मेलों !!!

**सोमनाथशास्त्री**–भागवत ज्ञानेश्वरी, ज्ञानेश्वरी आणि भागवत याशिवाय त्याला ग्रंथ नाहीं. ज्याच्या त्याच्या तोंडीं तरी हेंचः ज्ञानेश्वरी आणि भागवत, भागवत आणि ज्ञानेश्वरी. याचें पुराण ऐकून ऐकून सगळे लोक ईश्वरच होऊन जातील. मग बिचारा खरा ईश्वर काय करील कोण जाणे. याचीच मला काळजी वाटावयास लागली आहे. कसें त्रिविक्रमपंडित ?

**पिऱ्या**– ( वाळूंत गडबडा लोळतो. ) अग बया बया, मेलों मेलों मेलों !!!

**त्रिविक्रमपंडित**–अहो, आपण पंडित व वैदिक, शास्त्री, पुराणीक, धर्माधिकारी सर्वांची त्यानें अप्रतिष्ठा मांडली आहे. आह्मांला कोणी पुसत नाहीं प्राकृत विद्येचें अध्ययन असून घरीं धनधान्य विपूल येतें. द्रव्य पुष्कळ येतें. ह्मणे अयाचितवृत्ति, रोज शेंकडों ब्राह्मण जेवतात ! पण कांहीं कमी नाहीं. नुसता लाट मारतो. तो श्रीखंड्या ब्राह्मण पाणी आणण्याला, स्वयंपाक करण्याला, वाढण्याला, हरएक काम करण्याला, खुप खंबीर आणि बिनपगारी मिळाला आहे. कसें धरणीधरशास्त्री ?

**पिऱ्या**– ( वाळूंत गडबडा लोळतो. ) अग बया बया, मेलों मेलों मेलों ! ! !

**धरणीधरशास्त्री**–अहो, आह्मीं सर्व शास्त्रांत निपुण पण आह्मांला आतां पोटाकरितां लोकांची खुशामत करावी लागते. लोक ह्मणतात, एकनाथ विष्णूचा अवतार ! पण मी ह्मणतों आमचा दावेदार ! सगळे आमचे यजमान जे आहेत ते प्राकृत ग्रंथ वाचावयास लागले आणि ऐकावयाला लागले. आतां काय करावें तरी काय ? अहो, यजमानाचें असो, पण आह्मां भिक्षुकांच्या बायका त्या देखील ह्मणावयाला लागल्या कीं, संसार मिथ्या भ्रम आहे. त्याच्या घरीं जाऊन त्या नाथाच्या पायां पडतात. द्वापारयुगांत जसें श्रीकृष्णाकरितां ऋषिपत्न्यांनीं नवऱ्याला चोरून अन्न नेलें, तसें आमच्या बायका आह्मांला चोरून एकनाथाच्या कीर्तनाला जातात. ( रागाऊन ) हा आमची मिळकत सर्व प्रकारें बुडविण्याला कारणीभूत झाला आहे. याच्या संगतीनें सगळें पैठण सिद्धांतज्ञानी बनत चाललें आहे.

**धर्माधिकारी**–राण्या महार ह्मणजे सगळ्या गांवचा चोर. त्याला यानें आश्रय दिला. आश्रय दिला इतकेंच नाहीं, पण मागें झाले त्याला पुष्कळ दिवस–आपल्या बायकोच्या हातानें कणेरी करून त्याला पाजिली. एकनाथानें आपल्या हातानें त्याला खावयास घातली. अशी पक्की बातमी मला लागली होती. तो महार आतां मोठा साधु बनला आहे. नेहमीं विठ्ठलनाम तोंडांतून काढीत असतो.

एकनाथ हा धर्मबाह्य कामें फार करितो, ह्याबद्दल मी त्याला प्रायश्चित्त देणार आहें.

**पिऱ्या**—( वाळूंत गडबडा लोळतो. ) अग बया बया, मेलों मेलों मेलों ! ! !

**विश्वेश्वरभटजी**—हेंच तुह्मी चुकतां. त्याला प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घेण्याचें कारणच नाहीं. कसें म्हणाल तर केलेल्या कृतीबद्दल त्याच्या मनाला काडीभरसुद्धां पश्चात्ताप नाहीं. पुनः असें करणार नाहीं, असेंही तो म्हणत नाहीं. मग तुमच्या प्रायश्चित्ताचा उपयोग काय ?

**पिऱ्या**—( वाळूंत गडबडा लोळतो. ) अग बया बया, मेलों मेलों मेलों ! ! !

**सोमनाथ०**—हें कोणाचें कारटें आहे हो ? मघापासून उगीच शंख करीत आहे. बरें तें असो. तुम्हांला समजत नाहीं. आज कसा झाला तरी त्याचा चालता काळ आहे. आपणांस नेहमीं भोजनास जावयास सांपडतें. त्याला जर कायमचा बहिष्कार घातला, तर त्याच्या घरीं ब्राह्मणांस व ब्राह्मणेतरांस नित्य मुक्तद्वार आहे, त्याची वाट काय ? आपल्याला तरी रोज त्याच्या घरीं घृतकुल्या मधुकुल्या यथेच्छ हात मारण्यास सांपडणार कसा ! याचा विचार केला पाहिजे.

**पिऱ्या**—( वाळूंत तडफडतो. ) अग बया बया बया, मेलों मेलों मेलों ! ! !

**त्रिविक्रम०**—त्या दिवशीं प्रत्यक्ष त्याचा आजोबा चक्रपाणि याचें श्राद्ध. आह्मांला क्षण दिलेला. पण नदीवरून नित्याचें आन्हिक उरकून येण्यास आम्हांस किंचित् उशीर मात्र लागला, तों स्वारीनें तीन फकीरांस आमच्या अगोदर भोजनास घालून स्वारी मोकळी झाली. आजाआजी वारलीं त्याबद्दल बिचाऱ्याला काडींचेंसुद्धां दुःख नाहीं ! म्हणतो जन्म आणि मृत्यु आहेत कोठें ? बरोबरच आहे. आजोबाचें आणि यांचें मोठें सूतच होतें कीं नाहीं ! बाळ्या पहिल्यापासून नशीबाचा धड ! जन्माला आल्याबरोबर आईबापाचा

निकाल केला. म्हातारपणीं आजाआजीला सोडून गेला कोणीकडे उधळून. आतां पुनः आला तों आजाआजी गटकाऊन टाकलीं. तेच आतां फकीर होऊन आले असतील, म्हणून ब्राम्हणांच्या अगोदर जें आहे तें त्यांना भोजनास घातलें. दुसरें काय ? म्हणतो काय कीं, सगळें जग जनार्दनस्वरूपीच आहे. क्षुधिताला अन्नदान करण्यासारखें महाव्रत नाहीं. त्यांच्या कुडींत तरी परमेश्वराचा अंश आहेच. तो भुकेनें व्याकुळ झाला होता. तुमचा अजून व्याकुळ झालेला नाहीं. असलें फाजीलपणाचें आणखी चावटपणाचें भाषण ऐकून माझी तळव्याची आग मस्तकाला गेली होती. (रागानें) आणखी ते फकीर आमच्या देखत विडे चावीत बाहेर पडले. भ्रष्टाकार! वर्णसंकर!। (राण्या महार व एकनाथ बोलत बोलत प्रवेश करितात.)

**पिऱ्या**—अग बया बया, मेलों मेलों मेलों !

**एकनाथ**—अरेरे ! हें कोणाचें पोर तापलेल्या वाळूंत व्याकुळ होऊन रडत आहे ? या ब्राम्हणमंडळींना हें दिसलें नाहीं काय ? किंवा याचें रडें त्यांच्या कानांवरच गेलें नाहीं काय ? सर्व जग जर जनार्दनस्वरूपी आहे तर हें पोर कोणाचें का असेना, याला आपण कडेवर घ्यावें. ( मुलाला कडेवर घेऊन समजावितो. त्याची लाळ पुसतो. )उगा बाळ, रडूं नको अं ! राण्या, या मुलाला खाऊ आण जा. ( पैसे देतो. ) रडूं नको बाळ, तुला तुझ्या आईकडेस पावतें करतों. तुझें नांव काय बेटा ?

**पिऱ्या**—पिऱ्या. माझी आई म्हंगाली, हत बैस मी नाथाच्या पाया पडूनशान येते. मंग ती गेली कुनीकडे निघूनशान आन मी हत रडत बसलोया.

**एकनाथ**—तुझ्या बापाचें नांव कायरे ?

**पिऱ्या**—बाबा. ( राण्या प्रवेश करितो. )

**राण्या**—महाराज, ते महाराच मुल है. त्याच्या बाच नांव गेननाईक आळसकर. आता त्याला त्याच्या आईकडे पोहचते करतो. ( एकनाथ मुलाच्या तोंडांत पेढा घालतो. त्याचें तोंड कुरवाळतो. राण्याजवळ देतो.) महाराज, भगवंतांनीं जव्हा इस्वरूप अर्जुनाला दावल, तव्हा बामन कुठ होत, आन माझ्यासारखा महार कुठ होता ?

**एकनाथ**—महार आणखी ब्राम्हण हे उभयतां कृष्णस्वरूपांत समरस झाले होते, म्हणजे एकत्रच होते.

**राण्या**—अस जर होत तर मी म्हनतो मी आन आपुन जर एकच होतो, तर आज माझ्या गरीबाच्या झोपडीपोत चालुनशान माझ्या बायकोच्या हातची वाईच भाजीभाकर खानात ? माझ्या बायकोन लयी छंद घेतला आहे तुमच्या जेवन्याचा म्हनुनशान म्हनतो.

**एकनाथ**—श्रीजनार्दनकृपेंकरून तुझे मनोरथ पूर्ण होतील. देवाचे घरीं भक्ति पाहिजे, ती तुझ्या अंगीं आहे. देवाच्या घरीं ब्राम्हण आणि अब्राम्हण असा भेदाभेद नाहीं. भक्त आणि अभक्त असा मात्र आहे. ब्राम्हण वेदशास्त्रांत निपुण आहे पण हरिभक्तीला विन्मुख आहे; आणखी जातीचा अंत्यज म्हणजे महार पण खरा भक्त आहे, तर तो त्याच्याहून श्रेष्ठ आहे. यास आधार भागवत ग्रंथीं असा आहे कीं, विप्राद्विषड्गुणयुतादरविंदनाभपादारविंदविमुखा श्वपचं वरिष्ठं. ( एकनाथास धर्माधिकारी हाताला धरून ओढतात. राण्या जातो. )

**धर्माधिकारी**--अरे मूर्खा, भागवत, नव्हे केवळ श्रुति, त्यांतला श्लोक तूं महारास सांगतोस ! जें ऐकण्याचा महारास अधिकार नाहीं तें सिद्धांतज्ञान अनामिकास सांगतोस ! अनुचित कर्म करितोस ! तूं आहेस तरी कोण ?

**विश्वेश्वर०**-कुत्र्यापुढें क्षिप्रा नेऊन ठेवितोस ! गाढवाला उंचीं अत्तरें फासतोस ! तूं आहेस तरी कोण ?

**सोमनाथ०**-तुझ्या टाळक्यावर महा दोषाचें खापर फुटलें आहे. ब्राम्हणांला श्राद्धाचे क्षण देतोस, आणखी फकीरांना गिळायला घालतोस ! तूं आहेस तरी कोण ?

**त्रिविक्रम०**-भागवताचें पुस्तक प्राकृतांत करण्याचा अधिकार तुला काय ? तूं कोण आहेस ?

**धरणीधर०**-महाराचें आमंत्रण घेतोस ! तूं कोण आहेस ?

**एकनाथ**--मी होय ? कोण आहे तें लक्ष देऊन ऐका.

अभंग.

नाहं जोगी, नाहं भोगी ॥ नाहं दिगंबर, ना सन्यासी ॥ १ ॥
नाहं कर्मी, नाहं धर्मी ॥ नाहं उदासी, ना घरवासी बाबा ॥२॥

अचिंत्यरे भाई, अचिंत्यरे भाई ॥ ब्रह्मस्फुरे, तेचि माया॥३॥
नाम नही तहा, रूप न रेखा ॥ सोभयी हमारी काया, बाबा॥४॥
नाहं वेदा, नाहं सिद्धः ॥ नाहं पंडित, ग्यानी बाबा ॥ ५ ॥
नाहं जपी, नाहं तपी ॥ नाहं देह ध्यानी बाबा ॥ ६ ॥
नाहं पुरुषः, नाहं नारी ॥ नाहं देही, ना विदेही ॥ ७ ॥
नाहं पिंडा, नाहं ब्रह्मांडा॥ नाहं मौनी, नाहं विचारी बाबा ८
नाहं सद्रुप, नाहं चिद्रुप ॥ नाहं आनंद, नाहं भोग ॥ ९ ॥
जनार्दनकापूता, अभिनव एका ॥ निर्विकल्प, सर्वांगीं बाबा १०

(हात जोडून नम्रतेनें) राण्या महार मोठा वैष्णव भक्त आहे. हरिभजनीं रत झाला आहे. षड्रिपु जिंकलेले आहेत. मग त्याला अंत्यज कसा ह्मणावा ? अनामिकाचें एक सुद्धां लक्षण त्याच्या अंगीं दिसत नाहीं. जेवढे भागवत धर्म आहेत ते सर्व त्याच्या अंगीं बाणलेले दिसत आहेत. चित्ताची तळमळ जाऊन मनाला शांतता आलेली आहे. त्यानें आपल्या भक्तीनें पांडुरंग आपलासा केलेला आहे. काम-क्रोध-लोभ-माया हीं त्याच्या शरीराला स्पर्श करीत नाहींत. त्याची निष्ठा पाहून किंचित् श्लोकाचें अर्ध बोललों त्याची मला क्षमा करा. आपण मला जनार्दनस्वरूपी आहांत. आपल्या वचनमात्रें-करून स्वाहा स्वधा जेव्हां होतात, तेव्हां इंद्रादि देवता तृप्त होतात. आपल्या भाषणेंकरून पाषाणमूर्तींत देव प्रकट होतो. भगवान् आपला लत्ताप्रहर श्रीवत्सभूषण ह्मणून आपल्या हृदयीं धारण करितात. आपण प्रतिसृष्टि निर्माण करणारे, समुद्राचे घोट भरणारे, भगवान् सूर्यनारायणाचें तपन करण्याचें काम आपल्या छाटीकडून करणारे, शेषाचें पृथ्वी उचलण्याचें काम आपल्या दंडाकडून घेणारे, असे आपण प्रत्यक्ष धरामर आहांत. आपल्यास हवें तर आपण खुशाल वाटेल तें प्रायश्चित्त या देहास द्या. पण मला प्रायश्चित्ताची जरूरी मुळींच दिसत नाहीं. आपण ब्राह्मण, आपल्याला क्रोध नसावा.

**धर्माधिकारी**—फाजील, वाचाळ, कांहीं तरी लाघवी भाषण करतो. (इतर ब्राह्मणांस एका बाजूस काढून) आतां आपण याच्या पाळतीवर राहून हा त्या राण्या महाराचे घरीं भोजन करीत असतां

याला पकडूं. नंतर याला कायमचा बहिष्कार घालूं. आपल्यापैकीं कांहींजणांनीं याच्या घरीं राहावें. कांहींजणांनीं त्या महाराचे घराचे आजूबाजूला लपून बसावें. चला आतां मुकाट्यानें. ( ब्राह्मण जातात. एक गलित कुष्ट भरलेला ब्राह्मण प्रवेश करितो. )

**ब्राह्मण**–( एकनाथाच्या पायां पडून ) महाराज, मी फार अनाथ आहें. अपराधी आहें. कर्महीन आहें. मतिमंद आहें. परद्रव्य–परस्त्री अभिलाष करून संसारांत अनेक दुःखें भोगिलीं. अनेक घोर कर्में–ज्यांचा तोंडावाटे उच्चार सुद्धां करूं नये अशीं माझ्या हातून घडलीं. या पापानें मी गलित कुष्टानें व्याधिग्रस्त झालों आहें. सर्वांगाची दुर्गंधी येते. कानानें ऐकूं येत नाहीं. डोळ्यांनीं धड दिसत नाहीं. बारा वर्षें त्र्यंबकेश्वरीं अनुष्ठानें केलीं. कंदमुळें भक्षण केलीं. शेवटीं श्रींनें दृष्टांत दिला कीं, प्रतिष्ठानीं श्री एकनाथमहाराज मोठा वैष्णव भक्त आहे. ब्राह्मणाची सेवा करितो, सर्व भूतीं समभाव धरितो, त्याच्या पदरीं एक मोठें पुण्य जोडलेलें आहे. तापलेल्या नदीच्या वाळूंत एक महाराचें पोर भाजून तडफडत असतां इतर ब्राह्मणांला त्याची दया आली नाहीं, आपल्या पोटांत दया उत्पन्न होऊन आपण मोठ्या कळवळ्यानें तें बालक त्याच्या आईकडे पोंचतें केलें. हें महापुण्य आपण जोडिलें आहे. त्याचें उदक जर आपण माझ्या हातावर घातलें, तर माझें कुष्ट ताबडतोब जाईल.

**एकनाथ**–( हंसून ) मला पामराला एवढा मान कशाला पाहिजे ? आपण रोगानें फार पीडित आहांत. आजन्मपावेतों जें पुण्य या जीवाकडून झालें असेल, तें सर्व पाहिजे असल्यास आपल्यास अर्पण करितों.

**ब्राह्मण**–महाराज, एवढें पुण्य मला घेण्याचा अधिकार नाहीं. मला पचणार नाहीं. श्री त्र्यंबकेश्वरानें जी मला आज्ञा केली आहे तेवढेंच मला द्यावें.

**एकनाथ**–( गंगेंत बुडी मारून हातांत पाणी घेऊन ) माझ्या हातून महाराचें पोर त्याच्या मातेकडे पोंहचतें केल्याचें पुण्य जर घडलें असेल, तर मी तें मोठ्या आनंदानें या ब्राह्मणाला अर्पण करितों.

त्या पुंण्याच्या जोरानें याचा हा महारोग नाहींसा होवो. (पाणी त्याच्या हातावर सोडतो.)

**ब्राह्मण**–(मोठ्या आनंदानें) महाराज माझ्या शरीरांत ज्या वेदना होत होत्या, त्या आतां एकदम नष्ट झाल्या. मला मोठें समाधान वाटत आहे. माझ्या हातापायांचीं बोटें आतां ताठ होतात. मला चांगलें दिसूं लागलें. ऐकूं येऊं लागलें. माझ्या तोंडास चव आली. आतां मला पांच कोस चालण्याची शक्ति आली. माझी प्रकृती उत्तम झाली. मी आपला काय उतराई होऊं?

**एकनाथ**–पांडुरंगाचें नामस्मरण करीत जा, ह्मणजे आह्मांस सगळें पोहोंचलें. ज्याला कथा ऐकवत नाहीं किंवा ज्याला स्वतःही करतां येत नाहीं, त्यांनीं नेहमीं नामस्मरण करावें. राम, कृष्ण, गोविंद, विठ्ठल अशी नाममाला जर जपली तर सर्व तीर्थें त्याला लोटांगणें घालीत येतील. तेहतीस कोटी देव त्याच्या पायाचे दास होतील. त्याचे चरणरज आपल्या कपाळीं लागावे ह्मणून यम लाळ घोटील. शंख, चक्र, गदा, पद्म हस्तांत धारण करून भगवान् त्याच्या दारांत, "मला कांहीं तरी काम सांगेल काय?" अशी वाट पाहत उभा राहील. जगांत असें पापच नाहीं कीं, ज्याची शक्ति नामापुढें टिकाव धरील.

## अभंग.

**त्रिवेणी संगमीं नाना तीर्थें भ्रमी ॥ चित्त नाहीं नामीं तरि तें व्यर्थ ॥ १ ॥ नामासि विन्मुख तो नर पापीया ॥ हरिविण धांवया नपवे कोण्ही ॥ २ ॥ पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मीक ॥ नामें तिन्ही लोक उद्धरती ॥ ३ ॥ ज्ञानदेव ह्मणे नाम जपे हरीचें ॥ परंपरा त्याचें कुळ शुद्ध ॥ ४ ॥**

## अभंग.

**हरि बोला देतां हरि बोला घेतां ॥ हसतां खेळतां हरि बोला ॥ १ ॥ हरि बोला गातां हरि बोला खातां ॥ सर्व कार्य करितां हरि बोला ॥ २ ॥ हरि बोला एकांतीं हरि बोला लोकांतीं ॥ देहत्यागा–अंतीं हरि बोला ॥ ३ ॥ हरि बोला भां-**

डतां हरि बोला कांडतां ॥ उठतां बैसतां हरि बोला ॥ ४ ॥ हरि बोला जनीं हरि बोला विजनीं ॥ एका जनार्दनीं हरि बोला ॥ ५ ॥

( ब्राम्हण नमस्कार करून जातो. श्रीखंड्या खडावा, धौतवस्त्रें व कॉवड घेऊन प्रवेश करितो. )

**श्रीखंड्या**—आज महाराजांच्या मनांत कांहीं तरी विचार घोळतो आहे.

**एकनाथ**—तूं हें कशावरून जाणिलेंस ? तूं तरी मोठा धूर्तच आहेस. मला त्या राण्यामहाराच्या घरीं आज भोजनास जावयाचें आहे, तेव्हां माझ्या मनांत विचार चालला आहे कीं, घरीं जाऊन नंतर जावें, किंवा असेंच परभारें त्याच्या घरीं जाऊन द्वादशी सोडावी?

**श्रीखंड्या**—आपण आपल्या घरीं जावें. राण्याचा भाव पांडुरंगाच्याठायीं जर निर्मळ असला, तर तो परभारें आपल्या रूपानें जाईल. महाराच्या घरीं भोजन करण्याची त्याला संवय आहे. चोखामेळ्याच्या घरीं दहींभात खाण्याची त्याला संवय आहे. नुसतें आपल्या मनांत असें आलें कीं, पांडुरंगानें आपल्या रूपानें जावें कीं, तो गेलाच म्हणून समजा. आज आपण काय मौज होते ती बघूं. आतां आपण आपल्या घरींच जाऊं. आलाच आपल्याला महार बोलावणें, तर खुशाल जावें. न आला तर पांडुरंगानें खटल्याचें निवारण परभारें केलें, आपल्यास तोशीस लागूं दिली नाहीं, असें समजावें.

**एकनाथ**—बरें तर तूं ह्मणतोस तसेंच करावयाचें.

**श्रीखंड्या**—आपल्यास संध्या करावयाची आहेना !

### पद.

**एकनाथः**—

झालि संध्या, संदेह माझा गेला ॥ आत्माराम
हृदयीं सेजे आला ॥ ध्रु० ॥
गुरुकृपा निर्मळ भागीरथी ॥ शांति क्षमा
यमुना सरस्वती ॥

असिपदीं एकत्र जेथें होती ॥ स्वानुभवें ज्ञान
हेचि गुप्त स्थिति ॥ झालि० ॥ १ ॥
सद्बुद्धीचें घातलें शुद्धासन ॥ वरी दया
सद्गुरूची कृपा पूर्ण ॥
शम दम आंगीं विभुती चर्चिले जाण ॥ मुखीं
उच्चारी केशव नारायण ॥ झालि० ॥ २ ॥
बोध पुत्र निर्माण झाला जेव्हां ॥ ममता म्हातारी
मरोन गेलि तेव्हां ॥
भक्ति बहिण धांवोनी आली गांवा ॥ आतां
संध्या करूं मी कैंची केव्हां ॥ झालि० ॥ ३ ॥
सहज कर्मे तीं जालीं कृष्णार्पण ॥ ऐसें ऐकतां
नीवती साधुजन ॥
जन नव्हे अवघाचि जनार्दन ॥ एका जनार्दनीं
लाधली हेचि खूण ॥ झालि० ॥ ४ ॥

( खडावा पायांत घालतो. धौतवस्त्रें परिधान करितो.) श्रीखंड्या, अरे अशा तापलेल्या वाळूंत तूं कावड घेऊन शंभर वेळां येतोस, तुझे पाय कसेरे पोळत नाहींत ! हें बघ, आजपासून यावेळीं तूं पाण्याला येत जाऊं नको. मला वाटतें रोज पांचशें घागरी पाणी पुरत नसेल. कांहीं एक वेतन न घेतां इतके जिवापाड कष्ट माझ्या घरीं करितोस, हें पाहून माझा जीव तिळतिळ तुटतो.

**श्रीखंड्या**—महाराज, आपण यत्किंचित् श्रमी होऊं नका. माझे पाय मुळींच पोळत नाहींत. वाऱ्याच्या योगानें जसा गलचत च्या अंगीं वेग उत्पन्न होतो, तसा मी जों जों अधिक अधिक-काम करतों, तों तों मला जास्त करण्याचें स्फुरण येतें. मी कधीं थकत नाहीं आपण निष्काळजी असावें.

( एक शिद्दी प्रवेश करितो. तो एकनाथाच्या अंगावर थुंकतो.)

**श्रीखंड्या**--महाराज, आपल्यास विटाळ झाला. हा शिद्दी फार फाजील मनुष्य दिसतो. आपली आज्ञा असल्यास मी याची गुरमी जिरवून टाकतों. टाकूं का बत्तिशी पाडून, म्हणजे पुनः तंबाखू खाऊन पिचकारीच मारतां येणार नाहीं !

**एकनाथ**—छे, छे, असें अविचारीपणाचें कृत्य आपण करूं नये. कदाचित् त्यानें जाणून बुजून असें काम केलें नसेल. न जाणून केलेल्या कामाबद्दल त्याला आपण दोषी ठरवूं नये. मनोनिग्रह करण्याची ही संधि परमेश्वरानें आपल्यास आणून दिली आहे. अशी संधि पुनः येणार नाहीं.

**श्रीखंड्या**—आपल्या अंगीं पृथ्वीप्रमाणें क्षमा पूर्ण बाणलेली आहे. तिच्यावर कितीएक मळमूत्र टाकितात, कितीएक तिचें पूजन करितात, परंतु ती कोणावर लोभ करीत नाहीं किंवा क्षोभही करीत नाहीं. याप्रमाणें आपली चित्तवृत्ति आहे. चला आपण गंगेवर पुनः स्नानास जाऊं. ( उभयतां जातात. )

**शिद्दी**--ये बम्मन् न्हायात् हय्. खाली तमासा दिखलाता हय्. सब् रियासत् बादशहाकी हम् बादशहाके गुलाम हय्. ये हमसे जबरदस्त कैसा बनाता हय् देखता हूं. कैसा सो दफे नद्दीपर जाकर नाहता हय् सो मुजे देखना हय् ( एकनाथ व श्रीखंड्या प्रवेश करितात. एकनाथाच्या अंगावर शिद्दी पुनः थुंकतो. )

**श्रीखंड्या**-वशिष्ठानें अत्यंत क्षमा धारण केली, त्यामुळें त्याचे शंभर पुत्र विश्वामित्रानें ठार मारिले. जमदग्नीनें क्रोधाचा त्याग केल्याबरोबर सहस्रार्जुनानें त्याचा सहज वध केला. तशी आपली स्थिति होणार आहे. आपण मला आज्ञा करा कीं, मी याला खूप मुष्टिमोदक खावयाला देतों.

**एकनाथ**-त्याला आपल्या कृतीचा पश्चाताप आपोआप वाटावा असा उपाय योजण्याचें सोडून आपण त्याला शिक्षा करावी हें काम बरोबर नाहीं. त्याच्या प्रत्येक थुंकण्यानें मला अनायासें गंगेचें स्नान होत आहे. हे त्याचे उपकार माझ्या हातून कसे फिटतील याची मला काळजी आहे. चला आपण गंगेवर पुनः स्नानास जाऊं. ( उभयतां जातात. )

**शिद्दी**-दो दफे मय् उसके तनूपर थूका, लेकिन ये बिलकूल गरम नहि हुवा. और एक दफे वैसाहि करेंगे. क्या नतीजा होता हय्, सो देख लेंगे. मय् अब् उसे कुच् बात् करेगा. ( एकनाथ व श्रीखंड्या प्रवेश करितात. पूर्वीप्रमाणें शिद्दी थुंकतो. ) आपकू कुच् गुस्सा

कसा नहि आता ! तीन दफे आपके तनपर मय्‌ थूका, लेकिन आप मानिंद्‌ दिवारके खडे रहेथे, बडी ताजूबकी बात्‌.

**श्रीखंड्या**–माझ्यानें आतां संताप सहन होत नाहीं. मी या दुष्ट मनुष्याला पायाखालीं तुडवणार. राखुंडी किती फुंकली तरी जसा दिवा लागत नाहीं, तसा मीं यांना कितीही संताप आणण्याचा प्रयत्न केला, तरी तो व्यर्थच जातो. माझें करणें वाऱ्यावर तरवारीचा आघात केल्याप्रमाणें किंवा पाण्यावर काठी मारल्याप्रमाणें आहे.

**एकनाथ**–त्याचे माझ्यावर असंख्य उपकार झाले आहेत. मला गंगेचीं किती तरी स्नानें त्याच्या कृपेनें घडलीं. आपण माझ्या घरीं भोजनास चलावें. नाहीं तर श्रीखंड्या असें कर कीं यांना येथें आपल्या घरून दोन माणसांचें अन्न वाढून आणून दे, म्हणजे यांची क्षुधा शांत होऊन अन्नाऐवजीं तंबाखू फाकणार नाहींत.

**शिद्दी**–तोबा तकसीर मुजे बहुत आपसोस मालूम होता. मय्‌ आपने दिलकू रंज खीचतां हूं मुजे माफ हो. आप्‌ बडे साई हो पीरोमुरशद्‌ हो. ( सलाम करून ) मुजे आप्‌ इतना कहिना के जिसे हम्‌ अल्ला, खुदा और महमद्‌ कहते उस्से आप्‌ क्या कहते. और ये दोनो देव येक हय्‌ या जुदे.

**एकनाथ**–( त्याचा हात धरून )

## अभंग.

ख्याल किया मछलीवाले वह्ले ॥ धुंडी दर्याव गोविंद महंमद ॥ ध्रु० ॥ शंकासुरदैत्य मारि या वह्ले ॥ लायो चारी बेद महंमद ॥ १ ॥ खेल खेलावे आत्रे गोविंद महंमद ॥ गोविंद महंमद ॥ २ ॥ सबदेव ऱ्यानें नरसिंह बडा या वह्ले ॥ भेदा मृगजस्तंभ महंमद ॥ ३ ॥ हिरण्यकश्यप दैत्य मारिया वह्ले ॥ रखा भक्त प्रल्हाद महंमद ॥ ४ ॥ बळिराम सत्वा आगळ वह्ले ॥ उसे दिया पाताळ राज्य महंमद ॥ ५ ॥ खुजी सुरत ठेंगणी वह्ले ॥ फिरे फकीरी हाल महंमद ॥ ६ ॥ परशुराम माको मारी या वह्ले ॥ फत्ते किया बापका बोल महंमद ॥ ७ ॥ दशरथ का रामराना वह्ले ॥ राज्य दिया बिभीखन-

कु वल्ले महंमद ॥ ८ ॥ नंदजीके किसन सांवळ वल्ले ॥ खेळे जमुनातीर महंमद ॥ ९ ॥ बौध्यसुरत लिया है खानी वल्ले ॥ पानी फत्तर हुवे महंमद ॥ १० ॥ मेरा आल्ला घोडा चढीया वल्ले ॥ उसे कहे कलंकी गोविंद महंमद ॥ ११ ॥ एका जनार्दनीं येंव कर बोले ॥ तेरे दिदारकी भक्त भजे महंमद ॥१२॥ गोविंद महंमद ॥

( सर्व पडद्यांत निघून जातात.)

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**–राण्यामहाराची झोपडी.

---

( राण्यामहार व त्याची बायको जानकाई एकनाथाची भोजनाकरितां वाट पहात बसलीं आहेत. )

**जानकाई**–मंग आपल करन कायी कोनाबि बामनाला पसंत नई ह्मनायच. आपल नशीब अन् दुसर काय? आपुन जर बामन असतो, तर एकनाथ महाराज आपल्या घरी जेवया आल असत. देवान आह्माला महाराचा जलम दिला, आता ते कसल आपल्या घरी येतात. तुह्मी मघा बोलल्यापुन आज माझ्या जिवाला लय हुरहुर लागली हय. इकती तयारी करूनशान देवान आपला हिरमोड केला!

**राण्या**–मी तुझा निरोप त्याना सांगितल्याबरोबर व्हय म्हंगाल. पन समद्या बामनानी तेनला अस कावकाव केल–तेनला अशी जरब दिली–अन् मला वाटत मारत्याल बी–आपल्या पायी त्याना ईनाकारन तोशीस. काय कराव समदी तयारी करूनशान तर बसलोया.

**जानकाई**–मंग तुह्मी काय नेहमीं ह्मनत असता कीं बोलल्याप्रमान जो चालतो हंग त्योच खरा साधू. मंग ते जर व्हय ह्मनाल तर मंग आता का नाही येत? बामन ते बामन, आन महार ते महार. इकत्या पोथ्या पुरान तुह्मी ऐकता, पन महाराच्या घरी बामन जेवला, अस कुठ तरी ऐकल आहे का? आपल्या घरी पंढरीचा विठोबा जेवल; पन बामन कंधी कंधी जेवनार नाहीं. तुम्हाला भरम हाय भरम.

**राण्या**–नाथमहाराजांनीं सांगितल कीं विठोबाला समद्या जाती सारख्याच हयती. त्येला भक्ति पाहिजे. जाती नको. मानसाच्या वागनुकीवरून जाती पडल्या. आपुन कांहीं मास कधी खात नाहीं. एकादशीला कांहीं खात नाहीं. एकनाथासंग पंढरीची वारी करतो. रात्रंदीस ते जस सांगतात तस करतो. मंग इकत करून जर ते आता बारस सोडाया आमच्या खोपटात येनार नाहींत, तर मंग हा परान असला काय आन नसला काय सारखाच. याच्यापुन हा परान या देहीतून गेला तरी बी हरकत नाहीं.

**जानकाई**–अन मंग मी तरी तेच ह्मनते कीं समद्या लोकात यवढ तर व्हईल कीं महाराच एक जोडप एकनाथ त्येंच्या घरी जेवाया गेला नाहीं म्हनूनशान आपल्या गळ्याला फास लावूनशान मेल.

**राण्या**–तूं कशाला मरतेस ? माझ्या माग तूं रहा. चांगलासा दादला पाहून म्होतूर लाव. चांगल दागीन मिळत्याल. चार पोर होत्याल. (मुरका मारते.) देखनी बी चटकदार हैस. मला मातर आता जीव ठेवायचा नाहीं. माझ्या पायी तूं कशाला मरतेस ?

**जानकाई**–तुमच्या माग रांडाव होऊनशान मला काय करायच हाय ? जलमभर तुमच्या संगतीन मीठभाकर खाऊनशान आन धोंगडा नेसूनशान दीस काढल. आतां म्हातारपनी ढोबळा मनी म्होतुर लावून चट्टी पट्टी करून त्याला भुलवूनशान काय मिळनार हाय ? सात सात जलम मी तुमची बाईल होईन. तुमच्या संग मी मेले तर आपल्याला संगच जाळतील. आन मंग देव मला तुमचीच अस्तुरी करील. मी तुमच्या संगच मरनार.

**राण्या**–आन तर दोन चराट, घेऊ गळ्याला फास लावूनशान, आन देऊ परान. कालपुन एकादशीमुळ पोटामंधी आनबी नयी, तवा परान जान्यालाबी कांहीं उशीर लागनार नाहीं. जे बया आई पंढरपुरचे माझे महालक्ष्मी विठाबाई आई, आता तुझ दार उघड. या राण्या महाराला आन त्याच्या आवाला घे पोटात.

**जानकाई**–(अभंगाच्या चालीवर.) दार उघड, बया दार उघड. बया नउखंड पृथ्वी तुझी चोळी, सात पाताळा पाऊलें गेलीं,

एकवीस स्वर्ग मुकूट झळाळी, बया दार उघड. बया दार उघड. ( उभयतां फांस लावून घेतात. )

**राण्या**–( अभंगाच्या चालीवर. ) अलक्षपुर भवानी दार उघड बया, माहूर लक्ष्मी दार उघड बया, कोल्हापुर लक्ष्मी दार उघड बया, तेलंग लक्ष्मी दार उघड बया, तुळजापुर लक्ष्मी दार उघड बया, पाताळ लक्ष्मी दार उघड बया, कानाड लक्ष्मी दार उघड बया, आठ भुजा लक्ष्मी दार उघड बया, पंढरपुरनिवासिनी दार उघड बया, दार उघड बया, दार उघड बया, दार उघड बया, दार उघड बया.

**जानकाई**–( अभंगाच्या चालीवर, ) चारी पुरषार्थ गोंधळी, सनकादीक तेथें संबळी, तेहतीस कोटी भुतावळी, दिवट्या पाजळूनी तिष्ठती. बया दार उघड. वेताळ फेताळ खंकाळ, मारको मेसको भैराळ, जानाई जोखाई क्षेत्रपाळ, म्हैसासुर दैत्य माजला सबळ. अबबब, पीडा केली अहो बया दार उघड.

**राण्या**––( अभंगाच्या चालीवर ) मच्छाईबया दार उघड, कच्छाईबया दार उघड, वऱ्हाईबया दार उघड, नरसाईबया दार उघड, वामनाईबया दार उघड, परसाईबया दार उघड, रामाईबया दार उघड, कृष्णाईबया दार उघड, बोधाईबया दार उघड, कलंकाईबया दार उघड. ( दोघे एकदम ओरडून बोलतात). दार उघड बया, दार उघड बया, दार उघड बया, दार उघड बया. ( उभयतां जोरानें गळफांस ओढतात. एकनाथ प्रवेश करितो. गळफांस हिसकावून घेऊन दूर फेंकून देतो. )

**एकनाथ**—( अभंगाच्या चालीवर ) दैत्य कुळीं हिरण्यकश्यपु जन्मला, तेणें तुझा भक्त गांजीला, तें न पाहवे तुजला, त्या उग्ररूप धरिलें, बया दार लाव. त्वां क्रोधें स्तंभ फोडून, नारसिंहरूप धरून, दैत्यासी वधून, प्रल्हाद दिवटा रक्षिला, बया दार लाव. तूं वामनरूप धरून, बळीस पाताळीं घालून, शुक्राचा एक नयन फोडिलास, बया दार लाव. परशुरामरूप धरून, सहस्रार्जुनास वधून, मातेचें शीर छेदून क्षत्रियकुळ निवटिलें, बया दार लाव. सीतेचेनी कैवारें, रावण मारिला सहपरिवारें, अठरा पद्में वानरें, गोंधळ मांडिला लंकेशीं, बया

दार लाव. कौरव पांडव मिळाले, कुरुक्षेत्रीं युद्ध मांडिलें, अठरा अक्षौहिणी दिवटे भले, नाचती रणकल्होळीं, बया दार लाव. बौध्यावतार घेऊन, विटे समचरण ठेवून, पुंडलिक दिवटा पाहून, तयाचे द्वारीं गोंधळ मांडिला, बया दार लाव. आणिक दिवटे अपार, निवृत्ति ज्ञानदेव सोपानदेव खेचर, मुक्ताई जनाबाई विठोबा गोरा कुंभार, रोहिदास चोखा सजन नाचती, बया दार लाव. सावता नामा दामा जाण, नारा मादा गोंदा विठा कबीर कमाल पूर्ण, सेना जनमित्र, नरसि ब्राह्मण, दिवटे तिष्ठति, बया दार लाव. एका जनार्दनीं शरण, विठ्ठलनामें अंबा जाण, पुंडलिक दिवटा अवलोकून, निवांतरूपें बैसली. ( राण्या महाराचा हात धरून ) अरे राण्या, तूं मला आज द्वादशी सोडावयाला येथें बोलाविलें होतेंसना ? मग मला भोजनास वाढावयाचें सोडून तुम्ही दोघे गळफांस लावून घेऊन प्राण देण्याचा प्रयत्न काय म्हणून करीत होतां ?

**राण्या**—महाराज, आह्मांला अस वाटल कीं, आपुन आता खास आमच्या गरीबाच्या झोपडीत येत नाही. आपल्याला दुसर बामन येऊ देनार नाहीत. ह्मनूनशान आह्माला अक्षी वाईट वाटून आम्ही दोघवी परान देन्याला तयार झालो. जरास तुह्मी विळान आला असता, तर आमच दादलाबायकोच मुडद्च पाहिल असत.

**एकनाथ**—अरे पण देव असें करणारच नाहीं. असो, ब्राह्मणांचा जाच सोसून तुमच्या घरीं मी भाजीभाकर खाण्याला आलों आहें. ब्राम्हणांचा जाच देवालासुद्धां झाला तेथें आपला पाड काय? तुम्ही आतां मला लौकर वाढा, म्हणजे मी जेऊन जातों.

**जानकाई**—महाराजानी हत पाटावर बसाव. मी समदी तयारी केली हाय. आज मला किती आनंद झालाय म्हनूनशान सांगू ? मला अस वाटल की परत्यक्ष भगवान पांडुरंग जसा चोख्याच्या घरी जेवाया गेला, तसाच माझ्या घरी आला आहे. ( एकनाथ भात कालवून खाऊं लागतो. धर्माधिकारी, त्रिविक्रम शास्त्री प्रवेश करितात. एकनाथ आमटी भुरकतो. )

**धर्माधिकारी**—महाराचें अन्न आवडी आवडीनें भक्षण करीत आहेस याच्यापेक्षां पोटांत शेण का भरीनास ? नीचा, तुला आतां

कायमचा बहिष्कार घालतों. तुझ्या मुलांना महारांच्या मुली बायका कर. तुला ज्या मुली होतील त्या महारांनाच दे. अधमा, चांडाळा, माझ्या अंगाचा संताप–डोम झाला आहे ! ! !

**एकनाथ**—अहाहा । हा भावाचा भात, वैराग्याचें वरान्न आणि हें शांतिब्रम्हाचें तूप यांचा एक घास तर घ्या. धर्माधिकारीबुवा, तुह्मीं पुष्कळ ठिकाणीं मिष्ट मिष्ट पक्वान्नें पोट तट्ट होईपावेतों भरलीं असतील, पण यांतला जर एक घास खाल्ला, तर मला वाटतें तुम्ही माझ्या पत्रावळीवरच झडप घालाल.

**त्रिविक्रम**––चल मूर्खा, वाचाळपंचविशी चालविली आहेस. तुझ्या भाषणांत कांहीं अर्थ आहे काय ? तुला आतां नातवंडें होऊं लागलीं. पांढऱ्यांचे काळे होऊं लागले. आतां दिवसेंदिवस तूं इतका भकला आहेस कीं, आमच्या देखत तूं प्रत्यक्ष राण्याच्या घरीं जेवीत आहेस. तुझ्यापेक्षां तो गावबा शहाणा म्हणावयाचा. तूं कांहीं जातीचा अस्सल ब्राम्हण नाहींस, अशी आमची पक्की खातरी झाली. तूं यावेळीं आमच्या गांवांतून चालता हो. बऱ्या बोलानें चालता हो; नाहीं तर याच पावलीं तुला हातीं धरून बाहेर काढूं. कधीं सोडणार नाहीं. तुझे आईबाप महार होते का ?

**एकनाथ**—कौरवपांडवांच्या युद्धाचे वेळीं प्रथमदर्शनींच अर्जुनाला जबरदस्त संशयरूपी भुतानें झडपलें. तसें या ब्राम्हणांना संशयानें झडपलें आहे. मी ब्राम्हण आणि हा महार हा जब्बर संशय. हें संशयरूपी पिशाच्च फार कठीण ! हें हरिहराला दाद देत नाहीं. चारी वेद, सहा शास्त्रें व अठरा पुराणें यांना पत्ता लागत नाहीं. अठ्याऐंशीं सहस्र ऋषि तपश्चर्या करून थकले; परंतु ज्ञानदेव ह्मणतात, ब्रम्हादिका लक्षा नये, कल्प गेलीं युगायुगें, तो गवळीयाच्या ओसंगें, निघाला गे माय ॥ १ ॥ आतां मी कोण, तें तुम्हांला सागतों:–

## जोहार.

**जोहार मायबाप जोहार ॥ तूं कोण गांवींचा माहार ॥ पुसाल जरी साचार ॥ तरी सादर परिसा की जी मायबाप ॥ १ ॥ माझा निराकार मुळींचा ठिकाणा ॥ भक्तांसाठीं सो-**

ढिला जाणा ॥ वस्ती करूं कायापुरीच्या खुणा ॥ सांगेन की जी मायबाप ॥ २ ॥ आणि जोहार जी मायबाप जोहार ॥ मी पार्वतीचे गळ्यांतील हार ॥ ईश्वराचा पूर्ण भार ॥ त्याचा करितों कारभार ॥ मज नफराचे शिरीं की जी मायबाप ॥ ३ ॥ अखंड द्वारीं पडिला असतों ॥ प्रेमाचा तुकडा मागून खातों ॥ धन्याला दुवा देतों की जी मायबाप ॥ ४ ॥ तुह्मी सुळींचा ठाव सोडूं नका ॥ विसरलयास पावाल धक्का ॥ अंतकाळीं की जी मायबाप ॥५॥ वस्ती करूं आह्मी साचे ॥ समस्त कुळवाडी नगरींचे ॥ पैसे टाका धन्याचे ॥ बाकी थकवूं नका की जी मायबाप ॥ ६ ॥ असामी बारा दिधली ॥ शेवटीं द्वाही विझाली ॥ एका जनार्दनीं आज्ञा केली की जी मायबाप ॥ ७ ॥

( विश्वेश्वरभटजी, सोमनाथ, धरणीधर शास्त्री, गावबा प्रवेश करितात. )

**विश्वेश्वर**–अहो हें केवढें आश्चर्य ! आह्मीं इतका वेळपावेतों एकनाथाच्याच घरीं होतों. इतकेंच नाहीं, परंतु त्याच्या घरीं भोजनाला बसून आह्मीं यथेच्छ हात मारिला.

**गावबा**–हीं पाहीलींतका आमचीं पोटें ? आह्मीं आपल्या बेंबींचीं उखळें केलीं होतीं. धोतरें ढिलीं करून करून विश्वेश्वरभटजी, सोमनाथ महाराज, धरणीधर शास्त्री यांनीं खूप ताव मारला. पण बिचाऱ्या धर्माधिकाऱ्याला आणखी या त्रिविक्रम पंडिताला मात्र फाक्या बसला. आपणांला मी भोजनास बोलावण्यास आलों आहें. तुम्हां दोघांसाठीं एकनाथमहाराज खोळंबून बसले आहेत. हे एक एकनाथ महाराज कोण आहेत ? आपल्याला साष्टांग नमस्कार करितों. राण्याच्या घरीं इकडे पाटावर बसून जेवतां, तिकडे स्वतःच्या घरीं आपली वस्ती आहेच. याला साक्ष आमचे आम्हीं. नारदाला द्वारकेंत स्वतःला बायको मिळावी म्हणून शोध करीत असतां घरोघर कृष्ण दिसला, तसें आम्हांला नाथ महाराज दिसायला लागले !

**सोमनाथ**–कांहीं नाहीं. हा सारा बीरमंत्र आहे. दौलताबादेस यवनाच्या पदरीं हा कांहीं दिवस होताच. तेथेंच हा जादू शिकून आला आहे, आणखी दुसरें काय ?

**गावबा**–संभाळा, नाहीं तर जादूनें तुम्हांला आम्हांला गाढवं बनवायचा !

**धर्माधिकारी**–तें कांहीं नाहीं. तुम्हीं पाळत बरोबर ठेविली नाहीं. त्यानें तुमच्या हातावर तुरी दिल्या. आम्ही खात्रीनें सांगतों कीं तो स्वतःच्या घरीं मुळींच नाहीं. येथें येऊन महाराच्या घरीं तुकडे खातो आहे.

**धरणीधर**–आमचे डोळे फुटले म्हणावयाचे. अहो, आम्ही त्रि-वर्ग सारखे त्याच्या शेजारी बसून त्याच्या घरीं जेवलों, आणखी तुम्ही आम्हांला खोटें करितां, तेव्हां आतां तुह्मांला ह्मणावें तरी काय ? एक मनुष्य दोन ठिकाणीं दिसतो, हें आश्चर्य नव्हे काय ? हातच्या कांकणाला आरसा नको. आह्मी याला येथें संभाळतों. तुह्मी आतां त्याच्या घरीं प्रत्यक्ष जा आणि आपल्या डोळ्यांचें पा-रणें फेडून घ्या.

**जानकाई**–पन मी ह्मनते आमच्या घरी नाथ महाराज जेवल, ते बामन हायती आन तुह्मी बामन हायती, मंग आता तुह्माला जेवा-या काय हरकत हाय ? खाता का वाइच भाजीभाकर ?

**त्रिविक्रम**–जास्त बोललीस तर शिवून मारीन. तोंड आटप. तूं महारीण आहेस, याचा विचार केलास काय ? ज्यानें त्यानें आप-ल्या पायरीनें असावें. साऱ्या गांवांत जें आहे तें महारवणी झालें आहे. आपण सुद्धां आतां प्रायश्चित्त घेतलें पाहिजे.

**गावबा**–आह्मांलाही थोडेसें द्या, ह्मणजे अंगांत दंगात लोमनो लोमनो-मंत्राची कशी बहार ! आणखी चिखलानें अंगें भरवायचीं आणखी शेणानें–आणखी भस्मानें–आणखी मिशा काढायच्या ! नाहीतर मिशा काढायचें प्रायश्चित्त नको मला. कारण माझी आई आणखी मी सारखाच दिसतो. आईला मीं एकदां विचारलें, मिशा का ह्मणून काढतात ? तेव्हा ती ह्मणाली, मिशा जे लोक काढतात, त्यांना क्रोध नाहीं असें समजावें.

**राण्या**–( एकनाथाचे पाय धरून ) महाराज, आपुन इथूनशान जाऊ नका. हे बामन लयी रागावले हायती. बाहेर गेल्यावर हे आप-ल्याला मारत्याल. मी आपल्याला जाऊ देनार नाहीं. माझ्या झोप-

डींत माझ्या डोळ्यासमुख असच रहा. यासनी आपली किंमत नाहीं. एक माणूस दोन जागीं आपुण दावलत, यातल इंगीत मी जानल. आपल्याला मी सोडनार नाहीं. आपल्याला मी खास वळखल.

**धर्माधिकारी**–अरे त्याला धरून बस, ह्मणजे तो तुला ब्राह्मण करील. महारामांगांची प्रतिष्ठा वाढत चालली. पाहून घेतों तुझा चमत्कार. चला, याच्या घरीं. याला आतां घरांत येऊं द्यावयाचें नाहीं. असाचे असा गांवाबाहेर हाकून देतों.

**गावबा**––पण मी म्हणतों धर्माधिकारीबुवा, आतां तुह्मी एकनाथाच्या घरीं गेलांत, आणखी तेथें तुम्हांस प्रत्यक्ष एकनाथ दिसला, तर तुम्ही त्याला काय बक्षीस कराल; अथवा तुम्ही आपल्या स्वतःस कोणता दंड करून घेण्यास तयार व्हाल ?

**धरणीधर**––हाच प्रश्न मी सुद्धां तुम्हांला करणार होतों. अहो आम्हीं भोजन करीत असतांना त्याला प्रत्यक्ष पाहिलें.

**धर्माधिकारी**––तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें मला जर तेथें पुनः एकनाथ भेटला, तर मी स्वतःच दंड म्हणून सहस्त्रभोजन घालीन. आणखी एकनाथाला बक्षीस इतकेंच कीं, त्याला आजपासून त्यानें कांहीं अनन्वित जातिबाह्य कर्म केल्यास त्यास प्रायश्चित्त देणार नाहीं. तो पावनच आहे, असें समजेन. चला आतां त्याच्या घरीं.

( सर्व जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळ**—एकनाथाचें घर.

---

( उमीचंद प्रवेश करितो. )

**उमीचंद**– ( एकीकडे ) मला या एकनाथाचा स्वभाव बिलकुल आवडत नाहीं. याला कांहीं व्यवहार नाहीं. संसार नाहीं. उद्यांची काळजी नाहीं. पैसे देण्याची इच्छा नाहीं. घेण्याला मात्र पाय पुढें. माझे सातशें रुपये उचापतीबद्दल त्याच्याकडून येणें आहेत. देण्याचें कांहीं नांव आहे काय ? मागायला गेलें म्हणजे म्हणतो रुपये आले कीं, देऊन टाकतों, शेटजी तुह्मी बेफिकीर रहा. रुपये आपल्या घरांत

आहेत असें समजा. देण्याचें मात्र नांव नाहीं. गोकुळाष्टमीचा उत्सव, जनार्दनस्वामीची पुण्यतीथ, असल्या भाकड गोष्टींचें निमित्त करून लाडू-जिलब्या गिळायला पाहिजेत. परंतु उचापतीचे पैसे द्यावयाला नकोत. हा रोखा बरोबर आणला आहे. आतां मी फिर्याद केल्याशिवाय राहत नाहीं.

( एकनाथ व गिरजाबाई प्रवेश करितात. )

**एकनाथ**–या शेटजी, तुह्मी फार हेलपाटे घालतां याबद्दल मी मोठा लाचार आहें.

**उमीचंद**–लाचार आहेस तर माझे रुपये फेंकून देईनास. रस्त्याला फेंकून दे. मी आपला गोळा करून घेऊन जातों.

**एकनाथ**–संसारांत वित्त, परमार्थांत चित्त, आणखी शरीरांत पित्त, नसलें कीं फजिती!

**उमीचंद**–तुझी साऱ्या गांवांत फजिती करतों. माझे पैसे बुडवावेत अशी तुझी इच्छा आहे. आज पैसे घेतल्याशिवाय राहणारच नाहीं.

**एकनाथ**–पैसे असून कां मी देत नाहीं ? नसल्यावर कोठून द्यावे !

**उमीचंद**–बायकोच्या अंगावरचे दागिने मोड. लोकाला काय उपकार सांगतोस ?

**गिरजाबाई**—का झालें ? माझें तरी आपल्यास पहिल्यापासून हेंच सांगणें आहे. हा वाणी भला मनुष्य दिसतो. हे घे तुला माझ्या अंगावरचे दागिने सातशें रुपयांबद्दल. ( दागिने काढून त्याला देते. )

**उमीचंद**--मला घेऊन काय करावयाचे आहेत ? बाजारांत जाऊन मोड. आणखी आपल्या बापाचे रुपये सातशें आणून दे अंगावर दागिने घालायला गोड लागतात. लोकांचे पैसे देणें मात्र गोड लागत नाहीं. ( धर्माधिकारी, इतर ब्राम्हण व गावचा प्रवेश करितात.) पहाहो सर्व ब्राम्हणमंडळी, यानें सातशें रुपयांची उचापत घेऊन ब्राम्हणभोजनें घातलीं. मला यानें रोखा लिहून दिला आहे. या घटकेस यानें माझे रुपये मला द्यावेत. माझे रुपये मला पटून रोखा परत घेतल्याशिवाय यानें जर अन्नग्रहण केलें, तर याला

श्रीपांडुरंगाची शपथ आहे. आपल्याला मोठा पांडुरंगाचा भक्त म्हणवीत असतो. आतां पांडुरंग तुला रुपये कसे आणून देतो, तें पाहतों.

**धर्माधिकारी**--महाराच्या घरीं आमटी भुरकतांना आम्हीं याला प्रत्यक्ष पाहिला. आणखी येथें वाण्याबरोबर देवघेवीचा तंटा करीत बसला आहेच. बहुरूपी आहे, आणखी दुसरें काय!

**गावबा**—(दागिने हातांत घेऊन धर्माधिकाऱ्यास उद्देशून) महाराज, आपल्यास हे दागिने चांगले शोभतात. कारण आतां आपल्यांत आणि बायकांत कांहींच फरक नाहीं. एकनाथ आपल्यास येथेंही दिसला. आपण आपल्या पणांत हरलात. या दागिन्यांबद्दल सातशें रुपये या वाण्याच्या पदरांत टाका. आह्मीं तुह्माला वहिनी ह्मणून हाक मारीत जाऊं. अहो वहिनी, दादा कोठें गेले ! (दागिने धर्माधिकाऱ्याच्या गळ्यांत घालतो.)

**धर्माधिकारी**-एकनाथ, ही का माझी चेष्टा चालविली आहेस होय ! मी कोण आहें हें तूं जाणत नाहींस वाटतें ? तुझी खोड मोडल्याशिवाय राहणार नाहीं. (दागिने फेंकून देतों. रागानें सर्व ब्राम्हणांस घेऊन निघून जातो,)

**गावबा**-धर्माधिकारी पळाले ! आम्हांला कसे भ्याले ! का वहिनी, कशी त्यांची फजिती उडविली !

**एकनाथ**-हा वेडा जेथें तेथें घाग करितो. याला कांहीं समजत नाहीं. कोठें कसें बोलावें, कोठें कसें वागावें ?

**उमीचंद**—(उरावर हाणून घेतो, मोठ्यानें ओरडतो.) रुपयांची वाट काय !

**एकनाथ** - तुमचे रुपये दिल्याशिवाय मी अन्न खाणार नाहीं. मग तर झालेंना ?

**गिरजाबाई**--गावबा जारे, एवढे दागिने बाजारांतून मोडून आण जारे.

**गावबा**-खरें सांगूं का ! यांचें फार झालें तर आठ बारा आणे येतील. हे दागिने खोट्या दागिन्यांप्रमाणें दिसतात. माझ्या बायकोला बरे आहेत. आईला सांगून तुह्मांला आठ आण्यांचे पैसे पाहिजे असल्यास या घटकेस आणून देतों.

**गिरजाबाई**--आतां तुला अक्कल तरी कधीं येणार ? तुला अजून खोटे दागिने आणि खरे दागिने यांची कांहीं परीक्षा नाहीं. तुला नवरी तरी कशी येणार ?

**गावबा**--हें पहा, मला वाटतें नाटकांत जसे बायका खोटे डागिने अंगावर घालतात, तसे हे डागिने खोटे आहेत. बाजारांत यांचें कांहीं येणार नाहीं. कसें नाथमहाराज ?

**एकनाथ**—दागिने तिच्या माहेरचे. आह्मांला घेण्याचा संबंध काय ? त्या दागिन्यांवर तिची सत्ता. माझा कांहीं संबंध नाहीं.

**गिरजाबाई**--म्हणजे ? मजवर सत्ता आहे तर मी ज्या आपल्या वस्तूंवर सत्ता करतें त्यांवर इकडची सत्ता नाहीं का झाली ?

**उमीचंद**—बाईसाहेब बरोबर बोलल्या. एकनाथ तुह्मी चला बाजारांत. मोडा हे दागिने आणि टाका माझे रुपये देऊन.

**एकनाथ**--हलवायाचे घरावर तुळशीपत्र ! तुझें काय जातें ?

**उमीचंद**—अरे बाबा, आमच्यावर कांहीं प्रसंग आला, आम्हीं जर कैदेंत जाऊं लागलों, तर आमची बायको एक गुंजभरसुद्धां सोनें आपल्या अंगावरचें देणार नाहीं. आम्हांला लग्न करावयाचें ह्मणजे दहा पांच हजार रुपये अगोदर बायकोच्या बापाजवळ स्त्रीधन ह्मणून ठेवावें लागतें. तुझी बायको फार चांगली आहे. आपल्या नवऱ्याला सगळे दागिने अंगावरचे काढून देते !

**गिरजाबाई**-तुह्मी इतक्या चांगल्या गोष्टी सांगतां; मग तुह्मीच हे दागिने मोडून आणा जा. आपले रुपये काढून घ्या आणखी बाकीचे--

**गावबा**—बाकीचे मला दक्षणा.

**उमीचंद**—मला तुमच्या नवऱ्याची आज्ञा पाहिजे.

**एकनाथ**—मी आज्ञा करणार नाहीं.

**उमीचंद**—बरें मी जातों. पण मी तुह्मास शपथ घातली आहे याचा विचार करा. ( जातो. )

**गिरजाबाई**—आतां नुकतेंच जेवावयाला बसणार तों कर्जदारानें गांठलें. काय करावें माणसानें ? दागिने तर मोडावयाचे नाहींत. मग त्या वाण्याचे रुपये फिटणार तरी कसे ? आतां उपास का करावयाचा ?

**एकनाथ**--त्यानें शपथ घातली आहे, ती तुझ्या ध्यानांत आहेना ?

**गावबा**—नाहीं तर आपण जेवावें, आणखी त्याला ह्मणावें मी उपाशीच आहें.

**गिरजाबाई**--आतां आपण दोघे जेवलों नाहीं, तर घरांत उद्धव जेवणार नाहीं. श्रीखंड्या जेवणार नाहीं. हा गावबा जेवणार नाहीं.

**गावबा**--माझें जेवण चुलींत गेलें.

**एकनाथ**—तुह्मी खुशाल जेवा. तुमच्याकडे काय आहे? त्यानें शपथ मला घातली आहे. मी तेवढा उपाशी राहतों.

**गिरजाबाई**--पण कालची एकादशी आहेना ? आतां भुकेनें जीव व्याकुळ झाला असेल !

**गावबा**--नाहीं तर तुमच्यावरचा मी बसतों उपाशी. तुह्मी खुशाल जेवा. आणखी ह्मणा कीं आह्मी गावबाला बदली दिला आहे ह्मणून. ( एकीकडे ) राण्या महाराच्या घरीं यांनीं आमटी भुरकली हें जर मी गिरजाबाईला सांगितलें तर ? पण नको इतक्यांत.

**एकनाथ**--श्रीगुरूंनीं मला ब्रह्मरस पाजला आहे. नामामृताचें भोजन मी नित्य करतों. माझी भूक नाहींशी झालेली आहे. आह्मी नित्यशः अमृतच जेवितों. अमृतानेंच आंचवितों. निरालंबी शयन करतों. मन हेंच तांबूल. त्यानें आमचें तोंड रंगलेलें असतें. दुसरीकडे कोठें जात नाहीं. सोन्याच्या मूर्तीचें पूजन सोन्याच्याच फुलांनीं करावें. नाहीं तर लहान मुलाची एकादशी. जेवलों काय आणि न जेवलों काय आह्मांला दोन्ही स्थिति सारख्याच आहेत. तुह्मीं कोणी आमच्याबरोबर उपास करूं नये. जा स्वयंपाकघरांत.

**गिरजाबाई**-तें कांहीं होणार नाहीं. आह्मी कांहीं इकडे टाकून साफ जेवणार नाहीं. ( गावबा व गिरजाबाई जातात. एक ह्मातारा एक कागद घेऊन प्रवेश करतो. )

**ह्मातारा**--महाराज, हा एक माझा अर्ज आहे.

**एकनाथ**—तुह्मी कोठून आलां ?

**ह्मातारा**—शरीराबादेहून. आणखी हा अर्ज जिवाजीपंत शेख-दारानें दिला आहे. आपण हा वाचावा.

**एकनाथ**-- ( हंसतो. ) काय ह्मणे शरीराबादेहून आलों आणखी अर्ज जिवाजीपंतानें दिला. जिवाजीपंत ह्मणजे बहुतकरून कायापूर किल्ल्याचे ठाणेदार असतील? काय अर्ज करितात? ( वाचतो. ) अर्जदास्त अर्जदार ॥ बंदगी बंदेनवाज ॥ अलेकं सलाम ॥ साहेबांचे सेवेशीं ॥ बंदे शरीराबाद ॥ जिवाजी शेखदार ॥ बुधाजी कारकून ॥ परगणें शरीराबाद ॥ किल्ले कायापुरी ॥ सरकार साहेबांची आज्ञा घेऊन स्वार झालों तों ॥ परगणें मजकुरीं येऊन सरकार काम सुरू करावयास लागलों तों प्रगणें मजकूरचे जमेदार ॥ दंभाजी शेटे व कामाजी महाजन व मनीराम देशमुख व ममताई देशपांडी व क्रोधाजी नाईकवाडी ॥ ऐसे हरामजादे फार आहेत ॥ ते सरकार कामाचा कयासा चालूं देत नाहींत ॥ दंभाजी शेट्या कचेरीस येऊन जोम धरून बसतो ॥ मनीराम देशमुख आपलें काम परभारें करून घेतो ॥ ममताई देशपांडीण इणें तमाम प्रगणा जेरदस्त केला ॥ क्रोधाजी नाईकवाडी यानें तमाम तफरका केला ॥ तो साहेबांपासून जरासंध चोपदार आला ॥ त्यानें खबर केली कीं मागून यमाजीपंताची तलब होणार ॥ त्यास त्या धास्तीनें तमाम प्रगणा वोस झाला ॥ चितपशील कलम ॥ डोळसवाडीस मात्र कांहीं रुईझुई वस्ती राहिली ॥ कानगांव तो बंद झालें ॥ दोन्ही वेशींचीं कवाडें लागलीं॥ नाकापुरास वहाव सुटलें ॥ तोंडापुर तें तफरका झालें ॥ दंताळवाडी वोस पडली ॥ दिवेलागणी देखील राहिली नाहीं ॥ केंसगांवची पांढर झाली ॥ शिरापुराचे लोक दरोबस्त थरथरा कांपूं लागले ॥ हातगांव कसल्यानें जर्जर झालें ॥ त्यांच्यानें आतां कांहीं लावणी होत नाहीं ॥ पायगांवचीं मेटें बसलीं ॥ ढोंपरीपुरची राहिली ॥ चरणगांव चाली सरली ॥ अपानद्वार वाहूं लागलें ॥ गुह्यस्थान भ्रष्ट जाहलें ॥ उठूं पळूं लागलें ॥ धीर धरवेना ॥ ऐसी परगण्यांत कीर्ति बुडाली ॥ यावर सरकार काम सुरू करीत होतों ॥ तों यमाजीपंतांची परवानगी आली कीं ॥ हुजूर येणें ॥ जिवाजीपंत ठाणेदाराला ताकीदपत्र देतों त्याची अम्मलबजावणी करावी.

ताकीदपत्र ॥ समस्त राजकार्यधुरंधर परगणें शरीराबाद ॥ सुंमातेन लोली प्रवाहे ॥ ताकीदपत्र दिलें कीं कायापुरास जिवाजी-

नामें गृहस्थ कऊल देऊन देहगांवची वस्ती रक्षावया निमित्त पाठविले आहेत ॥ हर एकविशीं साहित्य करावें ॥ मनाजीराव सुभेदार बुधाजी पंत फडणीस व चित्ताजीपंत चिटणीस हे पदरीं थोर मनुष्य असतां ॥ अहंकारपंत सबनीस याचे हवालीं सर्व देहगांवचा कारभार केला ॥ त्याचे धन्याचे घरचे मुत्सद्दी घरीं बसवून नवीन मुत्सद्दी कामगार उभे केले ॥ तें हें चांगलें नव्हे ॥ विकल्पाजी महाजन व मोहाजी शेटे व कामाजी कोतवाल व क्रोधाजी नायकवाडी व द्वेपाजी जमेदार अधिकार जासूद लोभाजी पोतनीस विकारपंत जकातदार मत्सरजी मेहेऱ्या कुतर्काजी गस्तवान उन्मत्तजी पाटील कुबुद्धिपंत कुळकर्णी भ्रमाजी शिपाई मदाजी देशपांड्या दंभाजी देशमुख प्रपंचपंत मुजुमदार मूर्खाजी हुजरे स्वार्थाजी खिजमतगार अविवेक पुराणीक अज्ञान मशालजी हे नवीन कामगार उभे केले ॥ व घरांतील पहिल्या दासी उभ्या केल्या ॥ त्या—आशा मनशा तृष्णा कल्पना ममता कायाप्रीति भुली भ्रांती इच्छा वासना भ्रमणा कुबुद्धि निंदा अहंता चिंता निद्रा मोहनी ह्या कर्मकर्त्या बाद्या ॥ अहंकारपंत सबनीस यानें उभ्या केल्या ॥ त्यांनीं दरोबस्त परगणा बुडविला ॥ आणि यमाजीपंत कमाविसदार यांचे घरीं एकांतस्थळ स्थापन केलें ॥ त्यावरून हें ताकीदपत्र सादर केलें ॥ ते मुत्सद्दी व कामगार त्यागावे ॥ आणि सरकार हुजुरचे मुत्सद्दी कामगार आहेत तर त्याचे हातिं काम द्यावें ॥ मुत्सद्दी तपशील ॥ शुद्ध सत्वभाव वैराग्य विवेक बोध परमार्थ आनंद समाधान निर्वैर स्वानुभव धैर्य सत्य भजन पूजन हे कारभारी ॥ आणि कार्यकर्त्या सुशीला सुबुद्धि उन्मनी प्रतिष्ठा नवविधा मर्यादा शांति क्षमा दया नम्रता समाधि ह्या कार्यकर्त्या हे मुत्सदी यांचे हातीं काम द्यावें ॥ याजविषयीं सरकारांतून ताकीद झाली आहे ॥ तर लिहिल्याप्रमाणें वहिवाट करावी ॥ सबनीस मजकूर याचे कामगार मुत्सद्दी ॥ दरम्यान या कामांत आल्यास पारिपत्य केलें जाईल ॥ हें स्पष्ट समजावें ॥ सरकार कामगार उभे करावे याप्रमाणें वहिवाट करावी ॥ एका जनार्दनीं शरण ॥ हे अशीर्वाद ॥ हें ताकीदपत्र ॥ ( उभयतां जातात. )

## प्रवेश ६ वा.

**स्थळ**--उमीचंद वाण्याचें घर.

( उमीचंदाची बायको मोहना पलंगावर रुसून बसली आहे. )

**मोहना**—( स्वगत ) हमेशा पैशा पैशा! मारा घरवाळानें पैशा शिवाय बीजूं कई देखातूंज नथी. रातना बार बार वागालगण पण घेर आववानी फुरसत नथी. बे वागे जमीने उघराणी करवा गया छे तेनो हजी पत्तो नथी. एमने खावानुं सुधां सांभरतुं नथी. पैसो, पैसो! बीजी कांइ वात नही. मने लागे छे के, मुवाहसे त्यांथीए पैसाने माटे फरी बेठा थसें. मा, बाप, भाई, बेन, कोई नही. हुं आवी रुपाळी—शुं हुं रुपाळी नथी.—ते पण नही ! एमने जो कोई एम कहेके बाइडी छोडी दे, तो आटला हजार रुपया आपूं, तो एकदम छेडो फाडी आपे जो. मने एनो बहु गुस्सो आवे छे. में कह्युं के आपणे छोकरां छैया थतां नथी. माटे लावो, आपणे काई कशी जई तीर्थयात्रा करी आवीये, देवने काई मानता बानता चढावीये, साधु संतने संतोषीए तो तेमनी कृपाथी, काइ फरजंद थाय. पण ते मानुं शूं ! मने केहेके, तारे जोइये तो काशी अने रामेश्वर जा. म्हारे ? म्हारे पैसा एज विश्वेश्वर अने रामेश्वर, पंढरीनाथ अने जगन्नाथ. पैसो एज मारां माबाप, पैसो एज मारा भाईबेन, अने पैसो एज मारी बाइडी. एवा माणसने शुं करवूं ? पैसो तो पुष्कळ होय, पण कोई खानार न होय, तो पैसो एकठो करीने शुं करवुं ? एवा पैसावाळाने जीवता चोरनी बीक अने मुवा पछी सरकारनी बीक. छोकरा छैया होय, तो घड॰ पणमां उपयोगी पडे तेवां शुं ? पैसा आपीने भाडे आणेलां माणस कई कामे लागे के बा !

( उमीचंद हातांत वही घेऊन प्रवेश करतो )

**उमीचंद**—( स्वगत ) हजी मोहना कंई सूती होय एम लागतु नथी. ह्मारा मनने के ए सूती हसे ए सूई जाय एटले ह्मारे निरांत, नहीं तो मने हिसाब तपासवा दे नहीं, अने कंई कंई बात काहाड्या

करे. नही तो लो आपान, खावो, आ मिठाई, खावो, आटलूं अत्तरज हाथे लगाडो, एम बोलबोल कऱ्या करे. जो हुं एना कह्याप्रमाणें न करूं तो ह्मारो जमाखरचनो चोपडोज लईले. अथवा दिवो ओ-ळवी नांखे. अने कंई नही तो कंई करे शुं करीये ? घडपणमां जु-वान बाइडी लाववी, एटले पैसो आपीनें गळामां झुसरूं घालवा जेवुं छे. ( उघड ) मोहना में कुं, आजे मने आवतां जरा वार लागी.

**मोहना**—बपोरना बार वाग्याना गया हता ते हमणा दरशण थयां ( तोंड वेडावून. ) जरा एकज वार लागी. रातना बार वागवा आव्या, ते जरा एकज वार लागी, केरवाय के. एक अठवडी युं मोडुं थाय तो तेने एक घडी केहवी, एक महिनो थाय तो एक दिवस केहेवो, एक वर्ष थाय तो तेने एक पखवाडीयुं कहेवुं. आप्रमाणें व्याज गणवामां दिवस केम नथी गणतां ? त्यां एम गणे तो जीव-नेज पुछवूं तो !

**उमीचंद**—ह्मारी मोहना तो बहू डाहीछे. हुं बहु थाकीने आव्यो छुं. ते हवे निरांते हिसाब तपासवा देशे.

**मोहना**—प्राणनाथ. जो तमे थाकीनेज आव्या छो, तो हवे हिसाब तपासवानी तसदी शुं काम लो छो ? बळवा दो ते हिसाबनो चोपडो. नांखोने एक खूणे.

**उमीचंद**—ए मने शुं कहे छे! हुं जे रात दाहाडो मेहेनत करूं छूं ते शाने माटे कहे वारूं ?

**मोहना**—घेलां पणूं बीजुं शूं !

**उमीचंद**—आ उमीचंदने पैठण शेहेरमा कोण मुरख कहेशे ?

**मोहना**—लो हुं कहुं छुं, बीजुं कोण ?

**उमीचंद**--ह्मारी आंख मिचाया पछी ताहारू शुं थसे ! (रडतो) अरे एटला माटे हुं दमडी दमडी एकठी करीनें ताहारे माटे आ घरमां दाटी मूकुं छुं.

**मोहना**--हशे दाटी मुकेलुं, अने ते हशे ह्मारे माटे, पण मने ते जग्या सरखीए बतावीछे के ? कहेवानुंज के तुं ह्मारी जीव जान पण करणी जोइये तो कसइनी.

**उमीचंद**--( एकीकडे ) एनी जोडे बकवाथी शुं! मात्र म्हारो वखत नकामो जाय छे. ( उघड ) तुं हवे निरांते सुई जा. हुं घडीएक रही, तने बोलावूं, त्यारे आवजे.

**मोहना**--म्हारे शुं करवूं छे आवीने ? म्हारा मा बापे दस हजार रुपीया लईने तमने आपी, तेनो तमे खंगवाळवा बेठा हो, एम मने लागेछे. रातना बार बार वागा सुधी तमे बहार फरो छे, ते परथी तमारूं मन म्हारा उपर केटलुं छे, ए जणाईज आवे छे. हुं मोई तमारी सेवामां अटवाई मरूं छुं, पण ते तमारा लेखामां ए नथी. हवे हुं एक अक्षरे बोलवानी नथी. ( रुसते. )

**उमीचंद** ( एकीकडे ) दस हजार रुपया गयानुं ज्यारे मने सांभरी आवे छे ! त्यारे मारुं शरीर उभुं बळे छे. मने राते डंत्र पण आवती नथी बाकी मोहना नां पगलां आ घरमां थयां, त्यारथी दश हजार तो शुं, पण ते करतां दसगणा रूपीआ मळ्या. छे तो सारा पगलानी. पण मिजास बहु ( तिला समजावितो व उघड बोलतो. ) वहाली, हुं आजथी घरमां आव्या पछी आ जमाखरचनो चोपडो पलंगपासे कदी लावीश नही. रोज दिवामा बत्ती पडी एटले तारी सेवामां हाजर रहीश. ताहारो संतोष तेज म्हारो मोक्ष. ताहारूं कल्याण तेज म्हारू स्वर्ग. ताहारी चाकरी एज म्हारूं काम. ताहारां घेरणां तेज म्हारा देव !

**मोहना**--अने म्हारा लुगडां ?

**उमीचंद**--खरेखर हुं भूल्यो ताहारूं लुगडुं तेज माहारूं पागडुं. ( श्रीखंड्या सातशें रुपये घेऊन येतो. उमीचंदाच्या नांवानें हाका मारतो. )

**मोहना**--रात्रे पण गऱ्हाकने घेर बोलावो, एटले रात बधी तेनी जोडे बोलवामांज जाय. आटली रातना कोण मुवो आव्यो छे, लावो तेनी छाबडी खंखेरी नाखुं ( दार उघडून श्रीखंड्यास मारावयास धांवते. )

**उमीचंद**—अरे तुं ए बोले छे के बकेछे ? कोई मोटुं माणस हशे, नही तो कोटवालनो शिपाई हसे. अने ते गुस्से थसे ने आपणने मारसे.

**मोहना**--बोलो शुं जबाब आपुं ?

**उमीचंद**--कहेनी के छे नही, गाम गया. नही तो कहे आ-व्याज नथी. नही तो लाव, लाव, लाव, ताहारुं लुगडुं पहेरीनें बेसुं नें पछी उपर आवी पुछे तो कहे बहार गयाछे. आ तो म्हारी बेहेन छे. ओ भगवान ! साह्य था. सत्ये नारायणनी कथा करावीश. मारा बाप !

**श्रीखंड्या**—दरवाजा फोडून एकदम आंत घुसेन. तुझ्या नवऱ्याला खूप बडवीन. मरे मरेतों मारीन. हातापायांत बिड्या घालीन. भर चौकावर घेऊन जाईन. तुरुंगांत टाकीन. कुठें आहे तुझा नवरा ?

**मोहना**—माझा नवरा लांब गांवाला गेला आहे. त्याला जाऊन एक महिना झाला. तो येथून जातांना दौलताबादेला जातों ह्मणून गेला. मग त्याला मोंगलांनीं धरून दिल्लीला नेल्याची बातमी आहे. तेथें त्याला अकबर बादशहाचा गुलाम केला. [ उमीचंद बायकोचें वस्त्र गुंढाळतो. ]

**श्रीखंड्या**—अकबर बादशाचें गुलाम होण्याचें त्याच्या नशीबांत नाहीं, तुझा गुलाम होण्याचें आहे. ( जोरानें दार फोडून आंत प्रवेश करतो. उमीचंदास स्त्रीवेषांत पाहून पोट धरून हंसूं लागतो. ) ये शामळो कोतवालाचें नांव ऐकल्याबरोबर शेटाची शेटाणी झालास ? किती भित्रा आहेस तूं ! हे घे आपले सातशें रुपये. ( पिशवी पुढें करतो. )

**उमीचंद**--काय लबाड आहेस रे तूं श्रीखंड्या ? साऱ्या जन्मांत मला कोणीं असें फसविलें नव्हतें. मी नाथाला सांगून तुझी खोड मोडीन. तूं इतक्या रात्रीं कशाला आलास ? आतां रुपये मी घेत नाहीं. उद्यां सकाळीं घेईन. कारण रुपयांची पारख बरोबर झाली पाहिजे.

**श्रीखंड्या**—अरे बाबा रुपये सातशें बरोबर आणले आहेत. इतकेंच नाहीं, परंतु एक शिक्का निझामशाई शिक्क्याचे आहेत. एक रुपया खोटा अगर नरम निघाला तर सातशें रुपये पुनः देईन असें माझा धनी म्हणाला. आतांचे आतां रोखा माझे हातांत टाक. आपले रुपये घे.

**उमीचंद**—तुला का एवढी भीड पडूं नये कीं काय ? आतां

जा. सकाळीं रुपये दुकानावर मोजून पारखून घेईन. रोखा परत करीन.

**श्रीखंड्या**—तुला माझ्या धन्याची तिळभर तरी भीड पडली काय ? त्याला ताडकन पांडुरंगाची शपथ घातलीस. ( डोळ्याला पाणी आणून ) माझा धनी एकनाथ, आणखी त्याची सुशील पत्नी यांच्या तोंडांत अद्यापपावेतों अन्नपाण्याचा लेश नाहीं. आह्मी अजून कांहीं खाल्लें नाहीं. तूं मात्र आणखी तुझी बायको मात्र घी आणि रोटलो-घीशक्कर खाऊन बोक्यासारखे बसलां आहांत. भीड वगैरे कांहीं जाणत नाहीं. या हातांत पैसे आणि या हातांत रोखा. लाव आबिके आबि. नाहींतर चल कोतवालाकडे.

**मोहना**—बाबा, गरम होऊं नको. हा शेट असाच घालवेडा आहे. एकनाथ आणखी त्याची बायको यांना आपण व्यर्थ उपास घातले, याचा कांहीं याला पश्चात्ताप नाहीं. तुह्मी आपला रोखा आतां न्या. आणखी बिचाऱ्यांना जेवायला घाला. त्यांना कालची एकादशी आणखी आज पुनः उपास. ( नवऱ्यास उद्देशून ) तुम्ही जर या घटकेला रोखा परत दिला नाहीं, तर आतांच्या आतां बापाकडे निघून जाईन. पुनः सासरीं येणार नाहीं. तुमच्याबरोबर संसार करणार नाहीं. याद ठेवा.

**उमीचंद**—( एकीकडे ) ही बायको माझें दिवाळें काढील. इच्या पायीं मला नेहमीं असें बुडावें लागतें. नाहींतर माहेरीं जातें. पुनः येत नाहीं. तरुणपणांत बायको माहेरीं राहिली तर लोक मला हंसतील. ( वहींतून रोखा बाहेर काढून ) रुपये आतां देऊन जा. राखा सकाळीं घरीं पाठवून देतों. शपथ वाहतों.

**श्रीखंड्या**—( हातांतील रोखा हिसकावून घेऊन ) फार चांगलें. सकाळीं रुपये आणून देतों. नंतर रोखा दे. ( झपाट्यानें जाऊं लागतो. )

**उमीचंद**—( उरावर मारून घेतो ) अरे मेरा बाप ! तुला पटकी आली. तुझ्या हाताला किडे पडले ! हा काणी भामट्या आहे. ( श्रीखंड्याचे मागें धांवत जाऊन त्याला धरून आणतो. )

**श्रीखंड्या**—तूं म्हणालास माझ्याजवळ रोखा नाहीं, मग आतां

कोठून आलारे ! अरे चोरा, तुला आतां कोतवालाकडे नेल्याशिवाय राहत नाहीं. ( उमीचंदास कोतवालाकडे नेऊं लागतो. )

**उमीचंद**—( पायां पडतो. ) तुझ्या पायां पडतों. मला गुन्हा माफ कर. आतां पुनः असें करणार नाहीं ( बायको व श्रीखंड्या दोघे उमीचंदास दोहों बाजूनें ओढतात. ) एकीकडून बायको एकीकडून श्रीखंड्या-दोघे दोहींकडून मला ओढतात. आतां मी जगत नाहीं, मरतों. माझे हात तुटले ! ए बालाजी, तुझं ब्राह्मणभोजन घालीन, पण मला या संकटांतून सोडीव आतां.

**मोहना**—तूं माझा धर्माचा बाप आहेस. आम्ही तुझीं मुलें आहोंत. आम्हांला एक वेळ गुन्हा माफ कर. एकनाथाच्या बायकोला मी चोळीपातळ नेसवीन. तुला शेलापागोटें देईन. ( नवऱ्यास घरांत ओढून नेऊं लागते. )

**श्रीखंड्या**—घे हे रुपये. ( उमीचंदाचे स्वाधीन थैली करतो. ) पुनः असें कोणाला छळूं नकोस.

**मोहना**—चला आपण या भल्या मनुष्याला पोंचवायला जाऊं. ( त्रिवर्ग जातात. )

---

## प्रवेश ७ वा.

### स्थळ--एकनाथाचें घर.

---

( एकनाथ पुजा करीत बसला आहे. )

**एकनाथ**—

**अभंग**

तुज सगुण ह्मणों कीं निर्गुणरे ॥ सगुण निर्गुण एकु गोविंदुरे ॥ १ ॥ अनुमानेना अनुमानेना ॥ श्रुति नेति नेति ह्मणती गोविंदुरे ॥ ध्रु० ॥ तुज स्थूल ह्मणो कीं सूक्ष्मरे ॥ स्थूल सूक्ष्म एकु गोविंदुरे ॥ २ ॥ तुज आकार ह्मणो कीं निराकाररे ॥ आकारु निराकारु एकु गोविंदुरे ॥ ३ ॥ निवृत्तिप्रसादें ज्ञानदेव बोले ॥ बापरखुमा देविवर विठ्ठलुरे ॥४॥

( भागवताचें पुस्तक उघडतो. त्यांत उमीचंद वाण्याला लिहून दिलेला रोखा श्रीकार फाडलेला सांपडतो. )

अरे हें काय ! येथें हा रोखा परत कसा आला ? उमीचंद वाणी ह्मणजे साऱ्या मुलखाचा छट. बिना त्याचे रुपये त्याला पटल्याशिवाय त्यानें रोखा कधींही दिला नसता. असें असून हा रोखा माझ्या भागवत पुस्तकांत श्रीकार फाटलेला असा आला तरी कसा ! ( गिरजाबाई प्रवेश करते. )

**गिरजाबाई**:--बरें झालें रोखा परत आला. आज दोन दिवस झाले, पोटांत अन्नाचा लेश नाहीं. आपण कांहीं खाल्लें नाहीं, म्हणून बिचाऱ्या श्रीखंड्यानें कांहींच खाल्लें नाहीं. त्याला गुराप्रमाणें कष्ट आपल्या घरीं पडतात बरें का ? बिचारा उपाशीपोटींच पाणी भरीत आहे. त्याला मीं किती आग्रह केला कीं, तुला खाण्याला कांहीं हरकत नाहीं. उमीचंद वाण्याची शपथ फक्त आह्मां उभयतांना लागूं आहे. पण माझ्या ह्मणण्याचा त्याच्या मनावर कांहींच परिणाम होत नाहीं.

**एकनाथ**:—आपण आतां त्याला घेऊनच भोजनास बसूं. तूं कांहीं काळजी करूं नकोस. पण हा रोखा या पोथींत आला कसा, याचें मला राहून राहून आश्चर्य वाटतें. पांडुरंगा, आज हा मोठाच चमत्कार दाखविलास ! आपल्या आयुष्यक्रमांत आपण अपूर्व चमत्कार पुष्कळ पाहतों. परंतु प्रत्यक्ष दर्शनाचा लाभ मात्र फारच थोड्यांना होतो. ( श्रीखंड्या प्रवेश करतो. )

**श्रीखंड्या**:--प्रत्यक्ष दर्शन परमेश्वरानें आपल्यास दिलें, पण हाच परमेश्वर आहे, असें आपल्यास समजण्यास मार्ग काय ? भक्तांच्या आयुष्यक्रमांत मला वाटतें, अशा पुष्कळ गोष्टी घडून येत असतील. कोणाच्याना कोणाच्या तरी रूपानें देव त्याला अनेक वेळा येऊन भेटत असेल, त्याचें काम करीत असेल. जशी दामाजी करितां विठू महारानें रसद भरली !

**एकनाथ**:--आजचा प्रकार तरी कांहीं अंशीं असाच झाला आहे.

**श्रीखंड्या**:—आज काय झालें आहे महाराज !

**एकनाथ**:—तो उमीचंदवाणी पैशाकरितां काल किती तरी

बोलला, तुला माहीत आहेच. शेवटीं त्यानें पांडुरंगाची शपथही घातली. ह्या वेळपावेतों आह्मीं अन्न खाल्लें नाहीं. आतां पाहतों तों भागवतांत वाण्याला लिहून दिलेला रोखा निघाला. हा पहा. (त्याच्या हातांत देतो.)

**गिरजाबाई**--मला वाटतें त्याची कांहीं माहिती–ह्मणजे रोखा पोथींत आला कसा–श्रीखंड्याला कांहीं तरी असावी. तो मोठा चाणाक्ष आहे. ही गोष्ट कशी झाली असेल याचा तर्क तुझा कसा काय चालतो, तें आम्हांला सांग. तुझा तर्क नेहमीं खरा ठरतो, हें मी आज किती दिवस पाहत आहें. का असेंच कीं नाहीं ?

**एकनाथ**—अगदीं रास्त बोललीस. असा धूर्त पुरुष माझ्या पाहण्यांतच आला नाहीं. श्रीखंड्या, तुझा तर्क काय चालतोरे ? हा कागद येथें कसा आला असेल ?

**श्रीखंड्या**—महाराज, माझी अल्पबुद्धि आपल्यापुढें किती चालणार ? आपण प्रत्यक्ष सूर्य. मी खद्योत. आपण प्रत्यक्ष महासागर आणि मी एक ओहोळ. पण ज्याअर्थी आपण विचारतां त्याअर्थीं मला असें वाटतें कीं, पांडुरंगानें आपल्या वेषानें अगर कोणाच्या तरी वेषानें, उद्धवाच्या म्हणा, किंवा गावबाच्या ह्मणा, किंवा व्यंकेटाचार्य पुराणिकाच्या म्हणा, किंवा माझ्या वेषानें म्हणा, त्या उमीचंदाच्या घरीं जाऊन आपले पैसे भरले, यांत कांहीं संशय नाहीं. तो दुष्ट वाणी पैसे मिळाल्याशिवाय रोखा कधींच परत देणार नाहीं अशी आपली खात्री आहेच.

**एकनाथ**—हरहर ! पांडुरंगा, माझ्यासाठीं तूं किती श्रम करतोस ! यापेक्षां तूं मला प्रत्यक्ष दर्शन कां देत नाहींस. माझें चित्त दर्शनाकरितां व्याकूळ होत आहे हें तूं जाणत नाहींस काय ?

**श्रीखंड्या**--ईश्वरी माया फार कठीण. कोणाच्या नाहीं कोणाच्या वेषानें देव आपल्यापुढें प्रत्यक्ष येऊन उभा राहिला, तरी हाच देव असा आपल्यास काय पत्ता लागणार ?

**गिरजाबाई**--इतक्या भानगडींत पडण्याचें कारण नाहीं. त्या उमीचंद वाण्याला कोणी तरी पाठवून घेऊन या. ह्मणजे त्याच्या घरीं पैसे नेऊन कोणीं भरले याचा तपास लागेल. (लांब पाहिलेंसें करून)

पण हा पहा उमीचंद इकडेच येत आहे. (उमीचंद व गावबा प्रवेश करतात.)

**उमीचंद**-- (नाथाच्या पायां पडून) महाराज, आपल्याला मीं पांडुरंगाची शपथ घातली. उपास पडला. अन्न खाऊं दिलें नाहीं. याचा मला फार पश्चात्ताप झाला आहे. आपल्याला उपाशी ठेवून मी घरीं जाऊन यथेच्छ जेवलों. हर हर! मी किती दुष्ट आहें!

**गावबा**--फार दुष्ट. आमची स्वारी कधीं दुकानांत गेली तर आम्हाला या बसा सुद्धां म्हणत नाहीं. आम्हाला बदाम, खारका, खोबरें कांहीं कांहीं खावयाला देत नाहीं. उमीचंदापेक्षां मोहना राणी फार चांगली आहे. हा जर दुकानांत नसला तर मग मला गूळ, खोबरें, नाहींतर कांहीं तरी दिल्याशिवाय जाऊं देत नाहीं.

**गिरजाबाई**—याच्या आपल्या नेहमीं खाण्याच्या गोष्टी. नेहमीं खाण्याच्या गोष्टी काढूं नयेत बरें का.

**गावबा**--मग गोष्टी न करतां मुकाट्यानें तीन चार वेळा फक्त गिळीत जावें होय? बरें आतां असेंच करतों. आणा खायला.

**एकनाथ**--उमीचंदा, तुला रुपये पटले का?

**उमीचंद**--महाराज, हें काय विचारणें? एकदां रुपये घेतल्या नंतर मी का नाहीं म्हणणार आहे? मी इतका हलकट आहें?

**एकनाथ**--तुला रुपये कोणीं आणून दिलेरे?

**उमीचंद**—ज्याच्याजवळ आपण दिले त्यानेंच. आणखी त्याच्याचजवळ मीं रोखा परत केला.

**एकनाथः**--मीं तर तुझे रुपये अजून कोणाजवळ परत करण्यास दिले नाहींत मला तुझे रुपये देणें आहेत.

**उमीचंद**—महाराज, असें कसें बोलतां? काल रात्रीं बारा वाजतां आपण पैसे पाठविले ते मला पोंहोंचले. मीं रोखा परत केला. ज्यानें मला पैसे आणून दिले त्याला मीं पुष्कळ सांगितलें कीं, सकाळीं रुपये घेतों. या वेळीं रुपये पारखण्यास कोणी नाहीं; पण तो मनुष्य कांहीं केल्या ऐकेना. मला कोतवालाकडे घेऊन जाऊं लागला. मग मीं रुपये घेतले. आतां रुपयांची परीक्षा केली, ते फारच उत्तम ठरले. एक शिक्का आहेत. मी आपल्याकडे रात्रीच येणार होतों.

**एकनाथ**—अहो पण तुमच्याकडे रुपये घेऊन आला होता तरी कोण ?

**उमीचंद**—कोण ह्मणजे ? आपण पाठविला तोच. हा आपल्यापुढें उभा असलेला श्रीखंड्या.

**श्रीखंड्या**—हा अगदींच वेडा वाणी आहे.

**गावबा**—माझ्यासारखा

**श्रीखंड्या**—भल्या गृहस्था, काल द्वादशी, रात्रीं महाराजांचें कीर्तन झालें, मी येथें पखवाज वाजविण्यास उभा होतों. कीर्तन प्रहररात्र उरेपावेतों चालूं होतें. तुझ्या घरीं मी आलों केव्हां ? आणखी सातशें रुपये माझ्या बापानें ठेवलेत. रुपयांचें आणखी माझें वांकडें. मला रुपये पाहिजे असते तर मीं महाराजांजवळ पगार मागितला असता. त्यांनीं मला दिला असता. पण मी रुपयांना शिवत नसतों.

**उमीचंद**--महाराज, हा अगदीं खोटें बोलतो. यानें प्रत्यक्ष माझ्या हातीं रुपयांची थैली दिली. आणखी आतां नाहीं ह्मणतो.

**एकनाथ**—मला वाटतें, श्रीखंड्याच्या रूपानें हें काम कोणीं तरी केलें. तोच तो. त्याच्याशिवाय असा अमानुष चमत्कार होणार नाहीं. उमीचंदा, तूं मोठा भाग्यवान आहेस यांत कांहीं संशय नाहीं. तुला भगवंतानें श्रीखंड्याच्या स्वरूपानें दर्शन दिलें. आमच्या कपाळीं नाहीं.

**गावबा**—आपल्या घरीं तर श्रीखंड्या पाणी भरतो आहे. कपाळीं नाहीं असें कां ह्मणतां ?

**गिरजाबाई**--या श्रीखंड्याला घेऊन काय करावयाचें आहे ? याचें रूप घेऊन जो गेला होता तो पाहिजे.

**श्रीखंड्या**—मी आपला पाणक्या श्रीखंड्या, मला घेऊन काय फायदा, फार झालें तर चार घागरी जास्त पाणी आणीन.

**उमीचंद**—महाराज, मला जें भगवंतानें दर्शन दिलें तें त्याला सहन न होऊन त्यानें आपल्याला संकटांतून मुक्त करण्याकरितां दिलें.

**एकनाथ**--उमीचंदा, तूं महा भाग्यवान ! अत्यंत धन्य आहेस ! मी तुझे पायांचा दास आहें.

**उमीचंद**--छे छे ! महाराज, असें म्हणूं नका मला. आतां इतका

पश्चात्ताप झाला आहे कीं, मी आपली सगळी संपत्ति आपल्याकडेस आणून देतों. मला आतां पैसा नको. घर नको. बायको नको. कांहीं नको.

**गावबा**--म्हातारपणीं तरुण बायकोचा कंटाळाच असतो.

**उमीचंद**--आपण माझी सर्व दौलत धर्मार्थ खर्च करा. मी तिच्यावर तुळशीपत्र ठेवतों.

**गावबा**—जातीचा मारवाडी असून बोलतो चांगला.

**श्रीखंड्या**—मारवाडी झाला तरी मनुष्यच आहेना ! उपकार करणारावर अपकार करण्याची बुद्धि त्याला आतां राहिली नाहीं.

**एकनाथ**—उमीचंद, तुझी संपत्ति दानधर्मांत तूं स्वतःच खर्च कर. आमच्याकडे आणूं नको. परमेश्वराचें तुला प्रत्यक्ष दर्शन झालें. याची साक्ष तुला आतां द्रव्य नकोसें झालें. द्रव्याविषयीं लोभ तुझ्या मनांत राहिला नाहीं.

**गावबा**--महाराज, हा मारवाडी अतिशय कंजूष. एक एक कवडीसाठीं प्राण देणारा ! याच्या बोलण्यावर तुम्ही भरंवसा ठेवूं नका.

**उमीचंद**—मी आतां घरीं जातों. सगळी संपत्ति येथें आणून टाकतों, आणखी तुमच्या घरीं भाजीभाकरी खाऊन दिवस घालवितों. हा पहा चाललों ।

**सर्व**—अहो शेटजी, अहो शेटजी, जरा थांबा. ( तो पुढें जातो. सर्व त्याच्या मागून जातात. )

**[ अंक ४ था समाप्त. ]**

# अंक ५ वा.

## प्रवेश पहिला.

स्थळ--काशीक्षेत्रांतील मणिकर्णीकेचा घाट.

( मधुसूदनाचार्य भागवताची पोथी घेऊन प्रवेश करितो. )

**मधुसूदन**–आह्मी सर्व पैठणकर अज्ञान आणखी भोळ्या लोकांनीं ह्मणजे ज्यांना गीर्वाण भाषेचें ज्ञान नाहीं, अशा लोकांनीं एकनाथास विनंति केली कीं, आमच्याकरितां भागवतांतील एकादश स्कंधावर महाराष्ट्र भार्षेत टीका करावी. आमचे विनंतीला त्यानें मान दिला. टीका करण्यास आरंभ केला. प्रथम दोन अध्याय होतांच मीं मोठ्या आवडीनें ते लिहून घेतले. रोज स्नान झाल्यावर त्यांचा पाठ करीत असतों. पैठणाहून काशीस आलों. आजरोजीं ते अध्याय येथें मणिकर्णीकेचे घाटावर नित्य नियमाप्रमाणें मी तर वाचणार, मग येथील यतीश्वर महाराजांच्या कानावर ही गोष्ट गेल्यास माझ्या जिवावर अगर एकनाथाच्या जिवावर काय अनर्थ गुजरेल तो गुजरो. ( पोथी वाचण्यास आरंभ करितो. )

### ओव्या.

श्री गणाधिपतये नमः ॥ श्री सरस्वत्यै नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ श्री कुळदेवतायै नमः ॥ श्री कृष्णपरमात्मने नमः ॥ ॐ नमो जी जनार्दना ॥ नाहीं भवाभव भावना । न देखोनि मीतूंपणा । नमन श्रीचरणा सद्गुरुराया ॥ १ ॥ नमन श्री एकदंता । एकपणें तूंचि आतां । एकीं दाविसी अनेकता । परी एकात्मता न मोडे ॥ २ ॥ तुजमाजी वासु चराचरा । ह्मणोनी बोलिजे लंबोदरा । यालागीं सकळांचा सोयरा । साचोकारा तूं होसी ॥ ३ ॥ तुज देखे जो नरू । त्यासि सुखाचा संसारू । यालागीं विघ्नहरू । नामादारू तुज साजे ॥४॥

हर्ष तें वदन गजराजा। चारी पुरुषार्थ त्याचि चारी भुजा।
प्रकाशियां प्रकाशी वोजा। तो झळकत तुझा दंतु ॥ ५ ॥

( ओव्या वाचीत असतां तें ऐकण्याकरितां कांहीं संन्यासी जवळ येऊन बसतात. )

**ब्रह्मानंद**—

भवान् कुत्राधिवसति।
किं पुस्तकं भवान् वाचयति।
किमेतत्पुस्तकस्य नाम।
किं भवतोऽभिधानम्।
अपि ब्राह्मणो भवान्।

कां विवेकानंद, कसें काय आहे? मला वाटतें हा ब्राह्मण मोठा पंडित आहे. कसला तरी संस्कृत ग्रंथ वाचीत असेल. अध्ययन मोठें असेल, ह्मणून मीं संस्कृत भाषेंत कांहीं प्रश्न केले, परंतु बुवाला संस्कृताचा गंधही पण दिसत नाहीं. महाराष्ट्र भाषेंत कांहीं प्रश्न करून तूं तरी विचार. कोणता ग्रंथ आहे? काय वाचीत असतात?

**विवेकानंद**—महाराज, आपलें वास्तव्य कोठें असतें? आपण हा ग्रंथ जो वाचीत आहां त्याचें नांव काय, तें आह्मांस कृपा करून सांगाल काय?

**मधुसूदन**—यतिमहाराज, हें भागवत आहे. (सर्व संन्यासी हंसतात.)

**ब्रह्मानंद**--( हंसत हंसत ) साऱ्या जन्मांत भागवत नांवाचा महाराष्ट्रग्रंथ मीं आजच ऐकला. कोणीकडे संस्कृत भाषेची थोरवी आणखी कोणीकडे ही महाराष्ट्र भाषा! एखाद्या सकलगुणसंपन्न सार्वभौम राणीपुढें दीडदमडीचें बटकूर आणून उभें करावें, नाहीं तर सरस्वतीपुढें ग्रामदेवता जी मरीआई ती आणावी, किंवा मोरापुढें डोमकावळा, किंवा पंडितापुढें अजागळ, किंवा चिंतामणीपुढें कांदा, तशी ही तुमची महाराष्ट्र भाषा संस्कृतापुढें आहे. ते विद्वान कविशिरोमणि ज्यांनीं भागवत ग्रंथावर टीका केली, त्यांनीं आणखी कांहीं ग्रंथावर मुखरस पाघळला आहे काय?

**मधुसूदन**--आपण अवहेलना करा किंवा काय वाटेल तें म्हणा, मी तर मोठ्या भाविकपणानें त्यांच्या ग्रंथाचें पठण करतों. त्यांनीं

आणखी पुष्कळ ग्रंथांवर टीका केली आहे. चतुःश्लोकी भागवतावर टीका, हस्तामलकावर टीका, स्वात्मसुख नांवाचे शुकाष्टकावर टीका. याशिवाय ते केवळ आह्मांसारख्या प्राकृत आणखी भोळ्या जनांकरितां फार श्रम घेऊन भावार्थरामायण नांवाचा अतिशय मोठा ग्रंथ लिहीत आहेत. त्यांचें नांव एकनाथ. भागवताच्या दोन अध्यायांवर त्यांची झालेली टीका मीं उतरून घेऊन तिचें नित्य पठण करित असतों. तेच तेच अध्याय रोज वाचीत असतों.

**ब्रह्मानंद**--मला हेंच आश्चर्य वाटतें कीं, पैठणच्या धर्माधिकाऱ्यांनीं हें कृत्य सहन कसें केलें? त्यांनीं एकनाथाला शिक्षा कां नाहीं केली? बरें तें असो. भटजीबुवा, तुह्मी आपला हा उत्तम ग्रंथ घेऊन आमच्याबरोबर आमच्या मठाधिपतीकडे चला. मग त्यांचा हुकूम होईल त्याप्रमाणें तुम्हांला काय शिक्षा होणें असेल ती होईल.

**मधुसूदन**--( घाबरून पोथी बांधतो. ) आपण संन्यासी, कामक्रोध जिंकलेले, वासनाद्वेषांचें निर्मूलन केलेले, क्षेत्रवासी, महाविद्वान् आहांत. आपण काय शिक्षा कराल ती मी निमूटपणें सोशीन. पण रोज हें प्राकृत भागवत वाचण्यास मात्र चुकणार नाहीं. ( मधुसूदनास धरून मठाधिपतीकडे नेतात. )

**मठाधिपति**--मला तुमच्याविषयीं सर्व हकीकत कळली आहे. तुमचा गुरु जो एकनाथ त्याला पैठणाहून खेंचून आणण्याकरितां मी आपल्या शिष्यांना मागेंच रवाना केलें आहे. आज उद्यां त्यांची येथें येण्याची वाटच आहे. मला माझ्या शिष्यांनीं तुम्ही भागवताच्या अध्यायाचे महाराष्ट्र भाषेंत पाठ रोज मणिकर्णीकेच्या घाटावर करीत असतां, हें मागेंच कळविलें आहे. दिवसेंदिवस महाराष्ट्र भाषेचें प्राबल्य होऊन गीर्वाण भाषेंतील सर्व ग्रंथांवर टीका होतील. ब्राह्मणांचे वर्चस्व कमी होऊन अन्य जात विद्वान होईल. याबद्दल मी तुमच्या गुरूला नुस्ता जबाबदारच न धरितां त्याला चांगला येथें मार देतों. पुनः त्याच्या हातून अशी गोष्ट न होण्याबद्दल खबरदारी घेतों. तुमचा हा जो कवीश्वर आहे, त्याच्याविषयीं आम्हांला एकंदर वर्तमान सांगा.

**मधुसूदन**--महावैष्णव, केवळ विष्णूचा अवतार, असा एक-

नाथ नांवाचा माझा गुरु आहे. पैठणास रोज भजन, पूजन, ब्राह्मण-संतर्पण, ब्राम्हणपूजन, त्यांच्या चरणांचें तीर्थप्राशन, इत्यादि सत्कृत्यें करून संसारांत राहून परमार्थ करीत आहे. श्री जनार्दन स्वामी त्यांचे गुरु. त्यांच्या पायांच्या कृपेंकरून त्यांना कवित्वस्फूर्ति होऊन त्यानें भागवत ग्रंथावर आम्हां भाविक जनाकरितां प्राकृत टीका करण्यास आरंभ केला आहे.

**मठाधिपति**--ठीक ठीक. भागवत ग्रंथ केवळ उपनिषदांचें सार, तुमचे गांवचा कवि एकनाथ प्राकृतांत करीत असतो. या अपराधाबद्दल त्यास त्याच्या ग्रंथासहवर्तमान ताबडतोब येथें पाठवून देण्याविषयीं आम्हीं पैठणचे धर्माधिकाऱ्यास पत्र पाठविलें आहे. त्याला येथें बोलावून आणून त्याची चांगली फजिती करतों.

**ब्रह्मानंद**—महाराज, त्याला येथें येऊं तर द्या, ह्मणजे मीच त्या दुर्मतीला एका क्षणांत वादांत जिंकून टाकतों.

**मठाधिपति**—त्याला वादांत जिंकण्यापूर्वी माझी तुह्मांला अशी आज्ञा आहे कीं, तुह्मी माझे एकंदर तिनशें शिष्य आहांत. तरी प्रत्येकानें त्या एकनाथाला पांच पांच दंड सपाटून मारावे, कारण त्यानें भागवत ग्रंथ मराठी भाषेंत करण्यास आरंभ केला आहे. इतक्यावर तो जिवंत राहिलाच तर मग वाद करण्याचें पाहूं. आतां मी मठभिक्षा करावयास जातों. ( एकनाथ, गावबा, श्रीखंड्या व पैठणचे धर्माधिकारी प्रवेश करितात. एक संन्यासी एकनाथास धरून आणल्याची खबर देतो. ) हा आलाच तो. मी जातों आतां तुह्मांला आज्ञा केल्याप्रमाणें तुह्मी कार्यभाग करा. ( जातो. )

**गावबा**—एकनाथ, श्रीखंड्या ह्मणतो आपण पैठणाहून येथपावेतों पायीं आलांत. घोडागाडी वगैरे वहानावर आपल्यास या संन्याशांनीं बसूं दिलें नाहीं. आपण फार थकून गेलां असाल, करितां मला आपल्या चरणसंवाहनाची परवानगी असावी.

**एकनाथ**—ब्राह्मणाच्या हातीं पाय रगडून घेऊन अधःपाताचें साधन मला करून घ्यावयाचें नाहीं. तुह्मी माझ्याकरितां कष्ट सोसून येथपावेतों आलांत हें पाहून माझा जीव कासावीस होत आहे. त्यांतून श्रीखंड्या तर मला मार्गावर ठिकठिकाणीं संभाळीत होता.

श्रीखंड्या जर बरोबर नसता तर वाटेंत यतिमहाराजांनीं आमची चांगली लंबी केली असती, परंतु त्याला पाहतांच ते भिऊन जात.

**विवेकानंद**—कां ब्रह्मानंद, आपल्याला मठाधिपतींची आज्ञा काय आहे? एकनाथास दंडानें ताडण करण्यास आरंभ करूं काय? स्वामींची आज्ञा आहे कीं, प्रत्येकानें पांच पांच सोटे मारावेत!

**ब्रह्मानंद**—गुरुजींनीं सांगितल्याप्रमाणें करण्यास हरकत नाहीं. परंतु हा ब्राह्मण जर मार खातांखातां मेला, तर ब्रह्महत्येचें पातक आपल्या बोडक्यावर कोणी घ्यावयाचें? गुरुमहाराज राहतील नामानिराळे. शिवाय याच्या मुखाकडे पाहिलें ह्मणजे हा कोणी अद्वितीय पुरुष—कोणी अवतारीक—असा तुह्मास दिसत नाहीं काय! कसा शांतवृत्तीनें सहजस्थितींत बसला आहे. त्याच्याकडे पाहिल्याबरोबर त्याच्याविषयीं पूज्यभाव उत्पन्न होतो. क्रोध ठिकच्याठिकाणीं नष्ट होतो. आणखी याला सद्भावानें साष्टांग नमस्कारच करावा असें वाटतें.

[ सर्व संन्यासी पायां पडतात. ]

**धर्माधिकारी**—तुह्मी शिष्य उन्मत्त आहांत. श्रीगुरूच्या आज्ञेचें अवहेलन करितां! त्यांचे आज्ञेप्रमाणें जर तुह्मी त्याला एकेकजण पांचपांच सोटे मारीत नसाल, तर आतां जाऊन त्यांना सांगतों कीं, हे तुमचे उन्मत्त शिष्य एकनाथास जाऊन मिळाले. त्याला नमस्कार करितात. त्याच्यापुढें हात जोडून उभे राहतात. हा पहा मी चाललों. ( जातो. )

**श्रीखंड्या**—( लांब पाहिलेंसें करून. ) हं इकडेसच येत होते मठाधिपति बरें का, इतक्यांत धर्माधिकारी लागले जाऊन त्यांच्या कानाशीं. आतां तर काय, हे महंत क्रोधानें इतके तप्त झाले आहेत कीं, यांच्या नेत्रांतून संतापरूपी ज्वाला बाहेर पडतात कीं काय कोण जाणे असें मला वाटतें. नारायणनामाची लाखोली प्रऱ्हाद वाहतो हें पाहून हिरण्यकशिपूनें क्रोधानें थैमान केला किंवा श्रीरामचंद्राला बिभीषण शरणागत झाला हें पाहून रावण जसा करकरां दांत चावूं लागला, तसा या संन्याशाला क्रोध आतां कांहीं आवरेनासा झाला आहे. षड्विकारांचा नाश करील तो खरा संन्यासी. बाहेरून दंडण-मुंडण करून भगवीं नेसून कोणी संन्यासी होत नाहीं. यांनीं

व्यर्थ जानव्याची आणि शेंडीची ताडातोड केली. यांचा संन्यास मला पोकळ अवडंबर दिसतो.

( मठाधिपति एकनाथाकडे पाठ करून प्रवेश करितो. धर्माधिकारी त्याच्या मागून प्रवेश करितो. )

**मठाधिपति**--तुम्ही माझे सांप्रदायिक प्रत्यक्ष माझे शिष्य असें असून तुम्ही माझा आज्ञाभंग केला. रौरव नरकाला जाल. हाच शाप. धिक्कार असो तुम्हांला. ज्यानें प्राकृत ग्रंथ केला, त्याचें मला मुखावलोकन करावयाचें नाहीं, म्हणून मी त्याचेकडे पाठमोरा चालत आलों. षट्शास्त्रांत मी पारंगत असून रामेश्वरापावेतों आज माझा हात धरणारा कोणी आहे काय ? असें असून तुम्ही माझा हा केवढा अपमान केला. त्याला पांचत्रिक पंधराशें सोटे कां मारले नाहींत ! आतां त्याच्या आणि माझ्या दरम्यान पडदा धरा. आम्ही वादास प्रवृत्त होतों. (एकनाथ व मठाधिपति यांच्या दरम्यान एक छाटी धरितात. )

**गावबा**--शुभमंगल सावधान-वाघाचे डोळे-हरणाचे कान-ब्रम्हचारी बटवे. शुभमंगल सावधान. एकनाथाला तर बायको आहेच, पण या यतिमहाराजांना मात्र नाहीं. ( कांहीं संन्यासी गावबाला मारतात. )

**श्रीखंड्या**--अहो तो वेडा आहे. त्याला कांहीं समजत नाहीं. तुह्मी त्याला विनाकारण मारूं नका. तुम्ही फार पुण्यवान, केवळ परमेश्वरासारखे आहांत. एवढा वेडा ब्राम्हण शहाणा कराल तर आमच्यावर मोठे उपकार होतील.

**मठाधिपति**--चडचड पुरी कर. (एकनाथास) शास्त्र्यांचें, पंडितांचें, पुराणिकांचें आणि आम्हांसारख्या यतींचें महात्म्य तुझ्या ग्रंथानें कमी होईल याची वाट काय ?

**एकनाथ**--अतिशूद्रान्त मंडळीचा उद्धार होण्याची वाट काय !

**मठाधिपति**--भागवत ग्रंथाचें प्राकृतांत भाष्य करण्याचा अधिकार तुला कोणीं दिला ?

**एकनाथ**--आपण षट्शास्त्रांचें अध्ययन केलें आहे, त्यांत असें कोठें नमूद केलें आहे कीं काय ? कीं, भागवत ग्रंथाचें प्राकृ-

तांत भाष्य करूं नये ह्मणून ? गीतेसारख्या सर्वमान्य ग्रंथावर श्री ज्ञानेश्वरमहाराजांनीं प्राकृतांत काय ह्मणून भाष्य केलें ?

**मठाधिपति**--गीर्वाण भाषेचें महत्व, त्यावर प्राकृत भाष्य करून कमी केलेंस, याजबद्दल तुला योग्य दंड करितों.

**एकनाथ**—स्वामीस मी असें विचारतों कीं, गीर्वाण भाषा कोणीं उत्पन्न केली ?

**मठाधिपति**—परमेश्वरानें. इतकें या मूढाला समजत नाहीं.

**एकनाथ**—मी तर मूढच आहें, ह्मणूनच विनंति करितों. गीर्वाण भाषा जर परमेश्वरानें उत्पन्न केली, तर महाराष्ट्र भाषा चोरानें उत्पन्न केली आहे कीं काय ? मराठी, कानडी, तेलंगी, द्रवीडी, यवनी, कोकणी, मद्रासी, बंगाली, व्रिज भाषा, हिंदुस्थानी, सिंधी, तामिली, पाली, गुजराथी, मारवाडी या भाषा परमेश्वरानेंच उत्पन्न केल्या आहेत. ईश्वराच्या घरीं सर्व जाति आणि सर्व भाषा यांना सारखाच मान आहे. कोणत्याही भाषेंत त्याची स्तुति केली तरी त्याला पावलीच पाहिजे. आपल्या ह्मणण्याप्रमाणें जेवढ्यांना संस्कृत भाषा अवगत असेल तेवढ्यांचाच उद्धार होईल; मग आमच्या या भरतखंडांत आणि या सर्व पृथ्वींत शेंकडों जाति आणि शेंकडों भाषा आहेत त्यांचा उद्धार होण्यास मार्गच नाहीं. त्यांचा उद्धार होण्याचा आपण मार्ग दाखवा, ह्मणजे प्राकृतांत केलेला ग्रंथ फाडून चिंध्या करतों, अथवा आपणच गंगेंत बुडवून टाकावा.

**मठाधिपति**—माझें ह्मणणें, तुला अठरापगड जातीची काळजी हवी कशाला ? परमपूज्य शंकराचार्य सर्व वर्णांचे गुरु आहेत ते तिकडे त्यांचा उद्धार करोत, नाहीं तर काय पाहिजे तें होवो. त्यांचा अद्वैत सिद्धांत काय आहे? मूर्ख, अज्ञानी !

**एकनाथ**--हर ! हर ! ज्या शंकराचार्यांनीं ब्रह्मज्ञानाचा अधिकार अति शूद्रांसही आहे असा महासिद्धांत केला आहे, त्याच शंकराचार्यांच्या शिष्यपरंपरेंतील आपल्यास समजणाऱ्या मठाधिपतीस हें तत्व कळूं नये ह्मणजे त्यांच्या थोर नांवास व त्यांच्या उदात्त सिद्धांतास आपल्या हातानें काळिमाच लाविली ह्मणावयाची. अहो, जी गति परमेश्वराच्या घरीं शंकराचार्यास मिळाली तीच नामदेवास,

कबीर कमाल, चोखामेळा–जरी ते मुंडण केलेले नव्हते, अथवा त्यांनीं जरी भगवीं वस्त्रें परिधान केलेलीं नव्हतीं तरी त्यांना मिळा-लीच पाहिजे. शंकराचार्य जातीचा ब्राह्मण–नामदेव जातीचा शिंपी-चोखामेळा महार–असला भेदाभेद देवाच्या घरीं निःसंशय नाहीं. यालाच मी अद्वैत सिद्धांत समजतों.

**गावबा**—आमच्यासारखे जसें ब्रह्म न जाणतां केवळ जातीचे ब्राह्मण, तसेच हे कांहीं एक न जाणतां, क्रोधाचा त्याग न करितां जातीचे संन्यासी. तुमची आमची गडी बरें का संन्यासी बुवा. श्रीखंड्या, तूं होतोस का आमचा गडी ? पण तूं नको, तुला कधीं रागच येत नाहीं.

**मठाधिपती**-- ( एकीकडे ) याच्यापुढें माझी बोलण्याची मति चालत नाहीं. बोलण्यासारखें सहा शास्त्रांचे अध्ययनांत कांहीं सांपडत नाहीं. आतां काय बरें बोलावें ? ( घाबरल्यासारखें दाखवितो ) ( उघड ) तूं काळजी करूं नको. तुला जिंकल्याशिवाय सोडीत नाहीं. आण तुझा ग्रंथ इकडे. एक श्लोक वाचतों आणखी त्याचें भाष्य कसें काय झालें आहे तें पाहतों. जर टीका चुकली असेल, तर ग्रंथ गंगेंत फेंकून देतों. ( ग्रंथ घेतो व वाचतो. )

### श्लोक.

एषा माया भगवतः सर्गस्थित्यंतकारिणी । त्रिवर्णा वर्णि-ताऽस्माभिः किं भूयः श्रोतुमिच्छसि ॥ १ ॥ ॥ टीका ॥ उत्तम मध्यम अधम जन । तिन्ही अवस्था त्रिभुवन । त्रिविध कर्म तीन गुण । हें जाण विंदान मायेचें ॥ २ ॥ ध्येय ध्याता आणि ध्यान । पूज्य पूजक पूजन । ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान । हेही त्रिपुटी पूर्ण मायेची ॥ ३ ॥ दृश्य द्रष्टा आणि दर्शन । कर्मकर्ता क्रिया चरण । भोज्य भोक्ता भोजन । हे त्रिपुटी जाण मायेची ॥ ४ ॥ शब्द श्रोता आणि श्रवण । घ्रेय घ्राता घ्राण । रस रसना रसस्वादन । हे त्रिपुटी जाण मायेची ॥ ५ ॥ कर क्रिया आणि कर्ता । चरण चाल चालता । बोल बोलणें बोलता । हे त्रिविधावस्था मायेची ॥ ६ ॥ अहं सोहं जड मूढता । साधक साधन साध्यता । देवी देवो परिवार

देवता । हे ही त्रिविधता मायेची॥ ७॥ देह देही देहाभिमान। भव भय भवबंधन । मुक्त मुमुक्षु अज्ञान। हें ही विंदान मायेचें ॥ ८॥ सुख दुःख जडत्व पूर्ण । आधि समाधि व्युत्थान। उत्पति स्थिति निधान । इहीं लक्षणीं संपूर्ण माया विळसे ॥९॥ नभीं नीळिमा पूर्ण भासे। शंखीं नीळिमेचा लेश ही नसे। तेवीं स्वरूपीं माया आभासे । मिथ्या वेशें मायिक ॥ १० ॥

(आत्मगत) यांत तर बोट शिरकविण्यास जागा नाहीं. यानें मूळचा अर्थ तिळमात्र न सोडितां पूर्णपणें व्यक्त करून दाखविला आहे. भाषेचें सौरस्य इतकें मजेदार आहे कीं, तें पाहून मी तर दिपून गेलों. आतां मी अगदीं गोंधळून गेलों आहें.

**एकनाथ**--अहो श्रेष्ठहो, मी तुमच्या चरणांपाशीं अशी विनंति करितों कीं, मला आपल्या चरणाचें एकवार दर्शन द्यावें. आपल्या दर्शनाचा हेतू मनांत धरून येथपावेतों आलों. आतां पडदा दूर करून मला दर्शन द्या. माझ्याकडून कांहीं अपराध घडला असेल तर त्याची क्षमा करा. मी मतिमंद आहें, मूढ आहें, मला संस्कृताचें गम्य नाहीं, भावहीन–भक्तिहीन–ज्ञानहीन–वैराग्यहीन–शास्त्रपठण नाहीं–वेदाध्ययन नाहीं, असा सर्व प्रकारें केवळ भूमीला भारभूत झालेला आहें. तुह्मी साक्षात् नारायणमूर्ति आहां. महाक्षेत्रांत वास्तव्य करीत आहां. तुह्मीं जर माझे अपराध पोटांत घातले नाहींत, तर सर्व जग माझी हेळसांड करील. तात्पर्य, माझ्या वरचा राग दूर करून मला दर्शन देऊन माझा उद्धार करावा.

**मठाधिपति**—अहाहा ! काय याची वाणी अमृतासारखी गोड आहे. चित्ताच्या ठिकाणीं शांति किती बाणलेली आहे ! अविद्यारूपी अंधःकारानें माझें हृदय दाटून गेलें होतें. त्यांत याच्या भाषणानें ज्ञानरूपी सूर्याचा प्रकाश पडून माझा क्रोध निघून गेला. हा प्रत्यक्ष परब्रम्हमूर्ति आहे. सच्चिदानंदघन आहे. निर्विकार आहे. जगाचा उद्धार करण्याकरितां परमेश्वराचा हा अवतार असून त्यानें रुपाळू होऊन मला दर्शन दिलें. (पडदा बाजूला करितात.) जें ध्यान भागवतांत श्रीकृष्णमूर्तीचें वर्णन केलेलें आहे, त्याप्रमाणेंच मला हा दिसत आहे. त्राहि माम्, त्राहि माम्

भगवन्. ( साष्टांग प्रणिपात करतो. एकनाथ त्यास उठवितो. सर्व संन्यासी नारायणनामाचा गजर करितात. )

**श्रीखंड्या**—अकबर बादशहा आपल्या अविंध पंडितास या काशी क्षेत्रांतील विद्वान म्हणविणाऱ्या ब्राम्हणांकडून संस्कृत भाषा शिकवून रामायण आणि भारत यांचे तरजुमे फारशी भाषेंत बेलाशक करीत आहे, त्याला कां हे धर्माधिकारी आणि मठाधिपति शिक्षा करीत नाहींत कोण जाणें ?

**गावबा**—कदाचित् तो यांची मुंताच करील म्हणून.

**श्रीखंड्या**—( एकीकडे ) राखेखालीं धुमसत राहिलेला अग्नि जसा घृतसिंचन केल्यानें अधिकच प्रज्वलित होतो, तसा या वाग्युद्धांत मठाधिपति पराजित झाल्यानें धर्माधिकारी बुवा अधिकच खवळून गेले आहेत. बिळांतला नागोबा जसा फुत्कार करून अंगावर चवताळून येतो, तसें याला वाटत आहे कीं, या संन्याशाला आणखी त्याच्याबरोबर या एकनाथाला एकदम शूळावर चढवावें. आतां हा ब्राम्हण या संन्याशावर तुटून पडणार बरें का गावबा ?

**गावबा**--तो जर मजवर तुटून पडेल तर फार उत्तम होईल. तो एक भाकरी खात असेल तर मी दोन खाईन. तो दोन, तर हा पठ्ठ्या चार, तो चार, हा आठ. पाहिजे असेल तर याच बैठकीला होऊन जाऊं द्या. ( धर्माधिकारी गावबास मारतो. मठाधिपतीला धर्माधिकारी बाजूला ओढतो व एकीकडे नेऊन बोलतो. )

**धर्माधिकारी**--तुम्हाला त्या मूर्खानें इतकी काय भुरळ पाडली मला समजत नाहीं ? तुम्ही जो त्याला परमेश्वर बनविला आहे, इतकें अधिक त्याच्यांत तुम्हांला काय दिसून आलें ?

**मठाधिपति**--मला त्याच्या ठिकाणीं शांति, दया, तितिक्षा, निरिच्छता, इंद्रियदमन, इत्यादि गोष्टी इतक्या बाणलेल्या दिसतात कीं, त्याच्या शतांशहि माझ्या ठायीं मी संन्यासी असून नाहींत. संस्कृत ग्रंथावर टीका कां करूं नये, याचें सप्रमाण खंडण माझ्या हातून होत नाहीं. माझ्या सहा शास्त्रांपैकीं एकाहि शास्त्राचा उपयोग या वेळीं होत नसून त्यानें आपल्या कोटीबाज भाषणानें मला बोलण्यांत कुंठित केलें.

**धर्माधिकारी**--अहो यतिमहाराज, भागवतावर प्राकृत टीका म्हणजे अत्यंत घातक गोष्ट आहे. हें पाखंड मत हा दिवसेंदिवस वाढवीत चालला आहे.तुम्हांला अगदीं भ्रांत पडली. हें पाखंडमत अल्पस्वल्प आहे तोंच याचा नायनाट करून टाका. या महाक्षेत्रांत जी गोष्ट मान्य झाली, तीच चोहोंकडे मान्य होणार नाहीं. यांत तुमच्या क्षेत्राच्या नांवास काळिमा लागणार आहे. वैदिक, शास्त्री, पंडित, या सर्वांचें आपल्यास हात जोडून हें मागणें आहे कीं, तुह्मी सर्वज्ञ आहांत, सर्व विद्येचें मूळपीठ आहांत, चतुर्थाश्रम धारण केलेले आहांत, पैठणच्या एका भटुरड्यानें भागवत ग्रंथावर टीका करावी, आणखी ती तुह्मी मान्य करावी, हें लांछनास्पद आहे. ज्याप्रमाणें व्यासानें जैमिनीचें भारत बुडवून टाकिलें अथवा शंकराचार्यानें जैन मताचे ग्रंथ बुडवून टाकिले, तसें हें एकनाथी भागवतरूपी भारूड तुह्मी गंगेंत झुगारून द्या. आह्मां ब्राह्मणांना आनंद उत्पन्न करा. यांत तुमच्या नांवाचा आणखी तुमच्या क्षेत्राचा लौकिक वाढणार आहे. तुम्ही फक्त ग्रंथ माझ्याजवळ आणून द्या, म्हणजे मीं फेंकून दिलाच असें समजा.

**मठाधिपति**—( एकीकडे ) या दुराग्रही ब्राम्हणापुढें माझा कांहीं उपाय चालत नाहीं. माझ्या मनांत तर असें होतें कीं, आम्हीं सर्वत्रांनीं नाथमहाराजांचें आणि त्यांनीं केलेल्या ग्रंथाचें पूजन करावें. तो ग्रंथ व त्याचा कर्ता यांना पालखींत बसवून पालखी हत्तीवर ठेवून मोठ्या समारंभानें सात दिवस सर्व काशीक्षेत्रांतून मिरवणूक काढावी. परंतु या ब्राम्हणापुढें कांहीं इलाज चालत नाहीं. बिचाऱ्याला ग्रंथाची रचना करण्याला किती श्रम पडले असतील !

**धर्माधिकारी**—काय विचार चालला आहे ? अहो पहातां काय ? त्याच्या हातची पोथी घ्या हिसकावून, आणखी एक वेळ माझ्या हवालीं करा कीं, मीं तिला जलसमाधि दिलीच समजा. मग काय होणार असेल तें होवो.

**मठाधिपति**—एकनाथ, तुझा ग्रंथ मला सर्वस्वी मान्य आहे, परंतु या हट्टी ब्राम्हणापुढें माझा कांहीं इलाज नाहीं. पैठणकर धर्मा-

धिकाऱ्यांना येथील धर्माधिकारी मिळून गेले. उभयतांची आज्ञा तुझें भागवत गंगेंत झुगारून द्यावें अशी आहे.

**एकनाथ**--भूदेवांची आज्ञा जशी असेल, तशी मला मान्य केली पाहिजे. ज्या जनार्दनानें भागवतावर भाष्य करण्याची मला बुद्धि दिली, त्यानेंच त्यांना तें गंगेंत फेंकून देण्याची बुद्धि दिली आहे. दोन्ही गोष्टी मला मान्य आहेत. परमेश्वर भक्ताची महती वाढण्याकरितां कधीं कधीं त्याच्यावर विलक्षण संकटें आणतो. त्याचेंच हे एक उदाहरण आहे. यतिमहाराज, हें पुस्तक मी केलेलें नसून माझे पूज्य गुरुवर्य स्वामी जनार्दन यांचें आहे. हें आपण घ्या. ( पोथी मठाधिपतीचे स्वाधिन करितो. तो नदींत फेंकून देतो. गंगानदी पाण्यांतून हात बाहेर काढून वरचेवर पोथी झेलते. हातांचा दिव्य प्रकाश पडतो, धर्माधिकारी पळून जातो. )

**मठाधिपति**--काय हा अद्भुत चमत्कार ! विष्णुकन्या जी गंगानदी तिनें ग्रंथ वरचेवर झेलला ! केवढी ग्रंथाची महती आहे ! या काशीक्षेत्रांतील ब्रह्मवृंदांनीं मला शूळावर दिलें तरी हरकत नाहीं, परंतु हा अत्यंत पूज्य ग्रंथ मी आपल्या मस्तकीं धारण करणार. ( पाण्यांतून पोथी काढून वर आणून मस्तकीं धारण करितो. सर्व मंडळी नारायणनामाचा घोष करितात. ) हे माझ्या शिष्यवर्गानों, तुह्मी या ग्रंथाचें नित्य पूजन करीत जा. याचें श्रवण, मनन, पठण करीत जा. आपण याची हत्तीवरून मिरवणूक काढणार. श्री एकनाथ याची आपण-महापुरुष-परमात्मा-समजून महापूजा करूं. एकनाथ महाराज, आतां तुह्मी या काशीक्षेत्रांत राहून या ग्रंथाची परिसमाप्ति करावी. नित्यशः आह्मांस या ग्रंथाचें दर्शन होईल. समाप्ति झाल्यावर आपणास पैठणास जाण्याचा रुकार देऊं.

**एकनाथ**—जशी महाराजांची आज्ञा असेल तसें करतों. पूजेविषयीं म्हणाल तर माझी पूजा आपण करूं नये. मी पालखींत अथवा हत्तीवर बसण्यास अयोग्य आहें. आपल्यास वाटल्यास ग्रंथाची महती वाटेल तितकी वाढवावी. माझी हरकत नाहीं ( एकीकडे ) श्रीदत्तात्रेयाचें दर्शन आणि भागीरथीनें भागवत ग्रंथाला आपल्या हस्ताच्या ठायीं धारण करून दिलेलें प्रोत्साहन, या दोन्ही गोष्टी के-

वळ श्री जनार्दनकृपेंकरून घडून आल्या. ( मठाधिपति पुस्तक मस्तकावर धारण करून जातो. त्याच्यामागून नारायणनामाचा गजर करीत सर्व जातात. )

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**–एकनाथाच्या घरापुढचें पटांगण.

( राण्या महार व त्याची बायको जानकाई प्रवेश करितात. )

**जानकाई**--अहाहा! काय पन घमघमाट सुटला आहे. कशाचा बर वास येतुया?

**राण्या**--मी सांगू व्हय? बामन खात्याती तें गुळमट गुळमट आपल्याला खरकट्यामंधी लहान लहान तुकड घावत्याती. त्येचा घमघमाट येतुया.

**जानकाई**--पन त्येच नाव काय?

**राण्या**--कुनाच्या बाला नाव न गाव ठावू. आपल चटनी भाकरीच नाव आपल्याला म्हाईत. तें वाटोळ्या कड्यागत असत.

**जानकाई**--जिलबी म्हनत्यात त्याला जिलबी. तिला तळाव लागत. ती तळत्याती म्हणूनशान कसा घमघमाट चालला हाय. ( नाम्या, सोपान्या, गेन्या, तुक्या, वगैरे पुष्कळ महार व कांहीं महारणी प्रवेश करितात. )

**गेन्या**—का रानबा, तुम्ही तर नाथमहाराजाच लयी लाडक. तुमच्याघरी येऊनशान त्येनी आमटी भाकरी खाल्ली. पन तुम्हाला त्येनी आपल्या घरी कुठ कधीं बोलावलया? तुम्हाला पंक्तीला घेऊनशान ते आपल्या घरी कंधी जेवलत का? ते होनच नाहीं बर का.

**नाम्या**--आन गेला असला चोरुन मारुनशान तर कुना लेकाला ठाव? तुम्हा आम्हाला का पुसुनशान जाईल व्हय?

**सोपान्या**—हंग आपल्यासनी जर संग घेऊनशान गेला आन खायाला घातल तर काय नामी गोष्ट होईल बर.

**तुक्या**—लेकांच्या तोंडांला जनू पानी सुटलय अगदीं. माझ्यांचि सुटलय पन अपुन अस बोलूनशान दावनार नाहीं.

**जानकाई**--अर बावांनो, आपल्या कपाळीं असल कुठल अन्न. अपुन आपली चटनी भाकर खावी, आन पाटलाच्या म्होर म्होर कराव आन कोतवालाच्या म्होर म्होर करावें नाईतर बका बका लाथा खाव्याती. आपली चटनीन भाकर.

**राण्या**—मंग ती का वाईट हय व्हय ! अर कसलबी अन खाल्ल, तरी तोंडांत घास हय तवर त्ये ग्वाड. आन मंग मी म्हनतो, नरड्याच्या खालीं चावूनशान गेल्यावर त्येची काय चव हाय काय ? मंग लाडू असो नाई तर जिलबी असून द्या, नाहीं तर आठा दिसाची शिळी भाकर असून द्या, समद् सारखच. हा जिभचा शेंडा लयी शिंद्ळ हय. यवढा ताब्यात ठीवा ह्मनजे कंधी बी राग येनार नाहीं. आन कसली बी आस्ता व्हनार नाई. जिलबी आन कांदा-भाकर सारखच. मडक्यानी पानी पेल काय आन रुप्याच्या पचपात्रानी पेल काय सारखच. तान गेली ह्मनजे झाल.

**गेन्या**—कसं गिन्यान बोलतोया ? जातीचा महार पन आक्षी गिन्यान बोलतोया. पन गड्या रान्या, तुंझ गिन्यान हामासनी नग. आमच्या समद्याच्या पोटामंधी कालपून अन नाई; आन हा घमघमाट आल्यान आमच्या पोटामंधी कस भुकन भकभक होतया.

**नाम्या**--पोटामंधी आग लागलीया आग. अहाहा, काय वास येतोया ! नाहीं तर आमच्या घरी-कांद्याची घान.

**तुक्या**—माझ्या तोंडाला अक्षी मघापुन आळा घालतोया. पन ही जीभ रांड लयी वंगाळ हय. आपल्या गरीबासनी कोन असला उन्हून गरम गरम ताजा माल खायला घालतया ? बर पैस खरच करून सामान केसर आन कस्तुरी आनली, आन साखर तूंप आनल, तर इचभन आमच्या अस्तुरीला करताची येत नाहीं.

**जानकाई**--अस्तुरीला ह्मनाव कस्तुरी घाल जिलबीमंधी. काय मेला बोलतोया, अस्तुरीला करतां येत नाई. यमाई ह्मारीन तुझी बायको तर लयी सुग्रन हय ह्मनुनशान समद्या म्हारवाड्यामंधी बोलत्याति. ते असूंदे. आन समद् सामान, मी तुला जिलबी करूनशान घालते.

**सोपान्या**--जिलबी करतांना म्हनत्यानी मडक्याला भोक पाडूनशान त्येचा मंधून पीठ गाळाव लागत.

**राण्या**—चला राव उगच, काय लोकाच्यां दारामंदी गरदी. चला आपुन आपल्या कामासनी निघून जाऊ.

**गेन्या**--आपल्या बाच्यानबि यक पाऊल बि आता म्होर टाकन व्हनार न्हाई. आर नाहीं जिलबि खायाला तर नाहीं, पन तिचा वास तर येतोया. तेवढिच सई. आपुन निस्त वासावरच खुस मानुनशान घेऊ. नाहीं आपल्या कपाळी आसल आन. देवा, आम्ही जातिच म्हार, पन आह्मी का मानस न्हाई बर? साऱ्या जलमामंधी आह्मासनी येक दिसबि असल पोटभर गोड अन्न मिळत नाहीं. आमची तुला काइ कारुना नसाविना बर ?

**तुक्या**--अर बैलाच्या पाठीवर साखरच्या गोन्या, आन तुपाच बुदल, आन चालल राजाच्या घरी लग्नाला. पन त्येला खायाला काय ? फार फार झाल तर पेंड नाहीं तर कडब्याची ताट. त्यांतली आपली गत. धरा म्हारासनी बिगारीला, द्या त्याच्या डोसक्यावर मोठाली वझी आन पोटाला पैस मागितल तर ढुंगणावर दोन लाथा.

**सोपान्या**--आर एकनाथमहाराज समुरच हाय. त्येंच्या शेजारी आपुन राहातो, पन आसल आन पोट भरुनशान कंधी तरी मिळाल हाय का ?

**नाम्या**-- गाढवाच धनी त्याच्या ढुंगणावर एक टिकुर मारतो, आन देतो उकरडा फुकाया पाठून. तस आतां घरचा मालक आला कीं, खसकन आंगावर कुत्र्यावानी धाऊन येईल. नाहीं तर एकांदा आगांतुक बामन जरी आला, तरी तसच करील. म्हनजे आपुन आगांतुक, पन आम्हा गरीबाला उगच डसाया धावायच. गुमान आपल्या घरी चला नाहीं तर दारात गर्दी केली ह्मनुनशान मार मातर मिळल.( एकनाथ व गिरजाबाई प्रवेश करितात. )

**एकनाथ**--यांचें भाषण ऐकलें म्हणजे पोटांत तडतड तोडायाला लागतें. आतां ऐन दोन प्रहर झाले. तुमच्या ब्राम्हणाला तर अजून पत्ता नाहीं. मी म्हणतों, या महारांचें मन त्या श्राद्धाच्या अन्नावर गेलेलें आहे. यांना जर आपण हें अन्न दिलें तर काय होईल ? ब्राम्हणांला राग येईल काय ?

**गिरजाबाई**--हें काय बोलणें ? माझ्या मनांत आतां हीच कल्पना

आली होती. पण करायचें कसें ? आपण उभयतां ब्राम्हणाचे सासुर वासी आहों. शापादपि शरादपि. दुर्वासऋषि येण्याचे अगोदर अंबरीष राजानें नुस्तें देवाचें तीर्थप्राशन केलें, तर त्यांनीं त्याला शाप विनाकारण दिला. कपिलमुनीला क्रोध येऊन त्यांनीं सगराला शाप विनाकारण दिला. नलकुबेराला शाप देऊन नारदानें त्यांचे वृक्ष बनविले. हा क्रोध मोठा दुष्ट आहे. प्रत्यक्ष श्रीगजानन–सर्व विघ्नांचा हरण करणारा–त्याला क्रोध यावा काय ? पण त्याला क्रोध आल्याबरोबर चंद्राला शाप दिला. आपण उंदरावरून पडल्याचें बाजूलाच राहिलें. प्रत्यक्ष ईश्वरानेंसुद्धां क्रोधाला वश होऊन दक्षाबरोबर यज्ञ चालविणाऱ्या ऋत्विजांचासुद्धां शिरच्छेद केला. ह्मणून ह्मणतें परिणामाकडे लक्ष आहे का ?

**एकनाथ**—मग या महारांना विन्मुख लावूं ? छे, हें माझ्या हातून होणार नाहीं. ज्या परमेश्वरानें दुर्वास ऋषीच्या मागें सुदर्शन लावून अंबरीष राजाला विनाकारण शाप दिला ह्मणून शिक्षा केली, तोच कृष्णपरमात्मा या ब्राह्मणांच्या हातून माझें रक्षण करील. भूतदयेची आलेली ही संधि मी फुकट घालविणार नाहीं. ( श्रीखंड्या व गावबा प्रवेश करितात. ) श्रीखंड्या, माझ्या मनांत ब्राह्मणांसाठीं तयार केलेला सर्व श्राद्धाचा स्वयंपाक या महारांच्या पदरांत घालावा, असें आहे. तुला कसें वाटतें ?

**श्रीखंड्या**—फार चांगलें महाराज. त्यांना येथें आपल्या आंगणांतच भोजनास घालावें. गरीब, अंध, पंगु, अनाथ, दुबळे, अशांला अन्नाचा धर्म केला असतां परमेश्वर संतुष्ट होतो असें ह्मणतात. या बिचाऱ्या महारांना जिलबीचें जेवण कशानें मिळणार ? जातों मी. पाटरांगोळ्यांची तयारी करतों.

**गावबा**—मग त्यांना नेसायला पीतांबर आणखीन पांघरायला शालजोड्या काढूं का ? ह्मणजे नदीवरून धर्माधिकारी आले कीं, त्यांना वाटेल हे कोठले ब्राह्मण ? कानडी का द्रवीडी, तेलंगी का हिंदुस्थानी, का हे महार ब्राह्मण ? गिरजावहिनी, तुह्मी लौकर चटण्याकोशिंबरी वाढावयाला घ्या.

**एकनाथ**—ऐक रे, शालजोड्या पीतांबरांची गरज नाहीं ! तूं

त्यांना गार पाणी वाढ आणखी पंख्यानें वारा घाल. ( गावबा जातो. ) श्रीखंड्या, तूं काय करतोस ?

**श्रीखंड्या**—मी होय ? पाटरांगोळ्या करतों, आईसाहेबाला वाढूं लागतों, आणखी उष्ट्या पत्रावळी काढून गंगेंत नेऊन टाकून ब्राह्मण येण्याचे अगोदर शेण घेऊन भुया वगैरे सारवून लक्ष करून स्नान करून पुनः स्वयंपाक तयार करून ठेवतों. आपण कांहीं भिऊं नका. परमेश्वर आपली संकटांतून मुक्तता करील. महारांला भोजन घातल्याबद्दल धर्माधिकाऱ्याला अत्यंत क्रोध येऊन ते श्राद्धाला येणार नाहींत. परमेश्वरानें त्यांचे पितर स्वर्गांतून पाठवावे, ह्मणजे या चा नक्षा उतरलाच. ( जातो. )

**एकनाथ**—अरे राण्या, आमचा बेत काय झाला तुह्मांला कळला कारे ?

**राण्या**—महाराज, आह्मी समद् ऐकत हतच उभ हाईती. पन महाराज आमच्यापायी आपल्यासनी लयी तरास पडतो. हे बामन आपल्यासनी मारत्याल, काय करत्याल, काईबी सांगवत नाहीं. ह्मनु-नशान ह्मनतो आह्मासनी त्येंच भोजन झाल्यावर वाईच उष्ट्यामंधी खरकट द्या ह्मगजे झाल.

**गेन्या**--काय ह्मनत्यात नई, खरचनाराच खरचत पन कोठा-वळ्याच पोट दुखत. तुला लेका चोंबडेपना कुनी कराया सांगितलाय ? मालक आपल्यासनी राजागत खायाला घालतोया आन तू उष्ट्या-मधल तुकड कशापायी खातोसया ? लेकाला नरुस्यात जेवायाची सवच बघा. चांगल पचपक्कानाची ताट देत्याती. आपल्या बान चि पाहिली नसत्याल.

**गिरजाबाई**--अरे महारांनों, आणखी तुमची कांहीं मंडळी असली तर घेऊन या, ह्मणजे मग असें न व्हावें कीं, या केलेल्या स्वयंपाकांत तुह्मीं जेवावें आणखी आह्मीं ब्राह्मणांकरितां दुसरा केला कीं, पुनः दुसऱ्या महारांनीं यावें. ( एकनाथास उद्देशून ) बरें, मी वाढण्याची तयारी करतें. ( जाते. गावबा प्रवेश करतो. )

**गावबा**--पाटरांगोळ्या घालून तयारी केली आहे. आतां महार, मांग व चांभार वगैरे ब्राह्मणांनीं देवस्थानीं पितृस्थानीं बसून यथासांग

श्राद्ध करावें. सव्यापसव्याचा घोटाळा संभाळा बरें का गेननाईक महार. जेवतांना एकमेकांला शिवूं नका. नाहीं तर तुक्या टाकतो सोपान्याच्या पानांत भाकरी तसें येथें चालणार नाहीं. आजपासून तुह्मी लोक ब्राह्मण झालांत याचा विचार करा. आतां लौकरच तुमच्या मुलीसुद्धां आह्मीं करूं. आह्माला मात्र वेडेवेडे ह्मणायचें. मग आतां याला काय ह्मणावयाचें ? ( श्रीखंड्या प्रवेश करितो. )

**श्रीखंड्या**—महाराज, सर्व तयारी आहे. ब्राह्मण स्नानसंध्या करून नदीवरून आले नाहींत तोंच हा कार्यभाग उरकून घ्यावा. चलारे, एकएका पाटावर एक एक जण बसा मुकाट्यानें.

**गावबा**—एका पाटावर बसा आणि एका पाटावर पाय ठेवा, बरें का.

**एकनाथ**—राण्या, चला लवकर. तुह्मी मनांत कांहीं संकोच धरूं नका. स्वस्थ अंतःकरणानें तुम्हाला जें लागेल तें मागून घ्या, आणखी पोटभर जेवा. तुमचें स्वतःचें हें घरच आहे समजा. ( सर्व पडद्यांत जातात. एक वृद्ध ब्राह्मण प्रवेश करतो. )

**ब्राह्मण**—चाळ्याला आतां विसावें वर्ष लागलें. एवढाच मुलगा, पण त्याचें लग्न होण्यास मार्ग नाहीं. काय करूं या दरिद्राला ? कमीतकमी पांचशें रुपये तरी पाहिजेत. म्हटलें, येथील ब्राह्मण मंडळी सभा करून कांहीं वर्गणी करून एवढें ब्राम्हणाचें कार्य पार पाडतील; पण कांहीं नाहीं. धर्माधिकाऱ्याकडे गेलों. त्यानें अशी पैज मारली आहे कीं, एकनाथाला जर तूं क्रोध उत्पन्न केलास तर पांचशें तर काय परंतु हजार रुपये तुला देऊं. मी तर पैज मारून चुकलों. आतां पडली पंचाईत. एकनाथाला क्रोध उत्पन्न होऊन त्यांनीं मला मारिलें पाहिजे. ही गोष्ट घडून येणार कशी ? देवा, एकनाथानें माझ्या चांगल्या दहापांच श्रीमुखांत मारूंदे, म्हणजे मला रुपये मिळतील. तो म्हणतात केवळ शांतीचा आगर आहे. शांती हेंच ब्रह्म. मी दुष्टबुद्धि त्याला छळावयास आलों आहें. आतां त्याच्या घरांत डोकावून आलों तों त्यानें महारांची पंगत भोजनास बसविली आहे, त्याची बायको वाढते आहे. मनुष्यमात्राचा स्वभाव असा आहे कीं, स्वस्त्रीकडे कोणीं पापदृष्टीनें पाहिलें कीं पुरे, त्याला

मारावयास धांवावयाचें. प्रसंगोपात त्याला ठार सुद्धां मारावयाचें. परंतु हा स्वभाव एकनाथाच्या अंगीं असला मात्र पाहिजे. त्यानें मला क्रोधानें मारलें पाहिजे. नाहींतर मला कांहीं रुपये मिळत नाहींत. बाळ्याचें लग्न कांहीं होत नाहीं. देवाचें नांव घेऊन खटपट करावी. देव तरी अशा वाईट कृत्यांत आपल्याला सहाय्य कसा होणार ? ( विचार केलासें करून. ) आतां येथें पंक्तींत छपून बसावें. एकनाथाची बायको वाढायला आल्याबरोबर तिला धरतों—पुढें सुचेल तसें करतों. एकनाथानें मारलें जोड्याखालीं तर धर्माधिकाऱ्याकडून हजार पांचशें रुपये खास मिळतील. ( जातो. पंक्तींत लपून बसतो. महार पाटांवर बसून भोजन करीत आहेत असा पडदा उघडतो. )

**नाम्या**—यासनी काय म्हनत्याती बर जानकाई वहीनी ?

**जानकाई**—याला म्हनत्यात बुंदीचा लाडू.

**नाम्या**—मंग या गोळ्या गोळ्या एकाला एक कशान चिकटल्याती. खळीन व्हय, का डिकाने ?

**तुक्या**—अन खुसखुस कुडुंच कुडुंच काय करतया बर जानकाई वहीनी ? तुह्मी लयी सुग्रन हायीती. याच नाव काय हाय बर ?

**जानकाई**—याच नाव कुरडया.

**तुक्या**--मंग का गव्हाच सुत काढून त्याच्या केल्या हाईती व्हय ?

**राण्या**—गुमान म्होर पाहून जेवा झटपट नाहींतर जर का ते नदीवरून बामन आल तर खेटराखाली मारत्याल.

**गिरजाबाई**--काय लागेल तें मागून घ्या बरें का ! संकोच मानूं नका. ( ब्राह्मण पाठीवर हात ठेवतो. )

**ब्राह्मण**--( एकीकडे. ) कोण घोर कर्म हें ! साऱ्या माझ्या जन्मांत मीं असें काम केलें नाहीं. माझ्या बायकोला जर दुसऱ्यानें अशी धरली असती, तर मी नरडीचा घोट घेतला असता.

**गिरजाबाई**—अग बाई, हा कोण ह्मातारा ? यानें एकदम येऊन मला धरलें. याला ह्मणावें तरी काय ? सोडा मला. हें काय बाई बेलाशक लोकांच्या बायकाच्या अंगाला झोंबणें ह्मणजे ! याला काय ह्मणावें ? ह्मातारपणांत अक्कल जाते ह्मणतात हें कांहीं खोटें नाहीं. साठी बुद्धि नाठी.

राण्या--

कामाजी कोतवाळानें नागविलें बहुतासी ॥ हरिहराची अबरू घेतां भय नाहीं त्यासी ॥ जोहार मायबाप, जोहार, महार मी कायापुरीचा ॥ जन्मोजन्मीं वेसराखा आहे या नगरीचा जोहार मायबाप ॥ १ ॥

जानकाई--जुनाट जोगडा काळाचा काकडा डोंगरीं राहतो उघडारे ॥ झडपिला हांवे नागवाची धांवे पाठीसी लागला भील भोंडारे ॥ काजळखोपा नेटक रूपा पाहुनि भुलला तोंडारे ॥ महाभ्यासुर जटाधारी वीर्याचा चाळला लोंढारे ॥ धोंगड माझें बोलणें कान्होबा, धोंगड माझें बोलणें रे ॥ १ ॥

**एकनाथ**—कांहीं हरकत नाहीं. ब्राह्मणाला संभाळून तूप वाढ. त्यांना पडूं देऊं नको. त्यांना अगदीं दुखवूं नकोस. हें बघ, अपकाऱ्यावर जो उपकार करतो त्याला शांतीची मूर्ति ह्मणतात. त्यालाच परमार्थ लाभेल. विश्वामित्रानें हरिश्चंद्राचा नानाप्रकारें छळ केला; परंतु त्याच्या मनाची शांति ढळली नाहीं. कबीरानें स्वतःची बायको संतांना भोजन घालून तृप्त करण्याकरितां आपल्या खांद्यावर घेऊन वाण्याची कामवासना तृप्त करण्याकरितां त्याच्या घरीं नेऊन घातली. पांडुरंगा, या वेळीं माझ्या मनाची शांति ढळूं देऊं नको. महाराज, आपल्यास काय पाहिजे ? भिडावूं नका. आपल्यास कोण पाहिजे ?

**ब्राह्मण**--तुझी बायको.

एकनाथ-- अभंग.

आपुलीच दारा जरी टेके व्यभिचारा ॥ क्रोधाचा थारा अंतरीं नये ॥ १ ॥ आपुलेंच धन तस्करें नेतां जाण ॥ ज-याचें मन उद्विग्न नव्हे ॥२॥ आपुलाची पुत्र वधोनी जाय शत्रु ॥ परी मोहाचा पाझरु नेत्रीं नये ॥ ३ ॥ आपुलें शरीर गांजितां परनरें ॥ परी शांतीचें घर चळों नेदी ॥ ४ ॥ एक जनार्दनीं जया पूर्ण बोधु ॥ तोची येक साधु जगामाजी ॥ ५ ॥

**ब्राम्हण**--( गिरजाबाईस सोडून देतो. ) काय करावें, हा रागानें लाल होत नाहीं. माझ्या चार श्रीमुखांत भडकावीत नाहीं. सगळा माझा प्रयत्न फुकट. आतां माझ्या बाळ्याचें लग्न होत नाहीं. माझ्या वंशाचें नक्कल झालें. नारायणा, आतां काय करूं? आतां मला पांचशें रुपये कोण देईल ? (रडूं लागतो. ).

**एकनाथ**—महाराज आपण रडूं नका. आपल्या सेवेकरितां पाहिजे असल्यास आमचें कुटुंब घेऊन जा.

**ब्राम्हण**—छे छे ! महाराज ती माझी मातोश्री आहे, अशी पाप-बुद्धि माझ्या मनांत उत्पन्न झाली असती तर तिच्या अंगाला हात लावतांच मी जळून खाक झालों असतों.

**एकनाथ**--आपल्यावर असें कोणचें संकट आलें आहे ? या दासाच्या हातून त्याचें कांहीं निवारण झाल्यास पहा.

**गावबा**—आपण सुद्धां एखादी बायको अशीच धरून आणावी ह्मणजे झालें. पण मार खावा लागेल.

**ब्राम्हण**—महाराज, येथल्या धर्माधिकाऱ्यांनीं अशी पैज मारली होती कीं, एकनाथास जर क्रोध आणलास तर पांचशें रुपये देऊं. पांचशें रुपये मिळाले ह्मणजे माझ्या बाळ्याचें लग्न होईल, असें मनांत आणून, मीं आपल्यास क्रोध आणण्याचा प्रयत्न केला. परंतु आपण शांतीचें पाणिग्रहण केल्यानें, काम क्रोध बंदीखान्यांत टाक-ल्यानें माझी फार फजिती उडाली. आतां मीं काय करावें ? मी आपल्यास शरण आहें.

**एकनाथ**—भिऊं नका. मी आपल्यास पांचशें रुपये देतों. आपल्या चिरंजीवाचें लग्न करून देतों. तुम्ही सरळ रस्त्यानें आला असतां तर चांगलें झालें असतें. असो, वाकड्या रस्त्यानें आलांत हेंही एक प्रकारें बरें झालें. क्रोधाच्या आधीन होतों कीं काय, याची एक कसोटीच झाली. अरे श्रीखंड्या, उमीचंदाला म्हणावें, या ब्राम्ह-णाला पांचशें रुपये द्यावयाला सांगितलें आहे. यावें महाराज आपण. ( ब्राम्हण जातो. धर्माधिकारी व ब्राम्हण मंडळी पळीपंचपात्र्या दर्भ वगैरे घेऊन प्रवेश करतात. महारांची पंगत बसलेली पाहून थबकून उभे राहतात. अत्यंत रागावतात. महार पळून जातात. )

**धर्माधिकारी**—पृथ्वीप्रळय काळपावेतों रवरव नरकांत पडशील. तुला कुष्ट भरेल. तुला महारोग होईल. अंध होशील. पंगु होशील. पाषाण होऊन पडशील. आतां काय करूं ? काय बोलूं—

**एकनाथ**—परमेश्वरा, हें आकाश जरी माझ्यावर कोसळून पडलें अथवा हा ब्रह्मांड गोल जरी फुटून गेला तरी हरकत नाहीं. पण प्राणीमात्रावर सारखीच ममता करण्याची बुद्धि मला दे.

**धर्माधिकारी**—आतां तुझ्या बापाचें श्राद्ध महारांकडूनच करीव. आतां ब्राह्मणपणास मात्र तूं खास खास आंचवलास. क्रोधानें माझें मस्तक भणाणून गेलें आहे. वाटतें कीं, तुझ्या नरडीचा घोट घ्यावा.

**एकनाथ**—फार चांगलें आहे महाराज. या देहाचें सार्थक झालें, असें मी समजेन. सत्कार्यीं देह पडला यापेक्षां अधिक काय पाहिजे. हं आटपा लवकर. टाका मला खाऊन. ( पुढें सरतो. )

**धर्माधिकारी**—शिवूं नको मला. लांबून बोल. तूं चांडाळ आहेस. अरे श्राद्धाचा स्वयंपाक महारांना खावयास घातलास, आतां श्राद्ध होणार कसें ?

**एकनाथ**—कांहीं हरकत नाहीं. सर्व स्वयंपाक नवा करवितों. सर्व जागा सारवून काढतों. पुनः स्नानें करून सर्व स्वयंपाक नवा करून श्राद्ध करूं ह्मणजे झालें.

**धर्माधिकारी**—आतां जर हाडाचा ब्राह्मण असशील तर आमच्या पितरांना घेऊन ये जेवायला. बाकी आमच्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत तर आह्मीं तुझ्या घरीं अन्न घेणार नाहीं.

**गावबा**—आपल्या ह्मणण्याप्रमाणें पितर आणले तर मग ?

**धर्माधिकारी**—मग त्यांच्या पायां पडूं. आणखी याला परमेश्वर समजूं.

**एकनाथ**—इतर गांवांतले हजार ब्राह्मणांस भोजनास घातलें तर क्षेत्रांबला एक जेवल्याप्रमाणें आहे. क्षेत्रवासी हजार जेवले तर एक वेदपाठक जेवल्याप्रमाणें आहे. एक हजार वेदपाठक जेवले तर एक पंडित जेवल्याप्रमाणें आहे. एक हजार पंडित जेवले तर एका संन्याशाबरोबर. एक हजार संन्यासी एका परमहंसाबरोबर. हजार परमहंस एका ब्रह्मवेत्त्याबरोबर. ब्रह्मवेत्ता भोजन घालून तृप्त केला तर

हरिहर तृप्त होतात. असे अनंत ब्रह्मवेत्ते एका नामधारकाबरोबर आहेत असें शास्त्रोक्त आहे. राण्या महार मोठा नामधारक आहे. भगवान् त्याच्या घरीं प्रत्यक्ष जेवले आहेत. तुह्मीं स्वतः पाहिलें आहे. ह्मणून त्याला जेवायला घातलें. शिवाय महारांचें मन या अन्नावर गेलें होतें. त्यांचे आत्मे भुकेनें व्यांकूळ झाले होते.

**धर्माधिकारी**—तें कांहीं मी जाणत नाहीं. आतां पितरच आले पाहिजेत श्राद्ध चालवायला. त्याशिवाय तुझ्या घरीं कोणी अन्न ग्रहण करणार नाहींत. हे आह्मीं चाललों. ( सर्व ब्राह्मण जातात )

**एकनाथ**--( बायको, श्रीखंड्या व गावबा यांना उद्देशून ) कांहीं हरकत नाहीं. आपलें अंगण सर्व झाडून सारवून पुनः तयार करा. सर्व जागा प्रथम धुवून काढा. सर्वांना स्नानें करावयास सांगा. पुनः सर्व स्वयंपाकाची सिद्धता करा. हें असें होणारच. हें मी तुला पूर्वींच सांगितलें होतें. असो, तुम्ही आपापल्या कामाला जा. (एकनाथ खेरीज करून सर्व जातात.) पांडुरंगा, शंखासुराचा जीव घेतलास पण त्याचें कलेवर जसें हातांत मिरवितोस, त्याचप्रमाणें माझ्या शरीरांत प्रवेश करून माझ्याही देहाला वागवितोस. माझ्या शरीराचें चलनवलन अथवा मी जीं जीं कर्मे करितों तीं तीं तुझ्याच सत्तेनें होतात. माझ्या देहांतलें मीपण हें तूंच आहेस. दृष्टीनें जें जें कांहीं पहातों, कानानें ऐकतों, जिभेनें चव घेतों, त्या पाहण्याच्या, ऐकण्याच्या, चव घेण्याच्या सर्व क्रिया तूंच करतोस. मनाचें चपळपण तूंच आहेस. विवेकानें त्याचें आकलन करणारा तूंच आहेस. जागृति, स्वप्न, सुषुप्ति ह्या अवस्था तूंच आहेस. मला केवळ कळसूत्री भावल्याप्रमाणें पुढें केलें आहेस; पण माझ्या हातून सर्व क्रिया करून घेणारा सूत्रधार तूंच आहेस. सुवर्णाचे भिन्न भिन्न अलंकार केले तरी ते ज्याप्रमाणें सुवर्णपणाला सोडीत नाहींत, अरुणोदय आणि सूर्यप्रकाश एकच, पक्षी आणि त्याचे पंख एकच, समुद्र आणि त्याच्या लाटा एकच, वाद्य आणि त्याचा नाद एकच, त्याप्रमाणें भक्त आणि देव आहेत. ज्या ज्या क्रिया भक्तांनीं केल्या, त्या त्या देवानेंच केल्याप्रमाणें आहेत. भक्ताचे मनोरथ पूर्ण करण्याचें काम देवाचें आहे. या प्रसंगीं आपण धर्माधिकारी शास्त्री, पंडित

यांचे पितर होऊन यावें. श्राद्धाचा क्षण आपणच घ्यावा. श्राद्ध यथासांग चालवून भोजन करावें हें ह्या दीनाचें चरणापाशीं मागणें आहे. जयजनार्दन--जयजनार्दन--अहाहा, ही पहा पितरांनीं भरलेलीं दिव्य विमानें आकाशमार्गें खालीं उतरूं लागलीं आहेत. ( जातो. धर्माधिकारी व ब्राह्मण प्रवेश करितात. )

**धर्माधिकारी**—आज त्याची खूप फजिती उडाली. आतां त्याच्या घरीं जाऊं. ब्राह्मणांची व्यवस्था काय केली तें मला पहावयाचें आहे त्याला पाहिला कीं, माझें पित्त खवळून जातें. या प्रसंगीं तो माझ्या कचाट्यांत असा सांपडला आहे कीं, मी त्याचा कान धरून, त्याला वाटेल तसा वांकवीन. श्राद्धाचा स्वयंपाक महारांच्या पदरांत घालतो ! आतां कोण श्राद्ध चालवितो तें पाहूं या.

**त्रिविक्रम**--चला आपण त्याच्या घराकडे जाऊं. आड बाजूला लपून बसूं. काय काय चमत्कार होतो तो पाहूं. मला वाटतें, बहुतकरून नवीन स्वयंपाकाची तयारी करून ब्राह्मणांची वाट पहात दारांत उभा असेल. पण पैठणांत याला ब्राम्हण मिळणार तरी कसा? आपण बोलत बोलत अगदीं त्याच्या घराजवळ आलों. ( पडदा वर होतो. विमानांत बसलेले पितर दिसतात.

**धर्माधिकारी**—अरे, हें मी काय पाहतों आहें ! हे माझे बाबा ! यांना मरून अजून वर्षसुद्धां झालें नाहीं, तों ते येथें कसे आले ! अहो बाबा—अहो बाबा—

**त्रिविक्रम**--आणखी माझे आजोबा हे तरी येथें कसे आले ? अहो आजोबा-अहो अजोबा-

**धरणीधर**--आणखी आमचे जेष्ठ बंधु अच्युतशास्त्री कसे आले ! अहो दादा-अहो दादा-

**त्रिविक्रम**--आणखी आमचे काका राघवेंद्राचार्य कसे आले ? अहो काका-अहो काका-( एकनाथ प्रवेश करतो. )

**पितर**--अहो धर्माधिकारी ह्मणविणाऱ्या ब्राह्मणांनो, आह्मी तुमचे प्रत्यक्ष बाप तुह्मांला काय सांगतों तें ऐका. तुह्मी त्रिकाल स्नानें करितां, वेदांत पारंगत झालेले आहांत. शास्त्राचें अध्ययन पूर्ण झालेलें आहे. आपल्यास पंडित ह्मणवितां, ज्ञानी ह्मणवितां, वेदो-

क ब्राह्मण ह्मणवितां, धर्माधिकारी ह्मणवितां, ग्रामाधिपति ह्मणवितां, काय पाहिजे तें आपल्यास ह्मणवितां. अधिकाराच्या जोरावर दुसऱ्याचा छळ करितां. परंतु जोंपावेतों कामक्रोधादि षड्विकारांचा त्याग केला नाहींत, जोंपावेतों नामधारकाचा ह्मणजे श्री एकनाथाचा द्वेष तुमच्या मनांतून गेलेला नाहीं, तोंपावेतों तुह्मी परमेश्वर लवमात्र जाणिला नाहीं. तुमची क्रिया निष्फळ आहे, तुह्मी मुक्त होणार नाहीं. तुम्ही एकनाथाला शरण जा. म्हणजे तुमचाच काय, पण तुमच्या पुढच्या मागच्या शेंकडों पिढ्यांचा उद्धार होईल. तुम्हीं जे जे एकनाथाला शाप दिले आहेत ते ते उःशाप देऊन नष्ट करा. रात्रंदिवस त्याची सेवा करा, कारण तो प्रत्यक्ष पांडुरंगाचा अवतार आहे. धर्माची ग्लानी झाली, त्याची पुनः स्थापना व्हावी, भागवत धर्माचा प्रसार व्हावा ह्मणून स्वतः ज्ञानेश्वरमहाराजांनीं अवतार धारण केला आहे. ( सर्व विमानें वर जातात. विठ्ठलनामाचा गजर होतो. दिव्यप्रकाश पडतो. धर्माधिकारी व सर्व ब्राम्हण एकनाथाला साष्टांगनमस्कार घालतात. अशा स्थितींत पडदा पडतो. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—अळंकापुरांतील श्रीज्ञानेश्वराचें देवालय.

---

( एकनाथ विठ्ठलनामाचा गजर करीत दिंडी घेऊन प्रवेश करतो. )

**एकनाथ**—धन्य धन्य अळंकापूर ! ज्या ठिकाणीं चौऱ्यायशी सिद्धांचा राजा श्रीज्ञानेश्वर नांदत आहे, अशा स्थळाला जो दृष्टीनें पाहील, तो वैकुंठभुवनास केवळ टाळ्यांचा गजर करीत येईल. सर्व पूर्वजांचा उद्धार करील. या अळंकापुरीचे काष्ठ–तृण–पाषाण–वृक्ष देवच आहेत. तेहतीस कोटी देव येथें पक्षी होऊन येतात. येथील इंद्रायणी नदींत अस्थींचें पाणी होऊन जातें. पापी जनांचें पाप हरण करण्यास पंढरीहून हें सोपें आहे. कळीकाळ मोठा कोपायमान झाला, तरी अळंकापुरीस त्याचें कांहीं चालावयाचें नाहीं. जे लोक आळंदीच्या यात्रेला जातात ते पांडुरंगाचे मोठे लाडके भक्त होत. भूवैकुंठ जें

पंढरपूर त्याच्याहून याचा महिमा विशेष आहे. तात्पर्य, जन्मास आल्यासरसें निदान एकवार तरी अळंकापुरास जावें. मला वाटतें, द्वापारयुगीं श्रीकृष्णांनीं अर्जुनाला गीता सांगितली, त्यावेळीं इतर भाविक जनाला तिचा पूर्ण लाभ मिळाला नाहीं ह्मणूनच कीं काय, पुनः श्रीकृष्णांनीं ज्ञानेश्वराचा अवतार घेऊन भावार्थदीपिका ह्मणजे ज्ञानेश्वरी आह्मां प्राकृतजनासाठीं निर्माण केली. अजान वृक्षाचीं पानें भक्षून जो ज्ञानेश्वरीचें पठण करील त्यास ज्ञान प्राप्त झाल्याविना राहणार नाहीं. तीन सप्तकें जो श्रवण करील, तो ज्ञानसंपन्न होईल. भागीरथीप्रमाणेंच जो इंद्रायणींत स्नान करील तो मोक्षपदाला जाईल. सिद्धेश्वराच्या दर्शनानें सहज कैवल्य प्राप्त होणार आहे. ( दिंडींतील लोक विठलनामाचा गजर करीत पडद्यांत जातात. गावबा व श्रीखंड्या प्रवेश करितात. )

**श्रीखंड्या**—महाराज, आपण हजारों यात्रेकऱ्यांनीं बरोबर घेऊन आलांत. या प्रांतीं तर सांप्रत दुष्काळ पडलेला आहे. लोकांना खावयास अन्न नाहीं. अन्नावांचून शेंकडों लोक तडफडून मरत आहेत. येथें कांहीं सामान विकत मिळत नाहीं. आज दोन दिवस लोकांना फाके चालले आहेत. भाजीपाल्याचें तर नांवच नको.

**गावबा**—पण नदीला पाणी मात्र पुष्कळ आहे. त्याजवरच तूर्त भूक भागवावी. दुसरें काय ? ज्ञानेश्वरमहाराजांची मर्जी ! माझी आई मला ह्मणत होती तूं इतका लांब जाऊं नको; पण मी हट्टानें ऐकलें नाहीं. ( रडतो. )

**श्रीखंड्या**—( लांब पाहिलेसें करून ) पण हा पाहिला का बैलांचा तांडा. मला वाटतें पांचशें बैल असतील. हा कोणी तरी मोठा लमाण, नाहींतर व्यापारी वाणी वगैरे धान्य घेऊन इकडेसच येत आहे बरें का ? हें एक मोठें काम झालें ह्मणावयाचें. आपल्या मंडळीजवळ पैसे पुष्कळ आहेत, पण येथें पाहतों तों गांव सर्व उजाड पडलेला आहे. लोक सर्व बाहेरगांवीं निघून गेले. ( कानडा वाणी प्रवेश करितो. )

**कानडा**—हजारों हजार यात्रेकरू आले आहेत, असें पाहून मी मुद्दाम सर्व प्रकारचा माल विक्रीकरितां येथें घेऊन आलों आहें.

तूप, साखर, मैदा, भाजीपाला, फळफळावळ, वैरणकाडी, कापडचोपड, काय पाहिजे तो माल माझ्याजवळ विक्रीस तयार असून, भावाला अगदीं माफक आहे. पैशांची तक्रार पडणार नाहीं. कारण माझी खात्री आहे कीं, ज्या अर्थी आपण सर्व यात्रा करण्याकरितां आलां आहां, त्याअर्थीं माझे गरिबाचे पैसे खास खास बुडवून जाणार नाहींत. श्रीज्ञानेश्वरमहाराज तुह्मांला अशी बुद्धि देणार नाहींत. सारांश, पाहिजे तो माल माझ्याजवळून विकत घ्यावा.

**गावबा**—मात्र पैसे मुळींच मागूं नको, ह्मणजे तुझ्यासारखा माणूस नाहीं.

**श्रीखंड्या**—तूं तर आह्मांला प्रत्यक्ष पांडुरंगच भेटलास किंवा ज्ञानोबाच भेटलास. आह्मी आतां सगळे केवळ उपाशी मरणार होतों. काय करावें हें आह्मांस सुचत नव्हतें, पण इतक्यांत तुला येथें येण्याची परमेश्वरानें बुद्धि दिली. तूं आह्माला परमेश्वर दिसतोस.

**कानडा**--महाराज, तुह्मी तसाच मी. तुह्मांला जसें कोणी परमेश्वर ह्मणणार नाहीं, तसेंच मलाही कोणी ह्मणणार नाहीं.

**एकनाथ**--तुह्मी आतां असें करा कीं, एक मोठें थोरलें दुकान मांडा. त्या ठिकाणीं सर्व माल ठेवा. आमच्या लोकांकडून पैसे घेऊन लागेल तो माल त्यांना देत जा. तुमचे आमच्यावर अत्यंत उपकार झाले. या वेळीं हजारों लोकांना तुह्मीं जीवदान दिलें. तुमच्यावर पांडुरंग कृपा करील.

**कानडा**—महाराज, आपल्या पायाचा हा दास आहे. काय वाटेल तो माल सांगा, हजर आहे. मालाची किंमत आपण पैठणास गेल्यावर वर्ष सहा महिन्यांनीं सावकाश पाठवून द्या.

**गावबा**--मुळींच पाठवावयाची नसल्यास माझ्या आईकरितां एक छानदार लुगडें द्या, खणाविषयीं मी कांहीं बोलतच नाहीं.

**कानडा**--एक सोडून दहा लुगडीं घ्या महाराज.

**एकनाथ**--त्याच्या नादीं लागूं नका. तो आपला वेडसर आहे.

**कानडा**--मला, असलीं रत्नें फार आवडतात. अहो, प्रत्यक्ष देव तरी गवळ्यांच्या पोरांबरोबरच खेळत होता.

**एकनाथ**--रोज आमच्याकडे श्री ज्ञानेश्वराच्या प्रसादाला येत जा बरें का.

**कानडा**--महाराजांच्या प्रसादाचा लाभ मिळाल्यावर आणखी काय पाहिजे? आपला मुक्काम किती दिवस होणार?

**एकनाथ**--ज्ञानेश्वरमहाराजांचा मला असा दृष्टांत झाला आहे कीं, अजानवृक्षाच्या मुळीचें त्यांच्या कंठाला वेष्टण झालें आहे. समाधि उकरून तेवढी मुळी बाजूला केली, व समाधीचें काम मुस्तकीम तयार केलें कीं, आह्मीं त्यांची आज्ञा घेऊन परत जाऊं. मग आतां या कामाला काय अवधि लागेल तो लागो.

**कानडा**—आपल्यास ज्ञानेश्वरमहाराजांचा दृष्टांत झाला. आपण परम थोर आहांत. केवळ साधु आहांत. असो. महाराज, जातों मी आता. दुकानाची तयारी करतों. (एकनाथाच्या पायां पडून जातो.)

**श्रीखंड्या**--पाणी लागेल तर मजकडून घेत जा हो.

**गावबा**--भोजनाला ब्राह्मण घातलेत, आणखी दक्षिणा पुष्कळ असली, तर आह्मांला सांगा हो.

**एकनाथ**—बरें, तुह्मी दोघे जा आतां बिऱ्हाडीं. सगळी सोय लावून ठेवा. समाधि उकरण्याचें काम कोठवर आलें आहे तें मी पाहून येतों. (जातो.)

**श्रीखंड्या**—चला गावबा. आह्मी आणतों पाणी आणि तुह्मी करा स्वयंपाक. पण कालच्यासारखें करूं नकोहो. नाहीं तर खिरीचा मसाला कढींत आणि कढीचा मसाला हिंगजीरे मीठ मिरच्याचे तुकडे वगैरे खिरींत! साखर, वेलदोडे, बेदाणा, बदामाच्या कापा सगळ्या कढींत तरंगायला लागल्या! मी जरा बाहेर गेलों मात्र, तों माझ्यावर एवढा उपकार केलास.

**गावबा**--पण एकनाथाला कांहीं ओळखतां आलें नाहीं.

**श्रीखंड्या**--अरे नामामृताचें जो भोजन करणार, त्याला या असल्या जेवणाची चव कोठून असणार? जे राजहंस नित्यशः मोत्यांचा चारा खाणार, त्यांच्यापुढें तुझ्या खिरीची चव काय? बरें चला आतां. तुह्मी फार शहाणे आहांत. आतां तर झालें? (उभयतां

जातात. पडदा वर होतो. एकनाथ भुयारांत श्रीज्ञानेश्वराच्या समीप जातो. ज्ञानेश्वराचा दिव्य प्रकाश पडतो. )

**एकनाथ**--( साष्टांग प्रणिपात करून उभय हस्त जोडून ) महाराज ज्याप्रमाणें गंगेला थिल्लरोदकाचा अभिषेक, अथवा अमृताला गुळाचा नैवेद्य, अथवा सूर्याच्यापुढें दिव्याचा प्रकाश, त्याप्रमाणें मीं केलेली स्तुति आहे.

## ओव्या.

**ॐनमो श्रीज्ञानेश्वरा ॥ आदिनाथ निराकारा ॥ तुझिया कृपें संसारा ॥ तरलों यथा ॥ १ ॥ तूं तत्वज्ञानवेत्ता ॥ तूं सकळ योगियां सिद्धिदाता ॥ तूं मूर्तिमंत ज्ञान तत्वता ॥ भूतहृदयीं ॥ २ ॥ अविद्येचें अविद्यापण गेलें ॥ आणि मायेचें मायिकत्व मावळलें ॥ दोन्ही विरोनि जें ठेलें ॥ तें तूचि होसी ॥ ३ ॥ तूंचि भवसिंधूचें तारू ॥ तुझेनि नामस्मरणें साचारू ॥ देखती पैलपारू ॥ अज्ञान जीव ॥ ४ ॥ ज्ञानेश्वर हीं चार अक्षरें ॥ जो जप करी निर्धारें ॥ त्यासी ज्ञान होय सत्वरें ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥ ५ ॥**

महाराज, मी कृतार्थ झालों. आज मला श्रीगुरुजनार्दन स्वामी यांचें प्रत्यक्ष दर्शन झालें. अनंत जन्मीं कर्म, उपासना, तप, योग, जप, अनुष्ठान आणि साधूंची केलेली सेवा इत्यादिकांचें पुण्य आज मला मूर्तिमंत दृष्टीस पडलें. स्वप्नामध्यें सूर्यासारखा तेजस्वी, मदनाप्रमाणें सौंदर्ययुक्त, कंठामध्यें तुलसीकाष्ठमाला आणि कपाळीं मुद्रांकित गोपीचंदन लावून मुखानें श्रीविठ्ठल या नामाचा उच्चार करीत आलेले आपण मला प्रत्यक्षच दिसलां. ( श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या कंठास वेढा घातलेली अजानवृक्षाची मुळी काढून बाजूला लावतो. )

**श्री ज्ञानेश्वर—** श्लोक.

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ १ ॥**

या भगवंताच्या उक्तीप्रमाणें तुझी उत्पत्ति झाली आहे. अज्ञानरूपी अंधःकार तूं नाहींसा केलास. साधूंचा मान वाढविलास. अविवेकाची काजळी विवेकाच्या दीपानें नाहींशी केलीस. आज-

पावेतों भागवतधर्मांचा प्रसार करून शेंकडों लोक भक्तिमार्गाला लाविलेस. पुढेंही जे जे ह्मणून तुझ्या ग्रंथाचें परिशीलन करतील ते ते " भक्त " या संज्ञेस पात्र होतील. हें गीतेवरील भाष्य, ज्याला मीं भावार्थदीपिका असें नांव दिलें आहे तें मी तुला प्रसाद ह्मणून देतों. यांत किमया, वनस्पतींचे शोध, मंत्रशास्त्र, इत्यादिकांवर ओव्या घातल्या आहेत. या ओव्यांच्या वाचनापासून या कलियुगांत भयंकर प्रसंग ओढवतील, करितां या विषयांवर जितक्या ओव्या असतील तितक्या काढून त्यांऐवजीं स्वकपोलकल्पित ओव्या घाल. हें पुस्तक तूं प्रतिशुद्ध कर. कारण कीं, पाठांतरीं सर्वत्र हें फार अबद्ध झालें आहे.

**एकनाथ**--महाराज, गीतेची थोरवी म्यां पामरानें काय जाणावी. आपल्या मुखानें एकवार तिचें महत्व समजल्यास हा दासानुदास स्वतःस फार धन्य धन्य मानील.

**श्रीज्ञानेश्वर**--एकनाथ, पार्वतीनें गीतेची थोरवी मला सांगा, ह्मणून शंकरास प्रश्न केला त्यावेळीं त्यांनीं उत्तर केलें कीं, हे देवी, ज्याप्रमाणें तुझें स्वरूप अगम्य, त्याप्रमाणेंच गीतेचें अगम्य आहे. वेदाला अगम्य श्रुतीला अगम्य, असें आहे. कारण, प्रत्यक्ष परमेश्वराची ही वाणी आहे. गीता सर्व कथांचें जन्मस्थान, विवेकतरूचें उद्यानभूमिका, सर्व विद्यांचें मूळपीठ, शास्त्रांचा आधार, सर्व धर्मांचें माहेरघर, साधुजनांचा जिव्हाळा, आणि सरस्वतीदेवीचें भांडार अशी आहे. चातुर्य येथें शहाणें झालें. नवरसाला सौंदर्य येथूनच प्राप्त झालें. भ्रमरानें नेलेले पराग ज्याप्रमाणें कमलपुष्पें जाणत नाहींत, त्याप्रमाणें आपल्या इंद्रियांना नकळत हिचा परिणाम आपल्या मनावर होतो. आह्मीं केलेलें भाष्य म्हणजे ज्याप्रमाणें टिटवीनें आपल्या चोंचीनें समुद्र उपसून काढण्याचा प्रयत्न करावा, अथवा मुंगीनें गरुडाला पाठीवर घेऊन जावें, त्याप्रमाणें आहे. परंतु मला फक्त श्री गुरु निवृत्तींच्या चरणांचा आधार आहे. त्यायोगें मीं कांहीं तरी गीतेचा भावार्थ लिहिला आहे. नित्य नेमानें जो याचें पठण करील, अथवा जो नुसता गीता या शब्दाचा जप करील, तो भवसिंधु सहज [illegible] पण त्याची पुण्याई किती आहे हें हरिहर ब्रह्मा हे

सांगूं शकत नाहींत. त्याला त्रैलोक्याचें तीर्थाटण घडलें. वैकुंठ त्यानें आपलें राहतें घर केलें. वाराणसीच्या यात्रा त्यानें असंख्य केल्या. त्यानें अगणित लक्ष भोजनें घातलीं. मेरुपर्वतासमान त्यानें सुवर्णाचा धर्म केला. कोट्यानकोटी साधूंचें दर्शन त्याला घडलें, वाचक अथवा श्रोता नष्ट चांडाल दुर्जन असेल, परद्वारीं गमन करणारा, मात्रागमनी, तस्कर, सुरापान करणारा, मित्रद्रोही, कृतघ्न, असा जरी असला, तरी गीतेच्या आवर्तनानें त्याला मुक्ति खास मिळेलच, असें श्रीशंकरानें पार्वतीला सांगितलें आहे. तूं आतां पैठणास जा. तुझा कार्यभाग झाला. ( एकनाथाच्या मस्तकावर हात ठेवितात. पोथी हवालीं करितात. पुष्पांची माळ आपल्या गळ्यांतील त्याच्या गळ्यांत घालतात. )

**एकनाथ--** **अभंग.**

**संताचा महिमा वर्णावा किती ॥ अलक्ष लक्षमूर्ति ज्ञानोबा तो ॥ १ ॥ अर्जुना संकट पडतां जडभारी ॥ गीता सांगे हरि कुरुक्षेत्रीं ॥ २ ॥ तोची अवतार धरी अलंकापुरीं ॥ ज्ञानदेवसुंदर तारावया ॥ ३ ॥ गीता शोधोनिया अर्थ तो काढिला ॥ ग्रंथ तो निर्मिला ज्ञानेश्वरी ॥ ४ ॥ जगाचा उद्धार ज्ञानदेवनामें ॥ साधन हें आणिक नेणें न करी कांहीं ॥ ५ ॥ एका जनार्दनीं ज्ञानदेव नाम ॥ पावेन निजधाम संतांचें तें ॥ ६ ॥**

( एकनाथ भुयाराचे बाहेर येतो. पडदा पडतो. श्रीखंड्या, गावबा व कित्येक टाळकरी प्रवेश करितात. )

**श्रीखंड्या**—महाराज, काय हें आपलें जाणें ! आठ दिवस आपण तेथें करीत होतां तरी काय ?

**एकनाथ**—आठ दिवस ! काय बोलतोस तरी काय ! मला वाटतें फार झालें तर मी चार घटका आंत राहिलों असेन. एकूण संतांच्या संगतीनें जर एक वर्ष घालविलें तर एका दिवसाप्रमाणेंच वाटावयाचें, यांत कांहीं संशय नाहीं. असो. तुमची पैठणास जाण्याची आतां तयारी आहे काय ?

**श्रीखंड्या**--महाराज, आमच्याकडून कांहींच हरकत नाहीं. आमची निघण्याची आतां तयारी आहे.

**गावबा**--मला वाटतें, त्या कानड्यावाण्याकडून मीं आणखीं कापड घेतलें असतें तर बरें झालें असतें. मीं आपल्याला धोतरजोडा सुद्धां घेतला नाहीं. ( डोळे चोळतो. )

**एकनाथ**--गावबा, तुला वाईट वाटण्याचें कारण काय ? तुला काय त्या वाण्यानें फसविलें होय ?

**गावबा**--मींच त्याला फसविलें. पण आणखी फसविलें नाहीं म्हणून वाईट वाटतें. तो पळून जाणार असें जर मला अगोदर कळतें तर हजार पांचशें रुपयांचा माल तरी घेतला असता.

**एकनाथ**--मला तुझ्या बोलण्याचा अर्थ कळला नाहीं. श्री-खंड्या, हा काय म्हणतो आहेरे ?

**श्रीखंड्या**--महाराज, तो कानडा वाणी खरोखर ज्ञानेश्वर-महाराजच होते. मीं अगोदरच भविष्य केलें होतें, पण त्या वेळीं आपल्यास भुरळ पडल्याप्रमाणें झालें. हजारों रुपयांचें सामान म्हणजे कापडचोपड, दागदागिने, वाटेल तो माल त्यानें आपल्या पैठणकर मंडळींना उधार दिला. आतां आज आपण जाणार आहों हें त्याला कसें समजलें कोण जाणे. परंतु आज सकाळपासून तो एकाएकीं नाहींसा झाला आहे. त्याचे नौकर चाकर एक सुद्धां जाग्यावर नाहीं. आतां त्याच्या पैशाचें काय करावें ? पैसे द्यावे कोणाला ?

**गावबा**--मला द्यावे. म्हणजे मी लग्न करीन आणखी दहा पांच हत्ती बाळगीन.

**एकनाथ**--अहाहा ज्ञानेश्वरमहाराज ! तुम्ही आम्हां दीन जनाकारितां किती तरी हे श्रम घेतलेत !

### अभंग

**जाले ज्ञानदेव वाणी । आले सामुग्री घेऊनी ॥ १ ॥**
**पर्वकाळ द्वादशी । दिली सामुग्री आम्हासी ॥ २ ॥**
**ज्ञानदेवाच्या चरणीं ॥ शरण एका जनार्दनीं ॥ ३ ॥**

**श्रीखंड्या**—महाराज, आतां या पैशाचें काय करावयाचें ? जवळ जवळ लाख रुपयांची रक्कम माझ्याजवळ येऊन पडली आहे.

**गावबा**—मला वाटतें, सर्व पैसे नदीच्या डोहांत टाकून द्यावेत, म्हणजे बिचाऱ्या माशांचें पोट तरी भरेल.

**एकनाथ**--श्रीखंड्या, मला असें वाटतें कीं, आपण ही रक्कम गरीब लोकांना धर्म करून टाकावी. हल्लीं येथें भयंकर दुष्काळ पडलेला आहे. अशा वेळीं आपण त्यांना पैशाची मदत केल्यास परमेश्वर संतुष्ट होईल. याचप्रमाणें करावयाचें. ठरला बेत. चला आतां आपण पैठणाचा मार्ग धरूं. ( जाले ज्ञानदेव वाणी, हा अभंग म्हणत जातात.)

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**–पैठणांतील रस्ता.

---

( एक ब्राह्मण प्रवेश करतो. )

**ब्राह्मण**--( एकीकडे ) आज बारा वर्षें झालीं द्वारकेंत भगवंतांचें प्रत्यक्ष दर्शन व्हावें ह्मणून मी तपश्चर्या करीत बसलों होतों. शेवटीं मला दृष्टांत झाला. जगन्माता देवी रुक्मिणी इनें स्वप्नांत येऊन असें सांगितलें कीं, भगवान् द्वारकेंत नाहींत. तूं विनाकारण आपल्या जिवास कष्ट कां देतोस ? मी प्रत्यक्ष त्यांची अर्धांगी ह्मणवितें पण आज छत्तीस वर्षे होत आलीं, भगवंतांनीं माझें तोंड पाहिलें नाहीं. प्रथम बारा वर्षे एकनाथाच्या मागें देवानीं ध्रुपद धरिलें. एकनाथास माहीत नाहीं. नंतर बारा वर्षे एकनाथाच्या मुखानें भागवत श्रवण केलें. एकनाथानें जाणिलें नाहीं. आतां बारा वर्षे होत आलीं, एकनाथाच्या घरीं कृष्ण श्रीखंड्या या नांवानें पाणी भरीत असतात. तुला दर्शन घेण्याची इच्छा असल्यास तूं पैठणास जा. श्रीखंड्याचा शोध एकनाथाच्या घरीं कर, म्हणजे तुला प्रत्यक्ष दर्शन होईल. ज्या अर्थी प्रत्यक्ष भगवान् एकनाथाच्या घरीं स्वतः राबत आहेत, त्या अर्थी दुसरे देवही अन्य रूपानें राबतच असतील. असें देवी रुक्मणीनें मला सांगितलें. माझ्या नवऱ्यास असा निरोप सांगा म्हणून सांगितलें आहे कीं,–आपण तरी द्वारकेस या नाहींतर मी तरी पैठणास येतें. आपण नाथाच्या घरीं पाणी भरा. मी भांडीं घासीन, चूल पोतेरें करीन, नाहींतर नाथाच्या बायकोचीं बाळंतपणें करीन. ( श्रीखंड्या प्रवेश करतो. )

**श्रीखंड्या**--चांगला सुखानें एकनाथाच्या घरीं होतों, पण आलें, काळाचें बोलावणें आलें. हा ब्राम्हण एक माझा दावेदारच आहे म्हणावयाचा. ब्राम्हण मोठे हट्टी. त्यांच्यापुढें माझें कांहीं चालत नाहीं. असो, आतां बोलून काय उपयोग ?

**ब्राह्मण**—अहो दादा, मला नाथमहाराजांचें घर दाखविण्याची कृपा कराल काय ?

**श्रीखंड्या**—कशालारे बाबा ?

**ब्राह्मण**—तेथें एक श्रीखंड्या नांवाचा ब्राह्मण त्यांच्या घरीं पाणी भरीत असतो त्याला भेटावयाचें आहे.

**श्रीखंड्या**—श्रीखंड्या तर माझा मोठा जिवलग मित्र आहे. तो आणखी मी जोडीनेंच त्यांच्या घरीं पाणी भरीत असतों. माझें नांव माधव. पण कायहो महाराज, त्याच्याशीं तुमचें काय काम आहे तें मला कृपा करून सांगाल काय ? पण फार गुप्त असल्यास नका सांगूं.

**ब्राह्मण**—गुप्त ह्मणजे इतकें आहे कीं, जसा कपड्यांत बांधून विस्तव ठेवावा किंवा गारेच्या ढिगांत हिरा लपवावा, किंवा भांगेंत तुळस लपवावी, किंवा वेड्यांत पंडित लपवावा, किंवा पाखांड्यांत साधु लपवावा त्याप्रमाणें झालें आहे. अहो, तो श्रीखंड्या ब्राह्मण ह्मणजे प्रत्यक्ष—

**श्रीखंड्या**—चोर आहे कीं काय ? तरीच बरें मला त्याचा अनेक वेळां संशय आला, पण मी आपला कांहीं बोललों नाहीं.

**ब्राह्मण**—चोर तर तो आहेच, पण त्याशिवाय—

**श्रीखंड्या**—ह्मणजे चोरीपेक्षां मोठा आरोप त्याच्यावर आहे कीं काय ?

**ब्राह्मण**—चोरीपेक्षां जबरदस्त आरोप त्याच्यावर 'व्यभिचारी' असा आहे. आणखी जे लोक त्याच्या व्यभिचाराचें वर्णन करितात त्यांची गणना अत्यंत शहाण्या लोकांत केली जाते. प्रत्यक्ष शुकाचार्यांनें सुद्धां त्याच्या व्यभिचाराचें मोठ्या प्रेमानें वर्णन केलें आहे.

**श्रीखंड्या**--श्रीखंड्या व्यभिचारी ! हें मी आजच ऐकतों. तुमचे जवळ कांहीं प्रत्यक्ष प्रमाण आहे काय असें ह्मणावयाला ?

**ब्राह्मण**—श्रीखंड्या कोण आहे हें जर मीं तुह्मांला सांगितलें तर तुह्मांला वेड लागेल वेड. त्याला तुह्मी पाहिल्याबरोबर बसल्या जागींच तुमची समाधि लागेल.

**श्रीखंड्या**—तर मग सांगाच हो मला श्रीखंड्या कोण आहे तो ?

**ब्राह्मण**—तुमचा कान इकडे करा. ( कानांत सांगतो. )

**श्रीखंड्या**--अरेरे घात झाला. मीं त्याच्या संगतीला इतके दिवस राहून फुकट घालविले. असो आपलें नशीब, पण कायहो भटजीबुवा, तुम्हीं त्याला आणखी व्यभिचारी म्हणतां तें कसें बरें ?

**ब्राह्मण**—त्यानें गोकुळांत चोऱ्या केल्या, आहे तुम्हाला कबूल ?

**श्रीखंड्या**—कबूल. पण कसल्या चोऱ्या ? क्रोधाच्या अर्गळा काढल्या, भ्रांतीचीं कवाडें उघडून अज्ञानाच्या खिळा काढल्या. मायेचीं कुलपें तोडलीं. दंभाचे डेरे फोडिले. प्रपंचरूपी ताकाचा सडा केला. अहंकाराचा घुसळखांबा उपटून टाकिला. संचित हेंच शिळें लोणी त्याची धूळधाण केली. संकल्पविकल्पांचीं दुधाणीं फोडलीं. प्रारब्ध हेंच शिळें दहीं खाऊन टाकिलें. क्रियमाण जें दूध तें तोंडांत ओतून घेतलें सूचित आाणि दुश्चित या तुपाच्या घागरी भरलेल्या होत्या त्या बाहेर फेंकून दिल्या. गवळणींचीं मायेचीं वस्त्रें, द्वैताचीं लुगडीं होतीं, तीं फेडून टाकलीं. आपआपणाला विसरल्या. कृष्णरूपीं मिळून गेल्या. याला चोरी ह्मणणें ह्मणजे कापराच्या काजळीनें आकाशाला काजळाचीं पुटें देत बसणें अथवा मृगजळांत तारूं हाकारण्याप्रमाणें आहे.

**ब्राह्मण**--कायहो, तुम्हाला इतकें ज्ञान कसें प्राप्त झालें हो ?

**श्रीखंड्या**—नाथमहाराजांच्या संगतीनें. दुसरें काय ?

**ब्राम्हण**—बरें पण कृष्ण व्यभिचारी नाहीं, हें मला सिद्ध करून दाखवाल काय ?

**श्रीखंड्या**--जळचरांना ज्याप्रमाणें महासागराचा अंत लागत नाहीं, मशकाला ज्याप्रमाणें आकाश आक्रमून जातां येत नाहीं अथवा गर्भ ज्याप्रमाणें आपल्या मातेच्या वयाला जाणत नाहीं, त्याप्रमाणें प्रत्यक्ष महर्षींना ज्या परमेश्वराचा पत्ता लागत नाहीं, ज्यानें बाळपणचीं कोमलता नष्ट झाली नाहीं तोंच म्हणजे पांच वर्षांचा असतां

ही पृथ्वी निर्दानवी केली, त्याला व्यभिचारी कसें म्हणावें ? कृष्णाविषयीं भागवतांत असें लिहिलें आहे.

### ओव्या.

ज्या बाणांचा पिसारा ॥ लागतांचि पैं भेदरा ॥ तापसीं घेतला पुरा ॥ सोडोनि घरदारा पळाले ॥ १ ॥ तैसे सोळासहस्र बाण ॥ अखंड तुजवरी अनुसंधान ॥ करिता न मळे बोध जाण ॥ अति विंदान हें तुझें ॥ २ ॥ घरींच्या स्त्रिया सहस्रसोळा ॥ गोकुळादि मथुरेच्या अबळा ॥ तुज विषयी करावया गोपाळा ॥ नव्हती सकळा समर्था ॥ ३ ॥ त्यांचेनि तुज न करवेचि विषयी ॥ परी त्या त्वां केल्या निर्विषयी ॥ ऐसा तूं त्रैलोक्याचे ठायीं ॥ स्वामी पाहीं श्रीकृष्ण ॥४॥

**ब्राह्मण**—मग महाराज, रासक्रीडेंत काय आहे हो ? जेथें शंकर मृदंग वाजवितात आणि इंद्रादि सुरगण पुष्पवृष्टि करितात ? मग हें सर्व मिथ्याच ह्मणावयाचें ?

**श्रीखंड्या**—ऐका महाराजः—

### ओंव्या.

रासक्रीडा गोपिकांप्रती ॥ कोणी ह्मणेल कामासक्ती ॥ तेथ कामाची कैची प्राप्ती ॥ ऐक निश्चिती उद्धवा ॥ १ ॥ जेथ क्रीडे आत्माराम ॥ तेथ केवी रिघे बापुडा काम ॥ माझेनि कामें गोपिका निष्काम ॥ कामसंभ्रम त्या नाहीं ॥२॥ विषयबुद्धि तें मुख्य अज्ञान ॥ तें असतां मी न भेटे जाण ॥ असतां वेदोक्त जाणपण ॥ तेणेंही संपूर्ण न भेटे मी ॥ ३ ॥

**ब्राह्मण**—मी ह्मणतो एवढा जो गोपींना अधिकार आला त्याअर्थी त्या कोणी तरी महान भक्त असल्या पाहिजेत ?

**श्रीखंड्या**— ओंव्या.

त्या जाण वेदगर्भींच्या श्रुती ॥ श्रुतिरूपें नोव्हे माझी प्राप्ती ॥ तै परतल्या ह्मणोनि नेति नेती ॥ माझी सुखसंगती न पवेची ॥ १ ॥ यालागी गोपींची कामासक्ती ॥ म्यांची आणूनी निष्काम स्थिती ॥ त्यांसी दिधली सायुज्य मुक्ती ॥ जाण निश्चिती उद्धवा ॥२ ॥ म्यां गोपीकासी काम केला ॥

कीं निःशेष काम त्यांचा हरिला ॥ न विचारितां या बोला॥
कृष्ण व्यभिचरला मूर्ख ह्मणती ॥ ३ ॥

**ब्राम्हण**--हर हर ! आह्मी अज्ञानजन त्या अनंत अद्वय निर्विकल्प प्रभूला किती तरी ग्राम्य आणखी अश्लील दृष्टीनें पाहतों !

**श्रीखंड्या**—कपिलगीतेंतील तृतिय प्रसंग काय आहे बरें ? आत्मा हाच कृष्ण, सद्भाव हा नंद, प्रवृत्ति ही यशोदा, निवृत्ति ही देवकी, देह हें गोकूळ, धैर्य हें अंगण, विकल्प हे दैत्य, अविद्या ही पूतना, अनुहत ही मुरली, दया, क्षमा, शांती ह्या गोपिका, त्रिकूट हें वृंदावन, उन्मनी ही राधा, आणखी आदिमाया ही रुक्मिणी. सारांश भगवान् श्रीकृष्ण पूर्ण निर्विषयी असून त्यांनीं सकाम गोपिकांस देखील निष्काम केलें. राधाकृष्णाचें प्रेम ह्मणजे भजकभज्याचें, आत्मापरमात्म्याचें, अथवा जीवशीवाचें प्रेम ! भक्ताच्या अंतःकरणांत राधेच्या प्रेमाची ज्योत प्रकाशते तेव्हां चित्प्रकाश व भगवत्साक्षात्कार तेथें सहज होतो. या परम मंगल प्रेमास विषय मानणारे लोक अत्यंत हतभागी समजले पाहिजेत.

**ब्राम्हण**--या तुमच्या भाषणानें माझ्या हृदयांत दिव्य प्रकाश पडला. आजपावेतों मी ह्मणजे या गोष्टींनीं परमेश्वराची महती कमी आहे असें बिलकुल समजत नव्हतों; परंतु आपल्या भाषणानें माझी संशयनिवृत्ति पूर्ण झाली.

**श्रीखंड्या**—अहो, कुब्जा काय सुंदर होती का ? ह्मणतात देव तिच्या ठायीं रत झाला ! ह्मणजे काय विषयासक्ती का ? जसा सुदामाच्या पोह्याला झटला, द्रौपदीच्या धांवण्या धांवला, प्रल्हादाकरितां स्तंभ फोडून बाहेर आला, तसाच तो कुब्जेकरितां धांवला. तिची भक्ति तिला कामास आली. गोकुळांत काय दुष्काळ पडला होता, किंवा श्रीकृष्णाला खावयाला मिळत नव्हतें ? ऋषिपत्न्या अन्न घेऊन गेल्या, ह्मणजे काय तर त्यांच्या भक्तीला देव भुलला. दुसरें काय ? पांडवांच्या बापाचें कांहीं तीन चवल लागत होता काय ? पण त्याचीं घोडीं धुतलीं. तस्मात् भक्तीशिवाय गोष्ट नाहीं.

**ब्राह्मण**—माझी आतां बालंबाल खात्री झाली. आतां कृपा करून मला त्या श्रीखंड्याकडे घेऊन जा. ह्मणजे माझे मनोरथ पूर्ण

होतील. आपण मला आज प्रत्यक्ष गुरुच भेटलां. कारण आपल्या कृपेनें आज मला परमेश्वर भेटणार आहे. ( उभयतां जातात. पडदा उघडतो. एकनाथ रामायणाची पोथी लिहीत बसला आहे. जवळ गिरजाबाई व गावबा उभे आहेत. श्रीखंड्या पुनः प्रवेश करतो. )

**एकनाथ**—अरे श्रीखंड्या, ऐन उन्हांतून पाणी आणूं नकोसरे. तुला किती वेळा सांगितलें ? आज उत्सवाला पाणी लागणार तरी किती, आणखी तूं आणणार तरी किती ?

**श्रीखंड्या**—झालें, आतां ही शेवटचीच खेप महाराज. आतां देवघरांत जाऊन गंध उगाळून ठेवतों ( जातो. )

**गिरजाबाई**—साऱ्या साऱ्या जन्मांत श्रीखंड्यासारखा मनुष्य पाहण्यांत कांहीं आला नसेल. ह्मटलें माझे मनांत याचें लग्न आपल्या घरीं व्हावें. इकडून कोणावर शब्द टाकला तर कोणीही मुलगी देईल.

**गावबा**—आणखी त्याच्याबरोबर माझ्याकरितां आपण शब्द टाकला तर–

**गिरजाबाई**—तुला थोडें शहाणपण येऊंदे.

**गावबा**—आणखी आठ पंधरा दिवस दम खातो, कारण सध्या फाल्गुनाचा महिना चालला आहे. आज वद्य षष्ठि आहे. फाल्गुनाचा महिना गेल्यावर शहाणपणाचा महिना येईल. ( ब्राम्हण प्रवेश करतो. )

**ब्राह्मण**—( एकनाथाच्या पायां पडतो. ) महाराज,

**गावबा**—( एकीकडे ) ही बहुतकरून श्रीखंड्याला नवरी चालून आली असावी असें मला वाटतें.

**एकनाथ**--कोठें असतां महाराज ? आपल्याला कशाची अपेक्षा आहे ?

**ब्राह्मण**—महाराज, आपला केवढा अधिकार ! भगवंताचें कीर्तन करण्याचे ऐवजीं आपल्यासारख्या भक्तांचें जरी नामस्मरण केलें तरी भवबंधन तुटून जाईल. कारण देव निराकारी, आणखी बिन नांवाचा; परंतु भक्तांनीं देवाला आकाराला आणून नामरूपाला आणिला. आपल्यासारख्या भक्तांनीं देवाची प्रतिष्ठा वाढवून त्याला

वैकुंठाला नेऊन बसविलें. आपल्या उपकाराचा देवाच्या मस्तकावर इतका भार झाला आहे कीं, देव आपल्या केवळ मुठींत आहे. प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण आपल्या घरीं श्रीखंड्या नांव धारण करून कावडीनें पाणी भरीत आहे ! त्यामुळें अष्टमहासिद्धि आपल्या घरीं राबत आहेत ! कृपा करून मला श्रीखंड्या ब्राह्मणास भेटवा.

**एकनाथ**--महाराज, काय ! बोलतां काय ! श्रीखंड्या ब्राह्मण प्रत्यक्ष श्रीकृष्णाची मूर्ति !

**ब्राह्मण**—यांत काय संशय ? मी द्वारकेहून आलों. मला जगन्माता आदिमाया श्रीरुक्मिणी देवी इनें काय सांगितलें आहे आपल्यास सांगतों. ( कानांत सांगतो. )

**एकनाथ**—हें काय मी ऐकतों आहें ! हें सत्य असेल काय ? श्रीखंड्याला हाक मारा. गावबा जारे. ( गावबा जातो. )

**गिरजाबाई**—काय बाई नवल ! मी अभागिणीनें त्याला किती तरी छळला ! नाना प्रकारचीं हलकीं सलकीं कामें त्याला करायला सांगितलीं ! पाणी तर तो आणीतच होता. छत्तीस वर्षे भगवान् आमच्या घरीं निरनिराळ्या रूपानें होते; परंतु वांझेला जसें पुत्रमुखाचें सुख नाहीं, अथवा जात्यंधाला जसा सूर्य दिसत नाहीं, तसें आह्मांला तें समजलें नाहीं. किती आह्मी हतभागी !! ( गावबा प्रवेश करतो. )

**गावबा**—महाराज, श्रीखंड्या पळाला ! त्याला पकडण्याबद्दल कोतवालाकडे वर्दी देऊं का ? आपल्या घरांतील त्यानें कांहीं नेलें नाहींना ? पहा बोवा.

**गिरजाबाई**--मी एकदा स्वतः पाहून येतें. आपल्या देखत तो आतांच कावड घेऊन देवघरांत गेला. आणखी म्हणाला झालें आतां पाणी ही शेवटचीच खेप. खरोखरच शेवटची. ( श्रीखंड्याला हांका मारीत जाते. )

**ब्राह्मण**--आतां कावड घेऊन गेलेला तर श्रीखंड्याचा स्नेही ! त्याचें नांव माधव असें त्यानें मला सांगितलें. तो ह्मणाला कीं मी श्रीखंड्याला धाडून देतों. तुम्ही किंचित् बाहेर उभे रहा असें त्यानें मला सांगितलें. बाहेर उभा राहून राहून मी कंटाळलों. मग मी आंत

आलों. एकूण तोच श्रीखंडया यांत कांहीं संशय नाहीं ! त्यानें मला ज्ञानाच्या गोष्टी किती तरी सांगितल्या. पण मला चतुर्भुज मूर्तीचें दर्शन झालें नाहीं. ( गिरजाबाई प्रवेश करते. )

**गिरजाबाई**—देवघरांत नाहींसा झाला. गंध उघाळावयाचें काम अर्धेंच टाकलें आहे. आणलेली कावड तशीच भरलेली आहे. नारायणा ! आम्ही किती अभागी ! आम्हा अनाथाला एकाएकीं सोडून गेलास असा आम्हीं तुझा अपराध तरी कोणता केला होता ? मला प्रत्यक्ष दर्शन झाल्याशिवाय मी अन्नग्रहण करणार नाहीं.

**एकनाथ**--भटजीबुवा, तुम्ही माझ्याबरोबर या.(उभयतां जातात.)

**गावबा**--श्रीखंड्या ठक विद्येंत खरोखर अट्टल आहे! मी एवढा महाठक, पण मला तूं ठकविलेंस. आईसाहेब मला असें वाटतें कीं, या भटजीला खूप मार द्यावा. या दुष्ट मनुष्यानें आपला सर्वस्वी घात केला ( ब्राह्मण व एकनाथ प्रवेश करतात. )

**ब्राह्मण**--शंख चक्र गदा पद्म लीलेनें हस्तांत धारण केलेलें आहे ! दैदीप्यमान् मुकुट मस्तकाच्या ठायीं विराजमान् झालेला आहे ! मकराकृति कुंडलें कानांत तळपत आहेत ! पिवळा पीतांबर, ज्याच्या तेजानें सूर्याला सुद्धां उणेपणा आणिला, तो प्रभू नेसलेले आहेत ! कंठाच्या ठिकाणीं कौस्तुभ आणखी वैजयंती, हृदयावर श्रीवत्सलांछन, असा सावळा सुंदर, मनोहर, वैकुंठराणा आज मला तुमच्या रूपेनें दिसला. माझें काम झालें. आतां मी जातों. ( जातो. गावबा व गिरजाबाई पडद्यांत जातात. एकनाथ त्यांना देवघरांत जावयास खूण करतो. )

**एकनाथ**--जो ब्रह्मादिकाला पूज्यमान, ज्याचे शिवादिक चरण वंदन करतात, अशा देवाला मीं आपल्या घरीं पाणी वाहावयाला लाविलें ! ज्याचें वर्णन करतांना वेदशास्त्रें पुराणें वेडीं झालीं, त्याला मीं आपल्या घरीं ब्राम्हणांचीं उष्टीं काढावयास लाविलें ! क्षीरसागरांत प्रभाकर बेटावर जो शेषावर शयन करणारा, अशा देवाला मीं नीचानें आपल्या घरीं बिछाने पसरण्याचें काम सांगितलें ! ज्याच्याकरितां योगीजन अष्टांग योगसाधनें करितात, त्याला मीं उपकर्णीं घासावयास लाविलें ! प्रचंड नदीनद्यांची केवळ जननीच,

वैराग्यसंपन्न मुनिजनांस परमपूज्य, आणि युगायुगांच्या ठायीं जिची प्रसिद्धि, अशी जी भागीरथी, ज्याच्या चरणापासून उत्पन्न झाली, त्यानें माझ्या घरीं ब्राम्हणजनकी करून पंक्तींत पाणी वाढलें! अठ्यायशीं सहस्र ऋषि ज्याचें अर्चन करितात, त्याला सहाणेवर गंध घासावयास लाविलें! लक्ष्मीसहित अष्टमहासिद्धि ज्याच्या दासी आहेत, अशा पांडुरंगाला मी आपल्या घरीं फुलांचे हार गुंफावयाला लाविलें! ज्याच्या तेजानें चंद्र सूर्य तारे प्रकाशमान होतात, अशा प्रभूला दिव्यांच्या वाती सारण्यास लाविलें! प्रथम विठ्ठल नाम धारण करून बारा वर्षें माझ्या मागें ध्रुपद धरिलें, नंतर केशव नांव धारण करून बारा वर्षें भागवत श्रवण केलें, आणखी आतां बारा वर्षें कृष्ण श्रीखंड्या नांवानें ब्राह्मणजनकी केली! किती मी दुष्ट!! देवाला किती कष्टविलें! आतां या लोकीं राहून काय करावयाचें आहे!( मूर्छित पडतो. गावबा व गिरजाबाई प्रवेश करतात. )

**गावबा**—महाराज, काय मी धन्य! केवढी माझी पुण्याई! आज मला आपल्या रूपेनें प्रत्यक्ष भगवंतांचें दर्शन झालें. मी आणखी आईसाहेबांनीं चरणावर लोळण घेतली.

**एकनाथ**--( सावध होऊन ) तुह्मांला देव कसा दिसलारे? ( एकनाथ गावबाचे मस्तकावर हात ठेवतो. )

**गिरजाबाई**—आकाशाच्या रंगाप्रमाणें अथवा निळ्या कमळाप्रमाणें शरीराचा वर्ण होता! प्रसन्नवदन होतें! पाहिल्याबरोबर अंतःकरणांत आनंदाचें भरतें येऊन नेत्रावाटे अश्रूंचे पूर वाहूं लागले! कमळाच्या पाकळ्याप्रमाणें नेत्र विशाळ होते! भाषण करतांना हिऱ्याच्या ज्योतीप्रमाणें दांत झळकत होते! ओंठ पोंवळ्याप्रमाणें आरक्त होते! कारे गावबा, तुला भगवंतांनीं चारी भुजा पसरून आलिंगन दिलें! तूं सांग तर भगवंताचें स्वरूप कसें होतें?

गावबा— **ओव्या.**

**जैशीं विशाळ कमळदळें ॥ तैसे आकर्णान्त दोन्ही डोळे॥ भिंवया रेखिल्या काजळें ॥ तैसी रेखाकळे धनुष्याकृति ॥१॥ कपाळ मिरवत सावळें ॥ त्याहीवरी चंदन पिवळें ॥ माजी कस्तुरीचीं द्वयअंगुळें ॥ कुंकुममेळे अक्षता ॥ २ ॥ दीर्घ ना-**

शिक आणि कपाळ ॥ लखलखीत गंडस्थळें ॥ मुख सुकुमार कोंवळें ॥ अधरप्रवाळें आरक्त ॥ ३ ॥ जैशा हिऱ्यांच्या ज्योती ॥ कीं दाळिंबबीजांची दीप्ति ॥ तैशी मुखामाजी दंतपंक्ती ॥ दशन झळकती बोलतां ॥ ४ ॥ समान कर्ण दोन्ही सधर ॥ स्फुरत्कुंडलें मकराकार ॥ स्मितहस्य मनोहर ॥ ग्रीवा सुंदर कंबु जैशी ॥ ५ ॥

**एकनाथ**—अरे तुला श्रीगणेशायनमः लिहितां येत नव्हता, आणखी तूं तर एकदम कवित्व बोलूं लागलास ! हा परिणाम कशाचा झाला कळलें कां तुला ?

**गावबा**—महाराज, आपण मस्तकावर वरदहस्त ठेविल्यावर माझ्यासारख्या मूढाला ज्ञानप्राप्ति झाल्याशिवाय राहील काय ?

**एकनाथ**—हा परिणाम माझ्या हाताचा नाहीं. तुला आतां देवघरांत ज्यानें प्रेमानें जवळ घेतलें, तुझें मुख कुरवाळिलें, तुला कैवल्याचा अधिकारी केलें त्याचा हा परिणाम आहे.

**गावबा**—

### ओव्या.

कैवल्याचा अधिकारी ॥ मोक्षाची सोडीबांधी करी ॥ कीं जळाचिये परी ॥ तळवट घे ॥ १ ॥ ह्मणोनि गा नमस्कारू॥ तयातें आह्मी माथां मुकुट करूं ॥ तयाची टांच धरूं ॥ हृदयीं आह्मी ॥ २ ॥ तयाचिया गुणांचीं लेणीं ॥ लेववूं आपुलिये वाणीं ॥ तयाची कीर्ती श्रवणीं ॥ आह्मी लेऊं॥३॥ तो पहावा हे डोहळे ॥ ह्मणोनि अचक्षुसी मज डोळे ॥ हातींचेनि लीलाकमळें ॥ पूजूं तयातें ॥ ४ ॥ दोंवरी दोनी ॥ भुजा आलों घेऊनी ॥ आलिंगावया लागुनी ॥ तयाचें आंग ॥५॥

एवढा अधिकार जर भगवान् आपण होऊन आपल्यासारख्या संतांना देतो आहे, तर मी असें समजतों कीं, देवानें दिलेल्या आलिंगनापेक्षां आपल्या हाताच्या ठिकाणीं जास्त गुण आहे असें समजलें पाहिजे.

**गिरजाबाई**—आतां हा कवि झाला. याची कल्पना वाटेल तशी धांव मारते. कवि हे ब्रह्मदेवापेक्षां जास्त आहेत. कसे ह्मणाल तर ब्रह्मदेवाच्या कृतींत मुख तें मुखच, कमल तें कमलच, असा नियम आहे. पण कवीच्या सृष्टींत मुखाचें कमल, कमलाचें मुख,

चंद्राचें मुख, नाक ह्मणजे चांपेकळी नाहीं तर पोपटाची चोंच, ओंठ ह्मणजे पोंवळें, दांत ह्मणजे मोतीं, भिवया ह्मणजे धनुष्यें, डोळे ह्मणजे माशाचा आकार नाहीं तर कमळाच्या पाकळ्या, असें पाहिजे तसें होतें. ह्मणून ह्मणतें ब्रह्मदेवापेक्षां कवींचें सामर्थ्य विशेष आहे. ( गावबा रामायणाची पोथी वाचीत बसतो. हातानें कांहीं ओव्या लिहितो. )

**एकनाथ**—( गिरजाबाईला एकीकडे बोलावून ) आतां आपल्याला या लोकीं राहून काय करावयाचें आहे ? सद्गुरूच्या आज्ञेप्रमाणें भागवत धर्माचा प्रसार आपल्याच्यानें झाला इतका आपण केला.

**गिरजाबाई**—आपल्यामागें आपण स्थापन केलेले जन्माष्टमीचे उत्सव, फाल्गुन वद्य षष्ठीचा उत्सव, दुसरे भजनकीर्तनाचे सोहाळे चालणार कसे ? हरि पंडिनाला काशीहून बोलावितां काय ?

**एकनाथ**--मला वाटतें तुला अजून मायेचें भ्रांतिपडळ आहे. अगे, हरिपंडित आपला मुलगा, आणखी हा गावबा दुसऱ्याचा, हा भेदाभेद हवा कशाला ? तो काय देतो आणखी हा काय अंतरतो !

**गिरजाबाई**—मला मुळींच मायेचे भ्रांतीचें पडळ नाहीं. इतकीं वर्षें संगतीला असून मला एवढें कळेना कीं काय कीं, मुलेंबाळें म्हणजे धर्मशाळेंत चार दिवस वस्तीला आलेले वाटसरू. वाटसरू निघून गेल्याचें दुःख जसें धर्मशाळेला नाहीं, किंवा दोनप्रहरच्या सावलीला घटकाभर बसलेलीं गुरें उठून गेल्याचें दुःख जसें आम्रवृक्षाला नाहीं, तसेंच मी या लोकींचें वास्तव्य समजतें. माझ्याकडून बरोबर येण्याची तयारी आहे.

**एकनाथ**–आपण फार गुप्त रीतीनें आपलें प्राणोत्क्रमण करावें असें मला वाटतें. नंतर हा गावबा जाऊन गांवांत बातमी कळवील. आणखी धर्माधिकारी येऊन अग्निसंस्कार देतील.

**गिरजाबाई**—पण आपण आरंभिलेल्या रामायणाची व्यवस्था काय ? ग्रंथ समाप्त होण्याच्या अगोदर आपल्याला जाणें योग्य दिसतें काय ?

**एकनाथ**—युद्धकांडाचा हा चव्वेचाळीसावा अध्याय समाप्त झाला. पंचेचाळीसाव्या अध्यायाची रचना गावबा करील. गावबा, चार पांच ओव्यांची रचना करून दाखीव म्हणजे इची खात्री होईलरे

**गावबा**--महाराज, माझी पहिली वतनदारी मूर्खपणाची, परंतु आपलें उच्छिष्ट भक्षण करून या बुद्धीला कांहीं कांहीं प्रेरणा उत्पन्न झाली आहे. आपल्यासारखी प्रसादयुक्त अक्षरें माझ्या लेखणींतून कशीं निघतील ?

ओव्या.

श्रीसद्गुरु रामचंद्रायनमः ऐसें बोलतां हनुमंत ॥ संतोषला श्रीरघुनाथ॥ स्वानंदसुखें डुल्लत॥ पाठी थापटीत कपीची ॥१॥ सवेंचि बोले रघुराजा ॥ सवेग उठी पवनात्मजा ॥ शीघ्रकरोनि यावें काजा ॥ बंधुराजा उठवावे ॥ २ ॥ स्वस्थ असो तुझें चित्त ॥ स्वस्थ असो तुझें जीवित॥ अंगप्रत्यंग समस्त ॥ कपिनाथ निजविजयी ॥ ३ ॥ स्वस्ति असो तुजलागीं ॥ कल्याण असो सर्वांगीं ॥ सर्वदा विजयी जगीं ॥ तनुसर्वांगीं सुदृढ॥४॥ हनुमंता होई चिरंजीवी ॥ तैंही जीवित्व ज्ञानानुभवी॥ ज्ञान विज्ञान पदवी ॥ तुझेनी व्हावी जगासी ॥ ५ ॥ आतां मी तुज देवों आशीर्वाद ॥ तंव पूर्वींच तुझें बळ अगाध ॥ प्रतापकीर्ति अतिप्रसिद्ध ॥ ऐक सावध सांगेन ॥ ६ ॥ बाळपणीं आकळिला भानु ॥ तंव वज्रें इंद्रें हाणितला हनु ॥ हनुमंत हें नामाभिधानु ॥ तैंपासून तुज जालें ॥ ७ ॥ त्या रवीच्या धांवण्यासीं ॥ आले लोकपाळ वेगेसीं ॥ ख्याति लाविली तयांसीं ॥ ऐक सावकाशीं सांगेन ॥८॥ कुंठित जालें इंद्रवज्र॥ शिवाचा शूळ जाला चूर ॥ वरुणाचे पाश समग्र॥ चकचूर पै जाले ॥ ९ ॥ तुज न बाधी वरुणपाश ॥ दुसरा आश्रमी आश्रम पाश ॥ तिसरा कर्माचा कर्मपाश॥ तुज वीरेशा बांधीना ॥१०॥

**एकनाथ**—वाहावा ! फार चांगलें. एका दिव्यानें मालविलेला दुसरा दिवा लाविला तर पहिला कोणता हें कोणालाच सांगतां येणार नाहीं; त्याप्रमाणें माझ्या काव्यांत आणखी तुझ्या काव्यांत भिन्नता दिसणार नाहीं. गावबा, तूं जाऊन धर्माधिकाऱ्यांना मीं बोलाविलें आहे ह्मणून सांगून घेऊन ये. त्यांना ह्मणावें आमचा प्रयाणकाल येऊन ठेपला. आपल्यास तावडतोब बोलाविलें आहे.

( गावबा जातो )

## अभंग.

**कानीं घालुनीयां बोटें नादजे पाहावे ॥ न दिसतां जाणावें नऊ दिवस ॥ १ ॥ भोंवया पाहातां न दिसे जाणा ॥ आयुष्याची गणना सात दिवस ॥ ध्रु० ॥ डोळां घालोनीयां बोट चक्रजें पाहावें ॥ न दिसतां जाणावें पांच दिवस ॥ २ ॥ नासाग्राचें अग्र न दिसे नयनीं ॥ तरी तेंची दिनीं ह्मणा रामकृष्ण ॥ ३ ॥ ज्ञानदेव ह्मणें हें साधूचें लक्षण ॥ अंतकाळीं आपण पहावेगीं ॥ ४ ॥**

याप्रमाणें मला आतां माझ्या नाकाचा शेंडा कांहीं दिसत नाहीं. अंतकाळ समीप आला जन्म आणि मृत्यु देहाला आहेत. आत्म्याला कांहीं नाहीं. तो सच्चिदानंदघनस्वरूपी केवळ साक्षी या रूपानें आहे. भगवद्गीतेचा अर्थ ज्ञानेश्वर महाराजांनीं देशी भाषेंत तेराव्या शतकाच्या आरंभींच केला. भक्तिमार्ग वाढावा, गीर्वाण भाषेचा गंध नसणाऱ्या हजारों ब्राह्मणांचा व दरोबस्त ब्राम्हणेतरांचा उद्धार व्हावा म्हणूनच ज्ञानेश्वर अवतरले. इतकें जरी झालें तरी भागवत धर्माचें तत्व महाराष्ट्रमंडळांतील आबालवृद्धांस व अचांडाळ लोकांस कळलें नाहीं. एवढ्याकरितांच मी नित्य भागवताचें पुराण सांगितलें. कोणत्याही जातीचा पुरुष असला आणखी त्याला संस्कृताचा गंधही नसला तरी त्यानें या मार्गानें आपला उद्धार करून घ्यावा. मीं स्वतः कांहीं नवीन सांप्रदाय घातला अशांतला प्रकार नाहीं. ज्ञानेश्वरासारख्यांचींच पावलें मी उमटवीत गेलों आहें. त्यांनीं श्रीशंकराचार्यांचा किता वळविला आहे. त्यांनीं जातिभेदावर जिवोद्धार अवलंबून नाहीं तर केवळ ज्ञानावर किंवा भक्तीवर अवलंबून आहे, या औपनिषद् सिद्धांताचाच जीर्णोद्धार केला आहे. वेदाचा अंत अर्थात् ज्याच्या पलीकडे वेद राहिला नाहीं, तोच वेदांत ह्मणतो कीं, कर्मकांड गहन मार्ग असून ब्रह्मज्ञान किंवा भक्ति हा सुलभ मार्ग आहे. मी कोणत्याही रीतीनें शास्त्रातिक्रम केलेला नाहीं. ( गिरजाबाईस उद्देशून ) का, तुमची प्रयाणाची तयारी आहे किंवा कसें ?

**गिरजाबाई**—चंद्राची प्रभा चंद्राबरोबर. कमलपुष्पाचा सुवास

त्याच्याबरोबरच. दोन डोळे पण दृष्टि एकच. तशी मी कांहीं या चरणांपासून भिन्न का आहें? अथवा याच जन्मीं का आपल्याबगेचर आलें आहें? आणखी मृत्यु ह्मणजे काय? सूर्यचंद्राला जसा उदय अस्त, अथवा दिवस आणखी रात्र, अथवा जागृति आणि निद्रा, यांचा आपल्यास नित्यशः अनुभव आहेच. मृत्यु ह्मणजे महानिद्रा, फरक ह्मणून एवढाच.

**एकनाथ**—मग आतां प्रयाणकालास उशीर नको. अंतकाळीं जनार्दन सद्गुरूचें नांव घे. जय जनार्दन! (दोघे मूर्छित पडतात. गावबा, धर्माधिकारी वगैरे कित्येक ब्राम्हण व सुवासिनी प्रवेश करितात.)

**धर्माधिकारी**—हरहर! हें आह्मी काय पहात आहों. उभयतां नवराबायको गेलीं आह्मांला टाकून! आज आपला त्राता नाहींसा झाला! आज भक्तिरूपी सूर्य अस्तास गेला! ही महापतिव्रता, आमच्या पैठण शहराचें सौंदर्य नष्ट झालें!

**पहिला ब्राह्मण**--नाथमहाराज, तुह्मी आह्मांला टाकून कोठें चाललांत? आह्मां अनाथांचा तूं नाथ होतास. नाथमंदिरांतील कीर्तनाचा आज शेवट झाला. भागवताचें पुराण आतां कोण सांगणार?

**दुसरा ब्राह्मण**—गरीब अंध पंगु दुबळे यांचा कनवाळू दयेचा सागर आज चालला! हरहर!!

**पहिला निंदक**—अहो, नानाप्रकारचे चमत्कार दाखविले. स्वर्गीचे ब्राह्मण श्राद्धाकरितां आणले. राण्या महाराच्या घरीं जेवतांना पाहिला. इकडे स्वतःचे घरीं पुनः कायमच. अशीं दोन रूपें एकदम दाखविलीं. पुराण ऐकावयास प्रत्यक्ष गंगा येत असे. हरिपंडित त्यांचा मुलगा आपला बाप परान्न घेतो म्हणून त्यानें त्याच्या पुढील पत्रावळ ओढली, तों दुसरी आहेच. अशा हजार पत्रावळी उचलीपावेतों चाललें होतें. अशा तऱ्हेनें एका भाविक बाईचें सहस्रभोजन पार पाडिलें. चोरांची दृष्टि नष्ट झाली असतां त्यांना पुनः दिव्य दृष्टी दिली. पाषाणाच्या नंदीकडून गवत खावविलें. नंदीनें उंच उड्डाण करून गंगेंत धाडकन उडी घातली. ठेव ह्मणून एका गृहस्थानें आपल्याजवळचा परीस एकनाथाजवळ ठेवावयास दिला. तो चुकून

निर्माल्याबरोबर नदींत गेला. तेव्हां त्या ब्राह्मणास नदीवर नेऊन असंख्य परीस दाखविले! काशींत ब्राह्मणानें फेंकून दिलेला भागवत ग्रंथ गंगेनें हात वर करून झेलला! देवानें कावडीनें बारा वर्षें पाणी भरलें!

**दुसरा निंदक**--ही सर्व चमत्कारांची मालिका झाली. पण मी ह्मणतों, मरणाचा रस्ता सगळ्यांचा सारखाच कीं नाहीं? इतर लोकांप्रमाणें हे आतां आमच्याच खांद्यावर जाणार कीं नाहीं! जाणार ते जाणार आणखी सहकुटुंब जाणार!

**धर्माधिकारी**--(हात जोडून,) महाराज, जगाचा उद्धार करण्याकरितां आपण सगुण अवतार धारण केला. इतर लोकांप्रमाणें आपल्याला मरण न यावें अशी आमची इच्छा आहे. एवढी पूर्ण करावी. कृष्णदास लोले आपल्याला शरण आला. त्याचें आयुष्य अकरा दिवस आपण वाढवून त्यानें रचलेल्या रामायणाच्या युद्ध-कांडाची समाप्ति केलीत. तशाच रीतीनें याही वेळीं काळाला थांबवून भावार्थरामायण हा ग्रंथ सिद्धीस न्यावा, म्हणजे आम्हां सर्वांना संतोष होईल. (एकनाथ व गिरजाबाई उठून बसतात, सर्वत्र नामाचा जयघोष करितात.)

**एकनाथ**—आपलें कवित्व आपण सिद्धीला नेण्याबद्दल का-ळाला थांबविणें हें अगदीं अश्लाघ्य आहे. आमच्यामागें गावबा ग्रंथाची समाप्ति करील. गावबाला लेखणी अर्पण केलेली आहे. आतां तुम्ही म्हणतां आम्हांस खांद्यावर सहकुटुंब न्यावें लागेल त्यास आम्ही आपल्या पायांनींच गंगेंत प्रवेश करतों. गंगेच्या पवित्र उदकांत उभयतां समरस होऊन जातों. चला उठा.

(लोक एकनाथास तुळशीचे व फुलांचे हार घालतात, सर्वांस बुका लावि-तात, गिरजाबाईस सुवासिनी हळदकुंकू देतात, खणांनारळांनीं ओटी भर-तात, विठ्ठल नामाचा गजर होतो. पडदा वर जातो. नदीचा देखावा दि-सतो. नामस्मरणाचे गजरांत एकनाथ व गिरजाबाई नदींत कमरे इतक्या पाण्यांत प्रवेश करितात.)

## अभंग.

**हरि ह्मणा बोलतां हरि ह्मणा चालतां ॥ हरि ह्मणा खेळतां बाळपणीं ॥ १ ॥ ह्मणा हरिनाम पुरती सकळ काम ॥ हरि-**

नामें ब्रह्म हातां चढे ॥ २ ॥ हरि ह्मणा उठतां हरि ह्मणा बैसतां ॥ हरि ह्मणा पाहतां लोकलीला ॥ ३ ॥ हरि ह्मणा आसनीं हरि ह्मणा शयनीं ॥ हरि ह्मणा भोजनीं ग्रासोग्रासीं ॥ ४ ॥ हरि ह्मणा जागतां हरि ह्मणा निजतां ॥ हरि ह्मणा झुंजतां रणांगणीं ॥ ५ ॥ हरि ह्मणा येकटी हरि ह्मणा संकटीं ॥ हरि धरा पोटीं भावबळें ॥ ६ ॥ हरि ह्मणा हिंडतां हरि ह्मणा भांडतां ॥ हरि ह्मणा कांडितां साळीदाळी ॥ ७ ॥ हरि ह्मणा देतां हरि ह्मणा मागतां ॥ हरि ह्मणा गातां पदोपदीं ॥ ८ ॥ हरि ह्मणा देशीं हरि ह्मणा परदेशीं ॥ हरि ह्मणा अहर्निशीं सावधान ॥ ९ ॥ हरि ह्मणा जनीं हरि ह्मणा विजनीं ॥ एका जनार्दनीं हरी नांदे ॥ १० ॥

बाबानों, कलियुगांत नामाशिवाय तरणोपाय नाहीं. सर्वांभूतीं दया ठेवा. नवविधा भक्ति करा. चौऱ्यायशीचा फेरा चुकेल. माझ्या वचनावर विश्वास ठेवा. नाहीं तर फसाल. दारांत तुळशीवृंदावन असावें. अतिथीचें पूजन करावें. संताला शरण जावें. कंठांत तुळशीची माळ मिरवावी. एकादशी व्रत करण्यास चुकूं नका. रात्रौ हरिकीर्तन करा. द्वादशीस क्षिरापत करा. वैष्णवाच्या भक्तीचीं हीं लक्षणें आहेत गीता–ज्ञानेश्वरी–भागवत ह्यांचें नेहमीं पठण मनन करावें. शुभाशुभ प्रसंग प्रारब्धाचे आघात आहेत असें समजावें. सर्व कर्मे कृष्णार्पण करावीं. संसाराविषयीं काळजी बाळगूं नका. तो क्षणभंगुर आहे. पुत्रशोकानें किंवा पत्निवियोगानें दुःख करूं नका. रस्त्यांत किंवा नावेमध्यें जसे बारा घरचे बाराजण मिळतात, परंतु एकमेकाबद्दल सुखदुःख मनांत न आणतां परस्पराविषयीं उदासीन असतात, त्याचप्रमाणें या भासमान संसाराविषयीं बारशाच्या वेळीं व बाराव्याच्या वेळीं चित्तवृत्ति सारखीच ठेवा. दृष्टीचा उपयोग देवाच्या दर्शनाकडे अथवा संतांच्या दर्शनाकडे करा. संताच्या आलिंगनानें शरीर पवित्र करा. चरणांचा उपयोग संतसमागमें चालण्याकडे अथवा तीर्थयात्रा करण्याकडे अथवा हरिकीर्तनाला जाण्याकडे करा. नीच लोकांपुढें लांगुलचालन करून जें नृत्य करतां त्यापेक्षां हरिरंगीं नाचाल तर चरणाचें सार्थक होईल. हातांचा उपयोग

पांडुरंगाची पूजा करण्याकडे आणि सत्याचीं धर्म करण्याकडे करा. नाहीं तर जडित मुद्रांच्या योगानें हाताला शोभा येणार नाहीं. प्रेताला अलंकार घातल्याप्रमाणें होणार आहे. नामस्मरणाच्या योगानें वाचेचें सार्थक करा. त्याच्याशिवाय मिथ्यावाद कराल तर हागवण लागल्याप्रमाणें व्यर्थ बडबड आहे. तात्पर्य नानाप्रकारें गद्य-पद्य स्तवनांच्या योगानें पांडुरंगाची स्तुति करावी. भागवत धर्म ह्मणजे परमेश्वराची भक्ति. भक्तीशिवाय कर्मधर्म भ्रम आहे. भक्तीशिवाय सत्यवादीपणा गर्भांधाप्रमाणें आहे भक्तीशिवाय दयेची थोरवी मिरविणें ह्मणजे सौंदर्ययुक्त स्त्रीस नवरा नसल्याप्रमाणें आहे. भक्तीशिवाय विद्वत्तेचा टेंभा मिरविणें ह्मणजे चंदनाचा भार पाठीवर घेतलेल्या गर्दभाच्या गायनाप्रमाणें आहे. भक्तीशिवाय शरीर पोषण करून जें तप तें केवळ पूर्व अदृष्टाप्रमाणें पाप भोगणें होय. भक्तीशिवाय जीं अन्य साधनें तीं कोशकीटकानें केलेल्या बंधनाप्रमाणें होत. सारांश भक्तीशिवाय सर्व गोष्टी अप्रमाण होत. तुमच्या हिताकरितां आह्मीं मृत्युलोकीं अवतार घेतला. येरवीं मी मायातीत चैतन्यघन परिपूर्ण असा आहें.

**धर्माधिकारी**--आतां स्वामींना पुनः केव्हां अवतार घ्यावा लागेल, हें जाणण्याची सर्वांची इच्छा आहे.

**एकनाथ**— **अभंग.**

**जें धर्माची वाट मोडे ॥ अधर्माची सीग चढे॥ तें आह्मां येणें घडे ॥ संसारस्थिती ॥ १ ॥ नानामतें आणि पाखंडें ॥ कर्मठता अतिबंडें ॥ त्यांची ठेसावीं तोंडें ॥ हरिभजनेंकरूनियां ॥ २ ॥ जें जें हरिलीलाचरित्र ॥ तें तें माझेंचि स्वतंत्र ॥ देव भक्त एकत्र ॥ भेद नाहीं दोघांतें ॥ ३ ॥ जो जो अवतार हरी धरी ॥ तो तो मीच अवधारी॥ हरिनामें करितो गजरी॥ जगदुद्धाराकारणें ॥ ४ ॥ सर्वांभूतीं भगवद्भावो ॥ हा भक्तीचा निजनिर्वाहो ॥ धर्माचा अनुग्रहो ॥ वाढवावयालागीं ॥५॥ सर्वांभूतीं दया शांती॥ प्रतिपाळावी वेदोक्ती ॥ हेंचि एक निश्चिती ॥ कारणें आह्मां लागतें ॥ ६ ॥ लीलाविग्रही भगवंत ॥ तया ह्मणती नित्य मुक्त ॥ आह्मी काय**

तेथें ॥ वेगळेंची असो पां ॥ ७ ॥ विश्वरूपीं सृष्टी ॥ अर्जुनातें दावी दिठी ॥ भिन्न भेदाची गोष्टी ॥ बोलों नये सर्वथा ॥ ८ ॥ वत्सा हरणीचें चारित्र ॥ वत्स गोवळे स्वतंत्र॥ पांवे पायतन कटिसूत्र ॥ आपणची जाहला ॥ ९ ॥ एका जनार्दनीं ॥ विश्वरूप गोविंद मानी ॥ भेद धरी तो मनीं ॥ निंद्याहुनी अति निंद्य ॥ १० ॥

सर्वत्रांस माझा प्रणिपात आहे. सर्वांना हात जोडून विनंती आहे कीं, या तुमच्या एकनाथाला विसरूं नका.

## आरती.

॥ अवलोकितां जन दिसे जनार्दन ॥ भिन्न भिन्न तेथें दावी अभिन्न ॥ अनेक एकत्वें दिसे परिपूर्ण ॥ ठकली मन बुद्धि ॥ तेथें कैंचे गुणागुण ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय जनार्दना ॥ परमार्थें आरती अभिनव भावना ॥ धृ० ॥ ज्योतीची ही ज्योती उजळोनियां दीप्ती॥तेणें तेजें केली सतेज आरती ॥ पाहतां पाहतें पण पाहवया स्थिती ॥ नुरेचि वेगळेपण देह भान स्फूर्ती ॥ २ ॥ उजळीते उजळण उजळाया लागीं ॥ वेगळेंपण कैंचें नुरेचि ते भोगी ॥ अंगें अर्पीलें अंगीचे अंगीं ॥ जीवशीवपण गेलें हरपोनि वेगीं ॥ ३ ॥ पाठीना पोटीं अवघा निघोट ॥ सर्वांचा देखणा सर्वांवरिष्ट ॥ इष्ट न अनिष्ट गुप्तना प्रगट ॥ अहं सोहं सगट भरिला घोट ॥ ४ ॥ सर्वथा दिसे परी नाकळे मना ॥ जें जें दिसे तें तें दर्शना जाणा ॥ अभाव भावेंसीं गिळिली भावना ॥ अभिनव आरती एका जनार्दना ॥ ५ ॥

( जनार्दन नामाचा उच्चार करून विठ्ठलनामाच्या जयघोषांत उभयतां गंगेंत समरस होतात. दिव्य प्रकाश पडतो. सुरगण विमानांतून नीलोत्पल-पुष्पांची वृष्टि करतात. )

समाप्त.

# श्रीतुकाराम

## किं० १२ आणे ट. १ आणा.

## अभिप्राय.

पारमार्थिक विषयावर हें नवीन नाटक झालेलें असून तें जनरुचीच्या ओघास नवीन वळण लावून देण्यास अंशतः तरी उपयोगी पडेल अशी आह्मांस आशा आहे. **केसरी.**

यांत श्रीतुकाराम यांच्या चरित्राचें वर्णन फार चांगलें साधलें आहे. केवळ शृंगारिक गोष्टीशिवाय इतर रसांच्या आश्रयानें लोकरंजन करण्याचा यांत प्रयत्न आहे. त्याबद्दल ग्रंथकर्त्याची तारीफच केली पाहिजे. **सुधारक.**

रा. शिरवळकर यांनीं नाट्यालंकार चढवून विशेष शोभा आणिली आहे. प्रवेशाची जुळणी संगतवार झाल्यानें प्रयोगाचे वेळीं या नाटकास सारखा रंग भरत जातो व त्याचा परिणाम प्रेक्षकांचे मनावर चांगला होतो या गुणाबद्दल रा. शिरवळकर हे स्तुतीस पात्र आहेत. **नेटीव ओपीनियन.**

रा. शिरवळकर यांचा हा प्रयत्न नवीन धर्तीचा असून तो नाटक या दृष्टीनें चांगलाच पार पडला आहे. रा. शिरवळकर यांनीं आपला प्रयत्न पुढें चालवावा अशी त्यांस आमची आग्रहानें सूचना आहे. **श्रीसयाजीविजय.**

" श्रीतुकाराम " नांवाचें नाटक वाचून वाचकांच्या मनावर फारच चांगला परिणाम होईल. निरनिराळ्या प्रसंगीं प्रकट झालेले उदात्त विचार वाचून कोणाचें मन सद्गदित होणार नाहीं! **काळ.**

रंगभूमीवर हा प्रयोग उत्तम होत असतो. त्याच्या दर्शनानें भक्तिभाव जागृत होतो म्हणून ह्या नाटकाच्या संबंधानें आमच्या महाराष्ट्राच्या वतीनें ग्रंथकाराचें फार फार अभिनंदन करितों. **इंदुप्रकाश.**

# पानपतचा मुकाबला

## किं. ८ आणे ट. १ आणा.

## अभिप्राय.

ऐतिहासिक नाटक या दृष्टीनें पाहिलें असतां या नाटकाची मराठींतील चांगल्या नाटकांत गणना करितां येईल. भाषा जोरदार व नाटकाच्या कालास शोभण्यासारखी आहे. अशा रीतीच्या ऐतिहासिक नाटकाचे प्रयोग होतील तर पूर्वजांचा अभिमान जागृत होऊन अनायासें करमणूकही होईल. **केसरी.**

ऐतिहासिक नाटकें आमच्या मराठी भाषेंत अजून फारशीं झालेलीं नाहींत. त्यांतही इतिहासाला फारसें न सोडितां रचलेलीं नाटकें फारच थोडीं. अशा दृष्टीनें पाहतां प्रस्तुत नाटक हा एक योग्य दिशेनें झालेला चांगला प्रयत्न आहे. **सुधारक.**

वीररसयुक्त अशी भाषा लिहिण्याची हतोटी तुह्मांस चांगली साधली आहे. प्रयत्न वाखाणण्यासारखा आहे **न्यायमूर्ति रानडे.**

त्याकाळीं हिंदु स्त्रियांत जी थोरवी व स्वाभिमान व स्वधर्मपरायणता होती, तिची ओळख सध्याच्या काळच्या मुलांस ह्या पुस्तकापासून फारच चांगली होणार आहे. मीं ह्यांतले कांहीं कांहीं भाग पुनः पुनः वाचले तरी प्रत्येक वेळेस डोळे भरून येत.

**प्रो. जिन्सीवाले.**

सोनपतपानपतच्या शोकपर्यवसायी घोर प्रसंगाचे हें एक हुबेहुब चित्र असून, तें रंगभूमीवर आणून हल्लींच्या लोकांच्या मनावर आपल्या पूर्वजांचें शौर्य, धैर्य, मर्दुमकी व त्यांजवर आलेले अनेक घोर प्रसंग, यांचा ठसा उठविण्याचे कामीं तें फार उपयोगी पडेल अशी माझी खातरी आहे. **डाक्तर गर्दे.**

पत्ता-**वासुदेव रंगनाथ शिरवळकर** कसबा पेठ नं. २१० पुणें